
ISBN 978-81-939072-3-8



# शरद पवार

डॉ. पवन मांडवकर













डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र, कळंब, जि. यवतमाळ

ISBN 978-81-939072-3-8
Published by a Government Recognized National Level
Publisher under Peer Review System

शरद पवार यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मांडणारा ग्रंथ

# शरद पवार

डॉ. पवन मांडवकर

डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५ ४०१
**भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८ / ९४०३०१४८८५**
E mail : marathipradhyapak@gmail.com

***सहयोगी वितरक***
सेवा प्रकाशन
'पद्मनिलया', ४२, शिवाजी नगर, यवतमाळ ४४५ ००१

सेवा प्रकाशन
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४ ६०६

मूल्य तीनशे रुपये

ISBN 978-81-939072-3-8
❒ शरद पवार (Sharad Pawar)
❒ © डॉ. पवन मांडवकर (© Dr. Pavan Mandavkar)
❒ ग्रंथाचा प्रकार – अनुभव/आठवणी/माहितीपर
(Experiences/Memories/Informative)
❒ प्रकाशन क्रमांक १८
❒ प्रथमावृत्ती दि. १२ डिसेंबर, २०२०
(शरद पवार यांचा ८० वा जन्मदिन)
❒ आकार १/८ क्राऊन
❒ पृष्ठसंख्या २८८ ❒ प्रती १०००
❒ मुखपृष्ठ – फोर कलर – डॉ. पवन मांडवकर
❒ लेखनस्थळ – अमरावती, कळंब, यवतमाळ
संकलन – १९९७ ते २०१९
लेखन कालावधी – २००७ ते २०१९
❒ प्रकाशक / मुद्रक / वितरक
डॉ.सौ. वीरा मांडवकर
डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
e mail: marathipradhyapak@gmail.com
भ्रमणध्वनी : ९४२२८६७६५८, ९४०३०१४८८५
❒ सहयोगी वितरक
१. सेवा प्रकाशन
'पद्मनिलया', ४२, शिवाजीनगर, यवतमाळ ४४५००१
२. सेवा प्रकाशन
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६
❒ मूल्य ३०० रुपये

# अनुक्रमणिका

मनोगत आणि पार्श्वभूमी / ८
विशेष आभार! / २७
शरद पवार / २९
पवार पॅटर्न / ४५
पंजाब समस्या आणि पवार / ४६

**मान्यवरांच्या नजरेतून शरद पवार**

सामान्यांना संधी देणारे समताधिष्ठित नेतृत्व / ५२
रचनात्मक कार्यदृष्टी आणि कार्यकर्त्यांची जपणूक / ५६
कार्यकर्त्यांचे चालते बोलते विद्यापीठ / ५९
कृतिशील नेता / ६१
शरद पवार आणि बबनराव पाचपुते / ६३
भटक्या-विमुक्तांना न्याय / ६८
कुलगुरूंच्या निर्णयाचा मान राखा / ७५
रामदास फुटाणे यांच्या नजरेतून पवार / ७६
शरद पवार आणि सुनील तटकरे / ७९
न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या लक्षात राहिलेले पवार / ८१
साहित्य, संस्कृती, इतिहासाची जाण / ८२
महाविद्यालयाला प्रतिष्ठा मिळवून देणारा विद्यार्थी आणि युवकांचा नेता / ८६
नव्याचा वेध घेत सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवणारे नेतृत्व / ९०
नेता घडविणारा नेता / ९५

**कलाकारांचे श्रद्धास्थान**
शरद पवार आणि लता मंगेशकर / ९७
शरद पवार आणि शाहीर साबळे / १०१
**विरोधकांचा मित्र**
प्रमोद महाजनांच्या नजरेतून पवार / १०३
जगन्मित्र शरद पवार / १०६
विरोधकांच्याही प्रगतीकार्याचा सन्मान करणारा विधायक दूरदृष्टीचा नेता / १०९
**सामाजिक बांधिलकी आणि समाजपरिवर्तनाचा ध्यास**
महिला हिताचे दृष्टे नेते / ११२
राजकीय सत्ता समाजपरिवर्तनासाठी वापरणारे डोळस नेतृत्व / ११४
सामाजिक बांधिलकी जोपासणारा नेता / ११७
मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर / ११९
हिंदू स्त्रियांच्या वारसाहक्काचा प्रश्न / १२०
किल्लारीच्या भूकंपानंतर पीडितांचे अश्रू पुसणारा नेता / १२१
'शारदा निकेतन' ची काळजी घेणारे पितृहृदय / १२३
**शेतकऱ्यांचा नेता आणि विज्ञान, जैवतंत्रज्ञानप्रेमी कृषीतज्ञ**
आश्वासनाशिवाय कामाची पूर्तता / १२५
समाजकारणी कृषीमंत्री / १२७
शेती, शेतकरी, महानोर आणि पवार / १२९
विज्ञान व जैवतंत्रज्ञान प्रेमी / १३५
भवरलाल जैन यांच्या नजरेतून / १३८
फलोत्पादन क्रांतीचे नेतृत्व / १४०

फळशेतीतील क्रांती / १४२
शेतकऱ्यांबद्दलची आत्मीयता / १४४
**क्रीडाप्रेमी, क्रीडा संघटक व कुशल क्रीडा प्रशासक**
क्रीडा नगरीचे शिल्पकार / १४५
कुशल क्रिकेट प्रशासक / १५०
आय.पी.एल.चे जनक / १५३
**जनसामान्यांसाठी झटणारा लोकनेता**
जनसामान्यांशी अतूट बांधिलकी / १५४
महिला हिताची जाण / १५७
कामगार हिताला प्राधान्य देणारे नेतृत्व / १५८
जनसेवेतून मोठा झालेला नेता / १६१
कठीण प्रसंगी परक्या देशात मदत / १६३
माणुसकी / १६७
आजारी मुलीला जीवदान / १६८
लोकोद्धाराचा आदर्श / १६९
**सहस्रपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी**
स्वास्थ्यसंकटातही असामान्य आत्मविश्वास / १७१
समस्यांचे निराकरण / १७५
मुंबई-पुणे प्रवासाची एक आठवण / १७६
विद्वत्तेची कदर / १८१
राजकारणापलीकडची माणुसकी / १८२
मॅक्सम्युलरच्या तत्त्वज्ञानातही रमणारा नेता / १८३
विचाराधिष्ठित नेतृत्व / १८४

विनोदाची दांडगी जाण / १८६
मराठीविषयी कमालीची आस्था / १८७

**मैत्रीची जाण ठेवणारा नायक**

द्रष्टा विचारवंत आणि अभ्यासू मित्र / १८९
मैत्री योग्य नेता / १९१
दिलदार वर्गमित्र / १९४
मैत्रीची जपणूक / १९६
एक मित्र / १९७

**मुलाखतींतून जाणवणारे व पत्रकारांना भावलेले शरद पवार**

सुधीर गाडगीळांना भावलेले पवारांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व / १९९
निगर्वी, कणखर सहधर्मचारिणी प्रतिभाताई पवार / २०१
लोकसत्ता आयडिया एक्स्चेंज 2011 आणि पवार / २०६
शरद पवार नावाचे कुतूहल / २१८

**दखलपात्र प्रसंग आणि पवारांचे गुणविशेष उलगडणारे उल्लेख**

लोकमतवरील हल्ला / २२३
1980च्या जळगाव-नागपूर दिंडीने पवारांच्या राष्ट्रीय राजकारणाला कलाटणी / २२५
‘तर मी पंतप्रधान असतो.... सोनियांना स्वतंत्र विचारांचा पंतप्रधान नको होता....’ / २२७
वाजपेयी सरकार केवळ एका मताने कसे पडले? / २३०
नेहरूंशी जवळीक आणि मुख्यमंत्री पद / २३१
वीजप्रवाह खंडित झाल्यावरही जनतेला मंत्रमुग्ध करणारा नेता / २३२
आचार्योपासनेचा आदर्श / २३२

शालेय जीवनातील शेतीकामाचा प्रसंग / २३४
समाजकारणात राजकारण नाही / २३५
कांद्यांचा हार / २३५
शंभर फुटी बाकही तोकडा / २३६
गणपतीपुळे पर्यटन केंद्राची प्रेरणा / २३७
लोग साथ आते गए और कारवाँ बनता गया / २३८
सक्षम नेतृत्वाची झलक / २३९
पदयात्रांनी सुजलेले पाय / २४१
गिळायला शिकले पाहिजे, ओकायला नाही / २४२
'लोक माझे सांगाती' / २४२
राष्ट्रपती आणि पंतप्रधान पवारांबद्दल काय म्हणाले? / २४४
पवार जेव्हा पूजा करतात... / २४५
'पुतना मावशी'चा उल्लेख आणि माफी / २४६
... आणि घाशीराम जर्मनीत पोचला / २४६
शंकरराव चव्हाणांचा सल्ला ऐकला असता तर बाबरी मशीद पडली नसती / २४७
एकुलती माझी लेक लाडकी! / २४९
विधानसभा निवडणूक 2019 सत्तासंग्रामाचे सेनापती शरद पवार / २४९
थोडक्यात शरद पवार / २५८
शरद पवार यांचा जीवनपट / २६९
पवारांनी केलेली उल्लेखनीय कामे / २७२
असा द्रष्टा नेता परत होणे नाही! / २७६

# मनोगत आणि पार्श्वभूमी

शरद पवारांना प्रथमत: भेटण्याचा योग आला, तेव्हा मी भारतीय वायुसेनेतील हवामान विभागात चंदिगढ येथे कार्यरत होतो. चंदिगढला एअर फोर्सचे नं. 12 विंग आणि नं. 3 बी.आर.डी. (बेस रिपेअर डेपो) आहेत. हे दोनही एअर फोर्स स्टेशन्स एकमेकांना लागून आहेत. 3 बी.आर.डी.मध्ये मुख्यत्वेकरून एम.आय.-8 आणि एम.आय.-17 हेलिकॉप्टरच्या मेन्टेनन्सचे काम चालायचे. माझी पोस्टींग 12 विंगमध्ये होती. नव्याने तयार करण्यात आलेल्या नं. 42 स्क्वॉड्रन आणि नं. 44 स्क्वॉड्रनसाठी 1 मार्च 1961 रोजी 12 विंग एअर फोर्स स्टेशन निर्माण करण्यात आले होते. 12 विंग ए.एफ. हे अत्यंत गौरवशाली इतिहास असलेले एअर फोर्स स्टेशन आहे. 1962 च्या चीन युद्धात ऑक्टो.-नोव्हें. महिन्यात याच बेसवरून लद्दाखसह हिमालयाच्या शिखरांवर आणि कठीण भौगोलिक स्थिती असलेल्या चिनी सीमेवर लढणाऱ्या सैन्यासाठी रसद पुरविली गेली. प्रचंड मोठ्या आकाराच्या आय.एल. 76 आणि ए.एन. 12 या ट्रान्स्पोर्ट एअरक्राफ्ट्ससाठी आणि एम.आय. 26 या महाकाय अशा हेलिकॉप्टरसाठी हा बेस होता. नंतर फायटर एअरक्राफ्ट मिग 21 आणि ए.एन. 32 या ट्रान्स्पोर्ट एअरक्राफ्ट्सचे स्क्वॉड्रन तिथे आले. चंदिगढवरून लेह, थॉईस, कार्गिल, श्रीनगर अशा उत्तर सीमेवरील बेसेसवर एअर ऑपरेशन चालते. सैनिकांच्या व बी.एस.एफ, सी.आर.पी.एफ.च्या तुकड्यांची ने-आणही चालते. सीमेवरील सैनिकांसाठी खाद्यपुरवठा करण्यासाठी दररोज पहाटे 4

च्या सुमारास पहिले आय.एल. 76 लेहकडे झेपावते. दिवसभर हा बेस व्यस्त तर राहतोच; पण प्रचंड आवाज करणाऱ्या वेगवान मिग 21 या फायटर विमानांसह वर उल्लेखित विमाने रात्रीसुद्धा नियमित सराव करायची आणि आजही करतात. शिवाय चंदिगढचे सिव्हिल एअरपोर्टसुद्धा भारतीय वायुसेनेचेचीच धावपट्टी वापरते. मात्र त्यांची स्वतंत्र इमारत एअर फोर्स स्टेशनच्या हद्दीबाहेर एका टोकाला आहे. सिव्हिलियन्सना नागरी विमानात बसणे व उतरणे याव्यतिरिक्त पुढे प्रवेश नसतो. या सर्वांचे ए.टी.सी. (एअर ट्रॅफिक कंट्रोल) व मेट सेक्शन (हवामान खाते) एकच आहेत आणि ते भारतीय वायुसेनेचे आहेत. नागरी विमानांना मार्ग दाखवण्याचे व वेदर रिपोर्ट आणि फोरकास्ट देण्याचे काम एअर फोर्सकडेच आहे. या अत्यंत व्यस्त अशा बेसवर मी 1988 ते 1993 या कालावधीत होतो. '24 तास ऑन ड्युटी' असलो तरी वैविध्यपूर्ण अनुभवसंपन्नतेच्या दृष्टीने माझ्या जीवनातील हा अत्यंत महत्त्वाचा काळ होता.

सेक्टरनुसार सुनियोजित शहर चंदिगढ ही हरियाणाची आणि पंजाबची राजधानी तर आहेच; पण तो केंद्रशासित प्रदेशही आहे. तिथे दोनही राज्यांच्या विधानसभा आणि केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासकीय कार्यालय आहे. येथे हरियाणा, पंजाब, चंदिगढ युनियन टेरिटरीच्या बसेस (ट्रान्सपोर्ट सेवा) तर चालतातच शिवाय दिल्ली, हिमाचल प्रदेश यांच्याही रोडवेजचा वावर मोठ्या प्रमाणावर आहे. एकंदरीत उत्तरेकडील सैनिकी ऑपरेशन्ससाठी

चंदिगढ हे जसे एंट्री गेट आहे, तसेच ते राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचे केंद्रस्थान आहे.

1991 चा हिवाळा सुरू होण्याच्या मार्गावर होता. ऑक्टोबरमधील एके दिवशी दिल्लीच्या पालम विमानतळावरून झेपावलेले भारतीय वायुसेनेचे ‘गजराज’ म्हणजेच ‘आय.एल. 76’ हे विमान सकाळी 8 च्या सुमारास 12 विंग एअर फोर्सच्या धावपट्टीवर उतरले. त्यातून मा. संरक्षण मंत्री, ज्यांनी नुकतीच जून महिन्यात पदाची सूत्रे हाती घेतली होती, असे श्री. शरद पवार उतरले. सोबत कोणताही लवाजमा नाही, कार्यकर्ते नाहीत. चंदिगढचे विमानतळ व धावपट्टी संरक्षण खात्याच्या अखत्यारीत भारतीय वायुसेनेची असल्याने इतर नागरिकांना प्रवेश नसतो. त्यामुळे स्वागताला बाहेरचे कोणीच नव्हते. व्ही.आय.पी. रूमपासून अवघ्या 100 मीटर अंतरावर टारमॅकवर विमान उभे झाले. व्ही.आय.पी. रूमच्या वर आमचा मेट सेक्शन (हवामान कक्ष) होता. उत्तरेतील थंडीमुळे शरद पवार राखाडी रंगाचे पूर्ण बाह्यांचे स्वेटर घालून होते. आमच्या ए.ओ.सी. (एअर ऑफिसर कमांडिंग) आणि दोन अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले आणि पायी पायी ते व्ही.आय.पी. रूममध्ये पोचले. काही मिनिटांच्या थांब्यानंतर त्यांना पंजाबमधील पाकिस्तान सीमेवरील अन्य ठिकाणी डॉरनिअर या आय.एल. 76 पेक्षा आकाराने छोट्या विमानाने जावयाचे असल्याचे कळले. आम्ही दोघेजण मेट असिस्टंट आणि दोघे-तिघे ए.एफ.एस.ओ. त्यावेळी ड्युटीवर होतो. आम्ही विनम्रतेने त्यांना अभिवादन केले. आमच्याकडे स्मितहास्य करीत त्यांनी बघितले

आणि हिंदीमध्ये आपुलकीने चौकशी केली. माझा परिचय देताच त्यांनी आनंदाने माझ्या वडिलांची म्हणजेच डॉ. भाऊ मांडवकरांची चौकशी केली व त्यांच्या 'कोलाम' या संशोधनपर ग्रंथाचा उल्लेखही केला. थोड्याच वेळात ते पुढील दौऱ्यासाठी रवाना झाले.

शरद पवार हे माझे वडील प्रसिद्ध साहित्यिक, संशोधक, अभ्यासक डॉ. भाऊ मांडवकर यांना ओळखतात व कुठे भेटले तर "काय भाऊ, सध्या काय लिखाण सुरू आहे?" अशी चौकशी करतात, एवढीच तेव्हा मला माहिती होती. माझे वडील बालभारतीचे बरीच वर्षे अध्यक्ष राहिले होते. साहित्य संस्कृती मंडळासह अनेक समित्यांवरही होते. विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले होते. साहित्य वाचस्पतीने सन्मानित होते. 'कोलाम' या आदिवासी जमातीचे मराठीतील प्रथम अभ्यासक आणि त्यावर ग्रंथ लिहून साठच्या दशकात मार्गदर्शकाविना पीएच.डी. मिळविणारे संशोधक होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ते आवडते शिष्य होते. विदर्भातले 100 पुस्तके लिहिणारे पहिले लेखक होते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी कळंब येथे ग्रामीण, आदिवासी भागातील गरीब विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय सुरू केले होते. बहुधा अशा विविध कारणांमुळे शरद पवार त्यांना ओळखत असावेत. मी जेव्हा भारतीय वायुसेनेत रुजू झालो, तेव्हा माझे वय 17 वर्षे होते. शिवाय तत्पूर्वी मी अमरावतीला आणि वडील सतत दौऱ्यांवर व महाविद्यालय सुरू केल्यापासून ते अधिकतर कळंब, जि. यवतमाळ येथे असायचे. त्यामुळे राजकारण्यांशी माझा कधीच संबंध आला नव्हता आणि पुढे शरद

पवार नावाच्या एका मोठ्या व्यक्तीची मला मदत होणार आहे, ह्याचीसुद्धा त्यावेळी कल्पना नव्हती.

1972 साली डॉ. भाऊ मांडवकरांनी शिक्षण संस्था स्थापन केली. 1974 मध्ये मान्यता मिळाल्यापासून उपेक्षित ग्रामीण भागात आणि शिक्षणाची नितांत आवश्यकता असलेल्या त्यांच्या कळंब या जन्मगावी महाविद्यालय सुरू करावे, म्हणून ते प्रयत्नात होते. एखादे महाविद्यालय मान्य करणे राज्यकर्त्यांच्या हातात असायचे. त्यावेळी महाराष्ट्रातील राजकीय कालखंड धामधुमीचा होता. 25 जून, 1975 रोजी इंदिराजींनी लादलेल्या आणीबाणीने सर्वच कठीण झाले होते. त्यावेळी शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होते. 21 मार्च, 1977 रोजी आणीबाणी संपुष्टात आली. आणीबाणीनंतर काँग्रेस फुटली. इंदिरा गांधीनिष्ठ आणि काँग्रेस पक्षनिष्ठ असे गट तयार झाले. देशपातळीवर यशवंतराव चव्हाण आणि ब्रम्हानंद रेड्डी यांनी इंदिराजींचे नेतृत्व झुगारून रेड्डी काँग्रेस स्थापन केली. शरद पवार अपरिहार्यपणे रेड्डी काँग्रेसमध्ये गेले. आणीबाणीनंतर वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. 1978 च्या विधानसभा निवडणुकीत दोनही काँग्रेस स्वतंत्रपणे लढल्या. इंदिरा काँग्रेसला 62, रेड्डी काँग्रेसला 69 तर जनता पक्षाला 99 जागा मिळाल्या होत्या. शेतकरी कामगार पक्षाला 13, माकपला 9 आणि अपक्षांना 36 जागा मिळाल्या होत्या. सत्तास्थापनेसाठी दोनही काँग्रेसची आघाडी झाली आणि 7 मार्च, 1978 रोजी रेड्डी काँग्रेसचे वसंतदादा पाटील यांनी मुख्यमंत्री पदाची तर इंदिरा काँग्रेसचे नासिकराव तिरपुडे यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ

घेतली. 17 मे, 1977 ते 18 जुलै, 1978 वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते. 1978 च्या जुलै महिन्यात विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच वसंतदादांच्या सरकारमधून 40 आमदारांसह शरद पवार बाहेर पडले. त्यांनी समाजवादी काँग्रेसची स्थापना केली. समाजवादी काँग्रेस, जनता पक्ष, शेकाप आणि कम्युनिस्ट पक्षाला सहभागी करून त्यांनी पुरोगामी लोकशाही दल म्हणजेच 'पुलोद' स्थापन केले. साहजिकच अल्पमतात आलेले रेड्डी काँग्रेस व इंदिरा काँग्रेसचे सरकार पडले. वयाच्या 38 व्या वर्षी पवारांनी पुलोदचे सरकार स्थापन केले. जुलै 1978 ते फेब्रुवारी 1980 शरद पवार महाराष्ट्रातील मुख्यमंत्री होते. इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर येताच पुलोद सरकार बरखास्त करण्यात आले. जून 1980 च्या विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेस (इंदिरा) पक्षाला घवघवीत यश मिळाले आणि बॅरिस्टर अब्दुल रहेमान अंतुले राज्याचे नवे मुख्यमंत्री झाले. सिमेंट घोटाळ्यासह अन्य काही प्रकरणे गाजल्यानंर त्यांच्या जागी आलेले बाबासाहेब भोसले हे 21 जानेवारी, 1982 ते 1 फेब्रुवारी, 1983 या कालावधीत मुख्यमंत्री होते. 2 फेब्रुवारी, 1983 ते 1 जून, 1985 वसंतदादा पाटील पुन्हा मुख्यमंत्री झाले. या धामधुमीच्या काळात 1981 ते 1984 समाजवादी काँग्रेसचे शरद पवार विधानसभेतील प्रमुख विरोधी पक्षनेते होते. वसंतदादांच्या मंत्रिमंडळात सुधाकरराव नाईक शिक्षण मंत्री होते. सुधाकरराव हे भाऊ मांडवकरांचे बालमित्र होते. 1983 च्या मे महिन्यात एक दिवस त्यांचा फोन आला. "भाऊ, तुला कॉलेज दिले. लगेच सुरू

करायचे आहे. कामाला लाग." ते ऐकताच भाऊ मांडवकरांचा आनंद गगनात मावेना. सहकाऱ्यांना घेऊन त्यांनी तयारी सुरू केली. सोबतच अमरावती विद्यापीठासह अन्य काही महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली होती. पवार जरी विरोधी पक्षनेते होते, तरी त्यांचा शब्द नाकारणे, हे कोणत्याच सरकारला त्या काळातही शक्य नव्हते. वसंतदादा पाटील यांनाही दूरदृष्टी होती. त्यांनी अनेक समाजहितकारक, दूरगामी परिणाम साधणारे निर्णय घेतले. ग्रामीण भागात काँग्रेसचा प्रभाव वाढविण्यासाठी त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. त्यात 1983 मध्ये त्यांनी वैद्यकीय, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन विद्यालये सुरू करण्याचा आणि सोबतच कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये विनाअनुदान तत्त्वावर सुरू करण्यासाठी परवानगी देण्याचा निर्णय घेतला. राजकारणातील सोंगट्या हलत होत्या, तरी पवारांपासून सगळे पक्ष आणि राजकारणी वचकून होते. अशा प्रकारे आमच्या महाविद्यालयाच्या मान्यतेत शरद पवारांची, सुधाकरराव नाईकांची आणि वसंतदादा पाटलांची मदत झाली होती. आजही ग्रामीण, आदिवासी परिसरातील कळंबचे हे इंदिरा महाविद्यालय दीन-दलित-होतकरू विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे आशास्थान आहे.

शरद पवारांशी माझा प्रत्यक्ष संबंध पूर्वी आला नव्हता. 1991 च्या प्रसन्न सकाळी चंदिगढला मला त्यांना जवळून बघता आले. शरद पवार यांचे त्यावेळचे स्वीय सहायक वसंत गोविंद खेर हे आमचे दूरचे मामा. काही गोष्टी अशा घडल्या की त्या आपल्या हातात नसतात. पंजाब अशांत होता. अतिरेकी कारवाया मोठ्या

प्रमाणावर सुरू होत्या. आमच्या भोजन करावयाच्या सैनिकी मेसमध्येही मोठा बॉम्बस्फोट झाला. भोजन वाटपाच्या काउंटरवर एका कोपऱ्यात जेवणाच्या टिफिनमध्ये बॉम्ब ठेवण्यात आला होता. अगदी 8 ते 10 मिनिटे आधी भोजन करून मी ड्युटीवर गेलो होतो, त्यामुळे बचावलो. त्या दरम्यान वडिलांना हृदयविकाराचा झटका आला. अमरावतीत त्यांना रुग्णालयात भरती केले. पाकिस्तान सीमेवर सैन्याची जमवाजमव सुरू असल्याने मला रजा मिळू शकली नाही. वडिलांनी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थेत लक्ष घालण्यासाठी बोलावणे येऊ लागले. 21 मे, 1991 रोजी राजीवजींची हत्या झाल्यावर आणि त्यापूर्वीचा काही कालावधी केंद्रातील भ्रष्टाचाराची प्रकरणे तोंड वर काढत होती. 1987 पासून बाहेर आलेले बोफोर्स प्रकरण आता अधिक गाजत होते. सैन्य दलात अशा काही घटना घडल्या की त्या मला सार्वजनिक करता येणार नव्हत्या. अशा काही बाबी मी पत्राने आमचे मामा शरद पवारांचे स्वीय सहायक, जे त्यावेळी महाराष्ट्रात होते, त्यांना कळवीत होतो व मनाला न पटणाऱ्या बाबींवर पवारसाहेबांमार्फत काही तोडगा निघेल, काही सुधारणा होतील, अशी अपेक्षा ठेवत होतो. डिफेन्स सिक्युरिटी आणि प्रोटोकॉलमुळे मला शरद पवारांशी सरळ पत्रव्यवहार शक्य नव्हता. शरद पवारांकडून माझ्या उल्लेखासह भारतीय वायुसेनेच्या चिफ ऑफ एअर स्टाफ (सी.ए.एस.) यांना व नंतर आमच्या एअर ऑफिसर कमांडिंग (ए.ओ.सी.) यांच्यासह काही अधिकाऱ्यांना पत्रे गेली. मला त्यानंतर राजस्थान-पाकिस्तान सीमेवरील बाडमेर

तालुक्यातील उतरलाई या ठिकाणी पोस्टिंग मिळाली. उघड करता येणार नाहीत, अशा काही बाबतीत शरद पवारांची फारच मोठी मदत झाली. त्यांची ती मदत विसरता येणार नाही.

संरक्षण मंत्री म्हणून शरद पवारांनी केलेले काही बदल हे अभूतपूर्व होते. सैनिकांसाठी विविध सुविधा व योजना त्यांनी लागू केल्या. महत्त्वाचे म्हणजे महिलांना सेनेच्या विविध क्षेत्रात दिल्या गेलेला प्रवेश आणि सैन्यात महिला आरक्षणाची तरतूद हे त्यापैकी एक होते. संरक्षण साहित्याच्या उत्पादनाला व्यावसायिक जोड दिली. पूर्वी आपण आपल्या गरजेपुरते संरक्षण सामग्रीचे उत्पादन करायचो. उदाहरण द्यायचे झाल्यास आपल्याकडे काही लाखांमध्ये रायफल्स निर्मितीची क्षमता असतानाही आपण आपल्याला आवश्यक अशा फक्त 10000 रायफल्स दरवर्षी निर्माण करायचो. त्यामुळे निर्मिती खर्च अधिक व्हायचा. पवारांनी मोठ्या प्रमाणावर संरक्षण सामग्री निर्माण करून आशिया व अफ्रिकेतील काही देशांना तिचा पुरवठा करून सैन्य विभागाची आर्थिक स्थितीही उंचावण्याचा प्रयत्न केला. 'अर्जुन' रणगाड्याचं कामही पवारांच्या काळातच पूर्ण झालं. सियाचीनला भेट देणारे ते पहिले संरक्षण मंत्री होते. तिथल्या कठीण हवामानात सैनिकांसाठी लागणारे योग्य कपडे व अन्नपुरवठ्याचे नियोजन त्यांनी सुधरविले.

सर्वात महत्त्वाच्या एका बाबीचा उल्लेख अनिवार्य ठरतो. 1984 मध्ये इंदिराजींची हत्या झाल्यावर उसळलेल्या दंगलींमध्ये फार मोठ्या प्रमाणावर शिखांची हत्या झाली होती, त्यावेळी राम प्रधानांमार्फत आलेल्या प्रस्तावानुसार राजीव गांधींना पंजाब

समस्या सोडविण्यासाठी पवारांची गुप्तपणे फार मोठी मदत झाली होती. 'राजीव-लोंगोवाल करार' 1985 मध्ये अस्तित्वात आला. दुर्दैवाने त्यानंतर एक महिन्यातच संत लोंगोवाल यांची हत्या झाली. पंजाबमधील अशांतता पुन्हा डोके वर काढू लागली. पाकिस्तानने पंजाबमधील अशांततेचा फायदा घेत नवीन अतिरेकी संघटनांना खतपाणी घालण्यास सुरुवात केली. खलिस्तान कमांडो फोर्स, बब्बर खालसा, सरबत खालसा अशा अतिरेकी संघटनांना आर्थिक मदत, शस्त्रांची मदत, व्यूहरचना आणि अन्य मार्गाने रसद पुरविण्याचे काम कुख्यात पाकिस्तानी गुप्तचर संस्था आय.एस.आय. करीत होती. त्या अशांत पंजाबमध्ये मी 7 ऑक्टोबर, 1987 ते 16 मे, 1993 या कालावधीत होतो. तेथील असंख्य घटना मी स्वत: बघितल्या आणि परिस्थितीही अनुभवली. निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या कारागृहातील अतिरेक्यांनाही लोकशाहीमुळे कसे रातोरात सोडावे लागले आणि विशेष विमान सेवा देऊन तिहारमधून पंजाबात आणावे लागले, या घटनांचा मी साक्षीदार आहे.

येथे जरा इतिहासातील काही घटनांकडे वळणे संयुक्तिक ठरेल. इंदिराजींच्या हत्येनंतर 1984 ते 1989 राजीव गांधी भारताचे पंतप्रधान होते. श्रीलंकेत 'एल.टी.टी.ई.'शी (लिबरेशन टायगर ऑफ तमिळ एलम) लढण्यासाठी त्यांनी 1987 मध्ये पाठविलेल्या आपल्या आय.पी.के.एफ.मुळे (इंडियन पीस किपिंग फोर्स) त्यांच्यावर एल.टी.टी.ई. टपून होती. तेव्हा संरक्षण मंत्री के.सी. पंत (1987-1989) होते. 24 जानेवारी, 1987 ते 12

एप्रिल, 1987 या कालाधीत संरक्षण मंत्री राहिलेल्या व्ही.पी. सिंहांची जागा त्यांनी घेतली होती. 13 जून, 1987 ते 3 ऑक्टोबर, 1988 या कालावधीत मी मद्रासमधील तांबरम येथे होतो. आता मद्रासला 'चेन्नई' म्हणतात. श्रीलंकेत जाफना येथे आपला आय.पी.के.एफ.चा तळ ठोकण्यात आला होता. एल.टी.टी.ई.च्या सर्वाधिक अतिरेकी कारवाया याच भागात होत होत्या. दररोज मोठ्या प्रमाणावर सैन्याची ने-आण, लढण्यासाठी सामग्री, खाद्यपदार्थ पाठवणे, हे सर्व आमच्या एअर फोर्स स्टेशन तांबरम येथून व्हायचे. एक वेळ आमच्या बेसवरील सैन्य दलाला भोजन सामग्रीची अडचण जायची; पण आमच्या हवाई तळावरून आय.पी.के.एफ.साठी नित्यनेमाने अन्न पुरवठा करणे अपरिहार्य होते. या काळात एल.टी.टी.ई.ला मानणारा मोठा जनसमूह तामिळनाडूमध्ये तयार होत होता व आपल्या भारतीय सैन्याच्या विरोधात जनमत तयार होऊ लागले. एल.टी.टी.ई.ची निर्मिती कशी झाली आणि त्यांना खतपाणी कोणी घातले, हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय आहे. 30 जुलै, 1987 रोजी श्रीलंकेत गार्ड ऑफ ऑनरच्या वेळेस राजीव गांधींच्या पाठीवर एका सैनिकाने मारलेली उलटी बंदूक यातून काही संकेत मिळत होते. एल.टी.टी.ई.च्या बंदोबस्तासाठी श्रीलंकेत पाठविलेले आय.पी.के.एफ., त्यावर झालेला प्रचंड खर्च, बोफोर्स तोफ खरेदी घोटाळा, भोपाळ गॅस गळती, शाहबानो प्रकरण या पार्श्वभूमीवर राजीव गांधींच्या पंतप्रधान पदाचा उत्तरार्ध कठीण झाला होता. व्ही.पी. सिंगांना 1988 मध्ये मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यांच्या

संरक्षण मंत्री असतानाच्या काळात बोफोर्स घोटाळा प्रथम उघडकीस आणला गेला. त्यांनी जनता दल स्थापन केले. राजीव गांधींना प्रचंड विरोध सुरू केला. 1989 मध्ये निवडणुका झाल्या. व्ही.पी. सिंगांनी नॅशनल फ्रंट स्थापन करून भाजपाच्या पाठिंब्यावर 2 डिसेंबर, 1989 रोजी त्यांनी सरकार स्थापन केले. 10 नोव्हेंबर, 1990 पर्यंत ते भारताचे पंतप्रधान होते. चंद्रशेखर यांनी जनता दलातून बाहेर पडून समाजवादी जनता पक्ष (जनता दल सोशालिस्ट) स्थापन केला. अल्पमतात आल्यानंतर 7 नोव्हेंबर, 1990 रोजी अविश्वास ठराव पारीत होऊन व्ही.पी. सिंहांना पंतप्रधान पदाचा राजीनामा द्यावा लागला. 10 नोव्हेंबर, 1990 ते 21 जून, 1991 चंद्रशेखर हे पंतप्रधान होते. 64 खासदारांसोबत काँग्रेसच्या बाहेरून दिलेल्या पाठिंब्यावर त्यांनी अल्पमतातील सरकार चालवले. मार्च 1991 मध्ये काँग्रेसने पाठिंबा काढल्याने त्यांना पायउतार होणे भाग पडले. लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. राजीवजींच्या प्रचाराचा झंझावात सुरू झाला. श्रीपेरंबदूरला जाण्यापूर्वी राजीव गांधी मुंबईत येऊन शरद पवारांना भेटून भविष्यातील रणनीतीविषयी चर्चा करून गेले होते. दुर्दैवाने 21 मे, 1991 रोजी तमिळनाडूच्या कांचिपुरम जिल्ह्यातील श्रीपेरंबदूर या शहरात राजीवजींची हत्या झाली. आमच्या एअर फोर्स स्टेशनचे सायरन वाजले. रातोरात सोनियाजी व निवडक जवळच्या व्यक्तींना श्रीपेरंबदूरला नेण्यासाठी चंदिगढच्या आमच्या बेसवरून वरून दिल्लीला आय.एल. 76 विमान पाठविले गेले.

निवडणुका झाल्या. पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान झाले. नाट्यमय घडामोडींनंतर शरद पवारांना पंतप्रधान पदाने हुलकावणी दिली. नवीन मंत्रिमंडळात संरक्षण मंत्री झालेले शरद पवार यांनी परत अशांत पंजाबला शांत करण्यामध्ये मोलाची भूमिका बजावली. ज्या पवार यांच्या भेटीचा उल्लेख मी वर दुसऱ्या परिच्छेदात केला, ती त्यांची संरक्षण मंत्री पद स्वीकारल्यानंतरची पहिली पंजाब भेट असावी. त्यानंतर पवारसाहेब आणखी काही वेळा पंजाब-पाकिस्तान सीमेवरील गावे आणि शहरांना भेटी देण्यासाठी येत राहिले.

समस्या अशी होती की रात्रीच्या अंधारात अतिरेकी पाकिस्तानातून भारताच्या हद्दीतील सीमेवरील पंजाबच्या गावांमध्ये शिरायचे. या गावांमध्येच आश्रय घ्यायचे. शस्त्रांच्या बळावर घरामध्ये शिरून त्याच घरच्यांना जेवण बनविण्यास सांगायचे. नंतर बॉम्ब स्फोट घडवून परत पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात जायचे. दुसऱ्या दिवशी पंजाब पोलीस त्या गावातील त्या घराची झडती घ्यायचे व या लोकांचा अतिरेक्यांना पाठिंबा असल्याचे आरोप लावायचे. त्यामुळे पंजाब-पाकिस्तान सीमेवरील शिखांना नरकयातना भोगाव्या लागत होत्या. बॉम्ब स्फोटांमध्ये व बेछूट गोळीबारांमध्ये अनेक निरपराधांचे बळी जात होते. शासकीय सेवेमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांना, वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या डॉक्टर व परिचारिकांना, शिक्षकांना, शेतकऱ्यांना आणि छोटेमोठे उद्योग, कारखाने चालविणाऱ्यांनाही जगणे कठीण होत चालले होते. कितीतरी नागरिक, कर्मचारी, मजूर वर्ग सीमेवरील

असुरक्षित गावे सोडून शहरांकडे जाऊ लागले. कित्येकांनी तर नोकरीवर पाणीही फेरले. आम्हाला चोवीस तास सतर्क राहावे लागत होते. एअर फोर्स स्टेशन सोडून बाहेर जाण्यासाठी केवळ दिवसाच परवानगी मिळे आणि प्रत्येक अधिकाऱ्याला स्टेनगनधारी एस्कॉर्टशिवाय बाहेर पडताच येत नसे. पंजाबातल्या या अशांततेने आणि रोजगार कमी होत गेल्याने तरुणांमध्ये नैराश्य आणि काही प्रमाणात विद्रोहाची भावना निर्माण होत गेली. ही परिस्थिती बदलण्याची निकड ओळखून तरुणांमध्ये आणि नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी पवारांनी प्रयत्न सुरू केले. निवडक शिख अधिकारी, लष्करी अधिकारी यांना सोबत घेऊन त्यांनी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांच्याशी चर्चा केली. आमच्या लष्करात काही वैद्यकीय महाविद्यालये चालविली जातात. त्यातील काही वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि परिचारिका यांना या सीमेवरील गावांमध्ये सेवेसाठी पाठविले. आमच्या लष्करात 'मिलिटरी इंजिनिअरिंग सर्व्हिसेस' (एम.ई.एस.) असते. तेथील तंत्रज्ञांनाही पंजाबच्या विविध भागात नियुक्त केले. केंद्रीय विद्यालयांमधील शिक्षकांनाही तशाच प्रकारे पंजाबात पाठविले. या सर्वांच्या सुरक्षेसाठी साध्या वेशातील लष्करी जवानांना ठेवले. शिवाय गावोगावच्या तरुणांमध्ये या सर्वांनी मिसळून त्यांच्यासोबत कबड्डी, फुटबॉल, कुस्ती असे विविध खेळ खेळावे, अशा सूचना दिल्या. हे करीत असतानाच या तरुणांमध्ये भारतीय सैन्यातील जवानांप्रती, नागरी सेवा देणाऱ्यांप्रती आणि देशाप्रती कृतज्ञतेचे भाव किंवा चांगले विचार निर्माण व्हावेत, यासाठी

प्रयत्न केले गेले. शिवाय कुठे कोणी अतिरेक्यांसोबत जुळले आहे का, पुढे काही अतिरेकी हल्ले होणार आहेत का किंवा कुठे पोलीस अत्याचार करीत आहेत का, याचीही माहिती मिळविण्याचा उद्देश होता. या मिशनवर भारतीय सेनाप्रमुख जनरल सुनित रॉड्रिग्ज हे शरद पवारांसोबत होते. या सर्वाचा पुढे चांगला परिणाम दिसू लागला. हळूहळू पंजाबमधील जीवन पूर्वपदावर येत गेले.

6 डिसेंबर, 1992 रोजी बाबरी मशीद पाडली गेली. देशभर दंगली झाल्या. महाराष्ट्रही त्याला अपवाद नव्हता. मुंबई अशांत झाली. सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री होते. पवारांनी त्यांना नागपूरचे हिवाळी अधिवेशन गुंडाळून देशाची आर्थिक राजधानी मुंबईत जाण्याविषयी व परिस्थितीवर लक्ष ठेवण्यास फोनवरून सांगितले. प्रत्यक्षात तसे झाले नाही. मुंबईची स्थिती बिघडतच गेली. मुंबईला शांत करण्याची क्षमता पवारांमध्ये होती. प्रचंड दबावाखाली असलेल्या पंतप्रधान नरसिंहरावांच्या आग्रहामुळे पवारांना केंद्रातील संरक्षण मंत्रीपद सोडून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून 6 मार्च 1993 रोजी परत जावे लागले. पवार परतताच मुंबई शांत झाली. नेमकी त्यानंतर दोनच महिन्यात माझी बदली 5 एफ.बी.एस.यू. (फॉरवर्ड बेस सपोर्ट युनिट) म्हणजेच उतरलाई, जि. बाडमेर या राजस्थान-पाकिस्तान बॉर्डरवर झाली आणि पंजाबशी संपर्क तुटला. 19 जून 1993 रोजी मी 5 एफ.बी.एस.यू.ला रुजू झालो. उतरलाईचे स्टेशन 1935 मध्ये मारवाड राज्याच्या 384 एकर जमिनीला ताब्यात घेत रॉयल एअर फोर्सने तयार केले होते. तिथल्या धावपट्टीवर त्या काळात केवळ

2 आसनी विमाने उतरायची. स्वातंत्र्यानंतर ते सी.पी.डब्ल्यू.डी.ला हस्तांतरित केले गेले. 1950 पासून ते भारतीय वायुसेनेच्या ताब्यात आहे. 1965 च्या पाकिस्तान युद्धानंतर त्याचे बेसमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय झाला. 8 जून, 1972 पासून ते फॉरवर्ड बेस सपोर्ट युनिट म्हणून कार्यरत होते. 20 डिसेंबर 1993 रोजी त्याचे रूपांतर एअर फोर्स स्टेशनमध्ये झाले. बाडमेर जिल्ह्यात बी.एस.एफ. मोठ्या प्रमाणावर आहे. या ठिकाणी अतिरेकी कारवाया नव्हत्या; पण सीमेपलीकडून रात्रीच्या अंधारात काही तस्करांचा प्रवेश व्हायचा. त्यावेळी राजस्थान-पाकिस्तान सीमा तारेच्या कुंपणाने व्यवस्थित सील झालेल्या नव्हत्या.  बाडमेर हा भाग तसा वाळवंटी. मुनाबाओ हे सीमवरील शेवटचे ठिकाण. अनेक बोगदे पाकिस्तान-हिंदुस्थानच्या या सीमेखालून किंवा कुंपणाखालून जायचे. हेरॉईनसारख्या ड्रग्जची तस्करी चालायची. नकली नोटांच्या लोखंडी ट्रंक्स यायच्या. यात पाकिस्तानी सैन्यासह गुप्तचर संघटनांचा हात असायचा. काही वेळा या बेसवर पाकिस्तानी गुप्तहेरही पकडण्यात आले होते. अशा खूप बाबी होत्या; त्यांचाही सविस्तर उल्लेख करता येणार नाही. मी उतरलाईला असताना पवार संरक्षण मंत्री राहिले नव्हते, साहजिकच त्यांच्याशी पत्रव्यवहार कमी होत गेला. पण संरक्षण मंत्री असताना शरद पवारांनी पंजाबला दिलेल्या भेटी आणि भारतीय सैन्यासाठी केलेले कार्य हे अत्यंत प्रशंसनीय असेच होते, जे माझ्या कायम स्मरणात राहिले आहे.

2008 मध्ये डॉ. भाऊ मांडवकर यांचे निधन झाले. आमच्या मातोश्री डॉ. सिंधू मांडवकर यांची पवारांच्या वाढदिवसानिमित्त श्री. वसंत खेर यांच्यामार्फत पवारांशी क्वचित भेट होत होती. दोन वर्षांपूर्वी वसंत खेर यांचेही निधन झाले. 23 ऑक्टोबर, 2017 रोजी शरद पवारांसोबत शिक्षण संस्थाचालकांची एक सभा अमरावतीच्या 'हॉटेल महफिल इन' मध्ये आयोजित केली होती. त्या सभेत पवारांची भेट घेता आली.

2003 मध्ये उत्कृष्ट संसदपटू म्हणून आणि 2017 मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित शरद पवारांइतका सर्व क्षेत्रातील जाणकार आणि अनुभवी नेता कदाचितच देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात पहायला मिळेल. वयाच्या 80 व्या वर्षीही त्यांची काम करण्याची शैली एखाद्या तरुण राजकारण्याला लाजवेल अशीच आहे. आजही देशात पंतप्रधान पदाच्या उमेद्वाराविषयी चर्चा होते तेव्हा शरद पवारांचे नाव घेतले जाते. राजकारणाचे योग्य भाकीत करणाऱ्या पवारांनी मागच्या वाढदिवसाला सर्व विरोधकांना एकत्र स्टेजवर आणले होते. त्यामुळे देशात जर कोणाला बहुमत प्राप्त नाही झाले तरी शरद पवार हे एकमेव असे व्यक्तिमत्त्व मानले जाते की जे देशाच्या कानाकोपऱ्यातील पक्षांना एकत्र आणू शकते. 'पवार पॉवर'ला नाकारता येत नाही. भविष्याचा वेध घेत आधुनिक भारताला साकारतानाच माणुसकी, सामाजिक बांधिलकी, समानता या गुणांना चिकटून असलेल्या शरद पवारांच्या व्यक्तिमत्त्वाचे कुतूहल हे असे पूर्वीपासून होते. त्यांच्यावर पुस्तक लिहावे, ही

1993-94 पासूनची इच्छा. त्यांच्याविषयी वृत्तपत्रांतून आलेली कात्रणे गोळा करायला सुरुवात केली ती साधारणत: प्राध्यापकी पेशाकडे वळल्यावर 1997 पासून. 2005 मध्ये वसंत खेर यांनी शरद पवारांवरील लेखांचे संपादन केले आणि 'लोकमान्य लोकनेता' हा ग्रंथ साकार झाला. 2007 मध्ये डॉ. सिंधू मांडवकर यांच्या पंचाहत्तरीनिमित्त गौरवग्रंथाचे प्रकाशन केले. मा. शरद पवार यांनी आवर्जून पत्राद्वारे शुभेच्छा पाठविल्या. त्यांचे स्वीय सहायक श्री. वसंत खेर हे अमरावतीमधील या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. त्यानंतर शरद पवारांवर पुस्तक लिहायचा निर्धार पक्का केला आणि काम सुरू केले. त्याच वर्षी प्राचार्यपदाची जबाबदारी आल्याने वेळ मिळेनासा झाला. तरी थोडे थोडे लिहिणे सुरू ठेवले. शिवाय लिहायला घेतले की पुन्हा नव्याने देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात अशा काही घडामोडी व्हायच्या की शरद पवारांच्या व्यक्तिमत्त्वाचा नवा पैलू लक्षात यायचा. 2019 च्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे आणि सत्तास्थापनेचे हिरो ठरले ते शरद पवार. आता थांबून चालणार नाही, हे पुस्तक लगेच तयार व्हायला हवे, हा निश्चय केला. 'कोव्हिड-19' मुळे मार्च 2019 मध्ये 'लॉक डाऊन' झाले आणि या काहीशा निवांतपणात लेखनकार्याला प्राधान्य दिले. आज आपल्यासमोर हे पुस्तक सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. जुन्या पिवळ्या पडलेल्या कात्रणांना एक वेगळाचा सुगंध येत आहे. या पुस्तकात अनेक मान्यवरांचे विचार एकत्रित केले आहेत. अनेक पुस्तकांमधून, वृत्तपत्रांतून आणि विशेष

पुरवण्यांमधून तसेच विविध संकेतस्थळांवर प्रकाशित पवारांवरील लेखांचे, माहितीचे संकलन करून त्यावर भाष्य केलेले आहे. या ग्रंथात प्रशंसेचा भाग अधिक असला तरी पवारांचे दोष-दुर्गुण दिसले नाहीत, असे नाही. काही ठिकाणी तसे काही उल्लेख येतातही; पण त्यांच्या प्रचंड कार्यकर्तृत्वाने ते झाकोळून टाकले आहेत आणि मला जाणवलेले शरद पवार या ग्रंथातून मी मांडले आहेत. पवारांविषयी आणखी बरेच काही लिहिण्यासारखे आहे, हे मला त्यांचे 'लोक माझे सांगाती' हे पुस्तक वाचताना जाणवले. वास्तविक हे पुस्तक माझ्या हाती या ग्रंथाच्या लिखाणानंतर पडले. त्यावर लिहायचे म्हणजे आणखी एक नवे पुस्तक तयार होईल. म्हणून सध्या येथेच विराम देणे योग्य वाटते.

'शरद पवार' हे माझे 50 वे पुस्तक. शरद पवारांना समजून घेण्यासाठी, हे लेखन मी का केले आणि माझा पवारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन जाणून घेण्यासाठी हे प्रदीर्घ मनोगत आणि पार्श्वभूमी आवश्यक होती. या पुस्तकातील आकडेवारी, तारखा, विविध संदर्भ हे मी अधिकाधिक अचूक टाकण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु जर एखाद-दुसऱ्या ठिकाणी काही चुका आढळल्यास वाचकांनी मला अवश्य कळवाव्या, म्हणजे पुढील आवृत्ती काढण्याचा योग आला तर दुरुस्त्यांसह ग्रंथ सादर करता येईल.

- पवन मांडवकर

प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, 445401
निवास - 'पद्मनिलया', 42, शिवाजी नगर, यवतमाळ 445001
भ्रमणध्वनी 9422867658 e mail: pavanmandavkar@yahoo.com

❐❐❐

# विशेष आभार!

खालील मान्यवरांची विषयाशी संबंधित पुस्तके, लेख, मुलाखती, बातम्या, प्रत्यक्ष चर्चा यांची तसेच खाली नमूद केलेली विविध वृत्तपत्रे व त्यांच्या विशेष पुरवण्या यांचीही मदत हा ग्रंथ साकारताना झाली. या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

श्री. शरद पवार यांच्यासह त्यांचे संपूर्ण कुटुंब, कै. वसंत गोविंद खेर, कै. प्रमोद महाजन, कै. आर.आर. पाटील, श्री. नितीन गडकरी, श्री. तारिक अन्वर, कै. भवरलाल जैन, कै. बापुसाहेब काळदाते, कै. अण्णा जोशी, डॉ. प्रभा शिंदे, श्री. अरुण गुजराथी, श्री. छगन भुजबळ, श्री. दिलीप वळसे पाटील, श्री. हेमंत टकले, श्री. टी.एन. धुवाळी, श्री. शिवाजीराव पाटील, श्री. दिलीप कदम, डॉ. एन.पी. हिराणी, श्री. लक्ष्मण माने, श्री. सुनील तटकरे, श्री. राजेंद्र दर्डा, सौ. विद्या चव्हाण, डॉ. भारती लव्हेकर, श्री. बबनराव पाचपुते, सौ. मंदाताई म्हात्रे, श्री. ना.धों. महानोर, श्री. श्रीनिवास पाटील, श्री. रमेश कांबळी, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, श्रीमती लता मंगेशकर, ॲड. बाळासाहेब अनगळ, ॲड. रमेशदादा पाटील, शाहीर साबळे, ॲड. धनंजय तौर, डॉ. मंगला राय, डॉ. भारत पाटणकर, डॉ. जयसिंगराव पवार, श्री. दिलीप वेंगसरकर, डॉ. सुनंदा महाजन, श्री. रामदास फुटाणे, श्री. अनंत बागाईतकर, डॉ. एम.एस. स्वामिनाथन, डॉ. रघुनाथ माशेलकर, कै.डॉ. वसंतराव गोवारीकर, डॉ. जनार्दन वाघमारे, श्री. वासुदेव चोरघडे, श्री. अ.पा. देशपांडे, श्री. शंकरराव कोल्हे, श्री. शांताराम बोकिल, डॉ. चिंतामणी वैद्य, श्री. बापुसाहेब थिटे, श्रीमती प्रेमाताई पुरव,

श्रीमती विजया पाटील, श्रीमती विमला साठे, श्री. ज्ञानेश्वर आगाशे, प्रा. एकनाथ घेवंदे, श्री. मधुसूदन साळवी, श्री. खंडेराव भोसले, श्री. निशिकांत जोशी, श्री. अमर वझलवार, डॉ. दिलीप पारखे, श्री. रमेश गायकवाड, श्रीमती रजनी शहा, श्री. बाबासाहेब खर्डे, श्री. हरिभाऊ जवळगे, सौ. सुनीता जोशी, श्री. महेंद्र हंबिरे, श्री. दत्ता रोकडे, श्रीमती मणिंदर बेदी, श्री. प्रफुलकुमार मोकाशी, श्री. आनंदराव इंगवले, श्री. निळकंठ निबंधे, श्री. रामचंद्र साबळे, श्री. गजानन भोसले, श्री. बाळासाहेब सपकाळ, श्री. नवनीत शहा, श्री. महिपतराव पवार, श्रीमती सावित्री जगदाळे, श्री. सुधाकर पाटील, श्रीमती आशा शिंदे, श्री. संजय आवटे, श्री. भानुदास शिंदे, श्री. उद्धव रसाळे, श्री. सुरेंद्र हसमनीस, श्री. मधुकर भावे, श्री. सुधीर गाडगीळ, श्री. विनायक पाटील, श्री. दिनकर रायकर, श्री. प्रदीप राजपूत, श्री. गिरीश कुबेर, श्री. मधू कांबळे, श्री. दिनेश गुणे, श्री. निशांत सरवणकर, श्री. रोहन टिल्लू, श्री. प्रशांत दीक्षित, श्री. समीर जावळे, श्रीमती अश्विनी शेंडे.

वृत्तपत्रे - दै. लोकमत, दै. लोकसत्ता, दै. सकाळ, दै. दिव्य मराठी, दै. तरुण भारत, दै. देशोन्नती व या वृत्तपत्रांचे विविध पत्रकार तसेच शरद पवारांशी संबंधित उपलब्ध संकेतस्थळे, विविध वृत्तवाहिन्या व यू ट्युबवरील व्हिडिओ.

❐❐❐

# शरद पवार

कोणी त्यांना 'लोकाभिमुख नेता' म्हणतं, कोणी 'अष्टावधानी नेता', कोणी 'जाणता राजा' म्हणतं तर कोणी 'हिमालयाच्या उंचीचा नेता', कोणी 'सामाजिक बांधिलकीचे नेतृत्व' म्हणतं तर कोणी 'शेतकऱ्यांचा नेता', कोणी 'कार्यकर्त्यांचे विद्यापीठ' म्हणतं तर कोणी 'द्रष्टा नेता', कोणी 'कलाकारांचे हितचिंतक' म्हणतं तर कोणी 'क्रीडापटूंचा मित्र' कोणी 'कष्टकरी, उपेक्षितांचा आधार' म्हणतं तर कोणी 'समाजकारणी नेता' अशा एक ना दोन कितीतरी बिरुदांनी ज्या व्यक्तीचा सतत मानसन्मान होत आला आहे, ती व्यक्ती म्हणजे शरद पवार.

महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणात, समाजकारणात आणि सत्तास्थापनेत म्हणजेच सरकार बनविण्यात बाद करता येत नाही, असे एकमेव नाव म्हणजे शरदचंद्र गोविंदराव पवार. ते सुमारे 55 ते 60 वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात आहेत आणि 35 ते 40 वर्षांपासून देशाच्या राजकारणात. सर्वत्र त्यांनी आपला ठसा सर्वार्थाने उमटवून ठेवलेला आहे. ते केवळ चार वेळा मुख्यमंत्री झाले म्हणून एवढे कौतुक नाही तर मुख्यमंत्री नव्हते, तेव्हाही महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हा शरद पवार यांच्या संमतीने आणि मदतीने ठरायचा आणि आजही ठरतो. 2019 च्या निवडणुकांमध्ये स्वकीयांकडूनच एकाकी झालेल्या पवारांनी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदी विराजमान करून सत्तेचा 'कंट्रोल' स्वत:कडे ठेवला, हे सर्वजण जाणतातच; पण 1995 मध्ये भाजप-सेना युतीचे

सरकार बनवतानासुद्धा रात्री उशिरापर्यंत घडामोडी झाल्यावर राजकीय पटलावर आपला ठसा गडद करीत मनोहर जोशी यांना मुख्यमंत्री पदावर बसविण्यामागे शरद पवार होते, हे महाराष्ट्रातल्या मोजक्या राजकारण्यांना माहिती आहे. सुरुवातीला शिवसेनेचे सुधीर जोशी यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी निश्चित झाले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शरद पवारांना फोन केला आणि याची माहिती दिली. पवारांनी 'आडनाव जोशीच राहू द्या, पण सुरुवातीचे नाव बदला' असा सल्ला दिला होता. याचा अर्थ असा की महाराष्ट्राच्या राजकारणात सर्व सोंगट्या शरद पवारच हलवतात. त्यामुळे 1962 साली काँग्रेस पक्षाच्या राजकारणात आलेल्या तरुण वयातील शरद पवारांपासून आता ऐंशीव्या वर्षातील शरद पवारांपर्यंतचा प्रवास बघितला तर निश्चितपणे राजकारणातील एक अत्यंत महत्त्वाची व्यक्ती म्हणून त्यांचे राजकीय मूल्य वादातीत असल्याचे जाणवते.

1962 साली त्यांच्या वयाच्या बाविसाव्या वर्षी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे चिटणीस, 1967 साली सत्ताविसाव्या वर्षी आमदार, 1972 मध्ये बत्तीसाव्या वर्षी राज्यमंत्री, 1974 मध्ये चौतिसाव्या वर्षी कॅबिनेट मंत्री, 1978 मध्ये वयाच्या अडोतिसाव्या वर्षी मुख्यमंत्री, 1991 मध्ये वयाच्या एक्कावनाव्या वर्षी केंद्रीय संरक्षण मंत्री, त्यानंतर 2004 पासून व 2009 मध्ये केंद्रातील कृषी मंत्री झालेले शरद पवार यांचा राजकीय प्रवास हा अत्यंत विलक्षण असा आहे.

चार वेळा मुख्यमंत्री पदाची शपथ घेणारे शरद पवार यांचे आणखी अनेक महत्त्वाचे गुणविशेष आहेत. देशातल्या कोणत्याही राजकारण्याला किंवा त्या त्या राज्याच्या मुख्यमंत्र्याला जे जमले नाही ते शरद पवार यांनी करून दाखवले आहे. राजकीय नेता म्हणता येईल अशा यादीतही शरद पवार हेच क्रमांक एकवर आहेत. राजकारणातल्या विविध पदांवर असताना साहित्य, कला, क्रीडा, उद्‌योग, सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, नाट्यपरिषद अशा विविध क्षेत्रांतील दिग्गजांशी थेट संपर्क असलेले शरद पवार हे देशात एकमेव आहेत. राजकारणात काम करण्याचा उत्साह, जनतेसाठी काम करायचं आहे ही भूमिका, सर्व जिल्ह्यांतील, तालुक्यांतील राजकारण, भूगोल अशी सर्व बारीकसारीक तोंडपाठ असलेली माहिती, एकदाच भेटल्यावरही नावासह लक्षात ठेवून हाक मारण्याची हातोटी हे राजकीय नेत्यांना, कार्यकर्त्यांना आवश्यक असणारे सर्व गुण त्यांच्यात आहेत. पवारांचे आणखी एक सामर्थ्य म्हणजे त्यांच्या स्वत:च्या मतदार संघात मतदानाच्या आदल्या दिवशी फक्त एखादा तास देणारा आणि लाखो मतांनी निवडून येणारा हा देशाच्या राजकारणातला आज जवळपास एकमेव नेता आहे.

1984 मध्ये इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर काँग्रेसला मोठ्या मतांनी जनतेने निवडून दिले होते. त्या निवडणुकीत देशामध्ये सर्वाधिक मतांनी राजीव गांधी निवडून आले होते; पण इंदिरा काँग्रेसचे उमेदवार नसताना म्हणजे विरोधी पक्षाचा उमेदवार असताना बारामती मतदारसंघातून राजीव गांधी

यांच्या खालोखाल मतांनी क्रमांक दोनच्या मताधिक्याने शरद पवार हे विजयी झाले होते. दिल्लीच्या राजकारणात आजही पवार मोजक्या खासदारांच्या शक्तीने वावरत असले तरी महाराष्ट्रात सातत्याने किमान तीस-चाळीस-पन्नास आमदार आणि किमान आठ-दहा खासदार निवडून आणण्याची राजकीय क्षमता शरद पवार यांनी दाखवली आहे. काँग्रेस पक्षाच्या विरोधात 1980 च्या विधानसभा निवडणुकीपासून आताच्या विधानसभा लोकसभा निवडणुकीपर्यंत, शरद पवारांचा त्यावेळचा काँग्रेस-एस पक्ष असेल, त्यानंतर त्यांनी 1999 साली स्थापन केलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल या सर्व विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये पवारांनी आपली राजकीय शक्ती कायम ठेवली आहे.

शरद पवार यांना राजकीय विश्वासार्हता नाही, असे आरोप वारंवार झाले. उलट-सुलट राजकीय भूमिका त्यांनी अनेक वेळा घेतल्या. अनेक युत्या आणि अनेक आघाड्या त्यांनी केल्या. 1978 च्या जनसंघाला महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपदाचे स्थान देऊन त्यांनी मोठी राजकीय शक्ती दिली. बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेविरुद्ध लढण्यासाठी शिवाजी पार्कच्या सभेत जॉर्ज फर्नांडिस आणि दत्ता सामंत यांचे हात उंचावून त्यांनी हातातही घेतले. महाराष्ट्रातल्या शे.का. पक्ष, जनसंघ, समाजवादी यांना बरोबर घेऊन पुलोदही चालवले. सहाजणांचे मंत्रिमंडळ करून त्यांनी 38 व्या वर्षी मुख्यमंत्रीपद मिळवले. खरे तर राज्यपातळीवर असो की देशपातळीवर, सर्व राजकीय पक्षांच्या विचारांशी जमवून घेताना त्यांना अडचण येत

नाही. बाळासाहेब ठाकरेंचे वलय असताना 'ठाकरे' सरकारला तेव्हा त्यांनी राजसिंहासन मिळू दिले नव्हते आणि आज भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी 'ठाकरे' नावाचे सरकार त्यांनी महाराष्ट्रात आणले. त्यांनी स्वपक्षाशिवाय इतरांना विजयी केले काय किंवा सत्तेत कोणालाही आणले तरी शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्वत:ची शक्ती व महत्त्व कायम ठेवले आहे. महाराष्ट्राची सत्ताही त्यांचीच असते आणि विरोधी पक्ष नेतासुद्धा शरद पवार यांच्या मर्जीतलाच असतो.

1962 ते 1967 हा महाराष्ट्र काँग्रेसच्या वैभवाचा काळ होता. विधानसभेत बहुमत मिळवून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे पुन्हा मुख्यमंत्री झाले होते. सत्ताधारी बाकांवर त्यावेळच्या दिग्गज अशा जुन्याजाणत्या नेत्यांना मंत्री शरद पवार पक्ष संघटनेच्या खिडकीतून पाहत होते आणि त्याचा योग्य असा फायदा त्यांना निश्‍चितच पुढे झाला. त्यांचे मूळ घराणे शेतकरी कामगार पक्षाशी संबंधित असलेले घराणे आहे. या घराण्याची नाळ जोडलेली असताना शरद पवार यांनी मात्र विचार करून काँग्रेस पक्षात प्रवेश केला आणि प्रवेश केल्याबरोबर प्रदेश काँग्रेसचा पदाधिकारी म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली, याचे कारण त्यांच्या पाठीशी यशवंतराव चव्हाण होते. वयाच्या 27 व्या वर्षी बारामती विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे आमदार म्हणून शरद पवार यांचे पहिले पाऊल विधानसभेत पडले आणि त्यानंतर त्यांनी मागे वळून बघितले नाही. 1972 साली वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात गृह,

प्रसिद्धी राज्यमंत्रीपद त्यांच्याकडे सोपविण्यात आले. 1974 च्या वसंतराव नाईक यांच्या मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्री, 1975 साली शंकराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात कृषीमंत्री म्हणून शरद पवार यांचा प्रवेश झाला. पुढे देशातील त्यावेळचे सर्वात तरुण मुख्यमंत्री म्हणून शरद पवार ओळखले गेले.

मुख्यमंत्री म्हणून शरद पवार यांच्या पहिल्या दिवसाच्या निर्णयाचे राज्यभर स्वागत झाले. 1977 मध्ये वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना शासकीय कर्मचाऱ्यांनी 54 दिवसांचा संप केला होता. राज्याची जबाबदारी स्वीकारल्यावर राज्य कर्मचाऱ्यांशी संघर्ष होऊ नये म्हणून शरद पवार यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या महागाई भत्त्यातल्या तफावती दूर करण्याचा पहिला निर्णय घेतला. तसेच कर्मचाऱ्यांसाठी नेमलेल्या भोळे आयोगाने ठेवलेल्या विसंगती शरद पवार यांनी एका फटक्यात दूर करून टाकल्या आणि कर्मचाऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणारा नेता म्हणून ते ओळखले जाऊ लागले. अशा या शरद पवारांचा उल्लेख मधुकर भावे यांनी 'अष्टावधानी नेता' असा केला आहे.

शरद पवार हा नेता एका दिवसात तयार झालेला नाही. त्यामागे त्यांची प्रचंड मेहनत, दृढ इच्छाशक्ती, समोरच्याची नस ओळखण्याची ताकद, जनसमूहाच्या मानसशास्त्राची जाण आणि समग्र विषयांचे सखोल अध्ययन आहे, म्हणूनच त्यांना 'जाणता राजा' असे म्हटले जाते, ते योग्यच आहे.

कविवर्य ना.धों. महानोर यांना 1980च्या दशकात जळगाव जवळील त्यांच्या गावी जेव्हा त्रास देणे सुरू होते, तेव्हा

मुंबईतून विरोधी पक्षनेत्याचा फोन जळगावच्या पोलीस अधीक्षकांना गेला. “महानोरांसारख्या माणसाला काही झाले तर मी आहे आणि तुम्ही आहात.” एवढेच आणि त्यानंतर पुन्हा महानोर यांच्या विरोधात कोणी चकार शब्द काढला नाही. त्या काळात शाळा-महाविद्यालयांतून स्नेहसंमेलनांच्या उद्‌घाटनाची कितीतरी निमंत्रणे विरोधी पक्षनेता असणाऱ्या ज्या व्यक्तीला गेली होती, असा तरुणांमध्ये अफाट लोकप्रियता असणारा एकच नेता होता आणि तो म्हणजे शरद पवार.

दिनकर रायकरांनी काही आठवणी सांगितल्या आहेत. औरंगाबादच्या सुभेदारी विश्राम गृहातील 1981 ची अशीच एक धमाल रात्र होती. जमलेल्या सर्व दलित कवींच्या कविता रात्री दोन-तीन वाजेपर्यंत झाल्या. त्यांच्याशी गप्पा रंगल्या. काहींनी आम्हाला प्रकाशकच भेटत नाहीत अशी खंत व्यक्त केली. त्यानंतर पवारांनी “सकाळी मला भेटा. दोन-चार बँकांना मी सांगतो तुमचे काव्यसंग्रह प्रकाशित करण्यासाठी. कसलीही अडचण येणार नाही” असे सांगितले. पुढे या नवोदित कवींना पुढे येण्याची संधी मिळाली.

त्याच वर्षी इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्या आणि फेब्रुवारीत त्यांनी पुलोद सरकार बरखास्त केले. जूनमध्ये संजय गांधी अपघातात वारले. त्याचे वृत्त कळताच सगळे राग-लोभ विसरून शरद पवार अंत्यदर्शनाला गेले, तेव्हा इंदिरा गांधी यांनी चमकून विचारले, “क्या आप सिर्फ इसलिए आये है? मै ये बात कभी नही भुलुंगी.” 1984 मध्ये इंदिरा गांधींच्या हत्येनंतर

विधानसभेत शोकप्रस्तावावर बोलताना इंदिरा गांधींच्या खंबीर नेतृत्वाची आणि देशप्रेमाची भरभरून तारीफ करणारे तेच शरद पवार होते. असे शेकडो किस्से या माणसाविषयी सांगता येतील.

माणुसकीचा गहिवर आणि त्याचवेळी पक्का राजकारणी असे अनोखे रसायन राज्याच्या व देशाच्या राजकारणात खंबीरपणे उभे आहे, ज्याचा महाराष्ट्रालादेखील सार्थ अभिमान आहे. पक्षाच्या भिंतीपलीकडे त्यांचे मित्रत्व सगळ्यांना मान्य असते आणि म्हणूनच शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेसुद्धा म्हणायचे की "जरा तब्येतीची काळजी घ्या. देशाला आणि राज्याला तुमची गरज आहे."

शेतकरी कुटुंबात वाढलेल्या आणि शेकापच्या राजकारणाचे पडघम घरातच वाजत असताना स्वतःला असे घडविणे सोपे नाही. एकदा शाळेत नापास झाल्यानंतर त्यांच्या आईने दोन रट्टे मारून त्यांची शाळा बंद करण्याची ताकीद दिली, त्यावेळेस शिकण्याची जबरदस्त ऊर्मी जवळ बाळगणारा हा नेता आज आयटी, तंत्रज्ञान व नव्या नव्या शैक्षणिक अवकाशात आपल्या तरुण पिढीने मोठी झेप घ्यावी, यासाठी धडपडताना दिसतो, तेव्हा त्यामागे जाणीवपूर्वक जोपासलेली प्रचंड मेहनत, शिक्षणाची आवड आणि दूरदृष्टी लक्षात येते.

शरद पवार हे नाव राज्याच्याच नव्हे तर देशाच्या नकाशावर केवळ राजकारणी नेता एवढेच मर्यादित राहिलेले नाही. अगदी त्यांच्या बारामती मतदारसंघाबाबत सांगायचे झाल्यास देशातील अनेक नेते, मुख्यमंत्री बारामतीत जाऊन मतदारसंघ

कसा जोपासावा लागतो, हे शिकावयास येतात. त्यावेळी या लोकनेत्याच्या कामाची पावती मिळते.

शरद पवार म्हणजे काय, असा सवाल जो कोणी विचारतो किंवा त्यांच्या नावाची व्याख्या करण्याचा कोणी प्रयत्न करतो तेव्हा त्यांना अनेक उदाहरणांचे दाखले सोबतीला घ्यावे लागतात. तरीही काही गुणवैशिष्ट्ये राहिली की काय असे वाटत राहते. काय काय दाखले लोक देतात, याची यादी केली तर कधीही निवडणूक न हरणारा किंबहुना कसोटीच्या वेळीही स्वतःचे मताधिक्य वाढवून दाखविणारा, एकदा संपर्क आला की त्याला कायम नावानिशी ओळखणारा, चांगल्या गोष्टींचे कौतुक करणारा, चांगल्याचा अभ्यास, हव्यास आणि कास धरणारा, एखाद्याला आपलं मानल्यावर त्याच्या गुणदोषांसह स्वीकारणारा, देशहिताच्या कामांसाठी पक्षभेद बाजूला सारणारा, सांस्कृतिक जीवनात समरस होणारा व ते अधिक समृद्ध कसे होईल यासाठी प्रयत्न करणारा, साहित्यिक, पत्रकार, विचारवंत यांच्या विधायक सूचना कायम मान्य करणारा आणि म्हणूनच कायम त्यांच्या मैफिलीत राहणारा अशा असंख्य गुणांना पुरून उरणारा नेता म्हणूनही त्यांची व्याख्या करता येईल.

तरीही पवारांविषयी सतत वेगळे काहीतरी कोणीतरी सांगताना, लिहिताना दिसतात. आपल्या विरोधात जरी काही छापून आले तरी त्यात सकारात्मक बाजू घेण्याची त्यांची वृत्ती विलक्षण आहे. अनेक पत्रकार त्यांच्या विरोधात मजकूर लिहितात. त्यामुळे दुखावून न जाता तो पत्रकार समोर भेटला की “तुझं

वाचलं बरं का! पण ते चुकीच्या माहितीवर आधारित होतं. मला विचारलं असतं तर मी तुझी माहिती दुरुस्त केली असती" असे ठणकावून सांगायला ते मागेपुढे पाहत नाहीत. शरद पवारांना जसं चिडल्याचं कोणी सहसा बघत नाही, तसंच पत्रकारांवर रागावल्याचंही कोणी सहसा सांगत नाही. एक-दोनदाच त्यांना चिडलेले काही पत्रकारांनी पाहिले आहे. कितीतरी वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मुंबई मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकार परिषद होती. त्यात एका महिला पत्रकाराने भूखंडाविषयीचा प्रश्न केला. तिच्या विचारण्याचा रोख तिरकस होता. त्यावर क्षणभर चिडलेल्या पवारांनी "देवाने जीभ दिली म्हणून काही बोलायचे का?" असा सवाल केला होता.

2019 च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी अनेक कार्यकर्ते, नेते आणि नातेवाईकही राष्ट्रवादी काँग्रेस आणि पवारांना सोडून अन्य पक्षात गेले. त्यावेळी पत्रकारांनी नातेवाइकांविषयी वैयक्तिक उल्लेख केल्याने चिडलेले पवार पत्रकारांनी बघितले होते. "या पत्रकारांना बाहेर जाण्यास सांगा, नाहीतर मी पत्रकार परिषद घेणार नाही" असेही अन्य पत्रकारांना सांगताना पवार दिसले. चिडलेल्या शरद पवारांची मिडियात चर्चा झाल्यावर त्यांची बाजू उचलायला मिडियासमोर येऊन सुप्रिया सुळेंना त्यांच्या राज्य आणि देशसेवेच्या आयुष्यभराच्या कष्टांची आणि सोबतच त्यांच्या वार्धक्याची जाणीव करून द्यावी लागली.

2019 च्या निवडणुकांच्या प्रचाराच्या वेळी घडलेल्या प्रसंगाच्या निमित्ताने संजय आवटे यांनी सुरेख वर्णन आपल्या

लेखातून केले आहे. ते म्हणतात, 'शरद पवार पत्रकारांवर रागावले आणि त्याची बातमी झाली. राज ठाकरे पत्रकारांवर 'ऑन एअर' भडकले तरी ती बातमी होत नाही. नरेंद्र मोदी पत्रकारांना मोजतही नाहीत, त्याची बातमी होत नाही. अमित शहा पत्रकारांना जुमानत नाही, त्याची बातमी होण्याचा प्रश्नच नाही. मुद्दा असा आहे की सुसंस्कृत संयमाची अपेक्षा पवारांकडून आहे आणि ते खरेही आहे. इतक्या वर्षात जेवढी टीका पवारांवर झाली तेवढी कोणावरही झाली नसेल. जेवढी थट्टा पवारांची झाली तेवढी महाराष्ट्राच्या कोणत्याही नेत्याची केली गेली नसेल. कोणत्याही राज्याच्या लाडक्या नेत्याच्या कानशिलात लगावली गेली नसेल आणि तरीही 'शांत राहा', असे आवाहन पवारच करू शकतात.

टीका होऊनही त्याला प्रत्युत्तर म्हणून पवार कधी बोलले नाहीत. 'बारामतीचा बाजीराव' असे अग्रलेख पवारांवर लिहिणारे पत्रपंडित होते, तेव्हाही पवार त्या संपादकांविषयीचा आदरभाव बाळगून होते. एवढी टीका होऊनही पवारांचे स्थान कधी ढळले नाही. अशा दर्जाचा दुसरा नेता महाराष्ट्रानेच काय तर देशाने पाहिला नाही. 'पवार संपले' अशा आरोळ्या होत राहिल्या; पण पवार पुढे पुढे जात राहिले आणि त्यांचे स्थान अधिक बळकट होत गेले. त्यांच्या जागी अन्य नेता असता तर तो केव्हाच इतिहासजमा झाला असता. पवार मात्र समकालीन राहिले, 'रिलिव्हंट' राहिले. बदलत्या परिस्थितीतही स्वतःचे स्थान राखून पुढे जात राहिले.'

सध्या पवार कमालीचे अस्वस्थ आहेत कारण त्यांची माणसे त्यांना सोडून गेली. आयुष्याच्या या वळणावर आपल्या एका एका माणसाने सोडून जाणे किती क्लेशकारक असते, हे पवारांशिवाय अन्य कोणाला समजणार आहे? देशाच्या राजकारणातला हा असा श्रेष्ठ नेता आहे, जो सामान्य माणसांसाठी आपले आयुष्य खर्ची घालत आला आहे. मातीत उगवलेला असा हा नेता आहे. त्यांच्या पत्रकारांवर चिडण्यामागची कारणे तपासावी लागतात. एकेकाळी पत्रकारांशी एवढी मैत्री असणारा नेता आज इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या युगात आणि अभ्यास न करता चॅनेलचा टीआरपी वाढविण्याच्या प्रयत्नात व आपण समोरच्याला कसे प्रश्न विचारून किती निरुत्तर करतो यासाठी नवनवीन पत्रकारांचा सुरू असलेला हव्यास आणि त्यांची चढाओढ बघितली तर शरद पवार त्यांच्यापासून का दुरावले ते लक्षात येते. पत्रकारांशी त्यांचे संबंध कमी का होत गेले, त्याची कारणमीमांसा ते त्यांच्या पद्धतीने करतात. “आजकालच्या पत्रकारांचा अभ्यास नाही, वाचन नाही, त्यात राज्यात नेमके काय चालू आहे, त्याचे आकलन होत नाही आणि माईक आला की काहीही विचारण्याचा परवानाच मिळाला, या थाटात काही पत्रकार वावरताना दिसतात. त्यातून खरी माहिती मिळण्याऐवजी बरेचदा माहितीपेक्षा मनोरंजन अधिक होते व गैरसमजही पसरतात, म्हणून मी अशा पत्रकारांना भेटायचे टाळतो.” असे पवार म्हणाले होते. तरी 2019 च्या निवडणुकांदरम्यान आणि सत्तास्थापनेच्या

काळात त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदांची संख्या बघितली तर ते पुन्हा पत्रकारांच्या जवळ आल्याचे दिसले.

पूर्वी त्यांची पत्रकारांशी मस्तपैकी मैत्री होती. पत्रकारांनी एखादे चांगले पुस्तक सांगितले की ते आवर्जून वाचायचे किंवा आपण काही चांगले वाचले असेल तर ते त्यांना वाचायला सांगायचे. इस्रायलचे एक विमान युगांडात पळवून नेले होते. त्यातील प्रवाशांना ओलीस ठेवण्यात आले होते. त्यावेळी इस्रायलच्या कमांडोंनी सगळे प्रवासी सुखरूप सोडवून आणले होते. या घटनेवर आधारित 'एन्टॉब्वे ऑपरेशन' या नावाचा चित्रपट त्यांनी स्वतः पाहिला होता. तो आवडल्याने त्यांनी काही पत्रकार मित्रांना आवर्जून घरी बोलवून तो सिनेमा दाखवला होता.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना रोज सकाळी राज्यातील घडामोडींविषयी वरिष्ठ पोलीस अधिकारी माहिती देतात. मात्र शरद पवार मुख्यमंत्री असताना ते स्वतः सकाळी सातच्या आत इतके अपडेट असायचे की अधिकाऱ्यांची माहिती अपुरी असल्याचे दाखवून द्यायचे. एखादा अधिकारी समाजाभिमुख काम करत असेल तर त्यातून सरकारला वाईटपणा येत असला तरी त्याची पाठराखण करायचे. आजही त्यांच्या या स्वभावात बदल झालेला नाही. यातून अनेक चांगले अधिकारी निवृत्तीनंतरही त्यांच्याशी कोणत्या ना कोणत्या मार्गाने जोडले गेले आहेत. शरद पवार विरोधी पक्षनेते असताना सध्याचे ऊर्जामंत्री दिलीप वळसे-पाटील हे त्यांच्याकडे खाजगी सचिव होते. पवार मुख्यमंत्री झाल्यावर वळसे पाटलांना त्यांच्या कार्यालयात आपला समावेश होईल असे

वाटले; पण पवारांनी त्यांना आंबेगाव मतदारसंघ सांभाळण्याची जबाबदारी दिली व आपल्या सचिवाला सक्रिय राजकारणात आणून मंत्रीही केले. गुणग्राहकता त्यांनी राजकारणातही जपली व श्रीनिवास पाटील या सनदी अधिकाऱ्याला सक्रिय राजकारणात आणून खासदारही केले. त्यांनी ठरविलेल्या उमेदवाराला निवडून आणण्याचे कसब त्यांच्यात इतके ठासून भरले आहे की 2019 मध्येही त्यांनी उदयनराजे भोसले यांना पाडून पुन्हा ज्येष्ठ अशा श्रीनिवास पाटील यांना साताऱ्यातून निवडून आणले.

मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असतानाच्या काळात वेगवेगळ्या फायलींवर त्यांनी केलेल्या नोंदी शरद पवार त्या फायली काढून आवर्जून वाचत असत आणि त्यामुळे त्या नेत्यांची विविध विषयांकडे बघण्याची दृष्टी, व्यापकता व निर्णयक्षमता लक्षात येत असे. रामराव आदिक उपमुख्यमंत्री असताना त्यांनी केलेल्या काही नोंदी अतिशय अभ्यासपूर्ण आहेत, असे ते बरेचदा सांगत. पवारांची अभ्यासाची पद्धत ही अशी होती. अशा त्यांच्या अभ्यासातूनच राज्याच्या विकासासाठी सतत झटणारा अभ्यासू नेता म्हणून त्यांना मान्यता मिळाली.

डॉ. भारती लव्हेकर या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष होत्या. पवारांच्या लोकाभिमुखतेच्या संदर्भात काही माहिती त्यांच्या 2010 मधील एका लेखात आहे. त्यावेळी शरद पवार हे सत्तराव्या वर्षात पदार्पण करीत होते. त्यांच्या राजकीय प्रवासाला 45 वर्षे पूर्ण झाली होती. त्यांच्या मते, शरद पवारांचे

राजकीय जीवन म्हणजे एक चालताबोलता इतिहास आहे. त्यांच्या एकूण कारकिर्दीकडे नजर टाकली की त्यांनी राजकारणापेक्षा समाजहिताला आणि विकासाभिमुख राजकारणाला प्राधान्य दिल्याचे दिसते. विकासाची फळे समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोचली पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असतो. नव्या कार्यकर्त्यांना संदेश देताना ते सांगतात की, 'मी स्वतःच अजून विविध क्षेत्रात शिकत आहे. तरीही माझा देशातील तरुण पिढीवर विश्वास आहे. अनेक तरुण शास्त्रज्ञांनी, उद्योजकांनी, संशोधकांनी, क्रीडापटूंनी देशाचे नाव जागतिक कीर्तीच्या विक्रमी उंचीवर नेले आहे. आपल्या देशाचा, राज्याचा, जिल्ह्याचा, स्थानिक अभ्यास चिकित्सक वृत्तीने तरुणांनी केला पाहिजे. म्हणजे मग कोणत्या दिशेने जायला हवे, हे त्यांचे त्यांनाच समजून येईल.' राजकारणात काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांना शरद पवार सांगतात की, 'आधी राजकारणात येऊ नका. आधी विकासकामातून पुढे या आणि ज्या क्षेत्रात काम करायचे त्या क्षेत्रातील ज्ञान घ्या. पूर्वी पैसा हे भांडवल असायचे; पण आजच्या माहिती व तंत्रज्ञान युगात ज्ञान, माहिती, परिश्रम हे भांडवल आहे, हे लक्षात ठेवावे. असे काम करा की तुम्हाला राजकारणाची गरज लागणार नाही, तर तुमची गरज राजकारणाला लागेल.'

पवारांचे विचार नेहमीच कृतीतून बोलत असतात. समाजमनात कुठलेही परिवर्तन सहजगत्या होत नाही. अशा वेळी समाजहितासाठी प्रसंगी समाजाचा रोष पत्करण्याची तयारी दाखवणे तसेच सत्तेची जोड मिळाल्याने धोरणात्मक निर्णय घेता

येत असले तरी समाजातील विशिष्ट मनोवृत्तीचा सामना व राजकीय कारकिर्दीला प्रश्नचिन्ह लागण्याची जोखीम कुठलाही राजकीय नेता सहसा घेत नाही. त्यासाठी तो नेता समाजसन्मुख असावा लागतो. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, असा केवळ विचार न करता त्यादृष्टीने प्रसंगी समाजाचा रोष पत्करून समाजाला दिशा देण्याचे काम पवारांच्या कृतीतून दिसून येते.

ज्या राष्ट्रात स्त्रीला दुर्लक्षित केले जाते, ती राष्ट्रे मागासलेली असतात. 73 व्या घटना दुरुस्तीमुळे महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण मिळाले. देशात सर्वप्रथम ही संधी महाराष्ट्रातील महिलांना शरद पवारांनी उपलब्ध करून दिली. देशात दहा लाख तर राज्यात एक लाख महिला त्यांच्या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करीत आहेत. राज्यात सर्वाधिक महिला आमदार शरद पवारांच्या पक्षामध्ये असतात. प्रत्येक ठिकाणी महिलांना संधी देण्याचा प्रयत्न करून पवारांनी समाजासमोर वेगळा आदर्श ठेवला आहे. ते संरक्षणमंत्री असताना त्या दलांमध्ये महिलांच्या सहभागाविषयी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शंका व्यक्त केली होती. तरीसुद्धा हवाई आणि स्थलसेनेत महिलांसाठी दहा टक्के आरक्षण ठेवण्याचा निर्णय घेऊन महिलांना एक नवे दालन त्यांनी खुले करून दिले. केवळ संधीच नाही तर काम करताना येणाऱ्या अडचणी सोडविण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य असतो. उपेक्षित राहिलेल्या स्त्री जातीसाठी त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे ठरलेले आहे, जे या देशात अन्य कोणत्याही नेत्याने केले नाही.

❒❒❒

# पवार पॅटर्न

आजच्या राजकारणातील अनेकांची कारकीर्द पाहता सर्व जनतेला शरद पवारांचा अतिशय आदर वाटतो. माणसांच्या घोळक्यात रमलेले, कार्यकर्त्यांशी गप्पा मारत त्यांची सुखदुःख जाणून घेणारे पवारसाहेब अनेक कार्यकर्त्यांनी पाहिलेले आहेत. शरद पवारांच्या राजकारणाला सामाजिक संदर्भ असतात. सामाजिक संदर्भ त्यांच्या कुठल्याही कृतीचा मूळ पाया असतो. आपल्या कृतीचे समाजातल्या कोणत्या घटकावर काय परिणाम होतील, याचा अंदाज घेऊन ते आपली पावले उचलतात. आज राजकीय पक्षाची जडणघडण हे निराळे तंत्र झाले आहे.

शेती असो की संगणक, तंत्रज्ञान असो की साहित्य, राजकारण असो की समाजकारण, यात होत असलेल्या नवनवीन बदलाच्या गोष्टी शिकून घेण्यासाठी शरद पवार सतत तयार असतात आणि ते शिकण्यासाठी त्या त्या क्षेत्रातल्या जाणकारांबरोबर स्नेहसंबंध वाढवणे ही त्यांची खासियत आहे. वैचारिक अद्ययावततेसाठी तशी मानसिकता बनवून त्यानुसार स्वतःला घडवत राहणं हे शरद पवार आजवर कायम करीत राहिले आहेत. ज्ञानपिपासू वृत्ती बाळगून असल्यामुळेच आज बारामती पॅटर्न असो की बी.सी.सी.आय.चे अध्यक्षपद की 2019 च्या विधानसभा निवडणुका आणि सत्तास्थापना, सगळीकडे 'पवार पॅटर्न' दिसून येतो. एकदा त्यांच्यासोबत तुमचे सूर जुळले की मग तुमच्या नात्याचे धागे ते कधीही शिथील होऊ देणार नाहीत.

प्रवासात संबंधित माणसांकडून विविध माहिती मिळवत राहणं हे त्यांचं आवडतं काम. त्यामुळे त्यांचा लोकसंग्रह तर वाढत गेलाच पण प्रवासात त्यांना हव्या त्या विषयावरची माहितीही मिळून जायची आणि एक नवा माणूस त्यांच्याशी जोडला जायचा. त्यामुळे त्यांचं नेटवर्क जबरदस्त आहे. उत्तुंग कर्तृत्व, अफाट क्षमता, काळाची पावले ओळखून भविष्याचा वेध घेणे, विकासाची दूरदृष्टी, सर्वसमावेशक नेतृत्व, कठोर परिश्रम, प्रचंड मोठा लोकसंग्रह, कार्यकर्त्यांना आपुलकी आणि जिव्हाळा वाटावा अशी वागणूक, सामान्य माणसाचा सर्वांगीण विकास हा राजकारणाचा केंद्रबिंदू मानून स्वाभिमानी आचरण असणारा असा कोणताही नेता आज तरी आपल्या देशात नाही.

❑❑❑

# पंजाब समस्या आणि पवार

भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची त्यांच्याच शरीर रक्षकाने केलेल्या नृशंस हत्येनंतर पंजाबचा प्रश्न गंभीर झाला होता. पंतप्रधान राजीव गांधी पंजाबची समस्या सोडविण्यासाठी अत्यंत आतुर झाले होते. ऑपरेशन ब्लू स्टार मोहिमेनंतर शिखांच्या जखमा चिघळल्या होत्या. त्यामुळे शिखांशी सुसंवाद साधून त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेणे अत्यंत अवघड, पण आवश्यक अशी बाब होती. राजीव गांधींनी महाराष्ट्राचे मुख्य सचिव श्री. राम प्रधान यांची केंद्र सरकारचे गृहसचिव म्हणून नियुक्ती केली. त्यांनी भारतातील अनेक प्रश्न

सोडवताना खूप मेहनत घेतली. या काळात राम प्रधानांची आणि राजीव गांधी यांची जवळीक निर्माण झाली होती. त्यांनी 'राजीव गांधी यांच्या सहवासात' हे पुस्तक लिहिले आहे. त्या पुस्तकात शरद पवार यांनी राजीव गांधींना पंजाब प्रश्न सोडविण्यासाठी गुप्तपणे केलेल्या मदतीचा उल्लेख आहे. राम प्रधान म्हणतात, 'माझ्या मुलाच्या लग्नाच्या वेळी राजीव गांधींच्या त्या भेटीला एक महत्त्वाचा पदर होता. त्यावेळी मी त्यांना शिख फोरम व इतर शिख माणसांशी झालेल्या बोलण्याचा वृत्तांत दिला, तेव्हा त्यांनी मला विचारले, "अकाली दलाच्या नेत्यांबरोबर थेट बोलणी करायला काय हरकत आहे? आपले धोरण तसे दूरदर्शीपणाचे ठरणार नाही काय? त्यांच्या मनात खरोखर काय आहे हे जाणून घ्यायची इच्छा आहे." मी उत्तर दिले की, "ती जबाबदारी पत्करणारा माणूस एकच आहे. माझी व त्यांची चांगलीच मैत्री आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांची व प्रकाश सिंह बादलांचीही चांगली मैत्री आहे. शिवाय अनेक शिख नेत्यांशी त्यांचे सुरेख जमते."

त्यांची उत्सुकता अधिक ताणावी म्हणून काही सेकंद मी जाऊ दिले. नंतर म्हटले, "तुमच्यासारखेच ते एक तरुण राजकारणी आहेत. जर त्यांचे व तुमचे जमले तर तुमचे आणि तुमच्या पक्षाचे भले होईल. आज तुमच्यासमोर जी आव्हाने उभी आहेत, त्यांचा मुकाबला तुम्ही दोघे मिळून करू शकलात तर बहार येईल."

त्याच क्षणी माझ्या मनात आले होते ते नाव होते शरद पवारांचे. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांची चांगली ओळख झाली होती आणि मी स्वतः त्या काळात राज्यात गृहसचिव म्हणून काम पाहत होतो. यावेळी शरद पवार काँग्रेस-एस चे अध्यक्ष होते.

राजीवजींनी हिरवा कंदील दाखवला. शरद पवार व संत लोंगोवाल व सुरजीतसिंग बर्नाला यांची भेट झाली आणि पवारांनी दुसऱ्याच दिवशी त्या नेत्यांच्या प्रतिक्रियांचे टिपण प्रधानांच्या हाती ठेवले. चर्चेच्या शेवटी लोंगोवाल पवारांना म्हणाले होते, "अकालींचा खलिस्तानला कधीही पाठिंबा मिळणार नाही, हे जाहीरपणे घोषित करायची आमची तयारी आहे. आम्ही हिंसाचाराच्या विरोधात असू. हिंदू-शिख ऐक्याबद्दल आम्ही नेहमीच ठाम आहोत."

श्री. शरद पवार यांनी केलेले टिपण राजीवजींना आवडले. पवारांच्या क्षमतेबद्दल त्यांना विशेष कौतुक वाटले. ते प्रधानांना म्हणाले, "हे पहा प्रधानजी, पवार-लोंगोवाल भेटीबद्दल कोणाकडे काहीही बोलायचे नाही. अगदी गृहमंत्र्यांकडेही नको. (तेव्हा शंकरराव चव्हाण गृहमंत्री होते.) हे सगळे आपल्या तिघांतच ठेवूया. तुम्ही एस.पी. (शरद पवार) व मी यांच्यातच! बाकी कुणालाही ते ठाऊक असण्याची गरज नाही." राजीवजींचे असे म्हणण्याचे कारण म्हणजे शरद पवारांचे नाव पुढे आले की त्यांचे ज्येष्ठ सहकारी व पक्षनेते यांचा किती जळफळाट झाला असता, याची जाणीव राजीवजींना होती.'

देशाचा प्रश्न सोडविण्यासाठी शरद पवारांनी विनाअट राजीवजींना व प्रधानांना गुप्तपणे मदत केली. त्याचेच फलित म्हणून संत लोंगोवाल यांच्या मदतीने पंजाब करार अस्तित्वात आला. 24 जुलै, 1985 रोजी राजीव गांधी आणि संत लोंगोवाल यांच्या चर्चा होऊन 11 कलमी 'राजीव-लोंगोवाल करार अस्तित्वात आला. मध्यमवर्गी, नेमस्त वर्गाने त्याचे स्वागत केले तर तरुणांमध्ये नेत्यांनी आपल्याला फसविल्याची भावना निर्माण झाली होती. दुर्दैवाने त्यानंतर महिन्याभरातच संत लोंगोवालांची हत्या झाली.

1991 मध्ये राजीवजींच्या हत्येनंतर नवीन सरकारमध्ये पवार संरक्षणमंत्री झाले. अशांत पंजाबला शांत करण्यासाठी त्यांनी पुन्हा प्रयत्न सुरू केले. पाकिस्तानची कुख्यात गुप्तहेर संघटना आय.एस.आय. पंजाबमधील अतिरेक्यांना विविध मार्गाने मदत करीत होती. रात्री अंधारात अतिरेकी पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातून भारताच्या हद्दीत शिरायचे. सीमेवरील गावांमध्ये आश्रय घ्यायचे. शस्त्रांच्या बळावर घरामध्ये शिरून त्याच घरच्यांना जेवण बनविण्यास सांगायचे. नंतर बॉम्ब स्फोट घडवून परत पाकिस्तानात जायचे. दुसऱ्या दिवशी पंजाब पोलीस त्या गावातील त्या घराची झडती घ्यायचे व या लोकांचा अतिरेक्यांना पाठिंबा असल्याचे आरोप लावायचे. त्यामुळे पंजाब-पाकिस्तान सीमेवरील शिखांना दोनही बाजूंनी नरकयातना भोगाव्या लागत होत्या. बॉम्ब स्फोटांमध्ये व बेछूट गोळीबारांमध्ये अनेक निरपराधांचे बळी जात होते. शासकीय सेवेमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांना, वैद्यकीय सेवा

पुरविणाऱ्या डॉक्टर व परिचारिकांना, शिक्षकांना, शेतकऱ्यांना आणि छोटेमोठे उद्योग, कारखाने चालविणाऱ्यांनाही जगणे कठीण होत चालले होते. पंजाबात मोठ्या प्रमाणावर असलेल्या शेतीत यंत्रांचा वापर अधिक होतो. शेतीला लागणारी अवजारे, ट्रॅक्टर व त्याकरिता लागणारे सुटे भाग बनविण्याचे कारखाने भरपूर आहेत. या सर्वांवर वाईट परिणाम झाला. त्याकरिता लागणारे मनुष्यबळ, मोटर मेकॅनिक यांच्याही जिवाला धोका निर्माण झाला होता. अनेकजण सीमेवरील असुरक्षित गावे सोडून शहरांकडे जाऊ लागले. कित्येकांनी तर नोकरीवर पाणीही फेरले. पंजाबातल्या या अशांततेने आणि रोजगार कमी होत गेल्याने तरुणांमध्ये नैराश्य आणि काही प्रमाणात विद्रोहाची भावना निर्माण होत गेली. ही परिस्थिती बदलण्याची निकड पवारांनी ओळखून पंजाबमधील तरुणांमध्ये आणि नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. काही शिख अधिकारी, लष्करी अधिकारी यांना सोबत घेऊन त्यांनी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांच्याशी चर्चा केली. लष्करात 'आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज' पुणे (ए.एफ.एम.सी.), 'आर्मी कॉलेज ऑफ मेडिकल सायन्स' नवी दिल्ली (ए.सी.एम.एस.), 'आर्मी कॉलेज ऑफ डेंटल सायन्स', सिकंदराबाद (ए.सी.डी.एस.) अशी काही महाविद्यालये चालविली जातात. त्यातील काही वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि परिचारिका यांना या सीमेवरील गावांमध्ये संरक्षण मंत्रालयाने सेवेसाठी पाठविले. लष्करात 'मिलिटरी इंजिनिअरिंग सर्व्हिसेस' (एम.ई.एस.) असते. तेथील तंत्रज्ञांनाही पंजाबच्या विविध भागात

नियुक्त केले गेले. केंद्रीय विद्यालयांमधील शिक्षकांनाही तशाच प्रकारे पंजाबात पाठविले. या सर्वांच्या सुरक्षेसाठी साध्या वेशातील लष्करी जवानांना ठेवले. शिवाय गावोगावच्या तरुणांमध्ये या सर्वांनी मिसळून त्यांच्यासोबत कबड्डी, फुटबॉल, कुस्ती असे विविध खेळ खेळावे, अशा सूचनाही दिल्या. हे करीत असतानाच या तरुणांमध्ये सेनेतील जवानांप्रती, नागरी सेवा देणाऱ्यांप्रती आणि आपल्या देशाप्रती कृतज्ञतेचे भाव किंवा चांगले विचार निर्माण व्हावे, यासाठी प्रयत्न केले गेले. शिवाय कुठे कोणी अतिरेक्यांसोबत हातमिळवणी केली आहे का, पुढे काही अतिरेकी हल्ले होणार आहेत का किंवा कुठे पोलीस जनतेवर अत्याचार करीत आहेत का, याचीही माहिती मिळविण्याचा उद्देश त्यामागे होता. भारतीय सेनाप्रमुख जनरल सुनित रॉड्रिग्ज हे पवारांसोबत या मिशनवर होते. तशी लष्कराला नागरी सेवेत गुंतविण्याची परवानगी नसते; परंतु पंजाबमधील परिस्थिती हे फार वेगळी झाली होती. त्यामुळे येथे लष्कराला शांतता स्थापित करण्याच्या कामी लावण्यात आले. या सर्वाचा पुढे चांगला परिणाम दिसू लागला. हळूहळू पंजाबमधील जीवन पूर्वपदावर येत गेले.

इकडे बाबरी मशीद पडल्यावर मुंबईत झालेल्या दंगलींमुळे पवारांना केंद्रातील संरक्षण मंत्री पद सोडून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून 4 मार्च 1993 रोजी परत जावे लागले. अशांत पंजाबला शांत करण्यासाठी किंवा पंजाबात निवडणुका घेण्याइतपत स्थिती निर्माण करण्यासाठी पवारांनी त्यांच्या कार्यकाळात महत्त्वाची भूमिका पार पाडली, एवढे नक्की!

❒❒❒

# मान्यवरांच्या नजरेतून शरद पवार
## सामान्यांना संधी देणारे
## समताधिष्ठित नेतृत्व

प्रवाहाच्या विरुद्ध पोहूनदेखील ज्या नेत्यांनी देशाच्या राजकारणात स्वतःचं स्थान निर्माण केलं, ज्यांची संपूर्ण राजकीय वाटचाल सतत संघर्षाने भरलेली आहे, संघर्ष प्रस्थापितांविरोधात, रूढींविरोधात आणि सत्तापिपासू झालेल्या लोकांविरोधात केला, ज्यांनी स्वतःची अशी एक अस्मिता निर्माण केली आणि कार्यकर्त्यांचे ताफेच्या ताफे ज्यांच्यामागे उभे राहिले, देशभरात हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असे अनुभवसंपन्न नेते आहेत त्यापैकी एक म्हणजे शरद पवार. राजकारणात कितीही वादळे आली तरी जो एक वृक्ष कायमच अविचल राहिला आहे, तो वटवृक्ष म्हणजे शरद पवार. सगळ्या जातीधर्मात आणि सगळ्या वयोगटांमध्ये ज्यांचं नाव आदराने घेतलं जातं ते म्हणजे पवारसाहेब. महाराष्ट्र राज्य कायम आघाडीवर ठेवण्यासाठी ते कायम प्रयत्नशील असतात. समाजपरिवर्तनाच्या बाबतीत त्यांनी जे निर्णय घेतले, ते ठामपणे. प्रश्न कुठलाही असो त्याचा दूरगामी परिणाम काय होईल याचा अचूक वेध घेत राज्य पुढे नेण्याची क्षमता फक्त शरद पवारांमध्येच आहे. त्यांनी आपले संघटन कौशल्य दाखविले, कार्यकर्ते घडविले, अनेक यशस्वी नेते तयार केले आणि आपले आयुष्य सर्वांगाने समृद्ध केले.

उपमुख्यमंत्री पदावर राहिलेले दिवंगत नेते आर.आर. पाटील म्हणजेच आर.आर. आबा यांनी शरद पवार यांच्या बाबतीत नेहमीच कृतज्ञतेचे उद्‍गार अनेक सभांमध्ये, भाषणांमध्ये काढले आहेत. अनेक मुलाखती त्यांनी दिल्या. त्यामध्ये सातत्याने शरद पवारांचा गुणगौरव आणि कृतज्ञताभाव त्यांनी व्यक्त केला. 'पवारसाहेबांनी समाजाच्या प्रत्येक स्तरातून कार्यकर्ते आणि नेते निर्माण केले. त्यासाठी त्यांनी जात, धर्म, गरीब, श्रीमंत असे भेद लक्षात घेतले नाहीत आणि म्हणूनच उपमुख्यमंत्री पदापर्यंत माझ्यासारख्या सामान्याला पोचता आले. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या एका विशिष्ट अस्मितेच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी पक्षाची स्थापना शरद पवार यांनी केली होती. निधर्मीपणा, सामाजिक समता आणि पददलितांच्या मूलभूत मूल्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने कधीच सोडचिठ्ठी दिलेली नाही. आर्थिक उदारीकरणाचे परिणाम दिसायला लागल्यापासून श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी रुंदावत जाऊ नये यासाठी पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रयत्न करीत राहिला.

कृषीक्षेत्रातही शरद पवारांनी सातत्याने नवनवीन प्रयोग केले. त्यांच्या सर्जनशीलतेला सरकारी चौकटीच्या मर्यादा पडतील का अशी भीती अनेकदा व्यक्त केली गेली; पण शेतकऱ्यांनी उत्पादन करून स्वस्थ न बसता त्या मालाला विकण्याचे तंत्र अवगत करण्याची वेळ आली आहे. हा मंत्र त्यांनी कृषीमंत्री या नात्याने अधिक स्वच्छपणे आणि परिणामकारकरीत्या दिलेला

आहे. जैवतंत्रज्ञान उत्पादन, कृषी उत्पादन, प्रक्रिया उद्योग हे सर्व शेतकऱ्याच्या नजरेतून त्यांनी जपले.'

शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार जर कोणी कृतीत आणला असेल आणि या तीनही नेत्यांचा कृतिशील वारसदार जर कोणी असेल तर ते म्हणजे पवारसाहेब आहेत, असे आर.आर. आबा म्हणायचे. नामांतराच्या खूप घोषणा झाल्या; परंतु एक वेळ सत्ता गेली तरी बेहत्तर पण मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देणारच अशी भूमिका घेण्याचे धाडस फक्त पवारसाहेबांनी दाखवले.

पिढ्यान्‌पिढ्या महिलांचे प्रश्न मार्गी लागत नव्हते. त्यांच्या प्रश्नांवर चर्चा तर खूप झाली; पण काही धोरण आखून त्यांना मानसन्मान देणे, त्यातही कृतिशील भूमिका ही महात्मा फुले यांच्यानंतर राज्यामध्ये फक्त पवारसाहेबांनी घेतली आहे. पवारसाहेब राजकारणात किती मोठे आहेत, त्यापेक्षा त्यांनी राजकारणात किती परिवर्तनाचे काम केले याचे वेगवेगळ्या पद्धतीने मूल्यमापन करण्याची आवश्यकता आहे.

शेतकऱ्यांच्या, कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने न्याय देण्याची भूमिका त्यांनी मुख्यमंत्री असताना घेतली, जे निर्णय घेतले तेच सूत्र आजही वापरले जात आहे. 1989-90 साली राज्यात तेव्हा अतिरिक्त उसाचे उत्पादन झाले होते, प्रसंगी कायदे आणि आर्थिक परिस्थितीकडे कानाडोळा करून शेतकऱ्यांच्या मदतीला धावून जाण्याचे धाडस त्यावेळेस महाराष्ट्राच्या विधानसभेत पवारसाहेबांनीच दाखवले होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना 100

कोटी रुपये नुकसान भरपाई देण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. यात शेतकऱ्यांबद्दल दिलदारपणा होता. ग्रामीण भागाची जाण होती. सामाजिक परिवर्तनाची इच्छा होती. आर.आर. पाटील म्हणतात की, 'जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून काम केलेला, साधा उपसभापतीही होऊ न शकलेला माझ्यासारखा माणूस आपल्या पाच वर्षांच्या विधानसभेतील कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्राचा मंत्री होऊ शकतो, हे सांगितले तर आश्चर्य वाटू नये परंतु ज्या वेळी मंत्रिमंडळ गठित करायचे ठरले, काँग्रेसबरोबर सरकार बनवायचे ठरले, त्या वेळी विलासराव देशमुख मुख्यमंत्री आणि छगन भुजबळ उपमुख्यमंत्री झाले. त्यावेळी मनात निर्णय घेतला होता की पवारसाहेबांजवळ मागून आपल्याला काही मिळणार नाही आणि व्हायचे असेल तर मागायची आवश्यकता काय? म्हणून त्यांना मला मंत्री करा असे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कुठे सांगायला गेलो नव्हतो; पण माझे आत्ममन खात्री देत होते की पश्चिम महाराष्ट्रात अनेक स्पर्धक आणि ज्येष्ठ नेते असले तरीसुद्धा आपल्या कामाचे मूल्यमापन करण्याची दृष्टी या नेत्याजवळ आहे आणि त्यामुळे आपल्याला वगळून मंत्रिमंडळ होईल असे मला वाटले नव्हते आणि असे वाटत नसल्यामुळेच मी इच्छा असूनही साहेबांना सांगायला गेलो नव्हतो. पण मला आश्चर्याचा धक्का बसला, ज्या दिवशी मंत्रिमंडळाचा विस्तार होता. त्याच्या आदल्या दिवशी मला साहेबांचा फोन आला. 'आर.आर. उद्या तुम्हाला शपथ घ्यायची आहे.' माझ्या आयुष्यातला तो आणखी एक ब्रेक पॉईंट त्यांच्यामुळे मिळालेला.

फारशा आमदारांचे समर्थन नसतानाही त्यांनी मला मंत्रीपदाची संधी दिली. त्यांचे निर्णय बघितले तर मी असेन, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, दिग्विजय खानविलकर असतील, आम्हा तरुणांना फार मोठी संधी पवारसाहेबांनी दिली. तरुणांना अशी संधी महाराष्ट्राच्या इतिहासात इतर कोणीही दिली नाही. अनेक प्रस्थापितांना नाराज करून, वेळप्रसंगी अडचणी निर्माण करण्याची शक्यता माहीत असतानाही त्यांनी आम्हा तरुणांना दिलेली संधी आम्ही विसरू शकत नाही. या संधीचे सोने करणे ही जिद्द मनाशी आम्ही बाळगत असतो. आम्हाला संधी देताना पवारसाहेबांना काय अडचणी आल्या, हे आम्ही बघितले आहे. पण त्या अडचणींची फिकीर न करता त्यांनी आम्हाला संधी दिली', असे भावोद्‌गार माजी उपमुख्यमंत्री आर.आर. पाटील यांनी काढले होते.

❑❑❑

# रचनात्मक कार्यदृष्टी आणि कार्यकर्त्यांची जपणूक

5 वेळा लोकसभा व 2 वेळा राज्यसभेवर गेलेले माजी कृषीराज्यमंत्री तारिक अन्वर यांचा शरद पवारांसोबत काँग्रेस पक्षात असल्यापासून परिचय होता. काँग्रेस पक्षातून राष्ट्रवादी काँग्रेस हा वेगळा पक्ष झाला तेव्हापासून त्यांना जवळून पाहण्याची संधी तारिक अन्वर यांना मिळाली. त्यांना पवारांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख झाली. ते म्हणतात, आजवर अनेक

राजकीय नेते बघितले पण शरद पवार त्या सर्वांपेक्षा वेगळे आहेत. ते सतत राजकारणात राहतात आणि तोडमोड करीत राहतात. मात्र राजकारणाबरोबरच रचनात्मक काम करण्याची त्यांची इच्छा आहे, याची प्रचिती बारामतीमध्ये आली. तेथे शिक्षण, उद्योग, कृषी अशा प्रत्येक क्षेत्रात विकास झालेला आहे. कोणत्याही प्रसिद्धीशिवाय शांतपणे बारामतीसारख्या छोट्याशा गावाचा विकास पवारांनी केल्याने अनेकजण प्रभावित झाले. पवार म्हणतात की, 'राजकीय नेत्यांनी आपला पन्नास टक्के वेळ रचनात्मक कामासाठी द्यायला हवा. जोपर्यंत रचनात्मक कामे होणार नाहीत, तोपर्यंत देशाचा विकास होऊ शकत नाही.'

बारामतीमध्ये वस्तुसंग्रहालय आहे. त्यात शरद पवार यांना मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते, संरक्षणमंत्री पदावर असताना मिळालेल्या सर्व भेटवस्तू मांडलेल्या आहेत. पेन, घड्याळापासून अतिशय भारी किमतीच्या भेटवस्तू तिथे ठेवण्यात आलेल्या आहेत. स्वत:च्या सर्व भेटवस्तू वस्तुसंग्रहालयास देणारा दुसरा नेता भारतात नाही. पवारांच्या इमानदारीचाही हा परिचय आहे.

पवारांचा एक गुण असा की, खरे बोलण्याची त्यांच्यात हिंमत आहे. हा गुण फार थोड्या नेत्यांमध्ये असतो. बाबरी मशीद पाडली गेली, त्यावेळी शरद पवार यांचे उद्‌गार होते की, 'बाबरी समस्येवर न्यायालयाकडून निर्णय देण्यात आला तर फारच चांगले. त्याचे सर्वांनी पालन करावे. वस्तुस्थिती ही आहे की, बाबरी मशीद उद्‌ध्वस्त होण्यामुळे देशातील अल्पसंख्यकांचे आत्मबळ (आत्मविश्वास) तुटले आहे. ते आत्मबळ सावरण्यासाठी

तेथे (अयोध्येत) बाबरी मशीद पुन्हा बांधायला हवी.' कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्याने असे म्हटलेले नाही.

देशहितावर मोकळेपणाने बोलण्याची शरद पवार यांची वृत्ती आहे. राष्ट्रीय स्वाभिमानाच्या रक्षणासाठी त्यांनी जो त्याग केला, तसे धाडस अत्यंत कमी लोकांमध्ये असते. ते लोकसभेतील विरोधी पक्षनेते होते. त्यांच्यात ती क्षमता होती. एक प्रस्थापित नेते म्हणून ते सर्वांना माहीत आहेत; पण देशाच्या स्वाभिमानाचा प्रश्न आला तेव्हा वरील सर्व पदांचा त्याग करून त्यांनी निर्णय घेतला. सोनिया गांधी यांच्या परदेशीपणाबद्दल काँग्रेस पक्षात आवाज उठविला. राजकीय स्वार्थाने पदांचे राजकारण करणाऱ्या कोणाही राजकारणी व्यक्तीकडून असे साहस होऊ शकत नाही. लक्षात घेण्यासारखी बाब अशी की पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला, तेव्हा लोकसभा आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांची घोषणा आधीच झालेली होती. एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा नवीन झेंडा, नवीन निवडणूक चिन्ह, तर दुसरीकडे भारतीय जनता पक्ष निवडणुकीत उतरला होता. असे असतानादेखील पवार यांनी 60 आमदार व 11 खासदार निवडून आणले. पवार यांचा जनमानसात तळागाळापर्यंत संबंध आहे, याचे हे प्रतीक आहे. तसेच महाराष्ट्रातील त्यांच्या लोकप्रियतेचे हे एक उदाहरण आहे. आपल्या कार्यकर्त्यांचा विचार आणि काळजी घेणे हे शरद पवार यांचे वैशिष्ट्य. ते कार्यकर्त्यांकडे व्यक्तिगत लक्ष देतात. त्यांना कष्ट न होतील याचा विचार करतात, असे तारिक अन्वर यांनी म्हटले होते.

❒❒❒

# कार्यकर्त्यांचे चालते बोलते विद्यापीठ

शरद पवार यांच्यासारखा विलक्षण लोकसंग्रह असणारा, लोकांच्या भाषेत लोकांचे प्रश्न समजून घेण्याची-देण्याची हातोटी असणारा, लोकांचे प्रश्न त्यांच्याच भाषेत मांडण्याची विलक्षण पद्धत असणारा दुसरा नेता नाही. यासाठी त्यांना तासन्तास काम करावे लागते. लोकांसाठी ते सतत उपलब्ध असतात. ज्या समारंभात, ज्या लोकांमध्ये ते जातात तिथे राजकारणासोबत समाजकारणाचा विचार सातत्याने मांडतात. सत्यशोधक समाजाची भूमिका त्यांनी यशस्वीपणे मांडली आणि त्यातूनच अनेक कार्यकर्ते उभे राहिले. सर्व विषयांचा पवारांचा अभ्यास व आकलन जबरदस्त आहे. म्हणूनच कृषी उद्योग क्षेत्रासह सर्वच क्षेत्रात कर्तबगारपणे कार्य करणारे 'चालते बोलते विद्यापीठ' म्हणून आज पवारांकडे बघितले जाते.

शरद पवार विरोधी पक्षनेते असताना दिलीप वळसे-पाटील हे त्यांच्याकडे खाजगी सचिव होते. पवार मुख्यमंत्री झाल्यावर त्यांना आंबेगाव मतदारसंघ सांभाळण्याची जबाबदारी दिली व आपल्या सचिवाला सक्रिय राजकारणात आणून त्यांनी मंत्री केले. दिलीप वळसे पाटील 2005 मधील त्यांच्या एका लेखात म्हणतात, 'मुख्यमंत्रीपदी असणाऱ्या पवारसाहेबांविरुद्ध संक्रांतीच्या मुहूर्तावर काही मंत्र्यांनी केलेले बंड, त्यानंतर धास्तावलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला त्यांनी दिलेला दिलासा, शांतपणाने एका बाजूने धीर देण्यासाठी आणि दुसऱ्या बाजूने ते बंड मोडून काढण्यासाठी केलेले प्रयत्न आणि तिसऱ्या बाजूने

वरिष्ठ नेतृत्वाला सत्यस्थिती पटवून देणे. संकटाच्या परिस्थितीवर कशी मात करायची याची साक्ष देणारे हे उत्तम उदाहरण आहे.'

आणीबाणीनंतर काँगेसचे विभाजन झाले. मात्र निवडणुकीनंतर दोन्ही पक्षांना एकत्र सरकार स्थापन करावे लागले. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री आणि नासिकराव तिरपुडे उपमुख्यमंत्री झाले. तिरपुडेंनी सतत यशवंतराव चव्हाणांचा केलेला अवमान आणि त्यांना बंध न घालता आल्याने स्वाभिमानी पवारसाहेबांनी प्रतापराव भोसले, गोविंदराव आदिक, सुशीलकुमार शिंदे, शंकरराव चव्हाण, विनायकराव पाटील या सर्वांसह वेगळी भूमिका घेतली आणि राज्यात पुलोद सरकार स्थापन केले. शरद पवार यांना मुख्यमंत्री व्हायचे होते, एवढाच सरकार स्थापण्याचा चुकीचा अर्थ लावला गेला. साहेब दिल्लीश्वरांसमोर स्वाभिमानाने उभे राहिले आणि त्यानंतर राजकारणामध्ये जे काही घडले ते सर्व महाराष्ट्राला आणि देशाला माहीत आहे.

राजीव गांधी पंतप्रधान झाल्यानंतर 1986 साली इंदिरा काँग्रेस आणि एस काँग्रेसचे विलिनीकरण झाले. 1988 मध्ये पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. 1990 साली विधानसभेच्या निवडणुका झाल्या आणि शरद पवार पुन्हा मुख्यमंत्री झाले होते. राजीव गांधी आणि शरद पवार एकमेकांच्या जवळ येऊ लागले होते. राज्याला आणि देशाला पुढे घेऊन जाण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केल्याशिवाय पर्याय नाही, या विचारामुळे या दोन्ही नेत्यांना एकमेकांविषयी आकर्षण वाटू लागले होते. 1991 च्या निवडणुकीमध्ये राजीव गांधी तामीळनाडू राज्यातील श्रीपेरंबदूर

येथे गेले. त्याच्याआधी पश्चिम महाराष्ट्रातील सभा संपवून राजीवजी आणि पवारसाहेब एकत्र मोटारीने मुंबईला परत आले होते. काही अवधी मिळाला होता. त्या काळात दोघांच्या गप्पा सुरू झाल्या. देशाचे पंतप्रधान राजभवनावर न जाता थेट वर्षावर आले. त्या ठिकाणी या दोन्ही नेत्यांची चर्चा झाली आणि त्यामध्ये राज्याचे आणि देशाचे पुढचे राजकारण ठरले होते; परंतु नियतीला कदाचित हे मान्य नसावे, कारण त्यानंतर श्रीपेरंबदूर येथे राजीवजींची निर्घृण हत्या झाली. त्यामुळे दोघांनी एकत्रितपणे काम करण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.

❒❒❒

# कृतिशील नेता

शरद पवारांची काम करण्याची पद्धत, निर्णय घेण्याची तत्परता अत्यंत वाखाणण्यासारखी आहे. एवढ्या मोठ्या पदांवर राहिलेला हा नेता. हजारो लोक रोज वेगवेगळे प्रश्न, समस्या घेऊन येतात आणि नंतर करू किंवा होणार नाही असे न सांगता त्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन हा प्रश्न लवकर कसा मार्गी लावता येईल, कसा सोडवता येईल, यासाठी लगेच कृती करणारे नेते म्हणजे शरद पवार. 2000 साली संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाबाहेरील वस्त्यांचा प्रश्न फार अडचणीचा झाला होता. 68 हजार लोकांची पक्की घरे बुलडोझर लावून पोलीस फोर्स आणून तोडण्यात आली. त्याकरिता खूप आंदोलने केली गेली. घर संसार उद्ध्वस्त झालेल्या तीस ते पस्तीस हजार महिला त्यावेळी

एकत्रित येऊन मोर्चे काढून, धरणे देऊन आपल्या हक्कांसाठी लढत होत्या. हायकोर्ट, सुप्रीम कोर्टापर्यंत कायदेशीर लढाईही त्या लढल्या. सुप्रीम कोर्टात महिला जिंकल्या. जमिनीचा सर्व्हे व्हावा, ही त्यांची मागणी कोर्टाने ग्राह्य धरली; परंतु तरीही वनविभागाचे अधिकारी, जिल्हाधिकारी चालढकल करीत राहिले. शेवटी सर्व महिला पवारसाहेबांना भेटायला आल्या. पवारसाहेबांना त्यांचा प्रश्न माहीत होताच; परंतु तेथील लोकांचे पुनर्वसन कसे करायचे, याचा विचार ते करीत होते. कोर्टात प्रतिज्ञापत्र देऊन शासनाने कष्टकरी जनतेच्या पाठीशी उभे राहायला पाहिजे, यासाठी त्यांनी लगेच वनमंत्र्यांना, जिल्हाधिकाऱ्यांना बोलावून त्यांची बाजू समजून घेऊन शासनाने कशाप्रकारे निर्णय घेतला पाहिजे हे सांगून आदेशही दिले. त्यांनी अशाप्रकारे या महिलांना न्याय दिला होता.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आता जे 50 टक्के आरक्षण मिळाले आहे, त्यासाठी शरद पवार यांचे भगीरथ प्रयत्न आहेत. परित्यक्ता महिलांचे प्रश्न असो की अत्याचाराविषयीचे प्रश्न, पवारांनी त्यांना सोडविण्यासाठी प्राधान्य दिलेले आहे. ते मुख्यमंत्री असताना विविध क्षेत्रातील नामवंत महिलांशी, संबंधित संस्थांच्या पदाधिकाऱ्यांशी, नेत्यांशी चर्चा करून, सर्व महिला प्रतिनिधींचे म्हणणे शांतपणे ऐकून घेऊन त्यावर कायदा समिती त्यांनी नेमली होती. असे अनेक महत्त्वाचे निर्णय पवारांनी महिलांसाठी घेतलेले आहेत, असे विधान परिषद सदस्या सौ. विद्या चव्हाण यांनी 2010 च्या दै. लोकमतच्या एका विशेष पुरवणीतील लेखात नमूद केले होते.

❒❒❒

# शरद पवार आणि बबनराव पाचपुते

माजी आदिवासी विकास मंत्री बबनराव पाचपुते यांनी शरद पवार यांच्याविषयी आठवणी सांगितल्या आहेत. बबनराव पाचपुते महाविद्यालयात शिकत असताना विद्यार्थी म्हणून त्यांच्यासमोर खूप मोठे प्रश्न होते. ते एका सामान्य शेतकरी कुटुंबातून आलेले होते. त्यांच्या कुटुंबातील कॉलेज शिक्षण घेऊन पदवीधर झालेले ते पहिलेच होते. ते महाविद्यालयात शिकत असताना 1972 मध्ये देशात दुष्काळ पडला होता आणि या पार्श्वभूमीवर फी वाढ नको म्हणून आंदोलन सुरू झाले होते आणि त्यात बबनराव पाचपुते सहभागी होते. याच दरम्यान राज्यात रोजगार हमी आणि बाकीची कामे निघालेली होती. त्यावेळी वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते आणि शरद पवार हे गृहराज्यमंत्री होते. या दोघांचा नगर जिल्ह्यामध्ये दौरा होता. या दौऱ्यादरम्यान आपलं निवेदन तयार करायचं आणि मुख्यमंत्र्यांना द्यायचं असा निर्णय विद्यार्थी संघटनेने घेतला होता. त्यासाठी मुख्यमंत्र्यांची वेळ मागण्यात आलेली होती; पण ती मिळाली नाही. त्यामुळे नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणाऱ्या मुख्यमंत्र्यांची गाडी अडवण्याचा निर्णय विद्यार्थी संघटनेने घेतला होता. हे काम कोण करणार असा प्रश्न निर्माण झाला होता. कोणीही त्यासाठी पुढे यायला तयार नव्हते, हे लक्षात आल्यावर बबनराव पाचपुते यांनी त्यात पुढाकार घेतला आणि केवळ चार मुलांना बरोबर घेऊन मुख्यमंत्र्यांची गाडी अडवण्याचा निर्णय घेण्यात आला. दौऱ्यावर मुख्यमंत्र्यांसमवेत तत्कालीन गृहराज्यमंत्री शरद पवार हे होते.

मुख्यमंत्र्यांची गाडी आल्यानंतर ती गाडी पाचपुतेंसह चार विद्यार्थ्यांनी अडवली. त्यावेळी त्यांना मारण्यासाठी पोलीस धावले. मुख्यमंत्री गाडीतून खाली उतरले. त्यांच्याबरोबर शरद पवारदेखील उतरले आणि विद्यार्थ्यांच्या दिशेने आले. 'विद्यार्थ्यांना मारू नका' असे त्यांनी पोलिसांना सांगितले. विद्यार्थ्यांचे काय प्रश्न आहेत, हे त्यांनी जाणून घेतले. त्यावेळी बबनराव पाचपुते यांनी निवेदन दिले. पवारसाहेबांनी या विद्यार्थ्यांना भेटण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांशी बोलले, त्याचे प्रश्न समजावून घेतले आणि ते सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करू, असे आश्वासनही दिले. याच काळात पाचपुते यांच्या राजकीय जीवनाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. कॉलेजमध्ये ते हिरो ठरले.

पुढे पाचपुते कॉलेजमध्ये असतानाच पवारसाहेब राज्याचे कृषीमंत्री झाले आणि या काळात त्यांनी अनेक चांगले निर्णय घेतले. गहू, ज्वारीची पायलट योजना त्यांनी त्या काळात राबवली. त्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला. धान्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कर्ज उपलब्ध करून देण्याची योजना त्यांनी राबविली. वडील जवळ नसल्याने बबनराव पाचपुते स्वतः शेती करून गव्हाचं पीक घेत होते. त्या दरम्यान पवारांचा कार्यक्रम नगरला होता, त्यावेळी गव्हाच्या कणसांचा एक गुच्छ त्यांनी तयार केला आणि पवारसाहेब ज्या रस्त्याने जाणार होते, त्या रस्त्यावर गुच्छ घेऊन उभे राहिले. त्यांच्याजवळ येताच पवारांची गाडी थांबली आणि त्यांनी तो स्वीकारला. त्यावेळी त्यांनी चौकशी केली. त्यावर ते गृहराज्यमंत्री असताना बबनरावांनी गाडी अडवली

होती त्याची आठवण करून दिली. त्यानंतर सभेत त्यांनी पाचपुतेंच्या नावाचा उल्लेख केला. कॉलेजची मुलं शेती करायला लागली आहेत आणि ती चांगली पिके घेत आहेत, हे त्यांनी सांगितलं. त्यांच्या विधानाने बबनराव पाचपुते यांचा विश्वास वाढला आणि त्यामुळे त्यांनी राजकारणात काम करण्यास सुरुवात केली.

शरद पवार यांच्याशी संपर्क साधणे बबनरावांना शक्य होत नव्हते. त्यावेळी पवार काँग्रेसमध्ये होते आणि बबनराव जनता दलासाठी काम करीत होते. त्यावेळी बबनरावांनी आणीबाणीला विरोध केला होता आणि पवारसाहेबांच्या जवळ जाण्याचाही त्यांनी खूप प्रयत्न केला पण जमले नाही. 1980 मध्ये ते निवडणुकीला उभे राहिले, त्यावेळी पवार यांच्या काँग्रेस एस मधील उमेदवार उभा होता. त्याच्या प्रचारासाठी शरद पवार सभा घेणार होते. निवडणुकीसाठी बबनराव उभे आहेत हे कळल्यामुळे पवारांनी तिथे सभा घेतली नाही. त्यामुळे बबनराव विजयी झाले. ते निवडून आल्यानंतर पवारसाहेबांना भेटले आणि त्यावर पवार यांनी आपण सभा का घेतली नाही ते सांगितले, 'तुझ्यासारखा तडफदार उमेदवार निवडून आला पाहिजे, म्हणून प्रचार सभा घेतली नाही' असे त्यांनी सांगितले. पवारांविषयी बबनरावांच्या मनात आणखी आदर वाढला. अशाप्रकारे पवारसाहेबांची ओळख वाढली आणि राजकारणात त्यांचा आदर्श शरद पवार ठरले.

शरद पवार हे आगळंवेगळं व्यक्तिमत्त्व आहे. सामान्य कुटुंबातील तरुणांना चांगल्या संधी मिळाल्या पाहिजेत, यासाठी ते धडपडत राहिले. कोणताही निर्णय घेताना तो सामाजिक परिवर्तनाचा असावा, यासाठी धडपडत राहिले. ते राज्याच्या मुख्यमंत्रीपदी असताना नामांतराचा निर्णय त्यांनी घेतला. त्यावेळी या नामांतराच्या आंदोलनात बबनरावही होते. नामांतर केले तर सत्ता जाईल असे अनेकांनी सांगितले होते; पण सत्तेपेक्षा परिवर्तन महत्त्वाचे आहे, असे पवार त्यावेळी म्हणाले होते.

शरद पवार यांच्या एका शब्दामुळे सामान्य कार्यकर्त्यांच्या, राजकारण्यांच्या मनाला चालना मिळते. अनेक लोकांना घडवण्याचे काम पवारांनी केले आहे. 1999 मध्ये बबनराव पाचपुते हे पराभूत झाल्यानंतर पवारसाहेबांनी त्यांना बोलावून घेतले आणि राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदाची सूत्रे त्यांच्याकडे सोपवली. त्या काळात पवारांकडून त्यांना अनेक महत्त्वाच्या सूचना मिळाल्या, शिकायला मिळाले.

बबनरावांनी आणखी एक किस्सा सांगितला आहे. 'पवारसाहेब आजारी असल्याने रुग्णालयात दाखल होते. त्या दिवशी मी रात्रभर अस्वस्थ होतो. पवारसाहेबांना भेटेपर्यंत मला खूप अस्वस्थ वाटत होतं; पण मी गेलो तेव्हा रुग्णालयातही पवारसाहेब कामच करीत असल्याचे मला दिसले. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळाली, याबद्दल मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो. आधी वनखाते व त्यानंतर आदिवासी विकास खाते माझ्याकडे सोपवण्यात आले, त्यावेळी मी नाराज

होतो आणि हे खातं किती महत्त्वाचं आहे, त्यामध्ये काय काय काम करता येईल, हे मला पवारसाहेबांनी समजावून सांगितलं. त्यांचे मार्गदर्शन मिळताच माझ्या मनातील नाराजी दूर झाली.'

बबनराव विरोधी पक्षात असतानाही त्यांचे एखादे भाषण चांगले झाले तर पवार त्याविषयी नेहमी सांगत असत, कौतुक करीत. कोणता मुद्दा घ्यायला हवा होता आणि कोणता नको हेही त्यांना सांगत असत. अगदी छोट्या-छोट्या गोष्टींकडे बारकाईने लक्ष देत असत आणि त्यामुळे पवारांविषयी बबनरावांच्या मनात आदराची भावना होती. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करायला मिळाले पाहिजे याची ते वाट बघत होते. 'राष्ट्रवादी पक्षाची ताकद वाढवायची आहे, त्यामुळे तुझ्यासारख्या नेत्यांनी काँग्रेसमध्ये आलं पाहिजे' असे त्यांनी सांगितले. बबनरावांनी त्यावेळी नऊ आमदारांना घेऊन काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि तेव्हापासून ते पवारसाहेबांच्या सोबत आहेत. शरद पवारांकडे खूप उत्साह आहे. त्यांच्या कामाकडे आणि त्यांच्या उत्साहाकडे पाहिल्यानंतर त्यांच्यापेक्षा कमी वयाच्या लोकांनाही लाज वाटते. कामासाठी रात्री दोन वाजेपर्यंत जागं राहिल्यावरही सकाळी लवकर उठून ते तयार असतात. सतत काम करत राहणे हा त्यांचा स्वभाव आहे. एखाद्याची चूक झाली तरी त्याला समजावून सांगतात. इतका मोठा नेता असूनही महाराष्ट्रातील लोकांनी त्यांना सहकार्य करायला पाहिजे होते, तेवढे केले नाही, अशी खंत बबनरावांनी व्यक्त केली.

❒❒❒

# भटक्या-विमुक्तांना न्याय

1990 च्या जानेवारीत 'उपरा'कार लक्ष्मण माने हे मुंबईच्या विधानपरिषदेत सदस्य म्हणून पोचले, ते केवळ शरद पवार या भटक्या-विमुक्तांच्या चळवळीतल्या मार्गदर्शकामुळे, असे ते स्वतः सांगतात. शरद पवार हे 1980 पासून भटक्या-विमुक्तांच्या चळवळीशी संबंधित आहेत. लक्ष्मण माने असेम्ब्लीत दाखल झाले तो काळ मोठा राजकीय उलथापालथीचा होता. शरदराव 1988 ला दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले होते. महाराष्ट्राच्या सामाजिक घडामोडींचा अत्यंत महत्त्वाचा कालखंड सुरू झाला होता. सामाजिकदृष्ट्या काही महत्त्वाचे निर्णय करावेत, असा मानस ठेवून पवारांनी वाटचाल सुरू केली होती आणि लक्ष्मण माने यांच्यासारख्या व्यक्तीला आमदार करून त्यांनी भटक्या-विमुक्तांना न्याय देण्याचा प्रयत्न केला होता, असे लक्ष्मण माने यांनी 2005 मधील एका लेखात नमूद केले आहे.

मंडल आयोगाची अंमलबजावणी करून इतर मागासवर्गीय समाजाला 52 टक्के आरक्षण देत व्ही.पी. सिंह यांच्यानंतर शरद पवारांनीच सामाजिक न्याय दिला. भटक्या समाजाच्या राखीव जागा वाढणार असे जाणवत होते; पण हे होताना धनगर-वंजारी समाजाचा समावेश भटक्या विमुक्तांमध्ये करण्याचा निर्णय सुधाकरराव नाईक यांनी घेतला. धनगर-वंजारी या पुढारलेल्या जाती आहेत, तर कैकाडी समाज अत्यंत मागासलेला आहे असे लक्ष्मण माने यांचे स्पष्ट मत होते. धनगर मेंढ्या घेऊन फिरतात म्हणून त्यांना भटके ठरवू नये, असे

लक्ष्मण मानेंसोबत रा.सु. गवई यांनीही सांगितले होते; परंतु आरक्षण तशा पद्धतीने लागू झाले होते. लक्ष्मण माने हे शरद पवारांकडे गेले आणि ती समस्या त्यांना देशाचे संरक्षण मंत्री असताना समजावून सांगितली. शरद पवारांनी चर्चेतून मार्ग काढण्याचे आश्वासन दिले आणि त्यानंतर सविस्तर चर्चाही झाली. भटक्या-विमुक्तांसाठी स्वतंत्र जागा ठेवण्याचा निर्णय झाला. मागासवर्गीयांमध्ये दुफळी नको म्हणून मार्ग काढण्यात आला. त्यानुसार भटक्या-विमुक्तांच्या जागांचे वाटप अ, ब, क, ड असे केले. अ म्हणजे विमुक्त जमाती, ब म्हणजे मूळच्या भटक्या जमाती, क म्हणजे धनगर आणि ड म्हणजे वंजारी व विशेष मागास प्रवर्ग म्हणजे गोवारी आणि तत्सम आणि इतर मागासवर्गीय अशी वाटणी नक्की झाली. एकाने दुसऱ्याच्या संवर्गात जाऊन जागा पळवू नये याची व्यवस्था झाली. एक सामाजिक आक्रमण शरद पवारांनी ताकदीने थोपवले आणि दुर्बलांना वाचवले, याची कृतज्ञता लक्ष्मण माने यांनी व्यक्त केली.

2009 मधील 'आणि काही तासातच 25 लाख रुपये उभे राहिले' या त्यांच्या लेखात लक्ष्मण माने यांनी आणखी एक खूप वर्षापूर्वीचा प्रसंग नमूद केला आहे. भटक्या-विमुक्तांच्या शिक्षणाची जबाबदारी यशवंतराव चव्हाण यांनी लक्ष्मण माने यांच्या खांद्यावर दिली होती. चव्हाणसाहेबांच्या निधनानंतर अध्यक्षपदाची जबाबदारी 20 वर्ष शरद पवारसाहेबांनी सांभाळली. चव्हाण साहेबांच्या निधनानंतर उपेक्षित समाजाच्या शिक्षणाचे काम कसे पुढे जाईल याच काळजीत असताना लक्ष्मण माने चव्हाणांचे

मानसपुत्र शरद पवार यांच्याकडे गेले आणि अध्यक्षपद स्वीकारण्याची त्यांना विनंती केली. त्यांनी ती स्वीकारली परंतु ती स्वीकारताना पवार म्हणाले की, 'या संदर्भात माझं चव्हाणसाहेबांशी बोलणं झालं होतं. या कामात त्यांनी मला मदत करायला सांगितलं होतं. तेव्हा राजकारण, समाजकारण काहीही घडलं तरी मी अखेरपर्यंत या कामात चव्हाणसाहेबांचं काम समजून मदत करीतच राहीन.' खरोखरच त्यानंतर भटक्या-विमुक्तांचे शिक्षण करणारी 'भारतीय भटके विमुक्त विकास संशोधन संस्था' आणि लक्ष्मण माने यांच्यासह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही.

या कामात पवारसाहेबांचे अत्यंत बारकाईने लक्ष असायचे. संस्थेविषयी खडान्खडा माहिती त्यांच्याकडे असायची. संस्थेच्या सुरुवातीच्या दिवसांत एके दिवशी लक्ष्मण माने पवारसाहेबांच्या गाडीत जात असताना त्यांनी सहज म्हणून प्रश्न विचारला की, 'लक्ष्मणराव, हल्ली मटण कसं किलो आहे?' त्यावर लक्ष्मण माने गोंधळले. त्यांना कळेना की हे मटण मध्येच कुठून आलं? त्यांनी म्हटलं की, 'असेल दहा-पंधरा रुपये किलो.' ते हसले आणि म्हणाले, 'आपल्या भोसरीच्या आश्रमशाळेत पाचशे रुपये किलोने मटण घेतलं.' माने हादरून गेले, कारण संस्थेला त्यांनी फार काटेकोरपणे आर्थिक शिस्त लावलेली होती. पदाधिकाऱ्यांच्या हातात पैसा येत नसे. पाचशे रुपयांच्या वरचे व्यवहार चेकने व्हायचे. खरेदीसाठी निवडलेल्या समितीमार्फतच कटाक्षाने खरेदी व्हायची. सर्व मालाची खरेदी सरकारी डिपार्टमेंटल स्टोअरमधून

व्हायची आणि त्यामुळे मॅनेजिंग कौन्सिलमधील कोणताही सभासद या व्यवहारांशी संबंधित नसे. दळण, जळण, मटण अशा बाबींची स्थानिक पातळीवर खरेदी व्हायची. माने पुण्यातच असल्याने लगेच भोसरीच्या आश्रमशाळेत दाखल झाले आणि चौकशी केली. तेव्हा त्यामध्ये एक महिन्याचे मटणाचे बिल असे होते: पण लिहिणाऱ्याने 'एक महिन्याचे' ऐवजी 'एक किलोचे' असे लिहिल्याने घोटाळा झाला होता. पवारसाहेब मिस्किलपणे एवढेच म्हणाले, 'बारीकसारीक गोष्टीत लक्ष घातले पाहिजे, लक्ष्मणराव. चव्हाणसाहेबांचं काम आहे. तुमच्या-माझ्या कामाला गालबोट लागणार नाही, याची काळजी आपण घेतली पाहिजे.'

संस्थेत मुलांची संख्या वाढायला लागली तशा गरजा वाढायला लागल्या. सुरुवातीला काही दिवस कोल्हापूरच्या 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज आश्रमशाळे'ला स्वत:ची जागा नव्हती. मानेंनी राष्ट्रसेवा दलातील जुने सहकारी मित्र सुरेश शिपूरकर यांना कामात लक्ष घालण्याची विनंती केली. त्यांनी उजळाईवाडी येथील त्यांच्या स्वतःच्या प्लॉटवर आश्रमशाळेसाठी काही खोल्या बांधून मुलांची तात्पुरत्या स्वरूपात व्यवस्था केली. त्या शाळेच्या जागेसंबंधी दरवर्षी साधारण सभेमध्ये चर्चा होत असे. पवारसाहेबांनी मोकळी जागा बघायला सांगितले. सुरेश शिपूरकर, व्यंकप्पा भोसले, गीताताई जाधव, डॉ. दाभोळे ही कोल्हापूरची टीम कामाला लागली. सेवा दलातील त्यांचे जुने सहकारी मित्र श्रीकांत चौगुले त्यांच्या मदतीला धावून आले. त्यांनी स्वतःसाठी पाहिलेली पाच एकरांची एक मिळकत - सरदार गायकवाड यांच्या

मालकीची - कोल्हापूर शहरालगतच्या पाचगाव येथे होती. जागेचा व्यवहार ठरला आणि संस्थेने पाच एकर जागा विकत घेतली. कोल्हापूरला शाहू महाराजांच्या नावाने आश्रम चालतो, तेथे आता जागा उपलब्ध झाली, याचा पवारसाहेबांना खूप आनंद झाला. डोंगर पठारावर ही अतिशय सुरेख जागा होती, 25 मे 2001 रोजी तिथे पवारसाहेबांच्या हस्ते इमारतीचे भूमिपूजन झाले. तेव्हा दुपारचे अडीच वाजले होते. साहेबांबरोबर त्यांचा 'कॉन्हवाय' तर होताच; पण बाकीची वाहनेही होती. या सर्वांना पवारांनी सर्किट हाऊसला पाठवून दिले आणि लक्ष्मण मानेंना म्हणाले की 'गाडीत बसा.' त्यांना मानेंनी गाडीतच इमारतीचे आराखडे दाखवले. त्यांची गाडी सुरू झाली आणि पाचगावकडून कोल्हापूरकडे निघाली. त्यानंतरचे वर्णन लक्ष्मण माने यांच्या शब्दात वाचण्यासारखे आहे. 'मला ते म्हणाले, "किती बजेट आहे?" मी म्हणालो, "पंचवीस ते तीस लाख रुपये पहिल्या टप्प्यासाठी लागतील." "ठीक आहे. सुरू करू आपण काम." आणि गाडीच्या ड्रायव्हरला त्यांनी सांगितलं, "साडेपाच वाजता ग्रंथ प्रकाशनाच्या कार्यक्रमाला नव्या राजवाड्यावर जायचं आहे. बाकी सर्व गाड्यांना जाऊ द्या. फक्त आपण पाच वाजेपर्यंत रस्त्यावरच फिरायचं आहे. पाच वाजता आपण सर्किट हाऊसला जाऊ." आमच्या गाड्या रस्त्यावरून फिरायला लागल्या. मी आणि पवारसाहेब त्यांच्या गाडीत. पवारांचा मोबाईल सुरू होता. "काय गोविंदराव, काय चाललंय? आपले लक्ष्मण माने आहेत. त्यांची भटक्या-विमुक्त समाजातील मुलांसाठीची आश्रमशाळा आहे. त्यांना आपल्याला मदत करायची

आहे. संध्याकाळी महाराजांवरील ग्रंथाचे प्रकाशन आहे. येणार आहात ना? मग काय घेऊन येता? डीडी, चेक की कॅश घेऊन येता? हो वाड्यावरच यायचंच आणि मला भेटल्याशिवाय जायचं नाही." पहिला फोन बंद व्हायचा आणि दुसरा सुरू व्हायचा. साधारण संवाद हाच असे. अडीच-तीन तास कोल्हापूरच्या रस्त्यावरून आम्ही फिरत होतो आणि पवारसाहेबांचं कधी गोविंदराव, कधी श्रीपतराव तर कधी संपतराव, कधी रणजीत, कधी अजित असं सर्वांना पैसे घेऊन यायला ते सांगत होते. सव्वा पाच वाजता आम्ही सर्किट हाऊसला गेलो, तोपर्यंत ते अगदी खूष होते.

संध्याकाळच्या कार्यक्रमाला छत्रपती शाहू महाराजांनी कार्यक्रमाची उत्तम व्यवस्था केली होती. डॉ. जयसिंगराव पवार या थोर इतिहासतज्ज्ञांनी 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ' संपादित केला होता. त्याचा प्रकाशन सोहळा साहेबांच्या हस्ते पार पडला. कोल्हापुरातील सर्व संवर्गातील प्रतिष्ठित मंडळी या ग्रंथप्रकाशन सोहळ्याला उपस्थित होती. राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणजे कोल्हापूरकरांचा जीव की प्राण! पवारसाहेबांनी अतिशय सुंदर भाषण केलं. ग्रंथातले त्यांनी सांगितलेले तपशील, त्यातील कोपरखळ्या, विनोदी चुटके आणि त्यातून छत्रपती शाहू महाराजांचं स्फटिकासारखं दिसणारं पारदर्शक व्यक्तिमत्त्व, गोरगरीब रयतेशी असलेली त्यांची बांधिलकी, सामाजिक, आर्थिक समतेचा त्यांनी घेतलेला ध्यास, सामाजिक लोकशाहीचा पायाच कोल्हापूरमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनीच घातला होता.

सारं वातावरण शाहूमय झालं होतं. पवारसाहेबांनी आवर्जून मला जवळ बसवून घेतलं. कार्यक्रम संपला आणि लोक जेवणासाठी उठले तरी साहेब तिथेच खुर्चीवर बसलेले. कोणी गोविंदराव, कोणी काकासाहेब - सगळे जवळ येत होते. कोणी रोख रक्कम दिली, कुणी चेक दिले. साहेबांनी हळू आवाजात विचारलं, "किती पर्यंत गेलो?" मी म्हटलं, "16 झाले." ते बाकी लोकांशी बोलत होते. मला म्हणाले, "जरा शाहू महाराजांना बोलवा." मी पळत जाऊन शाहू महाराजांना बोलावून आणलं. शरदराव उभे राहिले. महाराजांचा हात हातात घेतला आणि त्यांना म्हणाले, "आम्ही एक काम काढलं आहे. लक्ष्मण माने यांच्या आश्रमशाळेचे बांधकाम आहे. आपल्या काही मंडळींना मी बोलावले आहे; परंतु सारे काही आले नाहीत. आम्ही जरा एका तासाभरात जाऊन येतो. तोपर्यंत गर्दी कमी होईल आणि आकडा पुरा झाला की मग आपण जेवू."

आम्ही गाडीत बसलो आणि गाडी कोल्हापूरच्या रस्त्याने फिरू लागली. एक तासाने पुन्हा आम्ही जेव्हा राजवाड्यावर गेलो, तेव्हा कित्येक खाशा खाशा मंडळींचा ताफा साहेबांची वाट बघत तिथे उभा होता. बघता बघता पंचवीसचा आकडा पार झाला. पुन्हा मला विचारलं, "काय लक्ष्मणराव, झालं काम?" मी मानेनेच 'हो' म्हटलं. शाहू महाराजांनी आमचं स्वागत केलं. ते साहेबांना म्हणाले, "झालं काम? की मी आणखी काय उचलायचं?" पवारसाहेब मिस्किलपणे हसले. "आता अर्ध काम आम्ही केलं आहे. उरलेल्या अर्ध्या कामाच्या वेळी आम्ही तुमचं नाव राखीव ठेवत आहोत."

बघता बघता पाचगावच्या माळावर राजर्षी छत्रपती शाहू महाराज आश्रमशाळेची देखणी इमारत उभी झाली. शाळेने उजळाईवाडीचा निरोप घेतला आणि पाचगावच्या माळावर स्वच्छंदी वाऱ्याबरोबर, मुलांची निकोप वाढ करीत संस्था अत्यंत वेगाने प्रगती करू लागली. ‘शरदराव कुठेही असले तरी त्यांचं मन या मुलांच्या कामात अडकलेलं असतं. जकातवाडीच्या अजिंक्यताऱ्याच्या कुशीत त्यांचं हेलिकॉप्टर परिसरातून मार्गस्थ होत असेल तर ते शाळेच्या आवारातील आभाळात घिरट्या घालू लागतं. मुलं, शिक्षक भराभर बाहेर येतात आणि हात हलवून अभिवादन करतात आणि साहेबांचं हेलिकॉप्टर त्यांच्या कामाला निघून जातं.’ असे माने यांनी नमूद केले आहे.

❑❑❑

# कुलगुरूंच्या निर्णयाचा मान राखा

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असताना डॉ. वसंतराव गोवारीकर हे विद्यापीठाच्या आवारात राजकीय सभा होऊ देत नसत. राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांच्या सभेसाठी विद्यापीठाचे प्रांगण उपलब्ध करून द्यावे, अशी विनंती त्यांना जेव्हा येत असे, तेव्हा ते नकार देत. ज्येष्ठ राजकीय मंडळी त्यांचा निर्णय मानत. स्थानिक पातळीवरील काही नेते कुरबुर करायचे. अशा एका वेळी नामदार शरद पवार यांनी स्थानिक नेत्यांना निरोप पाठवला की, ‘कुलगुरू जे म्हणतात ते बरोबर आहे. त्यांच्या निर्णयाचा मान राखा.’ हे डॉ. गोवारीकर यांनी स्वत: नमूद करून ठेवले आहे.

मराठा समाजाने आता राजकारणात वा सत्ताकेंद्रात जाण्यापेक्षा उद्योगधंद्यात झोकून द्यावे, हा बदलत्या काळाचा वेध पवारांना फार पूर्वी प्राप्त झाला होता. त्यांची ती दूरदृष्टी होती. जीवशास्त्र व माहिती तंत्रज्ञान तातडीने आत्मसात करण्यामध्ये या देशाच्या उज्ज्वल भवितव्याची बिजे आहेत, असे ते म्हणत. ते जेव्हा भाषण करीत तेव्हा त्यांचे भाषण किंवा निवेदन कोणी लिहून दिलेले नसे. ते निर्जीव वाचन नसायचे. सतत त्यांनी केलेल्या चिंतन-मनन-अध्ययन याचे व जागतिक पातळीवर केलेल्या निरीक्षणाचे फलित असायचे. त्यांनी तो विषय हाताळलेला असायचा. त्याची आकडेवारी त्यांना मुखोद्गत असायची. त्यात ठरावीक अशी घोकंपट्टी नसायची. त्या आकडेवारीमध्ये नेमके काय लपलेले आहे, याचे विश्लेषण ते मोठ्या सभांमध्ये लीलया करायचे. भाषण करताना ते एका पायावरून दुसऱ्या पायावर जोर देऊन मजेदार लकबीत प्रासंगिक उदाहरणांसह नर्मविनोद वापरून सोपी आणि प्रवाही भाषा बोलायचे. त्यांच्या अस्थिर उभे राहण्यातही भक्कम स्थिरता असायची, असे डॉ. वसंतराव गोवारीकर म्हणतात.

❏❏❏

# रामदास फुटाणे यांच्या नजरेतून पवार

महाराष्ट्रात 1960 नंतर एक चैतन्य निर्माण झाले होते. महाराष्ट्र राज्याला सुदैवाने यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे कुशल नेतृत्व मिळाले होते. त्यांचे सरकार बहुजनांना आपले वाटायचे.

सहकारातून समृद्धीकडे जाण्याचा विचार गावोगावी रुजवला गेला. पिढ्यान्पिढ्या कर्जबाजारी असणारा बहुजन समाज नव्या आर्थिक प्रगतीकडे वाटचाल करू लागला.

यशवंतराव चव्हाण संरक्षण मंत्री होऊन दिल्लीला गेल्यानंतर एका तरुणाने महाराष्ट्राचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. या तरुण तडफदार नेतृत्वाकडे महाराष्ट्रातील तरुण आकर्षित झाले. ज्येष्ठ मंडळी त्याच्याकडे यशवंतरावांचा वारसदार म्हणून पाहू लागली. यशवंतरावांचा सुसंस्कृतपणा, सर्व जाती धर्माच्या लोकांना जोडण्याचे धोरण आणि शेतकरी व कामगारांच्या उन्नतीचा विचार घेऊन महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक तालुक्यात हा तरुण फिरू लागला. हा तरुण सर्वांना आपला वाटू लागला आणि त्याचे फळ म्हणजे लवकरच महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झाला. दिल्लीला आव्हान दिल्यामुळे तरुणांच्या चेहऱ्यावर आनंद दिसला तर हे कशासाठी, अशी कुजबूज ज्येष्ठ करू लागले. हळूहळू इतर प्रांतातील नेतेही या तरुणाकडे आशेने पाहू लागले. भारतीय राजकारणात या तरुणाचे नाव सर्वांच्या तोंडी आले - शरद पवार.

त्यांच्या काही निर्णयांवर अनेकांचे मतभेद असतील; परंतु संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणारा असा नेता यापूर्वी झाला नव्हता. कोणत्या मतदारसंघात कोणत्या जातीची किती मते आहेत, हे फक्त पवार सांगू शकतील. प्रत्येक मतदारसंघातील पावसाळा, उन्हाळा, होणारी पिके, प्रत्येक जिल्हावार लेखक, कलावंत, खेळाडू सर्व सर्व शरद पवार नावाच्या संगणकात भरलेले

असते आणि त्यामुळे त्यांच्याशी बोलताना खूप विचार करावा लागतो. 'मनोधैर्य' ही पवारसाहेबांची प्रचंड शक्ती आहे आणि त्यांच्या दुसऱ्या शक्तीचे नाव आहे 'संयम'. राजकारणात जय-पराजय होत असतात; परंतु बोलताना ते कधीही तोल ढळू देत नाहीत. त्यांच्या विरोधात कुणीही काहीही लिहिले, बोलले तरी ते लगेच प्रत्युत्तर देत नाहीत. विरोधी बोलणाऱ्याचा राग मनात धरत नाहीत. फारच अती झाले तर नियोजनपूर्वक त्याच्याच मतदारसंघात त्याची जागा दाखवतात.

'महाराष्ट्रात साहेबांची सभा कुठेही असो, आजूबाजूच्या जिल्ह्यातील हजारो कार्यकर्ते उपस्थित असतात. ते जेथे उभे असतात, त्या वातावरणात प्रचंड चैतन्य निर्माण झालेले असते. मोगलांशी लढताना छत्रपती शिवाजी महाराजांना स्वकीयांशीही सामना करावा लागला. पवारांना स्वकीयांशी लढतच दिल्लीपर्यंतचा प्रवास करावा लागला. या प्रवासात शेतकरी, सामान्य माणूस त्यांच्याबरोबर सतत राहिला. त्यांनी गढीवर बसून कधीही राजकारण केले नाही तर चावडीवरून वेशीपर्यंत चालत जाण्याची तयारी असल्यामुळे शरद पवारांचे 'पवारसाहेब' आणि पवारसाहेबांचे 'साहेब' झाले. भविष्याची जाण असलेला, वास्तवाचे भान असलेला, शक्तीबरोबरच संयम जोपासणारा सह्याद्रीचा हा सुपुत्र ताठ मानेने यमुनाकाठी उभा आहे, याचा सर्वांना आनंद वाटतो' असे गौरवोद्गार प्रसिद्ध कवी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक रामदास फुटाणे यांनी त्यांच्या 2009 च्या एका लेखात काढले आहेत.

❒❒❒

# शरद पवार आणि सुनील तटकरे

शरद पवारांच्या काही आठवणी माजी मंत्री सुनील तटकरे यांनी सांगितलेल्या आहेत. त्यांच्या राजकारण प्रवेशाची एक घटना त्यांनी कथन केली आहे. त्यात ते म्हणतात की, त्यांचे वडील दत्तात्रय तटकरे राजकारणात सक्रिय सहभागी होते. त्यांची राजकीय कारकीर्द, त्यांचे यशापयश पाहतच पराजयातून झुंझारपणे उभे राहण्याची वृत्ती सुनील तटकरे यांच्यामध्ये आलेली होती. त्यांच्या राजकीय प्रवेशाला कारण ठरले ते एका राष्ट्रीय नेत्याचा रोहा येथील सत्कार. अर्थात त्यांच्या वडिलांच्या राजकीय कारकिर्दीत अनेक मोठ्या नेत्यांना जवळून पाहण्याची संधी त्यांना मिळाली होती; परंतु पवारांचा झालेला सत्कार कार्यक्रम त्यांना राजकारणात येण्यास पुरेसा ठरला आणि दत्ताजीचा मुलगा म्हणून सुरुवातीला ओळखणारे साहेब त्यांना काँग्रेसचा सक्रिय कार्यकर्ता म्हणून ओळखू लागले आणि 1989 च्या महापुरात उद्ध्वस्त झालेल्या रोहा, नागोठाणे, कोहा येथील त्यांच्या सक्रिय सहभागानंतर ही जवळीक अधिकच वाढली.

1995 साली निवडणूक प्रचाराच्या गडबडीत असताना तटकरेंना एक दिवस पवारसाहेबांचा विशिष्ट वेळेत फोनवरून संपर्क साधण्याविषयीचा निरोप मिळाला. त्या विशिष्ट वेळेला फोनवरून निवडणुकीबद्दल पवारांनी स्वतः चौकशी केली आणि निवडणुकीच्या प्रचाराची सभा कुठे घ्यायची, याबाबत विचारणा केली. त्यानंतर नियोजित वेळी पवारसाहेब प्रचार सभेला आले. निवडणूक आयोगाची पहिल्यांदाच कडक आचारसंहिता व सभेची

सकाळची प्रतिकूल वेळ असतानाही पवारसाहेबांच्या सभेला मिळालेला प्रतिसाद उत्तम होता. निवडणूक जिंकण्यासाठीची वातावरणनिर्मिती यामुळे झाली आणि त्यामुळेच ते विजयी झाले.

लोकसभा बरखास्त झाल्यानंतर महाराष्ट्र व देशात काँग्रेसचे विभाजन झाले. पवारसाहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. निर्माण झालेली परिस्थिती बिकट होती. कार्यकर्त्यांना दुःख झाले, त्याचबरोबर आत्मविश्वासही कमी झाला. जिल्ह्यात ठिकठिकाणी वेगवेगळे वातावरण तयार झाले. नंतर जवळ जवळ दोन महिन्यानंतर आलेल्या पवारसाहेबांच्या अपेक्षित फोनमुळे राष्ट्रवादीत जाण्याचा सुनील तटकरे यांचा निर्णय पक्का झाला. त्यांच्या पक्षांतराने रायगड जिल्ह्यात फार मोठे वादळ निर्माण झाले. त्यांच्याविरुद्ध वातावरण निर्माण होऊ लागले. अशातच ते विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे गेले. पवारसाहेबांनी ऐन पावसाळ्यात माणगावला प्रचार सभा घेतली आणि त्यामुळे विधानसभेवर तटकरे निवडून गेले. या चुरशीच्या निवडणुकीत पवारसाहेब व सर्वच प्रमुख नेत्यांची मेहनत फळाला आली. लोकशाही आघाडी सरकारमध्ये नगरविकास खात्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सुनील तटकरे ग्रामीण भागातील नगरपालिका सक्षम करण्याच्या मागे लागले आणि हे सर्व पवारसाहेबांच्या मार्गदर्शनाने शक्य झाले, महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर माणगाव विधानसभा मतदारसंघाला मंत्रीपद प्राप्त होण्याचा हा पहिलाचा बहुमान होता, असे तटकरे यांनी स्वतः नमूद केले आहे.

❒❒❒

# न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या लक्षात राहिलेले पवार

महाराष्ट्रामध्ये महिलांकरिता जे नवीन प्रगतीशील धोरण अमलात आणले गेले, त्यात शरद पवार यांचा सिंहाचा वाटा होता. मुलींनाही वंशपरंपरागत संपत्तीचा वाटा मिळावा, याकरिता त्यांनी महाराष्ट्रात कायदा करून घेतला. त्यांनी कधी राजकीय हिताचा विचार केला नाही. महिलांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी म्हणून त्यांनी सतत पावले उचलली. यशवंतराव चव्हाणांना सामाजिक प्रश्नांची आगळीवेगळी जाणीव होती तशीच जाणीव शरद पवारांनासुद्धा आहे. पवारांच्या बोलण्याला, वागण्याला सुसंस्कारांची झालर आहे. वैयक्तिक आणि सामाजिक संबंधात ते कधी राजकारण शिरू देत नाहीत. मैत्रीच्या संबंधाच्या आड राजकारण येऊ देत नाहीत. लोकनायक जयप्रकाश नारायण यांची जन्मशताब्दी सुरू झाली तेव्हा त्यांनी स्वतःतर्फे व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे सर्व प्रकारची मदत मनमोकळेपणाने केली. मतभेद असूनही लोकनायकांचे मोठेपण त्यांनी मोठेपणाने स्वीकारले, यातच त्यांचा मोठेपणा सामावलेला आहे. मुळातच त्यांचा पिंड समाजसेवकाचा आहे. समाजाची विस्कटलेली घडी सावरण्यासाठी समता, बंधुता आणि एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेच्या विकासासाठी ते सतत प्रयत्नशील आहेत, असे उद्‍गार निवृत्त न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी काढले होते.

❑❑❑

# साहित्य, संस्कृती, इतिहासाची जाण

आज राजकारणी मंडळींचे उदंड पीक आले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात राजकारण हे देशाचे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी होते. आताचे राजकारण देशाची सत्ता हस्तगत करण्यासाठी असते. लोकशाही पद्धतीत ते स्वाभाविक आहे, अपरिहार्य आहे. राजकारण्यांची आजची स्थिती पाहता कोणताही हाडाचा बुद्धिवंत, साहित्यिक, संशोधक, कलावंत यापासून चार हात लांब राहत होता ही वस्तुस्थिती आहे. राजकारणी मंडळीही हे लोक दूर राहतात म्हणून त्यांची पर्वा करत नाहीत, त्याबद्दल खंत बाळगत नाहीत. त्यांना माहीत असते की या लोकांशिवाय आपले काही अडत नाही. साहित्यिकांना जवळ बोलवावे, त्यांच्याशी काव्यशास्त्रविनोदाची चर्चा करावी, संशोधक-कलावंतांचे कौतुक करावे आणि या सर्वांना आवर्जून सांगावे की 'राज्य मोठे होते आहे, ते केवळ आमच्यासारख्या राजकारण्यांमुळे नाही, तर तुमच्यासारख्या गुणवंत, कर्तबगार व्यक्तींमुळे', असे सांगणारे राजकारणी कोण असा प्रश्न उपस्थित झाला तर शरद पवार यांचे नाव घ्यावे लागते आणि त्यापूर्वी हे कार्य कै. यशवंतराव चव्हाण यांनी केले होते, असे इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी म्हटले आहे.

शरद पवारांच्या 65 व्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित 'सकाळ'च्या एका अंकामध्ये फारूख अब्दुल्ला यांच्या संदेशातील एक विधान होते. त्यात त्यांनी म्हटले होते की 'शरद पवार हे आज केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर साऱ्या देशाचे नेते बनले आहेत. जणूकाही ते शिवाजी महाराजांचे अवतार आहेत.'

यासंदर्भात पुढे जयसिंगराव पवार यांनी त्यांचा एक अनुभव सांगितला आहे. एकदा ते तामिळनाडूतील जिंजी किल्ल्यात भटकंती करीत असताना त्यांच्या गाईडबरोबर इंग्रजीत त्यांचे संभाषण चालू होते आणि संभाषणाच्या ओघात त्यांनी त्याला विचारले होते की, 'तुम्हाला महाराष्ट्राबद्दल माहिती आहे का?' त्यावर तो गाईड म्हणाला होता की, 'शिवाजी महाराज आणि मुंबई.' त्याला पुन्हा जयसिंगराव पवार यांनी विचारले की 'अजून काही?' तो थोडेसे थांबला आणि म्हणाला, 'शरद पवार.' 'त्याच्या उत्तराने मी क्षणभर स्तिमित झालो. एका पवार कुलोत्पन्न नव्हे तर महाराष्ट्र कुलोत्पन्न व्यक्तीच्या नावाचा झेंडा तामिळनाडूतील जिंजी किल्ल्यावर जावा, याचा रास्त अभिमानही वाटला. वास्तविक अशी शिवछत्रपतींशी तुलना करण्याचा प्रश्न नाही. अशी तुलना त्यांना स्वतःलाही आवडणार नाही; पण कुठे काश्मीरमध्ये श्रीनगर, कुठे तामिळनाडूमधील जिंजी? दोघांचे संदर्भ वेगळे, दोघांचे उद्गार वेगळ्या संदर्भात काढलेले असले तरीसुद्धा त्यांच्या उद्गारात एक समान सूत्र दिसते. शिवाजी महाराजांचे, मुंबईचे अखिल भारतीयत्व हे जसे स्वयंसिद्ध आहे तसेच शरद पवारांचे अखिल भारतीयत्व सिद्ध झाले आहे.'

2001 मध्ये जयसिंगराव यांनी संपादित केलेल्या 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथा'चे प्रकाशन कोल्हापूरच्या न्यू पॅलेस प्रांगणात शरद पवार यांच्या हस्ते आयोजित केले होते. बाराशे पानांच्या त्रिखंडात्मक अशा शाहू ग्रंथाचे प्रकाशन तितक्याच तोलामोलाच्या आणि शाहू छत्रपतींची थोरवी जाणणाऱ्या व्यक्तीकडून व्हावे ही

त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी आणि त्यांच्या संस्थेचे एक विश्वस्त डॉ. विजयराव शिंदे यांनी शरद पवारांना दिल्लीत भेटून निमंत्रित केले होते. त्यांच्या निमंत्रणाचा स्वीकार आनंदाने करून कोल्हापूर भेटीत चांगला दोन-अडीच तासांचा वेळ द्यायचे शरद पवारांनी कबूल केले. दिल्लीच्या वारीत त्यांना तत्कालीन खासदार मायावती यांनाही भेटायचे होते. त्यापूर्वी उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री असताना त्यांनी शाहू ग्रंथास मोठे अर्थसाह्य केले होते. त्यांचा सत्कार शरदराव यांच्या हस्ते करायचे जयसिंगराव पवार यांनी ठरवले होते; पण त्यांची भेट कशी होईल असे म्हटल्यावर शरद पवार म्हणाले, "तुम्ही उद्या माझ्याबरोबर पार्लमेंट हाऊसमध्ये चला. मी तुमची मायावतींशी भेट घालून देतो." शरद पवारांनी बोलल्यानुसार केले. पुढे तो ग्रंथ प्रकाशन सोहळा पवारसाहेबांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

समाजाचे केवळ भौतिक जीवन समृद्ध असून चालणार नाही, तर समाजाचे सांस्कृतिक जीवनही समृद्ध असले पाहिजे, हा विचार शरद पवारांच्या सर्व प्रकारच्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील व्यवहारात दिसून येतो. 2007 मध्ये 'उद्याचा महाराष्ट्र अपेक्षा... आव्हाने' या विषयावर आपले विचार मांडताना पवारांनी म्हटले होते, "कुठल्याही समाजाची उंची ठरवली जाते किंवा त्याची जी फुटपट्टी आहे, ती फुटपट्टी लावताना तो समाज किती धनिक आहे, यावरून त्या समाजाची उंची कधी ठरवली जात नाही तर तो सुसंस्कृत किती आहे, कला, साहित्य, संगीत, नाट्य ही विविध क्षेत्रे आहेत, त्यांच्यामध्ये त्याचे काय स्थान आहे यावर त्या

समाजाची उंची मोजली जाते. एक कालखंड असा होता की समाजाची सांस्कृतिक उंची नीटनेटकी राखण्याचे काम आणि समाजव्यवस्थेला, संस्कृतीला चालना देण्याचे काम करणाऱ्या लोकांची महाराष्ट्रात चणचण नव्हती. त्यांच्या शब्दांनी, विचारांनी माणसे घडली. महाराष्ट्र राज्याला सांस्कृतिक परंपरा आहे. आज नव्या पिढीत आपल्याला उत्तम साहित्यिक दिसतात, कलावंत दिसतात; परंतु मला स्वतःला वाटते, या क्षेत्रात अजून काहीतरी आवश्यक आहे. सगळ्या क्षेत्रांमध्ये मराठीचे एक स्थान दिसले पाहिजे, मग ते कोणतेही क्षेत्र असो, शेती असो, उद्योग असो, साहित्य, पत्रकारिता वा शास्त्रीय संशोधन किंवा वैद्यकीय सेवा या सगळ्या क्षेत्रांतील माणसे महाराष्ट्रात आहेत, हे चित्र दिसले पाहिजे. तशी माणसे निर्माण करण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे, नव्या पिढीसमोर आहे."

शरद पवारांचे हे उद्गार म्हणजे 21 व्या शतकातील महाराष्ट्राचे नवनिर्मितीच्या घटनेचा सरनामाच आहे. साहित्य, कला, क्रीडा, उद्योग, कृषी, व्यापार, विज्ञान अशा सर्वच क्षेत्रांतील जी मंडळी निष्ठेने कार्य करतात, त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन त्यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्याचे पवारांचे विचारच त्यांना इतर राजकारणी लोकांपासून वेगळे करतात. बहुतेक राजकारणी सत्ताकारण करतात. शरद पवार सत्ताकारणाबरोबरच समाजकारण आणि संस्कृतीकारणही करतात. त्यासाठी लागणारी वैचारिक बैठक त्यांनी कमावली आहे. याबाबतीत त्यांचे गुरु यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श त्यांच्यासमोर असावा.

❒❒❒

# महाविद्यालयाला प्रतिष्ठा मिळवून देणारा विद्यार्थी आणि युवकांचा नेता

1959 च्या दरम्यान पुण्यामध्ये बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये शिकत असतानाच शरद पवार यांच्या धडाडीने, कौशल्याने युवकांनी त्यांना नेता मानले आणि तेव्हापासूनच विद्यार्थी चळवळीचे त्यांनी नेतृत्व केले. शरद पवारांना ज्ञानाबरोबरच नेतृत्वाची, लोकसंग्रहाची, सार्वजनिक कार्याची आवड होती. 1959 मध्ये महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सचे ते जनरल सेक्रेटरी झाले. विद्यार्थ्यांमध्ये ते लोकप्रिय होते. विद्यार्थ्यांना संघटित करणे आणि त्यांची मने जिंकणे ही विलक्षण किमया त्यांना साधलेली होती. अडचणीत, संकटात असलेल्या विद्यार्थ्यांना ते मदत करायचे. प्रत्येक विद्यार्थ्याला ते आपल्या कुटुंबातीलच एक वाटायचे. यामध्ये त्यांनी आपल्या अभ्यासाकडे कधीच दुर्लक्ष केले नाही. वर्गामध्ये पुढच्या बाकावर शरद पवार कधीच बसले नाहीत तर मागील बाकावर बसूनसुद्धा एकाग्रचित्ताने प्राध्यापकांच्या शिकवण्याकडे त्यांचे लक्ष असायचे. अनेक प्राध्यापकांचे ते लाडके विद्यार्थी होते. विद्यार्थीदशेपासूनच त्यांच्यात मानवता दडलेली होती. गरजूंना मदत करण्याची आंतरिक तळमळ त्यांना होती. हा विद्यार्थी वेगळा आहे, त्याचे व्यक्तिमत्त्व वेगळे आहे याची सातत्याने जाणीव शिक्षक आणि सहकाऱ्यांना व्हायची. त्या महाविद्यालयात काही परदेशी

विद्यार्थीदेखील होते. त्यांच्याशीही शरद पवार यांची चांगली मैत्री होती. मैत्री हा त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे.

कॉलेजमध्ये शिकत असताना ते वसतिगृहामध्ये राहायचे आणि वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. वसतिगृहातून घडणाऱ्या अप्रिय घटना त्यांनी कधीही घडू दिल्या नाही. ते शिस्तीचे भोक्ते होते. पुण्यात असताना पवारांनी विद्यार्थी चळवळ चालवली आणि युवक काँग्रेसचे राज्य पातळीवर नेतृत्व केले. त्यांचे नेतृत्व कौशल्य आणि धडाडी पाहून यशवंतराव चव्हाण फार प्रभावित झाले. त्यांनी शरद पवारांना आपला मानसपुत्र मानले. विद्यार्थीदशेतच शरद पवारांनी अनेक देशांचे दौरे केले आणि तेथील विद्यार्थी चळवळींचा अभ्यास केला. विविध आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये ते सहभागी झाले होते, अशी माहिती विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुण गुजराथी यांनी दिली.

डॉ. चिंतामणी गणेश वैद्य हे 'बीएमसीसी'चे उपप्राचार्य आणि प्राचार्य राहिले आहेत. त्यांनी शरद पवारांच्या काही आठवणी सांगितल्या आहेत. बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजच्या उपप्राचार्य पदाची सूत्रे ज्यावर्षी वैद्य सरांच्या हाती आली, त्याच वर्षी शरद पवार यांनी बीएमसीसीमध्ये विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला होता. सहाजिकच त्यांचे महाविद्यालयीन विद्यार्थी जीवन जवळून पाहण्याची संधी वैद्य सरांना मिळाली. शरद पवार हे आदर्श विद्यार्थी होते. कॉलेज आणि हॉस्टेलमधील शिस्तीचे ते कटाक्षाने पालन करीत. सर्वांमध्ये मिसळून वागण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांचा मोठा मित्रसंग्रह होता. कोणतेही काम त्यांच्यावर

सोपवले की ते निश्चितपणे होणारच असा विश्वास त्यांनी प्राध्यापक तसेच वर्गमित्रांमध्ये मिळवला होता. अडचणीत असलेल्या आपल्या मित्रांना मदत करण्यास ते तयार असत. त्या वयातच त्यांचे नेतृत्वगुण प्रगट होत होते. बारामतीसारख्या लहान गावातून पुण्यासारख्या मोठ्या शहरातील कॉलेजमध्ये आल्यानंतरदेखील थोड्याच दिवसात त्यांनी विद्यार्थ्यांवर आपली छाप सोडली. प्रत्येक वर्षी ते विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवडून येत. दोन वर्षे ते जिमखाना विभागाचे प्रमुख चिटणीस होते. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय होते. एका वर्षी स्नेह संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण यांना बोलवण्याची सूचना त्यांनी केली आणि ती अंमलातही आणली. त्या संमेलनानंतर थोड्याच काळात शरद पवार युवक काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणून राजकीय क्षेत्रात सक्रिय झाले.

शरद पवार हे उत्कृष्ट खेळाडू होते. विशेषतः कबड्डी, खो-खो वगैरे भारतीय खेळांमध्ये त्यांना विशेष रस होता. आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये बीएमसीसीच्या वतीने ते खेळले होते. बीएमसीसीचे क्रीडा संचालक आर.डी. खानीवाले हे त्यांचे आवडते शिक्षक होते. त्यांच्याकडे त्यांनी या खेळाचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले होते. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ते भाग घ्यायचे. कॉलेजच्या एका नाटकात त्यांनी काम केले होते. इतरही कार्यक्रमांत ते आघाडीवर असत. एकंदरीत, महाविद्यालयीन जीवनातील सर्व क्षेत्रात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि आपले कर्तृत्व सिद्ध करून दाखवले.

बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलन मेळाव्यांना ते काही वेळा उपस्थित राहिले आहेत. या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अनेकदा कार्यक्रमाचे पाहुणे म्हणूनही आलेले आहेत. अनेकदा आपले मनोगत प्रकट करताना त्यांच्या विनोदबुद्धीची झलकही ते दाखवीत. वैद्य सर सांगतात की, एकदा ते म्हणाले की “आता व्यासपीठावर येण्यापूर्वी सरांकडे मी चौकशी केली की सध्या बीएमसीसीमध्ये प्रवेश मिळण्यासाठी एस.एस.सी. परीक्षेमध्ये किमान किती गुण मिळवावे लागतात? सरांचे 70% हे उत्तर ऐकून मला धक्काच बसला. एवढे गुण मला कधीच मिळाले नाहीत. बरे झाले मी तीस वर्षांपूर्वी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. आता प्रवेश घेण्यासाठी आलो असतो तर वळणावरच्या वडाच्या झाडाखालीदेखील मला कोणी उभे राहू दिले नसते. मी या कॉलेजमध्ये शिकत असताना माझा बराच वेळ फर्ग्युसन कॉलेजच्या आवारात जायचा. (विद्यार्थ्यांमध्ये हशा आणि टाळ्या) तुम्हाला वाटते त्या कारणासाठी नाही. आमचे वसतिगृह फर्ग्युसन कॉलेजच्या आवारात होते. (पुन्हा हशा आणि टाळ्या) सध्याच्या विद्यार्थ्यांना सर्व गोष्टी लवकर हव्या असतात. माझे तसे नव्हते. मी प्रत्येक वर्गात मुक्काम ठोकत सावकाश अभ्यासक्रम पूर्ण केला, त्यामुळे विद्यापीठाने ठरविलेल्या मर्यादेपेक्षा अधिक काल मी या कॉलेजमध्ये राहिलो. माझे या कॉलेजवर प्रेम आहे, याचे हेही कारण आहे.”

बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला तेव्हा पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने 'व्यवसाय प्रेरणा, प्रशिक्षण आणि संशोधन' या प्रकल्पासाठी मुख्यमंत्री निधीतून त्यांनी भरघोस देणगी दिली आणि या प्रकल्पाच्या इमारतीच्या उद्घाटनाला आवर्जून उपस्थित राहिले. सुवर्ण महोत्सव समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री मा. मनमोहनसिंग यांना बोलवण्यात आले होते. त्यांनी येण्याचे मान्य केले होते; परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे ते येऊ शकले नव्हते, त्यावेळेस वैद्य सरांची परिस्थिती अत्यंत चमत्कारिक झाली होती. काय करावे काही सुचत नव्हते. तेव्हा शरद पवार त्यांच्यामागे खंबीरपणे उभे राहिले आणि आपण समारंभ यशस्वीरीत्या पूर्ण करू, असा विश्वास त्यांनी दिला. त्या समारंभाला शरद पवार आले आणि समारंभ यशस्वीरीत्या संपन्न झाला. त्या समारंभात त्यांचे भाषण फार चांगले झाले. ते अजूनही अनेकांच्या स्मरणात आहे.

❒❒❒

# नव्याचा वेध घेत सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवणारे नेतृत्व

ऐंशीच्या दशकात मुंबईच्या कामगार चळवळीत काम करणारे डॉ. भारत पाटणकर म्हणतात, 'विसाव्या शतकाचा उत्तरार्ध, साठाव्या दशकाची अखेर आणि सत्तराव्या दशकाची

सुरुवात या काळात देशाच्या समाजकारणात, राजकारणात आणि सांस्कृतिक क्षेत्रात नवीन पिढी पुढे आली. त्यावेळी त्या पिढीने वेगवेगळ्या अंगाने नव्या पर्वाला जन्म दिला. हे फक्त हिंदुस्थानातच नाही तर जगभरात घडले. महाराष्ट्रात 'युवक क्रांती दल', 'मागोवा' यांसारखे तरुणांचे गट नवा दृष्टिकोन घेऊन चळवळ उभारू लागले. काँग्रेस पक्षात नवी पिढी उदयाला आली. स्वातंत्र्य चळवळीत पुढाकार घेणाऱ्या काँग्रेस पक्षात स्वातंत्र्यात वाढलेल्या तरुण पिढीने प्रवेश केला. या पिढीचे महाराष्ट्रातील प्रमुख प्रतिनिधी होते शरद पवार.'

शेतकरी कामगार पक्षाची परंपरा असलेल्या बारामती परिसरात जन्म घेतलेला, 1971-73 च्या दुष्काळात बारामती परिसरात जनतेत कार्य केलेला हा तरुण. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक वगळता काँग्रेसचा पोशाख धोतर, नेहरू शर्ट आणि गांधी टोपी असा होता. शरद पवार यांच्या प्रवेशाबरोबरच हा पोशाख न वापरता आधुनिक शर्ट, पॅन्ट वापरणारी पिढी काँग्रेस संस्कृतीत आली. ती राज्य चालवण्यासाठी नवा दृष्टिकोन घेऊन आली. हा दृष्टिकोन त्या काळातील नव्या तरुण पिढीचे नेतृत्व करणारा होता.

'कामगार-शेतकरी प्रजा राज्य' निर्माण करण्याचे 1942च्या 'चले जाव' घोषणेच्या अधिवेशनातील काँग्रेसचे सूत्र या काळापर्यंत पूर्णपणे भंगले. नेत्यांची जुनी पिढी देशातल्या भांडवली व्यवस्थेतच समाजवादाचे ध्येय सांगण्याच्या अंतर्विरोधात घोटाळली. अन्नधान्य टंचाई, बेरोजगारी अशा काळात शरद

पवारांच्या रूपाने काँग्रेसमध्ये आलेल्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या पायावर भांडवलाचा विकास करून त्या माध्यमातून समृद्धी आणण्याचा नवा दृष्टिकोन स्वीकारला गेला. स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाच्या जुन्या भांडवलावर आधुनिक विकासाची कास धरली पाहिजे, असे पवारांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसच्या नवीन पिढीचे म्हणणे होते. याच आधारावर सहकारी खासगी भांडवल उभे करून रोजगार निर्मिती आणि समृद्धी या विचाराला व्यवहारात आणण्यासाठी काँग्रेसमध्ये संघर्ष सुरू झाला. या धोरणासाठी आवश्यक ती राजकीय जोखीम पत्करून राजकीय फेरमांडणी करण्याचे धाडस आणीबाणीनंतर लगेच पवारांनी केले. 'पुलोद' म्हणजेच पुरोगामी लोकशाही दलाचा प्रयोग पुढे आणून ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. मधल्या काळात असा प्रयोग केंद्र सरकारमध्ये झाला. या प्रयोगासाठी पवारांना काँग्रेसच्या मुख्य प्रवाहातून बाहेर यावे लागले.

मुंबईच्या कामगार चळवळीत काम करीत असताना डॉ. भारत पाटणकर हे ट्रेड युनियनच्या राजकारणात गुरफटून न जाता नवी मानव मुक्ती चळवळ उभारण्याचे स्वप्न पूर्ण करीत होते. 1974 मध्ये श्रमिक संघटनेच्या चळवळीवर हिंसक हल्ला झाल्यावर शहादा येथील झोपडीवजा ऑफीसमध्ये बाजल्यावर बसून त्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करणारे गृहराज्य मंत्री शरद पवार त्यांनी बघितले होते. त्यानंतर पवार 'पुलोद'चे मुख्यमंत्री झाले. काही काळानंतर पवार यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. राजीव गांधींच्या हत्येनंतरच्या कालखंडातील ती राजकीय

अपरिहार्यता होती. राजीव गांधींनी आधुनिक दृष्टिकोन मांडला तरी काँग्रेस आधुनिक झाली नाही. मनमोहन सिंग अर्थमंत्री आणि मग पंतप्रधान झाले; पण साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या युगात देशातील भांडवल विकासाचे आधुनिक धोरण काँग्रेसला गवसले नाही. नेहरू, इंदिरा गांधी युगातील शासकीय भांडवल आणि खाजगी भांडवल यांच्या मिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण खासगीकरणाकडे झुकविले की विकास होणार हा दृष्टिकोनही अपयशी ठरल्याचे त्यांना मान्य करावे लागले. अर्थव्यवस्था कृषी उद्योगांच्या आधुनिक विकासासह कशी प्रगत करायची, ही समस्याच त्यांनी हाताळली नाही. आधुनिक तंत्रविज्ञानाचा वेधच काँग्रेसने घेतला नाही. याच कारणामुळे शरद पवार काँग्रेसमध्ये कधीच समाधानी राहिले नाहीत. संधी मिळेल त्यावेळी त्यांनी स्वतःची स्वतंत्र ताकद उभी करण्याचा मार्ग चोखाळला. भांडवली विकासाचे आधुनिक धोरण देशी ढंगाने विकसित करायचे तर देशाच्या मातीशी नाते जिवंत ठेवावे लागेल, हा पवारांचा दृष्टिकोन. राहूल गांधी कितीही खेड्यात जाऊन गरिबांच्या घरी राहिले, तरी या प्रकारचे नाते तयार होईल असे नाही. त्यामुळेच कॉग्रेस पक्षाकडे असे धोरण नाही. त्यांचे धोरण खाजगीकरण, उदारीकरण आणि शासकीय भांडवलाचे अस्तित्व यांमध्येच घुटमळते आहे. यासंदर्भात पवारांचा दृष्टिकोन पाहिला तर असे भांडवली विकासाचे अत्याधुनिक आणि देशी ढंगाचे धोरण स्वीकारण्याची शक्ती त्यांच्यात आहे आणि म्हणूनच ते

काँग्रेसमध्ये नाहीत आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तरुण नेतृत्वाला ते अजूनही समजत नाहीत.

कृषी उद्‍योग क्षेत्रातील पवारांनी केलेले कार्य ही दुसरी क्रांती ठरणार आहे. पवारांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन अंमलबजावणीपर्यंत जाण्यासाठी पावले टाकायला सहमती दिली आहे. त्यांच्यातील वेगळेपण समजून घेणे गरजेचे आहे. जुन्या काँग्रेस संस्कृतीत ते राहू शकत नाहीत. नव्याचा मेळ साधून भविष्यात प्रगती घडवण्याची ताकद त्यांच्यात आहे. भांडवली उत्पादन व्यवस्थेच्या, जातीयतेच्या, स्त्रियांच्या शोषणावर आधारित व्यवस्थेच्या बाहेर या देशाला काढणे गरजेचे आहे. पर्यावरण संतुलित समृद्ध नवी समाजव्यवस्था आणण्यासाठी विज्ञान-तंत्रज्ञानाची कास धरावी लागणार आहे. भावी समाज व्यवस्थेला त्यासाठी तयार व्हावे लागेल. जनतेच्या दृष्टीने क्रांतिकारक विकास केवळ शेतीला पाणी देण्याने होणार नाही तर नागरी सुविधा, आरोग्य सुविधाही लागणार आहेत. त्यासाठी पायाभूत औद्‍योगिक क्षेत्रात मजबूत पकड निर्माण करणारे, शेतीमालावर आधारित कृषी उद्‍योग उभारायला प्रोत्साहन देणारे धोरण हवे आहे. सूर्यप्रकाश आणि समुद्राच्या लाटा जनतेच्या विकेंद्रित सहकारी नियंत्रणात आणून ऊर्जा निर्मिती करावी लागेल. एक नवी कृषी औद्‍योगिक क्रांती करण्यासाठी पुढाकार घेण्याची ताकद असणाऱ्या कार्यकर्त्यांनी एकत्र येण्याची गरज आहे. आणि असा सर्वसमावेशक दृष्टिकोन ज्या राष्ट्रीय नेतृत्वाजवळ आहे, ते म्हणजे शरद पवार आणि ते एकमेव आहेत.

❒❒❒

# नेता घडविणारा नेता

महाराष्ट्राची खडान्‌खडा माहिती असलेले पवारसाहेब म्हणजे महाराष्ट्राचा आत्मा. राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील सर्वसामान्य कार्यकर्त्याला त्याच्या नावाने ओळखणारे ते एकमेव नेते असावेत. अत्यंत परिश्रम, प्रयत्नातील सातत्य, तळमळ आणि जिद्द हे गुण म्हणजे त्यांचा स्थायीभाव आहे. संयम शिकावा तर तो पवारसाहेबांकडूनच. राजकीय जीवनात कितीही झंझावात येवोत, विरोधक तुटून पडोत, पवारसाहेबांनी आपला संयम कधी ढळू दिला नाही. कितीही कडवट टीका झाली अथवा कितीही आरोप झाले तरी त्यांचा मनावरील ताबा कधी सुटला नाही. ते जसे मुरब्बी राजकारणी आहेत, तसेच ते कुशल संघटक व क्रियाशील कार्यकर्तेदेखील आहेत. क्रीडा क्षेत्राबद्दल त्यांच्या मनात विशेष आपुलकी आहे. म्हणूनच मल्लखांब, कबड्डी, खो-खो, कुस्ती यांसारख्या इथल्या मातीत जन्माला आलेल्या खेळांना आणि खेळाडूंना त्यांनी प्रोत्साहन दिले. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाची स्वतंत्रपणे स्थापना करून त्यांनी राज्याच्या क्रीडा विभागाला नवी दिशा दिली. महाराष्ट्र गौरव पुरस्कार देणारी महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्याचे श्रेय पवारसाहेबांकडे जाते.

पवारसाहेबांचे व्यक्तिमत्त्व शक्तिशाली लोहचुंबकासारखे आहे. ते सत्तेत असो किंवा नसो, त्यांच्याभोवती सदैव कार्यकर्ते आणि भेटीला येणारे लोक असतात. या गर्दीला ते कधीही नाराज करीत नाहीत. एखाद्या महत्त्वाच्या भेटीला जायचे, बैठकीला जायचे असेल तर ते त्या लोकांना म्हणतात की, ‘महत्त्वाच्या

बैठकीला जायचे आहे. मला जायला परवानगी देता का?' जनतेची परवानगी मागणाऱ्या या नेत्याला कोण बरे परवानगी देणार नाही? अशा प्रसंगी पवार साहेबांशी दोन शब्द बोलायला मिळाले नाही तरी ते लोक म्हणतात, की 'पवारसाहेब आमची परवानगी घेऊन गेले.' लोकांना नाराज न करण्याचा पवारसाहेबांचा हा गुण विरळाच.

विविध क्षेत्रातील व्यक्तींची, संशोधनाची, नवीन गोष्टींची अद्ययावत माहिती ठेवणे ही त्यांची खासियत. या माहितीचा उपयोग ते सभांमधून जनसामान्यांचे प्रबोधन करण्यासाठी तर निवडणुकीच्या वेळी उमेदवार ठरविण्यासाठी करतात. तसेच उद्योग, शिक्षण, सहकार क्षेत्रातील अद्ययावत माहिती त्यांच्याकडे असते. त्यांच्या उपस्थितीत झालेल्या अनेक बैठकांमध्ये त्यांच्याजवळ असलेल्या या माहितीच्या खजिन्यामुळे भल्याभल्यांची दांडी उडते.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री राहिलेले छगन भुजबळ म्हणतात की, पवारसाहेबांच्या संपर्कात जे आले ते राजकारण, समाजकारण, शिक्षण, उद्योग अशा कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात उच्च पदापर्यंत पोचले, यशस्वी झाले. पवारसाहेबांच्या परिसस्पर्शाने त्यांच्या जीवनाचे सोने झाले. राज्याचे माजी उच्च शिक्षण मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे उदाहरण पुरेसे आहे. उच्च शिक्षण घेतल्यानंतर कोणत्याही पदाची अपेक्षा न बाळगता हा तरुण कित्येक वर्षे पवारसाहेबांच्या सान्निध्यात काम करीत राहिला. त्यांच्या अंगभूत गुणांना पवारसाहेबांचा परिसस्पर्श झाला

आणि आज हा तरुण महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाचे योगदान देत आहे. पवारसाहेबांचे कर्तृत्व आणि व्यक्तित्व अथांग आहे. आजपर्यंतच्या त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिपूर्ण वेध घ्यायचा म्हटला तर एक मोठा ग्रंथ लिहावा लागेल. या वयातही तरुणाला लाजवेल अशा उत्साहात दिवसाचे अठरा-अठरा तास काम करणारे पवारसाहेब म्हणजे राजकारण, समाजकारणात कार्यकर्तृत्व गाजविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या युवकांसाठी एक दीपस्तंभ तर आहेच, पण पवारसाहेब म्हणजे 'नेता' घडविणारा नेता होय, असे छगन भुजबळ म्हणतात.

❑❑❑

# कलाकारांचे श्रद्धास्थान शरद पवार आणि लता मंगेशकर

शरद पवारांविषयी लतादिदींनी विविध कार्यक्रमांमधून आणि लेखांमधून आठवणी सांगितलेल्या आहेत. संगीत क्षेत्रात स्वत:ला झोकून दिले असल्याने राजकारणाशी त्यांचा तसा संबंध येत नाही. राजकारणातल्या अगदी मोजक्याच व्यक्ती त्यांना भावल्या आहेत, ज्यांच्याविषयी त्यांच्या मनात आदर, आपुलकी आहे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. लतादिदींच्या एकसष्टीनिमित्त कार्यक्रम झाला, त्यावेळी शरद पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. दिदींच्या

स्नेहाखातर त्यांनी नेहरू सेंटर येथे प्रीतीभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला राजीव गांधी हेसुद्धा उपस्थित होते. या कार्यक्रमात शरद पवार यांनी त्यांच्या वयाचा उल्लेख केला, तेव्हा राजीव गांधी यांनी हसत वयाचा उल्लेख टाळण्याबाबत सांगितले. त्यावेळी 'अवघ्या महाराष्ट्राला लतादिदी परिचित असल्याने त्यांचे वयसुद्धा सर्वांना ठाऊक आहे' असे उत्तर पवारसाहेबांनी दिले होते.

लतादिदींनी त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुण्यात एका भव्य रुग्णालयाच्या उभारणीसाठी शरद पवार यांची कशी मोलाची मदत झाली, तेसुद्धा सांगितले आहे. सुरुवातीला या रुग्णालयासाठी केवळ एक एकर जमीन लतादिदींनी घेतली होती. शरद पवार यांना कळताच त्यांनी दिदींचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांची भेट घेतली आणि त्यांच्या सचिवांना केवळ जमिनीचे बघा, एवढेच सांगितले. सरकारी पातळीवरील कामांना खूप वेळ लागतो. मात्र रुग्णालयाला मोठी जमीन मिळवून देण्याचे काम पवारसाहेबांनी अर्ध्या तासात केले. पुढे रुग्णालयाच्या शिलान्यास कार्यक्रमाला ते आवर्जून उपस्थित होते.

बारामती येथे आपल्या मातोश्रींच्या नावाने पवारसाहेबांनी शैक्षणिक संस्था सुरू केली. त्या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी लतादिदींना बोलवले होते; परंतु हेलिकॉप्टरच्या प्रवासात त्यांच्या कानांना मोठा त्रास होत असल्यामुळे त्यांना तिथे जाता आले नाही. त्यानंतर जेव्हा लतादिदींची भारतरत्न पुरस्कारासाठी निवड

झाली होती, त्यावेळी नवी दिल्ली आणि मुंबई येथे शरद पवारांनी लतादिदींचा मोठा गौरव केला होता. मुंबईतील कार्यक्रमासाठी तर त्यांनी खास लतादिदींसाठी पैठणी आणली होती.

'भारतरत्न' पुरस्कार मिळाला तेव्हाचा किस्सा लतादिदींनी सांगितला आहे. त्या म्हणतात, 'मला भारतरत्न पुरस्कार मिळाला तेव्हाची गोष्ट. माझ्यासह पद्मभूषण आणि पद्मविभूषण जाहीर झालेल्यांना पवारसाहेबांनी आपल्या घरी स्नेहभोजनासाठी बोलाविले होते. आमच्या सन्मानार्थ त्यांनी शास्त्रीय संगीताची मैफिल आयोजित केली होती. मला तर खूपच आश्चर्य वाटलं, कारण पवारसाहेबांना संगीतात अजिबात रुची नाही असं मला कोणीतरी त्याआधी सांगितलं होतं. माझ्या मनात त्यांच्याविषयी तोच समज होता. एका कार्यक्रमात धाडसाने पवारसाहेबांना मी विचारले की "संगीताच्या बाबतीत आपण एवढे कोरे का?" तेव्हा पवारसाहेबांनी हसून सांगितले की "तुम्हाला कोणीतरी चुकीची माहिती दिली आहे. चित्रपट संगीतापेक्षा सुगम आणि शास्त्रीय संगीताची मला अधिक आवड आहे." सहाजिकच इतकी सुंदर मैफिल पाहून मी चकित झाले होतेच; पण पवारांच्या उत्तराने आणखी चकित होण्याची वेळ आली. उत्तरोत्तर मैफिल रंगत गेली. संपूर्ण वेळ पवारसाहेब तल्लीन होऊन ऐकत होते.'

लतादिदी म्हणतात, 'पवारसाहेब आणि मी विविध कार्यक्रमात अनेकदा भेटलो आहे. ते आस्थेने विचारपूस करतात. मला राजकारणात अजिबात रस नाही. संगीत आणि राजकारण हे प्रांत वेगळे आहेत. त्यामुळेच आम्ही जेव्हा गप्पा मारतो, तेव्हा

बोलण्यात राजकारण सोडून अनेक विषय असतात. त्यांच्याशी बोलताना आपण एका मोठ्या राजकीय नेत्याबरोबर गप्पा मारत आहोत, असं वाटत नाही. आपल्या परिचितांच्या आवडीनिवडीची माहिती मिळवणे आणि प्रसंगानुसार ती जपणे, हा त्यांचा महत्त्वाचा स्वभावविशेष. एक उदाहरण सांगते, चंदेरी रंगाच्या साड्या मला आवडतात, असं त्यांना समजलं. मग त्यांनी आपल्या पत्नीला म्हणजे प्रतिभावहिनींना सांगून माझी ही आवडदेखील पुरवली. एवढेच काय एकदा त्यांनी मला बारामतीला येण्याचं निमंत्रण दिलं. निमंत्रणाचा मान राखून त्यांच्याकडे गेले, त्यावेळी त्यांनी माझा सत्कार केला. त्याविषयी आमचं काहीच बोलणं झालं नव्हतं. त्यामुळे मला तो सत्कार अनपेक्षित होता; पण आपल्या गावी आलेल्या पाहुण्यांचा सन्मान करण्याची त्यांची रीत होती. त्यांनी मला बारामती गावाची यथास्थित माहिती दिली. ती भेट मी कधीच विसरू शकणार नाही. त्यातही प्रतिभावहिनींनी केलेला पाहुणचार विसरणं अशक्यच आहे.

असाच एक सत्कार आणि नंतरचा पाहुणचार मला आठवतो. 'भारतरत्न' पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांनी नरीमन पॉईंटजवळ यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये माझा सत्कार आयोजित केला होता. दिलीप कुमार यांच्या हस्ते तो झाला. तो भव्य सोहळा कमालीचा देखणा होता. माझ्या मनावर त्या आठवणी कायमच्या कोरल्या गेल्या आहेत.

त्यानंतर सोलापुरात माझा कार्यक्रम होता. पवारसाहेब त्याला उपस्थित होते. सोलापुरात मटणाचा एक प्रकार प्रसिद्ध आहे

आणि तो मी कधीच खाल्ला नव्हता; पण पवारसाहेबांमुळे इच्छा पूर्ण झाली, कारण त्यांनी त्या दिवशी आमच्यासाठी तो प्रकार आवर्जून करायला सांगितला होता.

संगीताविषयी बोलायचं तर त्यांना मालकंस राग आवडतो. मी गायलेलं, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लिहिलेलं 'जयोस्तुते' गाणंही त्यांच्या खास आवडीचं. सोलापुरातल्या नागरी सत्काराच्या वेळी ही गोष्ट मला समजली. त्यांनी आपल्या भाषणात याविषयी सांगितलं. त्यातील काव्य आणि चाल त्यांना आवडते असंही त्यांनी विशेषत्वाने सांगितलं होतं. त्यानंतर मी भाषण करायला उभी राहिले आणि त्यांना ते गाणं ऐकवलं.

माझ्या वडिलांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमाला ते दोन-तीनदा येऊन गेले आहेत. पवारसाहेबांबद्दल बोलावं तेवढं थोडं आहे. ते उत्तम राजकारणी आहेत. संगीतातील दर्दी आहेत आणि रोजच्या धकाधकीतही आपल्या परिचितांच्या लहानसहान इच्छा पूर्ण करणारे आहेत.'

❒❒❒

# शरद पवार आणि शाहीर साबळे

शरद पवार हे कलाकारांचे श्रद्धास्थान आहेत. शरद पवारांच्या काही आठवणी शाहीर साबळे यांनी सांगितलेल्या आहेत. शरद पवारांचे वैशिष्ट्य असे की कला क्षेत्रातील एखाद्या चांगल्या कार्यात कसलीही अडचण आल्यास ती निवारण करताना त्यांनी कधी आप-पर असा भेदभाव दाखवला नाही. शाहीर साबळे यांच्या

मुलीने शालेय शिक्षण संपल्यावर शास्त्रीय नृत्य शिकण्याचा ध्यास घेतला होता आणि त्यावेळेस नालंदा नृत्य महाविद्यालयाची एक जाहिरात पेपरमध्ये वाचनात आली होती. त्याच्या संचालिका होत्या सौ. कनक रेळे. त्यांच्याशी साबळेंचा परिचय झाला. अशाच एका भेटीत त्यांनी नालंदा महाविद्यालयाच्या संदर्भातील एक अडचण सांगितली की हे महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी संलग्नित करायचे असून त्यासाठी त्यांनी मंत्रालयात प्रयत्न चालवलेले होते; परंतु त्यात त्यांना यश मिळत नव्हते कारण खाजगीरीत्या भरमसाठ शास्त्रीय नृत्य शिकविणाऱ्या गुरु घराण्यांच्या मिरासदारीवर त्यामुळे संकट आले असते. याच मंडळींनी दबावतंत्र वापरून त्यांच्या या प्रयत्नांना खीळ घातली होती. हे महाविद्यालय संलग्नित झाले असते तर विद्यापीठाच्या सर्व सुविधा त्यांना मिळून सामान्य मुला-मुलींना शिक्षण घेणे सोपे गेले असते. या प्रकरणाची माहिती जेव्हा साबळे यांनी शरद पवारांना दिली, तेव्हा सौ. कनक रेळे यांचा शुद्ध हेतू शरद पवारांसमोर स्पष्ट झाला आणि त्यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घातले. तातडीने फाईल मंत्रालयात फिरू लागली आणि सगळे सोपस्कार पूर्ण करीत थोड्या अवधीत या महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठाची मान्यता मिळाली आणि आज नालंदा महाविद्यालय हे मुंबईतील नृत्यकलेचे अग्रणी विद्यापीठ ठरले आहे, ही शरद पवारांचीच कृपा आहे, असे शाहीर साबळे म्हणतात.

❒❒❒

# विरोधकांचा मित्र

# प्रमोद महाजनांच्या नजरेतून पवार

प्रमोद महाजनांची आणि शरद पवार यांची पहिली भेट मुंबईत 'रामटेक'वर 1978 मध्ये झाली. त्यावेळी पवार मुख्यमंत्री होते आणि प्रमोद महाजन अंबाजोगाईहून त्यांच्या पक्षाच्या म्हणजे तेव्हाच्या जनसंघाच्या कामासाठी मुंबईस आले होते. 'मोहनराव भागवत यांच्यामागे मी शेपूट म्हणून फिरत होतो आणि त्यानंतरच्या तेवीस वर्षांमध्ये माझा राजकीय प्रवाह आणि प्रवास, पक्षाचे नाव बदलले तरी हिंदुत्वाचाच राहिला.' असे प्रमोद महाजन यांनी पवारांवरील एका लेखात म्हटले होते. 1978 ते 1986 या दरम्यान शरद पवार इंदिरा काँग्रेसच्या बाहेर होते आणि पुरोगामी लोकशाही आघाडीत प्रमोद महाजन व ते सोबत होते. त्या काळात 1980 आणि 1985 मध्ये त्यांनी सोबत निवडणूक लढवली होती, तीही शरद पवार यांनाच मुख्यमंत्री करण्याच्या मुद्द्यावर. सुमारे आठ वर्षे राजकारणात ते एकमेकांच्या बरोबर होते. 1986 मध्ये प्रमोद महाजन राज्यसभेवर निवडून गेले. संसदीय करिअर प्रमोद महाजनांना लाभण्याचे श्रेय शरद पवार यांचे आहे; कारण त्यावेळी जनसंघाचे शांती पटेल हे पुन्हा राज्यसभेवर येण्यास उत्सुक होते आणि प्रमोद महाजन यांना जनसंघाची फक्त 14 मते मिळाली होती. शरद पवार यांनी चंद्रशेखर यांना समजावले नसते, तर प्रमोद महाजन राज्यसभेवर येऊ शकले नसते, असे त्यांनी स्वतः प्रांजळपणे कबूल केले आहे.

शरद पवारांचे महाजनांनाही आकर्षण होतेच; पण राजकीय विरोध आणि व्यक्तिगत संबंध यात पवारांनी अंतर राखले. त्याची सरमिसळ होऊ दिली नाही. एक माणूस म्हणून शरद पवार श्रेष्ठ आहेत. प्रमोद महाजनांनी एक किस्सा सांगितला होता. ते म्हणतात, 'परळी वैजनाथ येथे माझी बहीण आणि मेव्हणे जिल्हा परिषद शाळेत शिक्षक होते. शरद पवार तेव्हा राज्यात मुख्यमंत्री होते आणि त्यांनी परळी वैजनाथ येथील आमदारांना आपल्या मंत्रिमंडळात मंत्री केले. या मंत्र्यांनी माझ्या बहिणीची व मेव्हण्याची दोन वेगवेगळ्या गावी बदली केली. मी पवार यांच्या कानावर बदलीची ही घटना घातली, तेव्हा त्यांनी त्या मंत्र्यांना बोलावले आणि "बाकी काय राजकारण तुला करायचे ते कर. पण असे बदली करण्याचे प्रकार तू करशील तर तुला मंत्री म्हणून ठेवणार नाही", अशी समज दिली.

गोपीनाथ मुंडे हेही प्रमोद महाजन यांचे मेव्हणे होते आणि राज्यात विरोधी पक्षनेतेपदी असताना मुंडे यांनी शरद पवार यांच्यावर शरसंधान केले होते; पण तरीही प्रमोद महाजन आणि पवार यांचे संबंध बिघडले नाही. पवारांविरोधात अशी टीका करू नये म्हणून मुंडे यांना महाजनांनी सांगितले असते तर त्यांनी टीका केली नसती; पण प्रमोद महाजन त्यांच्या राजकारणात पडले नाही. त्याचप्रमाणे शरद पवारांनी 'मुंडे यांनी आपल्यावर टीका करू नये' याबद्दल त्यांना बोलण्यास प्रमोद महाजनांना कधी सांगितले नाही. अशा कारणांमुळेच प्रमोद महाजन आणि शरद पवार यांचे

मैत्रीसंबंध कायम राहिले आणि आपापल्या पक्षाशी ते एकनिष्ठ राहिले.

महाराष्ट्राला तळहातासारखा ओळखणारा पवारांशिवाय दुसरा नेता नाही. यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांच्यानंतर जर श्रेष्ठ नेता कुणी असेल तर तो म्हणजे शरद पवार हाच होय. महाराष्ट्राच्या राजकारणाबाबत शरद पवारांची जाण अद्भुत आहे. महाराष्ट्र कसा असावा याबद्दल शरद पवार यांचे स्वप्न आहे. असे स्वप्न असलेला दुसरा पुढारी कुठल्याही पक्षात नाही. कला व साहित्याचे क्षेत्र असो की विज्ञान, शेती व तंत्रज्ञान असो, या सर्व क्षेत्रात महाराष्ट्र कसा असावा याबाबतचे त्यांचे स्वप्न अतुलनीय आहे. बारामतीमध्ये त्यांनी हे स्वप्न साकार करून दाखवले आहे. चार वेळा मुख्यमंत्री पद, विरोधी पक्षनेते पद, संरक्षण मंत्री पद असा सगळा व्याप असतानादेखील बारामतीमध्ये त्यांनी केलेले विकासाचे विधायक काम खरोखर कौतुकास्पद आहे आणि त्यामुळेच पवार हे बारामतीतून बाहेर का पडत नाहीत, असा प्रश्न पडण्याचे कारण उरत नाही.

शरद पवार यांच्या भरीव कामगिरीचा काळ म्हणजे 1978 ते 1986. त्यांच्या नेतृत्वाखाली 1978 ते 1980 या काळात पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार महाराष्ट्राला मिळाले होते. ते फार चांगले सरकार होते. इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्र त्या वेळेस बरेच प्रगत आणि आघाडीवरचे राज्य होते. पंतप्रधानानंतर देशात महाराष्ट्राचा मुख्यमंत्री तेव्हा महत्त्वाचा समजला जात असे.

प्रमोद महाजन म्हणतात, 'पवार यांचा स्वभाव शांत आहे. त्याचे मला आकर्षण आहे. असाच एकदा मी चिडलेला असताना शरद पवार मला म्हणाले, "भागवतांकडून काही शांतपणा तू शिकला नाहीस."

अशा काही आठवणी भाजपचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांनी सांगितल्या होत्या.

❒❒❒

# जगन्मित्र शरद पवार

निर्व्याज मैत्री हा शरदराव यांच्या अनेक गुणांपैकी एक मोठा उल्लेखनीय गुण आहे. त्यांची मैत्री साऱ्या बंधनाच्या व मर्यादांच्या पलीकडची आहे. तिला वयाचे, पक्षाचे, क्षेत्राचे, धर्माचे अशा कशाचेही बंधन नाही. आपल्या इच्छेप्रमाणे राजकारण व समाजकारण करत असताना त्याची बाधा आपल्या मैत्रीवर ते पडू देत नाहीत. राजकारणी, खेळाडू, कलावंत, लेखक अशा विविध क्षेत्रातल्या अनंत लोकांशी त्यांची मैत्री आहे. त्यांचा सहकार्याचा हात सदैव पुढे असतो. माजी लोकसभा सदस्य अण्णा जोशी (लक्ष्मण जोशी) लिहितात की, 'आमच्यासारख्यांची कामे त्याच्या दृष्टीने किरकोळ असतात; पण काम घेऊन येणाऱ्याला ते किती महत्त्वाचे आहे, हे ओळखून ते झटकन हातातले काम टाकून काम समजावून घेणार आणि संबंधितांना ताबडतोब फोन करणार. त्यांच्याशी काम समजावून सांगून चर्चा करणार आणि जणूकाही स्वतःचेच काम आहे, असे समजून त्या कामाचा पाठपुरावा

करणार. पुढे केव्हाही भेटल्यानंतर आपण काही विशेष गोष्ट केली आहे, असा आविर्भाव न आणता गप्पागोष्टी तशाच चालू राहणार. खऱ्या अर्थाने ते जगन्मित्र आहेत.'

अटल बिहारी वाजपेयींपासून चंद्रशेखरांपर्यंत, मुलायमसिंह यादवांपासून प्रमोद महाजनांपर्यंत, काश्मीरच्या अब्दुल्लांपासून ते आंध्र प्रदेशच्या चंद्राबाबूंपर्यंत, बाळासाहेब ठाकरेंपासून जॉर्ज फर्नांडिसांपर्यंत सर्वांशी त्यांची दोस्ती आहे. संगीत क्षेत्रातील पंडित भीमसेन जोशी, लताबाई, कलाक्षेत्रातील जब्बार पटेल, शबाना आजमी किंवा क्रीडाक्षेत्रातील मारुती मानेंपासून तर सुनील गावस्करांपर्यंत सर्वदूर त्यांचा मित्रपरिवार पसरलेला आहे. मैत्रीचे हे मैदान सांभाळत असताना शरद पवार परतफेडीची अपेक्षा मनात बाळगत नाहीत. सर्वांचे विचार, ध्येयधोरणे शरदरावांच्या विचारांशी, कार्याशी प्रत्येक वेळी जुळतीलच असे नाही. अनेक माणसे अशी आहेत की आपली कामे पदरात पाडून घेण्याकरिता ते संबंध ठेवतात, त्यातले शरद पवार नाहीत. एखाद्या गोष्टीवर एखाद्याचे म्हणणे पटत नसले तर त्याच्याशी कायम संबंध तोडणारी माणसेसुद्धा आहेत; परंतु शरद पवारांचे वैशिष्ट्य हे की कोणत्याही घटनेचा परिणाम आपल्या मैत्रीवर ते होऊ देत नाहीत. निर्व्याज मैत्री करणे हा त्यांचा स्वभावच आहे.

जोशींनी त्यांची एक आठवण सांगितली आहे. नागपूरला विधानसभेचे अधिवेशन सुरू असताना उपाध्यक्षपद विरोधी पक्षाकडे द्यावे, या संकेताला धरून त्यावेळी अण्णा जोशी यांना उपाध्यक्ष म्हणजे डेप्युटी स्पीकर करावे हे सांगण्याकरिता प्रमोद

महाजन, गोपीनाथ मुंडे आणि अण्णा जोशी नागपूरला तेव्हाचे मुख्यमंत्री शरद पवार यांच्या निवासस्थानी गेले होते. या मंडळींनी त्यांचे म्हणणे पवारांकडे मांडल्यावर पवारांनी विचारले, 'डेप्युटी स्पीकर झाल्यानंतर अण्णा आमच्यासाठी काय करणार?' तेव्हा प्रमोद महाजन यांनी स्पष्टपणे सांगितले की, 'घटनेप्रमाणे स्पीकरची जी कामे असतील तीच आणि तेवढीच कामे अण्णा जोशी करतील. तुम्ही त्यांना डेप्युटी स्पीकर करा किंवा करू नका.' इतके स्पष्ट सांगूनही पवारांनी जोशींच्या उमेदवारीला मान्यता दिली. एवढेच नव्हे तर अण्णांना निवडून येण्यासाठी मदतही केली. मधुकरराव चौधरी आजारी असल्यामुळे पदाची जबाबदारी दीर्घ काळ जोशी यांना सांभाळावी लागली. तेव्हा रोज सकाळी वर्तमानपत्र वाचून, रेडिओच्या बातम्या ऐकून त्या दिवसाच्या सभागृहातील कामकाजासंबंधी अण्णा जोशी व विरोधी पक्षनेते म्हणून मनोहर जोशी, गोपीनाथ मुंडे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करीत असत आणि या सर्व कालावधीत शरदरावांनी, मनोहरपंतांनी आणि गोपीनाथ मुंडेंनी त्यांना कोणतीही गोष्ट 'आऊट ऑफ द वे' करायला सांगितली नाही आणि तरीही त्यांचे काम सभागृहाच्या पसंतीस उतरले. शरद पवारांचा आणखी एक गुण असा की, ते आपल्या प्रतिस्पर्ध्यावर टीकेचा हल्ला करताना आपला मुद्दा तर ठोसपणे मांडतातच, पण व्यासपीठाची प्रतिष्ठाही सांभाळतात, असे अण्णा जोशी यांनी नमूद केले आहे.

❒❒❒

# विरोधकांच्याही प्रगतीकार्याचा सन्मान करणारा विधायक दूरदृष्टीचा नेता

'महाराष्ट्रातील ज्या राजकीय नेत्यांबद्दल माझ्या मनात आत्यंतिक आदरभाव आहे, अशा नेत्यांमध्ये श्री. शरद पवार आहेत.' असे भाजपचे नितीन गडकरी यांनी पवारांवरील एका लेखात म्हटले होते. शरद पवारांचे आणि भाजपाचे नितीन गडकरी यांचे वैचारिक स्तरावर एकमत होऊ शकत नाही. राजकीय मतभिन्नता कायम राखूनही जेव्हा गडकरी पवारांचा विचार करतात, तेव्हा महाराष्ट्राचा हा लाडका नेता राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान आणि महत्त्व जोपासून आहे, याचा त्यांना विशेष अभिमान वाटतो, असे त्यांनी अनेकदा म्हटले आहे. शरदराव राष्ट्रीय राजकारणात कार्यरत असले तरी त्यांचा जीव महाराष्ट्रात अडकलेला असतो. शरदरावांनी उभा महाराष्ट्र पिंजून काढला आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यांची साद्यंत माहिती त्यांना आहे. हजारो कार्यकर्त्यांची नावे पाठ आहेत. एकदाच भेटलेला माणूस खूप काळानंतर पुन्हा भेटला तरी शरदरावांनी त्याला ओळखले नाही, असे होत नाही. शरदराव खऱ्या अर्थाने लोकनेते आहेत. त्यांच्यासारखे नेतृत्व कॉँग्रेसच्या राजकारणात सर्वोच्चपदी असते, तर कदाचित या पक्षाचे स्वरूप आता आहे, त्यापेक्षा वेगळे दिसले असते. सोनियाजींच्या नेतृत्वाच्या प्रश्नावर शरद पवारांनी व्यक्त केलेले मत राष्ट्रवादी नेत्यांचे मत होते. असे मत व्यक्त करणे अनेकदा राजकीय अडचणीचे असते; पण शरदराव यांनी आपली

भूमिका कायम राखली आणि काँग्रेसमधून बाहेर पडले. राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती केली. या राष्ट्रवादी काँग्रेसला राष्ट्रीय स्तरावर किती स्वीकारार्हता मिळाली हा विषय बाजूला ठेवला, तरी राष्ट्रीय मूल्यांसाठी राजकीय अस्तित्व पणाला लावायला खूप हिंमत लागते, ती शरदरावांनी दाखवली, याचे नेहमीच गडकरींना कौतुक वाटत राहिले आहे.

शरदराव यांचे संघटनकौशल्य जबरदस्त आहे. त्यांनी विशिष्ट क्षेत्रावर निर्माण केलेली पकड सहजासहजी सुटत नाही. मुख्यमंत्री असताना सत्तारूढ पक्ष आणि विरोधी पक्षही तेच चालवतात, असे काही पत्रकार मित्र म्हणतात. वस्तुस्थिती अशी नसली तरी त्यांचे मित्र सर्वदूर पसरले आहेत, याबद्दल शंका नाही. छोट्या छोट्या कामगारांपासून सहकार चळवळीतील दिग्गज आणि मोठ्या उद्योगपतींपर्यंत साऱ्यांमध्ये शरदरावांचा संचार आहे आणि साऱ्याच वर्गांना त्यांच्याबद्दल मोठी आत्मीयता आहे, याचा अनुभव मी अनेकदा घेतला आहे, असे गडकरी म्हणतात. स्वकर्तृत्वाने राजकीय क्षेत्रात आपले स्थान मिळविणारे, प्रशासनावरही मजबूत अंकुश ठेवणारे ते यशस्वी प्रशासक आहेत. त्यांना फार जवळून पाहण्याची संधी गडकरींना मिळाली. अत्यंत योजनाबद्ध असे जीवनमान त्यांनी स्वीकारले आहे. या अंगभूत गुणांचा लाभ त्यांना प्रशासनातही झाला. त्वरित निर्णय घेऊन प्रश्नांची सोडवणूक करण्याचा त्यांचा झपाटा निश्चितच वाखाणण्याजोगा आहे. महाराष्ट्राचे नेतृत्व करताना आणि संरक्षणमंत्री म्हणून आपली जबाबदारी पार पाडताना शरदराव

यांनी आपली भूमिका समर्थपणे पार पाडली. राजकीय जीवनात विविध रीतीचे चढउतार अपरिहार्य असतात. त्यामुळे अनेकदा कामे अपुरी राहिली, याचे असमाधान त्यांना वाटले असेल; पण जेवढा काळ ते ज्या ठिकाणी राहिले तेवढा काळ त्यांनी तेथे आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला, हे त्यांचे राजकीय विरोधकही मान्य करतील.

महाराष्ट्राच्या विकासाचा ध्यास घेणाऱ्या फार थोड्या नेत्यांमध्ये शरद पवार आहेत. या राज्याला देशात अग्रभागी नेण्याची आकांक्षा आणि स्वप्न त्यांनी आपल्या उराशी बाळगले आहे. तंत्रज्ञान, कृषी उद्योग, पायाभूत सोयी या सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राची जलदगतीने प्रगती व्हावी, असाच पवारांचा ध्यास आहे. अशी दूरगामी विधायक दृष्टी क्वचितच राजकीय नेत्यांमध्ये आढळते. याच ध्यासातून शरदरावांनी अनेक प्रकल्पांची उभारणी केली, सहकार चळवळीला मदतीचा हात दिला. कृषी क्षेत्रात महाराष्ट्राने मोठी आघाडी घ्यावी, यासाठी मोठ्या जोमाने पाठपुरावा करणाऱ्यांमध्ये ते नेहमीच पुढे राहिले आहेत. त्यांनी राज्याच्या कृषीक्षेत्राला, सहकार चळवळीला आणि तंत्रविज्ञानाला नवीन दृष्टी दिली, भविष्याचा वेध घेणारी दिशा दिली, याबद्दल कोणाच्या मनात शंका नाही. युतीच्या काळात मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग निर्माण करण्याची संधी गडकरींना मिळाली; पण या मार्गाची आखणी शरदरावांच्याच कार्यकाळात झाली होती, हा इतिहासाचा भाग आहे. या द्रुतगती मार्गावरील तिच्या उभारणीबाबत गडकरी आणि पवार यांच्यामध्ये मतभिन्नता होती; पण शरदराव कधीही

या महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पाच्या आड आले नाहीत. उलट प्रत्येक वेळी त्यांनी विविध विकासकामांच्या प्रगतीबद्दल उत्सुकता दाखवली, याचा विशेष उल्लेख गडकरींनी केला आहे.

पवारांचे आणि गडकरींचे मार्ग भिन्न आहेत. राजकीय प्रवासात कधी समांतर तर कधी छेदून जाण्याची वेळ येते. पण पवारांसारखे प्रसन्नचित्त आणि राज्याच्या भविष्याबद्दल कमालीची कळकळ बळगणारे नेते भेटले की त्यांच्या विरोधकांनाही आनंदच होत असतो आणि आपल्या विरोधकांचाही त्यांनी सन्मानच केला आहे, सूडबुद्धीची वागणूक दिली नाही, असे विनम्रपणे नितीन गडकरी यांनी नमूद केले आहे.

❑❑❑

# सामाजिक बांधिलकी आणि समाजपरिवर्तनाचा ध्यास

## महिला हिताचे दृष्टे नेते

महाराष्ट्रात अनेक राजकीय नेते होऊन गेले; परंतु समाजातील सर्व घटकांना समान न्याय देण्याचे, उपेक्षितांना जवळ करण्याचे काम जर कोणी केले असेल तर ते फक्त पवारसाहेबांनी. राजकारणाबरोबरच समाजकारण, कृषी, उद्योग, सहकार, शिक्षण, माहिती तंत्रज्ञान इ. क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या पवारसाहेबांनी महिलांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक कल्याणासाठी

मोलाची कामगिरी बजावली आहे. महिलांना जोपर्यंत निर्णय प्रक्रियेत सामावून घेतले जात नाही, तोपर्यंत त्यांचा विकास होणार नाही, असा आग्रह धरून पवारसाहेबांनी 1994 साली महिला धोरण जाहीर केले. महिलांविषयी शासकीय पातळीवर सकारात्मक भूमिका घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आणि पवारसाहेब पहिले मुख्यमंत्री ठरले. या धोरणामुळे महाराष्ट्रात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जवळपास एक लाख महिलांना निवडून येण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे अनेक महिलांना सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, नगराध्यक्ष, महापौर पदावर विराजमान होण्याचा बहुमान मिळाला आहे. महिलांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी फक्त पद बहाल करून चालणार नाही, तर निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग असावा म्हणून महिलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पवारसाहेबांनी सकारात्मक भूमिका घेतली. मुलींना मोफत शिक्षण, आरोग्याचे प्रश्न, महिला कर्मचाऱ्यांच्या समस्या या बाबींचा प्राधान्याने विचार करून धोरणात्मक निर्णय घेतले. विकसनशील देशातील कृषी उत्पादनात महिलांचा निम्मा वाटा असतो, म्हणून प्रत्येक क्षेत्रात महिलांना पुरुषांबरोबर संधी दिली पाहिजे, या धोरणाचा पुरस्कार करून पवारसाहेबांनी महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सकारात्मक भूमिका घेतली आहे. म्हणूनच शरद पवार हे महिला हिताचे दृष्टे नेते आहेत, असे माजी विधानसभा सदस्या सौ. मंदाताई म्हात्रे म्हणतात.

❑❑❑

# राजकीय सत्ता समाजपरिवर्तनासाठी वापरणारे डोळस नेतृत्व

अशक्य कोटीतील गोष्ट शक्य कोटीत आणण्याच्या कौशल्याला राजकारण म्हणतात. ज्याला ही कला प्राप्त झालेली असते, तो राजकीय क्षेत्रातला उच्च कोटीचा नेता ठरतो. ही कला सहजासहजी साध्य होत नाही. ती साध्य करण्यासाठी अविरत प्रयत्न करावे लागतात. खडतर मार्गावर चालावे लागते. या कलेला साहस आणि दूरदृष्टीची जोड द्यावी लागते. प्रखर ध्येयवाद असावा लागतो. देशात अशा प्रकारचे नेते फार थोडे आहेत, जे आहेत त्यात शरद पवारांचा क्रम फार वरचा आहे. माजी कुलगुरू व माजी राज्यसभा सदस्य डॉ. जनार्दन वाघमारे यांनी पवारांच्या कार्यावर व डोळस नेतृत्वावर प्रकाश टाकला आहे.

शरद पवारांच्या राजकीय जीवनाची सुरुवात काँग्रेसचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून झाली. घरात पुरोगामी विचारांचा वारसा होता. त्याचा प्रभाव त्यांच्यावर आजही कायम आहे. त्याचा उपयोग शरदरावांच्या व्यक्तिमत्त्व विकासास झाला. अभ्यासू वृत्ती, सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि प्रत्यक्ष कार्य यांतून त्यांची आकलनक्षमता प्रचंड प्रमाणात वाढली आहे. स्वतंत्र प्रज्ञा लाभलेल्या पवारांनी आपल्या राजकीय आयुष्याच्या वाटचालीत समोर आलेली आव्हाने पेलली. राजकारणाला त्यांनी सामाजिक व आर्थिक परिमाणे दिली. राजकारणाचा अन्वयार्थ समोर ठेवून ठोस निर्णय घेतले. मंत्री म्हणून विविध खाती सांभाळली. मुख्यमंत्री

म्हणून अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. केंद्रात संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी केलेली कामगिरी अतिशय कल्पक व कार्यक्षम होती. प्रशासनावर त्यांचे नियंत्रण होते. ते लोकनेते आहेत. 'मासेस'चे नेते आहेत. पक्षश्रेष्ठींनी लोकांवर लादलेले ते नेते नव्हते आणि नाहीत. त्यांचे नेतृत्व हे जनसामान्यांपासून अंकुरले, वाढले आणि वटवृक्षाप्रमाणे विस्तारले. या वटवृक्षाच्या मुळ्या जमिनीत सर्व बाजूंनी खोलवर पसरलेल्या आहेत. पवारांचे नेतृत्व भक्कमपणे उभे राहण्याचे हेच एक कारण आहे. जनमानसात खोलवर रुजलेले असे नेतृत्व लाचारीने कुणासमोर झुकत नसते.

शरद पवारांची बुद्धिमत्ता महासंगणकासारखी आहे. महाराष्ट्रातील शेकडो कार्यकर्त्यांना ते नावाने ओळखतात. त्यांचे संघटनकौशल्य कौतुकास्पद आहे. जनमानसावरची त्यांची पकड स्तिमित करणारी आहे. त्यांच्या आयुष्यात अनेकदा चढउतार आले; पण पराभवाची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली नाही. वास्तवाचे भान आणि त्याचबरोबर प्रचंड आशावाद ही त्यांच्या नेतृत्वाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. काळाच्या पावलांची चाहूल त्यांना जाणवते. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाची भाषा आज आपण बोलत आहोत. त्याची चाहूल फार पूर्वीच पवारांना लागलेली होती. खुल्या बाजारपेठेची अनिवार्यता आणि त्याचबरोबर तिच्यातून संभवणारे धोके त्यांच्या ध्यानात केव्हाच आले होते. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साह्याने आधुनिकतेकडे वाटचाल करण्याचे आवाहन त्यांनी केले. जैवतंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला तर आपली उत्पादन क्षमता प्रचंड

प्रमाणात वाढेल, असे ते आत्मविश्वासाने सांगतात. प्रश्न शेतीचे असोत की शिक्षणाचे, सहकाराचे असोत की उद्योगधंद्यांचे, रोजगार निर्मितीचे असोत की दारिद्र्य निर्मुलनाचे, जलसंवर्धनाचे असोत की जलसिंचनाचे, देशाच्या संरक्षणाचे असोत की राष्ट्रीय एकात्मतेचे, महिलांच्या विकासाचे असोत की दुर्बल समाजघटकांच्या उन्नतीचे, अशा विविध प्रश्नांची जाण तर त्यांना आहेच पण त्या प्रश्नांचा सखोल अभ्यास पवारांनी केला आहे. त्यांचे नेतृत्व हे परप्रकाशित नाही. ते स्वयंप्रज्ञ असल्यामुळेच अनेक समकालीन राजकीय नेत्यांच्या असूयेचे ते लक्ष्य ठरले. पवारांनी अनेक पुरोगामी निर्णय धाडसाने घेतले. महिलांविषयी धोरण, मंडल आयोगाचा पुरस्कार व स्वीकार, मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर, महात्मा फुले, डॉ. आंबेडकरांच्या समग्र साहित्याचे प्रकाशन यांचा वानगीदाखल उल्लेख करता येईल. राजर्षी शाहू महाराजांची आठवण व्हावी असेच या नेत्याचे कार्य आणि दृष्टी आहे. लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यात 29 सप्टेंबर 1993 ला भूकंप झाला. काही हजार लोकांचे प्राण गेले. त्या दुःख निवारणार्थ राज्याचे तेव्हाचे मुख्यमंत्री म्हणून स्वतःचे अश्रू सावरून ते सहभागी झाले. उद्ध्वस्त झालेली गावे त्यांनी नव्याने बांधून दिली. भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या कामात स्वतः गुंतले. राजकारण हे विधायक, सर्जनशील असले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. राजकीय सत्ता ही समाजपरिवर्तनासाठी वापरली पाहिजे यावर त्यांची निष्ठा आहे, असे डॉ. जनार्दन वाघमारे यांनी एका लेखात म्हटले आहे.

❐❐❐

# सामाजिक बांधिलकी जोपासणारा नेता

1962 पासून सलग 39 वर्षे महाराष्ट्र विधान मंडळाच्या सेवेत असताना मुख्यमंत्री, सभापती, अध्यक्ष, विरोधी पक्ष नेता व अनेक सदस्यांना जवळून पाहण्याची संधी रमेश कांबळी यांना मिळाली. त्यात विशेष करून शरद पवार यांच्या कर्तृत्वाचा उंचावणारा आलेख त्यांना विस्मयकारक आणि भारावून टाकणारा वाटतो, असे ते म्हणतात. सामाजिक परिवर्तनासाठी विविध क्षेत्रात मार्गदर्शन करणारे उत्कृष्ट संघटक म्हणून महाराष्ट्राच्या विधान मंडळाच्या माध्यमातून सभागृहाचा नेता म्हणून पवारांनी भूमिका पार पाडली. 1978 मध्ये सत्तांतराच्या वेळी पवारांकडे अननुभवी व तरुण सहकारी होते, तर समोर विरोधकांमध्ये एकापेक्षा एक ज्येष्ठ व धडधडणाऱ्या तोफा होत्या. त्यात वसंतदादा पाटील, मधुकरराव चौधरी, प्रभा राव, यशवंतराव मोहिते, प्रतिभा पाटील यांचा समावेश होता. अशा प्रतिकूल आणि कठीण परिस्थितीत पवारांवर कडक आणि विषारी टीका झाली असली तरी त्यांचे कर्तृत्व आगीत घातलेल्या सोन्याप्रमाणे उजळून निघाले. 1987-88 मध्ये विधानसभा आणि विधान परिषद यांचे सुवर्णमहोत्सव राज्यात सर्वत्र संपन्न झाले. त्यावेळी विधिमंडळे, लोकशाही व जनता यांच्या संदर्भात शरद पवारांनी केलेली भाषणे ऐतिहासिक ठरली आहेत. त्यांनी विधानमंडळाच्या निवृत्त सदस्यांच्या कठीण परिस्थितीची व त्यांच्या समस्यांची नोंद घेऊन त्यांना निवृत्तीवेतन, वैद्यकीय उपचार, मुंबईत राहण्यासाठी जागा इत्यादी सुविधा जाहीर केल्या होत्या. 9 ऑगस्ट, 1995 रोजी

विधान परिषदेमध्ये, युती शासनाने रद्द केलेल्या एन्‌रॉन प्रकल्पाबाबतच्या प्रस्तावावर शरद पवारांनी केलेले भाषण अत्यंत अभ्यासपूर्ण आणि घणाघाती असे होते. त्यांच्या भाषणात त्यांची राज्याच्या हिताची तळमळ आणि भविष्यकाळासाठी नियोजनाची आवश्यकता यासंबंधीचे मुद्दे होते. युती शासनाने ते प्रत्यक्षात आणले असते तर आजची परिस्थिती आली नसती.

एकदा पवारांना 'गोवध बंदी' या विषयावर बोलायचे होते. त्यांनी विधिमंडळ ग्रंथालयाकडे चिठ्ठी पाठवून स्व. एस.एम. जोशी यांनी त्या विषयावर केलेल्या भाषणाची मागणी केली. यावरून त्यांचा अभ्यास आणि व्यासंग दिसून येतो. 12 डिसेंबर 1990 रोजी शरद पवारांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण सभागृहाने पक्षभेद विसरून त्यांच्या उत्तुंग कर्तृत्वाला मानाचा मुजरा दिला होता. त्यावेळी मधुकरराव चौधरी म्हणाले होते, 'यशवंतराव अष्टपैलू होते; परंतु त्यांचा मानसपुत्र सहस्त्रपैलू आहे. विलक्षण तीव्र बुद्धी, चाणाक्ष स्वभाव, प्रचंड लोकसंग्रह व अतुलनीय ऊर्जा असलेले शरदरावांचे नेतृत्व चंद्ररेखेप्रमाणे वर्धीष्णू व्हावे.'

मुख्यमंत्री म्हणून सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय पवारांनी विधानसभेत मंजूर करून घेतले आणि त्याचा फायदा आज सामान्यांना होत आहे. केंद्र शासनातर्फे महागाई भत्त्यात वाढ होत असे आणि तो लाभ राज्याच्या कर्मचाऱ्यांनाही मिळावा, म्हणून कर्मचाऱ्यांना प्रत्येक वाढीच्या वेळी अर्ज, निदर्शने करावी लागत. त्यामुळे शरदरावांनी कर्मचारी

प्रतिनिधी, शासनाचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली आणि ज्या ज्या वेळी केंद्र सरकार आपल्या कर्मचाऱ्यांसाठी वाढ जाहीर करील, तशीच वाढ राज्याच्या कर्मचाऱ्यांना देण्याचा कायमस्वरूपी निर्णय घेतला. रोजगार हमी योजनांच्या अंतर्गत फलोद्यानविषयक कामांची सांगड त्यांनीच घालून दिली होती. मंडल आयोगाच्या शिफारशींचा लाभ इतर मागासवर्गीयांप्रमाणेच विमुक्त जातींनाही देण्याचा ठराव त्यांनी मांडल्यामुळे त्याचा त्या जातींना प्रत्यक्ष लाभ झाला. नगरपरिषद, महानगरपालिकेत आज महिला प्रतिनिधी आहेत. तथापि सत्तेच्या राजकारणात हक्काने स्थान मिळवून देण्याचा 33 टक्के महिला आरक्षणाचा क्रांतिकारी निर्णयही 1993 मध्ये पवारांनीच घेतला होता. रमेश कांबळी यांनी विधीमंडळाचे सचिव म्हणून 10 वर्षे काम केले होते आणि पवारांच्या समाज परिवर्तनाच्या निर्णयाचे ते प्रत्यक्ष साक्षीदार होते. 'माझे हे भाग्यच होते', असे गौरवोद्गार कांबळी यांनी काढले आहेत.

❑❑❑

# मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्यावरून उद्भवलेली प्रचंड स्फोटक परिस्थिती सर्वांनाच माहिती आहे. नामांतराच्या प्रश्नावर दलित जनतेच्या भावना तीव्र झाल्या होत्या, तर इतरांनी त्याला संघटितपणे जबरदस्त विरोध केला होता. या संपूर्ण आंदोलनाला लज्जास्पद असे हिंसक वळण

मिळाले. दंगलीत दलितांवर अत्याचार झाले. नरसंहार झाला. मात्र पवारांनी पुढाकार घेत अत्यंत अवघड असा निर्णय घेऊन मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले. त्यासाठी त्यांनी दलित आणि दलितेतर यांच्यामधील मतभेदाची प्रचंड दरी दूर करण्यासाठी परिश्रम घेतले. अपेक्षा केल्याप्रमाणे शरद पवारांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला पराभव पत्करावा लागला; परंतु पवारांच्या नामांतराच्या निर्णयाचे दूरगामी परिणाम आता चांगले दिसू लागले आहेत. मराठवाड्यात दलित आणि दलितेतर यांच्यातील दुरावा मिटला आहे.

❑❑❑

# हिंदू स्त्रियांच्या वारसाहक्काचा प्रश्न

शरद पवारांनी हिंदू स्त्रियांच्या वारसाहक्कासंबंधित क्रांतिकारक निर्णय घेतला. हा निर्णय भारतात सर्वप्रथम महाराष्ट्रात पवारांच्या नेतृत्वाखाली घेतला गेला. त्यासाठी त्यांनी हिंदू वारसा हक्क कायदा 1956 मध्ये सुधारणा करून संयुक्त कुटुंबाच्या मालमत्तेत स्त्रियांना बरोबरीने वाटा दिला. हा सुधारित कायदा 22 जून 1994 रोजी अमलात आणला. ही सुधारणा करण्याची आवश्यकता का वाटली, याचा खुलासा करताना असे विशद करण्यात आले आहे की, ज्या अर्थी भारतीय संविधानाने कायद्यासमोर सर्व समान असतील, असा मूलभूत अधिकार प्रत्येक नागरिकाला दिला आहे आणि हिंदू एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये मुलींना केवळ लिंगभेदामुळे संपत्तीमधील समान हक्कातून

वगळले जाते व त्यामुळे समाजाला विघातक अशा हुंडा पद्धतीचा उगम होतो. त्या हुंडा पद्धतीच्या उच्चाटनासाठी आणि हिंदू समाज पद्धतीमध्ये स्त्रियांना जास्त चांगल्या परिस्थितीत राहता यावे, म्हणून हिंदू वारसा संहितेमध्ये ही सुधारणा करण्यात आली.

शरद पवारांचा हिंदू वारसा हक्क संहितेमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय इतका प्रभावी ठरला की केंद्र सरकारने एक परिपत्रक काढून भारतातील सर्व राज्यांना आवाहन केले की महाराष्ट्राच्या धर्तीवर सर्व राज्यांनी हिंदू वारसा हक्क कायद्यामध्ये सुधारणा करावी. पवारांच्या राजकीय विरोधकांनी त्यांचा हा निर्णय एकमताने उचलून धरला, हे विशेष! केवळ शरद पवारांमुळे संपूर्ण भारतातील स्त्रियांना न्याय मिळाला असून त्यांच्या जीवनामध्ये अनुकूल स्थित्यंतर घडून आले आहे.

❒❒❒

# किल्लारीच्या भूकंपानंतर पीडितांचे अश्रू पुसणारा नेता

किल्लारीच्या प्रलयंकारी भूकंपात जे निष्पाप जीव हे जग सोडून गेले, त्यांना या देशातील व विदेशातील अनेक स्वयंसेवी संस्थेतील सेवाभावी बांधवांनी तसेच भारतीय लष्करी जवानांनी मातीच्या ढिगाराखालून काढून त्यांचे अंत्यसंस्कार केले. जी दुर्दैवी माणसे व प्राणी जिवंत होते, त्यांना जगविले आणि या घडामोडींच्या मुख्य सूत्रधाराची भूमिका बजावणारे मातब्बर

राज्याचे त्यावेळेचे बलशाली मुख्यमंत्री शरदचंद्रजी पवार हे होते. 'या हिमालयासारखी उंची असलेल्या माणसाची कायमची आठवण ठेवणे, हे भूकंपातून त्यांच्या आशीर्वादाने जगलेल्या माणसांचे, संतांच्या पुण्याईने पावन झालेल्या आमच्या भोळ्याभाबड्या मराठवाड्याच्या मातीचे नैतिक कर्तव्य आहे. या भयावह परिस्थितीत असताना प्रसंगी आपल्या जीवाची पर्वा न करता आपला स्वत:चा तोल सांभाळून कौशल्यपूर्ण मार्गाने समयसूचकतेने वाटाड्याचे काम शरद पवार नावाच्या या पहाडी पुरुषाने केले' असे मंगरूळ, (औसा) लातूरचे हरिभाऊ जवळगे म्हणतात.

पवारसाहेब कोणत्याही संकटास तोंड देण्यास वाकब्गार आहेत, हे किल्लारीच्या भूकंपाच्या वेळेस सर्व जगाच्या लक्षात आले. भूकंपाची माहिती मिळताच अवघ्या अडीच ते तीन तासात सर्व दृष्टीने उद्ध्वस्त झालेल्या तेरणा परिसरातील किल्लारी या गावी येऊन ते दाखल झाले. त्यांनी एक महिना स्वतःला तिथे गुंतवून घेतले. आपल्या जीवाभावाचा नेता आपल्या दुःखात धावून आला, हे पीडितांनी बघितले. भूकंपग्रस्त डोके बडवीत असताना पवार व त्यांचे सहकारी गाडीच्या खाली उतरले होते. दुःखाने व्याकूळ झालेल्या भूकंपग्रस्त बांधवांना निधड्या छातीला लावून अश्रू पुसण्याचा प्रयत्न ते करीत होते. हरिभाऊ जवळगे यांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांनी विचारले होते की, "जवळगे गुरुजी, आपला मंगरूळ गाव काय म्हणतो?" त्यावेळी भेदरलेल्या आवाजात जवळगे म्हणाले, "साहेब, माझा मंगरूळ गाव पूर्ण साफ

झाला असून त्यात माझी स्वतःची जन्मदात्री माता, भावजया, चुलत्या, काका, मामा, भाऊ वगैरे रक्तामासाचे संबंध असलेली अनेक माणसे गेली. सध्या रस्तोरस्ती प्रेते पडली असून जखमी माणसे तडफडत आहेत. मातीच्या ढिगाऱ्यांखालून वर येण्याकरिता माणसे तडफडत आहेत. येथून डॉक्टर व मनुष्यबळ घेऊन जाण्याकरिताच मी आलो आहे."

तेव्हा ते म्हणाले की, "आता काळजी करू नका. ही नैसर्गिक आपत्ती आहे. हे सामुदायिक दुःख आहे. सर्वांनी मोठ्या धैर्याने सामना करायला हवा." असा लोकांना धीर देत त्यांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न पवार करीत होते. त्यांचे धाडस, नियोजन, त्याचबरोबर सर्व राजकीय पक्ष, जातीपंथांत, निरनिराळ्या संघटनांत, परदेशी बांधवांत त्यांच्याबद्दल असलेली आपुलकी व जिव्हाळा या बाबी त्यावेळी फारच उपयोगी ठरल्या. अनुभव नसलेला नागरी भागातील कुणी एखाद-दुसरा मुख्यमंत्री असता तर हजारो माणसांसोबत अन्न-वस्त्र-निवारा व आरोग्य सेवेअभावी त्यांचीपण त्यावेळी वाट लागली असती.

❒❒❒

## 'शारदा निकेतन'ची काळजी घेणारे पितृहृदय

1998-99 ची गोष्ट. पुण्यातील कर्वे नगर परिसरातील 'शारदा निकेतन' वसतिगृहामध्ये अनेक विद्यार्थिनी राहत होत्या. दिवसेंदिवस विद्युत बिल वाढत चाललेले होते. तिथे 88 खोल्या होत्या. प्रत्येक खोलीमध्ये तीन ट्युबलाइट, दोन पंखे आणि त्यात

विद्यार्थिनी टेपरेकॉर्डर, हेअर ड्रायर वगैरे वापरायच्या. त्यामुळे वीज बिल वाढत होते. याला आळा घालायचा म्हणून कमिटीने सकाळी साडेनऊ ते सायंकाळी साडेपाच या वेळेत वीज बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता आणि मुलींना त्यांच्या निष्काळजीपणामुळे हा निर्णय घ्यावा लागला, अशी समज दिली. काही दिवसानंतर श्री. शरद पवारांना ही बाब समजली, तेव्हा त्यांनी या समितीला समज दिली की, “वीज बंद करणे हा उपाय नाही. त्यांची अशी गैरसोय करू नका. त्यापेक्षा त्यांना ताकीद द्या. इस्त्रीची सोय रूममधून काढून टाका आणि दुसरीकडे स्वतंत्र व्यवस्था करा.” आणि त्यानंतर चारही मजल्यांवर प्रशस्त टेबलवर इस्त्री करण्याची सोय करण्यात आली. इस्त्री सेवाही 24 तास सुरू असते. मुलींची कोणतीही गैरसोय झालेली शरद पवारांच्या पितृहृदयास सहन होणारी नाही.

शरद पवारांची पुणे भेट शारदा निकेतनला भेट दिल्याशिवाय पूर्ण होत नसते. उभ्या उभ्या का होईना, शरद पवार तिथे जातात आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या कार्यकर्त्यांचा संच असतो. शारदा निकेतनमध्ये आल्यानंतर त्यातील काहीजणांना निकेतनचे काही भाग दाखवण्याची व्यवस्था करतात. हेल्थ क्लब, कार्यालय, कॉम्प्युटर, इंटरनेट विभाग दाखवण्याची व्यवस्था केली जाते. त्या विभागांना भेट देताना साहेबांच्या चिकित्सक नजरेतून लहान लहान गोष्टीसुद्धा सुटत नाहीत. असेंब्ली हॉल एकदा पाहत असताना काही मुली अगदी जवळून टीव्ही पहात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. 264 विद्यार्थिनी असलेल्या संख्येला

टीव्ही अत्यंत अपुरा आणि अयोग्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आणि दोनच दिवसात एक भलामोठा स्क्रीन टीव्ही त्यांनी लावून दिला. जणूकाही एखादे मिनी थिएटरच. उत्तमात उत्तम असेल ते दुसऱ्यांना देण्याची आणि त्यांचा आनंद वाढविण्याची शरद पवारांची ही विद्यार्थिनींबाबतची पितृवत प्रवृत्ती सतत दिसून येते, असे त्या वेळच्या रेक्टर विमला साठे म्हणतात.

❒❒❒

# शेतकऱ्यांचा नेता आणि विज्ञान, जैवतंत्रज्ञानप्रेमी कृषीतज्ञ

## आश्वासनाशिवाय कामाची पूर्तता

1978 साली शरद पवार पहिल्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हा मराठी विज्ञान परिषदेच्या दैनंदिन कामासाठी देणगी मिळावी या हेतूने मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह अ.पा. देशपांडे हे परिषदेचे त्यावेळचे विश्वासू व मुंबईचे माजी नगरपाल श्री. ज.ग. बोधे यांना सोबत घेऊन पवारांच्या कार्यालयात भेटले. शरदरावांनी त्यांचे बोलणे ऐकून घेतले आणि ‘पाहतो’ असे म्हणाले. कोणतेही आश्वासन न घेता ही मंडळी पाच मिनिटात तिथून निघाली. मात्र दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी वाचली की, मराठी विज्ञान परिषदेला मुख्यमंत्र्यांनी एक लाख रुपयांची देणगी जाहीर केली आहे. ती जाहीर झाल्यापासून

आणखी काही पत्रव्यवहार न करता एकविसाव्या दिवशी चेक हातात पडला होता. फार न बोलता काम करण्याची शरद पवार यांची पद्धत आहे.

विज्ञान परिषदेने 1993 मध्ये चुनाभट्टीच्या विज्ञान भवनावर पहिला मजला बांधला. वीस-बावीस लाख रुपये खर्च झाला होता. परिषदेने दहा लाख रुपये जमवले होते आणि बारा लाख रुपये देणे होते. काय करावे ही विवंचना होती. परिषदेच्या विश्वस्त मंडळाची सभा झाली. मुख्यमंत्रीपदी परत शरद पवार होते. प्रमुख विश्वस्त जयंत नारळीकर यांच्या सहीने मुख्यमंत्र्यांना पत्र पाठविण्यात आले. महिन्याभराने डॉ. नारळीकर परदेशातून परत आले आणि त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या पत्राचे काय झाले, ते विचारले. तेव्हा देशपांडे यांनी त्यांच्या सचिवांकडून त्यांच्या मुलाखतीची वेळ मागून घेतो असे सांगितले. हे बोलणे झाल्यावर दोन दिवसातच मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून एक लखोटा आला आणि उघडून पाहत असता दहा लाख रुपयांचा चेक होता. झटपट कामे करावी, हीसुद्धा शरद पवारांची पद्धत आहे.

मराठी विज्ञान परिषदेने 1996 साली राष्ट्रीय स्तरावरचा विज्ञान लेखक मेळावा मुंबई येथे घेतला होता आणि तीन-चार लाख रुपये होणाऱ्या त्याच्या खर्चापोटी नेहरू सेंटरकडे एक लाख रुपयांची देणगी मागितली. सेंटरचे अध्यक्ष पवार होते. सभेचे पत्र मंजुरीसाठी ठेवल्यावर मराठी विज्ञान परिषद काम करणारी संस्था आहे. तिला एक लाख रुपये द्यावे, असा निर्णय त्यांनी लगेच घेतला. असाच अनुभव 2000 साली पुण्याच्या आयुका संस्थेचे

विज्ञान प्रसारकांचे आंतरराष्ट्रीय अधिवेशन घेतल्या गेले तेव्हाही विज्ञानप्रेमींना आला होता.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानात शरद पवार यांची 12 मार्च, 2000 रोजी अ.पा. देशपांडे यांनी भेट घेतली आणि निमित्त होते मराठी विज्ञान परिषदेने देशपांडे यांचे संपादित केलेले 'पाणी : प्रश्न आणि उपाय' हे पुस्तक मदतीने छापण्यासाठीचे. पहिली 5000 प्रतींची आवृत्ती संपली होती आणि पुस्तकाला सतत मागणी येत होती. देशपांडे म्हणतात, 'पवारांनी पाच मिनिटे आमचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांना काय सांगायचे ते सांगितले आणि या पुस्तकात आणखी काय हवे यावर माधवराव चितळे यांचा सल्ला घ्या, असे म्हणाले. पवार यांच्याबरोबरच्या भेटीत दोन मिनिटात विषय संपतात आणि त्यांना विषयाचे आकलन पटकन होते. सांगणाऱ्याने पाल्हाळ लावू नये अशी त्यांची अपेक्षा असते. कामाचे बोलून झाले की पवार उजवीकडे पाहतात. भेटायला येणाऱ्याकडे नाही. आपले काम संपले, आपण आता उठावे, याची ती खूण असते'

❐❐❐

# समाजकारणी कृषीमंत्री

केंद्रीय कृषीमंत्री असतानाही शरद पवार कसे समाजकारणाला चिकटून होते, याविषयीही अरुण गुजराथी यांची मते वाचनात आली. त्यांच्या मते शरद पवार एक आदर्श नेता आहेच; पण ते समाजकारणी अधिक आहेत. शरद पवार यांचे

सर्वात जास्त लक्ष शेतकऱ्यांकडे आणि श्रमजीवी माणसांकडे आहे. केंद्रीय कृषीमंत्री पदाची धुरा सांभाळली तेव्हापासून शरद पवारांनी त्या खात्याचा सूक्ष्म अभ्यास केला. कृषी खात्याबाबत केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पात केवळ एक ते दीड टक्का तरतूद आहे, हे त्यांनी लक्षात घेतले. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून तरतुदी केल्या नाहीत, तर शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होणे कठीण आहे, हे त्यांनी जाणले. मोटार घ्यायची असेल तर शून्य टक्के व्याजदर, ट्रॅक्टर घ्यायचा असेल तर 13 ते 14 टक्के व्याजदर असतो. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या कर्जावर 12 ते 14 टक्के तर इतरांना मिळणारे कर्ज पाच ते सहा टक्के व्याजदराने मिळते. तेव्हा शेतकऱ्यांना मिळणाऱ्या कर्जाचा व्याजदर पाच ते सहा टक्के असला पाहिजे, अशी भूमिका शरद पवार यांनी घेतली आणि व्याजदर कमी करून दाखवला. त्यानंतर राज्य शासनाने निर्णय घेतला की जे शेतकरी वेळेवर कर्ज परत करतील त्यांना सबसिडी दिली जाईल. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचा व्याजदर चार टक्क्यावर आणण्याबाबतही ते ठाम होते. शेतकऱ्यांच्या संदर्भातील क्रांतिकारी पावले शरद पवारांच्या भूमिकेमुळे उचलली गेली. कृषीमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यापासून त्यांनी कायम शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. पवार हे समाजकारण मानणारे नेते, त्यामुळे 80 टक्के समाजकारण, 20 टक्के राजकारण असा राष्ट्रवादी पक्षाचा संदेश अगदी छोट्यातल्या छोट्या कार्यकर्त्यांपर्यंत गेलेला आहे. निवडणुका जवळ असतील तेव्हा राजकारण करणारच पण पाचही

वर्षे राजकारण केले तर त्याचा फारसा परिणाम चांगला होत नाही, हा महत्त्वाचा संदेश पवारांनी दिला.

धर्माच्या नावावर राजकारण करणे हे शरद पवार आणि त्यांच्या पक्षाच्या विचार तत्त्वप्रणालीत बसत नाही. त्यांनी संपूर्णपणे धर्मनिरपेक्ष पक्ष स्थापन केला. महाराष्ट्रातील छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचे विचार त्यांच्या पक्षाचा मूळ गाभा आहे.

❐❐❐

# शेती, शेतकरी, महानोर आणि पवार

शरद पवारांनी शेती आणि शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याचा आढावा कवी ना.धों. महानोर यांनी विविध लेखांमधून घेतला आहे. 2009 च्या दै. सकाळच्या विशेष पुरवणीत ते म्हणतात, ‘शरद पवारसाहेब व माझे संबंध 35 वर्षांचे. अगदी पहिल्या भेटीतच खूप वर्षांची ओळख असावी अशी मनमोकळी चर्चा आत्मीय भावनेने झाली. त्या भेटीत साहित्यापेक्षा शेती, पाणी, फळबागा हेच अधिक होतं. मी विधानपरिषदेचा आमदार असताना बारा वर्षे व त्या व्यतिरिक्तही आजवरच्या भेटीगाठीत, चर्चेत महाराष्ट्राची शेतीयोजना, त्यात काय काय करता येईल यासाठी त्यांची धडपड व तळमळ पाहिली. शक्य असेल तो सहभाग मी देत राहिलो. हे जिवाभावाचं नातं कौटुंबिक प्रेमानं वाढलं. माझ्या सगळ्याच क्षेत्रातल्या उभारणीत, सुखात, आनंदात त्यापेक्षाही दुःखात त्यांनी खूप काही केलं. वर्षभरात दोन-तीन वेळा

कुठेतरी दोन दिवस एकत्र बसून अनेक प्रश्नांवर, योजनांवर चर्चा करावी, योजना हाती घ्याव्यात, प्रत्यक्ष काम करावं हे ठरवून आम्ही एकत्र येतो. या चार-पाच वर्षांत त्याचं पक्कं ठिकाण आहे - गोविंदबाग, बारामती.

एका दिवाळीची आठवण महानोरांनी सांगितली आहे. 'मी बारामतीला एक वाजेपर्यंत पोचून बोरवडगाव - काटेवाडी या गावातील सुंदर असा पाणलोट पाहून, संपूर्ण गावाची फलोद्यानाची योजना आखून पवारांसमवेत पक्की करावी, असं ठरलं. मी बारामतीला पोचलो; पण त्यांना न भेटता लपून राहिलो. साहेब मग एकटेच अडीच वाजता त्या गावांना कबूल केल्याप्रमाणे गेले. मी गोविंदबागेत थांबलो. दिवाळीला पवारसाहेबांच्या विस्तारित कुटुंबातले, जवळच्या नातेसंबंधांतले, लहान-मोठे गणगोत एकत्र येतात, भेटतात, छान गप्पा गोष्टी करत एकमेकांची सुखदुःख समजून घेत नव्या उभारीने नवं नवं काहीतरी हाती घेतात. त्या पन्नास-साठ गणगोतांचे आणि माझे घनिष्ठ संबंध आहेत. त्यांच्यासमवेत अनेक विषयांवर गप्पा मारताना मला माझं भरपूर भरण-पुनर्भरण करून घ्यायचं होतं. गप्पा, कविता, विनोद, शेती, सामाजिक, राजकीय आणि एकमेकांचं व्यक्तिगत सुखदुःख वाटून घेता आलं. साहेब तर नेहमीच भेटतात; पण हे दुर्मिळ होतं म्हणून मी स्वार्थाने लबाडी केली.

पाच वाजता शरदराव आल्यावर सगळं उघड झालं. ते मनमोकळे हसले. सीताफळांच्या सहा बॉक्सची रिबन सोडून त्यांनी शुभारंभ केला. मला त्याच दिवशी इंदूरच्या मार्केटमध्ये सीताफळ

विक्रीचा उच्चांकी भाव मिळाला. घरातल्या सगळ्यांचीच दिवाळी सीताफळानं साजरी झाली. त्यांनीच शेतकऱ्यांना फळबागेचा हा नवा वारसा महाराष्ट्रासह देशासही दिला. आज तो दिमाखदार पद्धतीने भरलेला दिसतोय.'

महानोरांप्रमाणेच अनेक राजकीय विश्लेषक आणि अभ्यासकांनी पवारांच्या शेतीप्रेमाचे व त्यातील सखोल ज्ञानाचे गोडवे गायले आहेत. पवारांनी निर्णय घेऊन महाराष्ट्रात 100 टक्के अनुदानावर कोरडवाहू फळबागा उभ्या केल्या. सीताफळ, पेरू, डाळिंब यांसोबतच मोसंबी, आंबा, चिकू यांसारख्या थोडे अधिक पाणी लागणाऱ्या फळबागांचे नियोजन तसेच त्यांच्यावरील रोगांचे नियंत्रण कसे करायचे, चांगले, अधिक उत्पादन कसे घ्यायचे, मार्केटिंग व प्रक्रिया उद्योग यासाठी काय करता येईल यावर पवारांचा अभ्यास विलक्षण दांडगा आहे. मुख्यमंत्री असताना त्यांनी किमान आठ महिने म्हणजे साधारणत: जानेवारीपर्यंत पाणी कसे देता येईल, याकरिता 'पाणी अडवा'चं जलसंधारणामध्ये विकसित केलेलं रूपांतर अधिक सक्षम होतं. नवतंत्रज्ञान आणणे, मोठी यंत्रसामग्री वापरून युद्धपातळीवर काम करणे, त्याचे निर्णय तातडीने घेणे हे कार्य पवारच करू शकतात. बारामती व त्यांच्या शेतीच्या परिसरात माती, कंटूर, सीसीटी आणि सिमेंट बांध, लहान तलाव, शेततळ्यांचं भक्कम जाळं निर्माण केलं. त्यामुळे विहिरींचे पाणीसुद्धा वाढले. ठिबक सिंचन, स्प्रिंकलरने पाणी दिले तर क्षेत्रही वाढते, त्यातून दर्जेदार, बाजारात अधिक किंमत मिळणारा सुदृढ माल मिळेल, एकरी उत्पन्नाची वाढ मिळेल हे शेतकऱ्यांना पटवून

दिलं. हे जाळं मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यासाठी व पूर्ण भाग ठिबक सिंचनाखाली आणण्यासाठी अनुदान देऊन या पाणलोट विकासासाठी पैसा कधीच कमी पडणार नाही यासाठी केंद्रात सदोदित प्रयत्न केले. शरद पवार स्वत: सांगत की, केंद्रात मुख्य ठिकाणी असलेल्या मंडळींची, नेत्यांची मानसिकता बदलली आहे. शेतीमधूनच भक्कम काम करावे लागेल आणि अर्थव्यवस्था सुदृढ होण्याचा हाच एक मोठा मार्ग आहे, या विचारापर्यंत सगळेच आलेले आहेत. ज्वारी, बाजरी, मका, तूर, सोयाबीन, कापूस अशा निव्वळ कोरडवाहू पिकांसाठी कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन व्यवस्थेने अधिक काटेकोरपणे लक्ष देणे गरजेचे आहे, एकरी उत्पादनाला अधिक शक्तिमान, कमी पाण्यावरही उत्तम पीक येईल असे सुदृढ वाण हवे आहेत. कृषी विद्यापीठे, कृषी संशोधन संस्था यांना अधिक आर्थिक मदत मिळावयास हवी, याकरिता ते सतत प्रयत्नशील होते.

एखाद्या वर्षी खूप पाऊस पडतो, पिकांची खूप मोडतोड होते, त्यातून शेतीचे प्रश्न उभे ठाकतात. तरी अलीकडे लहान शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊन, उरलेल्या शेतकऱ्यांनाही बऱ्यापैकी कर्जमाफी देऊनसुद्धा समाधान नाही. लाल्या रोग, तेल्या रोग यांमुळेही व्यथित होऊन शेतकरी सरकारकडे अधिक अनुदानाच्या मागण्या घेऊन आशाळभूतपणे पाहतो. विविध योजना मंत्रालय ते महसूल, आयुक्त विभाग, जिल्हाधिकारी व नियोजन मंडळ, तालुका, प्रत्यक्ष गाव असा प्रवास करत शेतीपर्यंत येताना खूप मोठा काळ जातो. ही प्रक्रिया योजनांनाही फारच

मारक आहे. योजना आल्या. मृदसंधारण, शंभर टक्के अनुदान, फळबागांचा हप्ता, आणखी खूप काही वाटप झाले; पण फार थोडे अधिकारी स्वतः लक्ष घालून शेतकऱ्यांसाठी अधिक वेगाने काम करतात. बहुसंख्य अधिकारी शेतकऱ्यांची अडवणूक करण्यात धन्यता मानतात. 31 मार्चपर्यंतसुद्धा योजनांचे पैसे मिळत नाहीत. मग पैसे परत जातात. शरद पवारांना या सर्व प्रश्नाची जाण होती आणि शेतकऱ्यांसाठी आपण काहीतरी केलं पाहिजे, याच भूमिकेतून त्यांनी केंद्रात कृषीमंत्री पद घेतले होते.

'कृषी विकास प्रतिष्ठान' या संस्थेत पाण्यातून पाझर निर्माण करून अत्यंत कमी पाण्यावरची पीक पद्धती, फळबागा, ऊस, केळी, द्राक्ष प्रक्रिया असे सर्व प्रयोग शरद पवारांनी शेतकऱ्यांना सोबत घेऊन करून दाखवले. पूरक व्यवसाय केल्याशिवाय शेती परवडणार नाही, म्हणून संकरित गाई, म्हशी, बकरी, मेंढी, कुक्कुटपालन अशी भक्कम जोड शेतीला दिली. खरेतर पवारांनी स्वत: तलावांचे जाळे निर्माण केले. ते स्वत: शेतात राबले होते. त्यांनी स्वतः शंभर, हजार रुपयांसाठी बाजारात माल विक्री केला होता. त्यांना शेतीतील दुःखाची जाण होती. त्यांच्या चेहऱ्यावर शेतीप्रश्नांविषयी सतत अस्वस्थता असायची. म्हणून मुख्यमंत्री झाल्यावर, कृषीमंत्री झाल्यावर कृषी विद्यापीठांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले. शेतीसोबत दुग्ध व्यवसाय, अधिक उत्पादनाची ऊस, केळी शेती, त्याला जोड व्यवसाय याची पाठराखण करीत तशा योजना आणल्या. त्यांच्या कार्यकाळात राज्य पुष्कळ बळकट झाले.

आजही शेतीविषयक अभ्यास असणारा पवारांशिवाय कोणताही नेता या देशात नाही. शेती, शेतकरी, कष्टकरी आणि आहे तशा निसर्गातून शेतीचे उत्पादन घेत त्याला पूरक व्यवसायाची जोड देण्याचे सखोल ज्ञान हे त्यांचे बलस्थान आहे.

2005 मधील एका लेखात ना.धों. महानोर यांनी डिसेंबर 1980 मधील शेतकरी दिंडीचा उल्लेख केला आहे. शेतीचे प्रश्न इतके अडचणीचे झाले होते की दररोज शेती विक्री आणि मरणप्राय खेडी अशीच चर्चा होत होती. शरद पवार यांनी मोठ्या प्रमाणावर अंगावर आलेली शेती, शेतीपूरक मालाचे, सीड्स, फर्टिलायझरचे गगनाला भिडलेले भाव याविरोधात जळगाव ते नागपूर अशी पायी शेतकरी दिंडी काढली होती. एखाद-दुसरा पक्ष वगळता देशभरातील सर्वच पक्ष त्यात सामील झाले होते. नेत्यांना घेऊन विक्रमी सभा केल्या. त्यांना शेतीचे प्रश्न समजावून दिले. दिंडी अमरावतीच्या पोहराबंदीत आल्यावर पवारांसह गणपतराव देशमुख, राजारामबापू पाटील, एन.डी. पाटील, यशवंतराव चव्हाण, महानोर यांना अटक झाली होती. भंडाऱ्याच्या फुफाट्यात त्यांना जेलबंद केलं होतं. सामान्य शेतकऱ्यांनी प्रत्येक मुक्कामाच्या परिसरात उत्स्फूर्त स्वागत केले. ती शेतीचे, शेतमजुरांच्या प्रश्नांचे, खेड्यातल्या गरिबांचे, जात-पात धर्माचे, पुरोगामी विचारांचे विश्लेषण करणारी नव्हे तर चिकित्सा करणारी अशी दिंडी होती. पवारांच्या राजकीय, सामाजिक अशा आयुष्यात या शेतकरी दिंडीची नोंद ठेवणे अपरिहार्य आहे.

❒❒❒

# विज्ञान व जैवतंत्रज्ञान प्रेमी

शरद पवारांसारखा लोकसंपर्क असलेला, राजकारणाला समाजकारणाची जोड देणारा, महाराष्ट्राची सखोल माहिती असलेला, शेतीची जाण असलेला दुसरा नेता नाही. डॉ. रघुनाथ माशेलकर एका लेखात म्हणतात की, पवारांची ओळख पहिल्यांदा झाली, त्यावेळी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते आणि रघुनाथ माशेलकर हे एका राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक होते. 'एनसीएल'च्या भेटीवर पवारसाहेब आले होते. माशेलकर म्हणतात, 'त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची एक झलक तेव्हा पाहता आली. 1991 मध्ये जागतिक मराठी परिषदेच्या निमित्ताने त्यांचा आणि माझा परिचय झाला. 1995 मध्ये मी दिल्लीला 'वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदे'चा महासंचालक म्हणून गेलो. आमची अधूनमधून भेट होत असे. 1998 मध्ये हैदराबाद जागतिक मराठी परिषद झाली आणि त्याचा मी अध्यक्ष होतो. या परिषदेत आम्ही दोघे दोन दिवस एकत्र होतो. तेव्हापासून आम्ही अधिक जवळ येत गेलो.

भारतीय कृषी संशोधन परिषदेमध्ये (आयसीआर) मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणण्यासाठी पवार यांनी माझ्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. विजय केळकर हेही एक सदस्य होते. 'आयसीआर'चा अभ्यास करून आम्ही आमचा अहवाल सादर केला. 'आयसीआर'मध्ये आमूलाग्र बदल करण्यासाठी, नोकरशाहीचा हस्तक्षेप कमी करण्यासाठी, तरुण शास्त्रज्ञांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, त्यांना पेटंट

मिळवता यावे यासाठी आम्ही काही शिफारशी केल्या होत्या. 'आयसीआर' आणि उद्योग यांच्यात कोणताही समन्वय नाही, त्यात नावीन्यपूर्ण असे काही घडत नाही, हे आम्ही स्पष्टपणे सांगितले. आमच्या अहवालाची दखल पवारांनी घेतली आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी पावले उचलली. निर्णय घेण्यासाठी लागणारा कणखरपणा त्यांनी अगदी सहजपणे दाखविला.

'कोकाकोला'मध्ये कीटकनाशकाचे अंश आढळल्याची चर्चा सुरू झाल्यानंतर सांसदीय समिती नेमली गेली. पवार समितीचे अध्यक्ष होते. त्यानंतर त्यांनी मला एकदा फोन केला आणि विज्ञानाच्या अनुषंगाने मी या विषयाची चर्चा समितीच्या सदस्यांशी करावी अशी विनंती केली. अर्थातच मी तसे केले आणि त्यानंतर त्यांच्या समितीने या विषयावर अतिशय समतोल अशी भूमिका घेतली.' असे माशेलकरांनी नमूद केले आहे.

पवार यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयात कमालीची रुची आहे. नव्या ज्ञानाबद्दल त्यांना कमालीची आस्था आहे. या क्षेत्रात वेगाने होत असलेल्या बदलांचीही त्यांना जाणीव असते. ते या विषयावरील नवी पुस्तके, नवी माहिती आवर्जून वाचतात. त्यांच्याकडे त्यांचा स्वत:चा ग्रंथसंग्रह आहे. पाहुण्यांना बारामतीच्या एका भेटीत ते त्यांचा ग्रंथसंग्रह दाखवितात. प्रत्येक पुस्तकाबद्दल ते काही ना काही सांगतात. त्यांचा हा व्यासंग वाखाणण्याजोगा आहे.

बारामतीच्या भेटीत ते तिथल्या संस्थाही दाखवितात. या संस्थांद्वारा बारामतीचा त्यांनी केलेला कायापालट पाहून थक्क

व्हायला होते. खुद्द पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी याबाबत प्रशंसा केली आहे. दिल्लीतील विज्ञान भवनात झालेल्या एका कार्यक्रमात त्यांनी म्हटले होते की, “पवार यांनी बारामतीत जसा कायापालट केला आहे, तसे देशातील प्रत्येक गाव आणि शहराचे झाल्यास भारत आपोआपच प्रगत होईल.” पंतप्रधानांच्या या विधानात कोणतीही आतिशयोक्ती नाही. पवारांनी हे सारे करून दाखवले आहे, ते त्यांच्या नेतृत्वगुणामुळे, द्रष्टेपणामुळे आणि समाजाच्या व्यापक विकासाच्या कळकळीमुळे.

हवामानबदल या विषयावर त्यांचा अभ्यास आहे. वाढत्या प्रदूषणामुळे हवामानात काय बदल होतील आणि त्याचा शेतीवर काय परिणाम होईल, याबद्दल ते बोलत असतात. या बदलत्या परिस्थितीला कसे सामोरे जाता येईल याचा विचार ते करीत असतात. त्यांच्यातील याच दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रात फलोत्पादनात क्रांती झाली आणि महाराष्ट्रातील फळे निर्यात होऊ लागली.

पवारांमध्ये आणखी एक गुण आहे, तो म्हणजे त्यांची श्रवणक्षमता. समोरच्याचे ते शांतपणे ऐकून घेतात आणि मगच स्वतः बोलायला लागतात. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाचे ते ऐकून घेत असतात. एवढा व्याप असताना त्यांना हे कसे जमते, याचे कोडे अनेकांना उलगडत नाही. अर्थात अशा साऱ्या गुणांमुळेच ते कार्यकर्त्यांमध्ये आणि लोकांमध्ये प्रिय आहेत.

शरद पवार यांची सर्जनशीलता, द्रष्टेपण आणि नेतृत्व यांविषयी रघुनाथ माशेलकरांना नेहमीच कौतुक वाटत आले आहे. त्यांचे प्रागतिक विचार, स्थानिक, राष्ट्रीय व जागतिक

प्रश्नांबद्दलची त्यांची चाणाक्ष समज, इतरांना कल्पनाही येणार नाही अशा रीतीने दूरदृष्टीने संभाव्य बदल आधीच विचार करून ठेवण्याची त्यांची क्षमता अद्भुत आहे. या सर्व बाबींनी पवारांचे व्यक्तिमत्त्व उजळून निघाले आहे, असे 'जैवतंत्रज्ञानावर दृढ विश्वास' या शीर्षकाच्या 2005 मधील दुसऱ्या एका लेखात डॉ. रघुनाथ माशेलकरांनी नमूद केले आहे.

देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान हेच महत्त्वाचे साधन आहे, असे पवारांचे मत आहे. माहिती तंत्रज्ञान उद्याच्या भारताला योग्य आकार देणार ही त्यांची श्रद्धा केवळ भाषणांमधूनच नव्हे तर कृतीतूनही व्यक्त होते. बारामतीत त्यांनी माहिती तंत्रज्ञान विद्यालय सुरू केले, ते जागतिक दर्जाचे आहे. आधुनिक जैवतंत्रज्ञान शेतीसह सर्वच क्षेत्रात कायापालट घडवून आणू शकेल, याबाबत त्यांचा दृढ विश्वास सातत्याने त्यांच्या कृतीतून जाणवत असतो. त्यामुळेच माहिती तंत्रज्ञान व जैवतंत्रज्ञान या क्षेत्रातील अनेक वैज्ञानिकांना प्रेरणा मिळते, उत्साह मिळतो, असे रघुनाथ माशेलकर यांनी म्हटले आहे.

❑❑❑

# भवरलाल जैन यांच्या नजरेतून

जैन इरिगेशन सिस्टीमचे भवरलाल जैन यांनी शरद पवारांसोबतच्या आयुष्यातील काही आठवणी सांगितल्या. ते म्हणतात, सामाजिक जीवनात वावरत असताना ज्यांच्यावर

उलटसुलट आरोप झालेले नाहीत, असा पुढारी विरळाच. शरदरावांच्या बाबतीतही तत्सम आरोपांची झड अधूनमधून लागत असते. साहेबांच्या तोंडून त्याचा खुलासा व्हावा म्हणून भवरलाल जैन यांनी पवारसाहेबांना एकदा विचारले, “साहेब, लोक म्हणतात, नाही म्हणायला आपण प्रचंड गंगाजळीचे मालक आहात. काही महाभाग तर आकडेवारी शेकडो कोटी रुपयांच्या घरात टाकतात. खरं काय ते सांगा.” जळगाव-औरंगाबाद कारच्या प्रवासात रात्री दहा वाजण्याच्या सुमाराला संभाषणाची सुरुवात होते. “भवरलालजी, अजूनही नित्यनेमाने दरमहा वीस हजार रुपये माझे बंधूवर्ग घरखर्चासाठी पाठवीत असतात. माझी आई म्हणजे शारदाबाई शेतकरी कामकरी पक्षाची कार्यकर्ती म्हणून सार्वजनिक जीवनात वावरली. सात भावंडांपैकी एकाला सामाजिक कामासाठी वाहण्याचे आईने ठरवले तेव्हा त्याच्या संसार खटल्याची जबाबदारी इतर सहा भावंडांनी सांभाळली पाहिजे, अशी आज्ञा दिली. सुरुवातीपासून आजही तीच परंपरा प्रचलित आहे. राहता राहिलं आकड्यांचं. माझ्या मित्र परिवारामध्ये उद्योगपती, सधन शेतकरी, व्यापारी यांचाही समावेश आहे. मला कधीच अवाढव्य रकमेची गरज भासली नाही; परंतु भासली तेव्हा आणि त्या प्रमाणात माझी मित्रमंडळी ती पूर्ण करीत आली आहेत. या वस्तुस्थितीमुळे राजकीय जीवनात असले गैरसमज होणे, पसरवणे, राईचा पर्वत करणे यांसारखे प्रकार नित्यनेमाने चालू असतात.” असे हसून शरदराव पवार बोलले होते.

बारामतीस स्व. अप्पासाहेब पवार यांच्या नावाने कृषी विद्यालयाच्या शुभारंभाचा कार्यक्रम हजारो लोकांच्या साक्षीने पार पडल्यानंतर भवरलाल जैन आणि शरद पवार जेवणासाठी निघणार होते. तिथेही त्यातल्या त्यात वेळात वेळ काढून पवारांनी त्यांना व ना.धों. महानोर यांना शेतावर नेले. शेतात आल्यानंतर विहिरीच्या कठड्यावर बांधलेल्या उंच बुरुजावरून त्यांनी त्यांना तिथल्या शेतीची पूर्ण माहिती दिली, जणू ते तिथे रोज राबत असतात. “भवरलालजी, तुमच्या ‘टिश्यू कल्चर’ केळीची ही माझी बाग. मला उत्पन्न सरासरी केवळ 20 किलोच मिळालं. अर्थात दोष टिश्यू कल्चरचा नाही. आमच्या जमिनीचा पी.एच. 8.6 वर आहे. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी मी आता प्रयत्नशील आहे. पुढच्या वर्षी द्राक्षांप्रमाणेच जैविक तंत्रज्ञानाच्या (बायोटेक्नॉलॉजी) केळीचं विक्रमी उत्पादन घ्यायचं आहे.” पवारांचे हे बोलणे ऐकून भवरलाल थक्क झाले. राष्ट्रीय पातळीवर कार्यमग्न असतानाही कृषी-औद्योगिक क्रांतीचा पुरस्कार करणाऱ्या हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या अभ्यासू राजकारण्यांमध्ये पवार प्रथम क्रमांकावर आहेत, असे विनम्रतेने भवरलाल जैन यांनी कबूल केले आहे.

❑❑❑

# फलोत्पादन क्रांतीचे नेतृत्व

शरदराव पवार यांना शेती, फळबाग, दूध, जैवतंत्रज्ञान यांविषयी आवड आहे. त्यांनी ही साधने सामान्यांपर्यंत पोचविण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला आहे. त्यांचा विकास

साधण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिक बाजारपेठेत भारताला टिकायचे असेल, तर अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून कमी खर्चात अधिक उत्पादन कसे घेता येईल, याची दिशादर्शक माहिती शेतकऱ्यांना करून देणारा हा एकमेव द्रष्टा नेता आहे. भारत हा एकमेव असा देश आहे की, जगाची बाजारपेठ काबीज करू शकतो; कारण या देशात हवा, पाणी, सूर्यप्रकाश मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळेच तो कृषी उत्पादनात अग्रेसर होऊ शकतो. आधुनिकतेची कास आणि ती देण्याचे काम पवार यांनी महाराष्ट्रात वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटच्या माध्यमातून व दिल्लीत 'सिटा'ची स्थापना करून सुरू केले आहे.

हरितक्रांतीचे जनक डॉ. स्वामिनाथन यांच्या सहकार्याने व कृषी शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाने महात्मा फुले कृषी विद्यापीठात अभ्यास व प्रयोग करून गव्हाच्या उत्पादनात क्रांती झाली. मुख्यमंत्री असताना पवारांनी कृषी, पणन, फळे, भाजीपाला, इतर प्रक्रिया संस्था सहकारी तत्त्वावर स्थापन करण्याबाबतचा अहवाल सादर करण्याचा आदेश शंकरराव कोल्हे यांना दिला होता. त्यांनी 1991 मध्ये अहवाल सादर केला होता. तो कोल्हे समितीचा फलोत्पादन अहवाल म्हणून ओळखला जातो. तो जसाच्या तसा स्वीकारून महाराष्ट्रात फलोत्पादन क्रांती शरद पवारांनी घडवून आणली. रोजगार हमी योजना आणि फलोत्पादन यांची सांगड घालून हा कार्यक्रम महाराष्ट्रात यशस्वीरीत्या राबविण्यात आला. 'द टाटा एनर्जी अँड रिसर्च इन्स्टिट्युट नॅशनल अॅकेडमी ऑफ सायन्स' यांच्या साह्याने वॉशिंग्टन येथे पार पडलेल्या परिषदेत

'दारिद्र्यनिर्मूलन व टिकाऊ विकासासाठीचे नवे तंत्रज्ञान' या विषयावर शरद पवार यांनी जे भाषण केले, ते अत्यंत प्रभावी ठरले. भांडवल, मनुष्यबळ आणि जमीन यांच्या जोरावर उत्पादकता आणि संपन्नता यांची व्याख्या दिवसेंदिवस बदलत चालली आहे. ज्ञान हा संपत्तीचा मूलस्रोत आहे. माहिती आणि संदेश दळणवळण क्रांतीने उत्पादन आणि व्यापार यांच्या पद्धतीत मोठे बदल घडत आहेत. आपण नेमका कोणत्या दिशेने प्रवास करायचा याचा शेतकऱ्यांनी आतापासूनच विचार करायला पाहिजे. दोहा व्यापार परिषदेत भारताने जी भूमिका घेतली, त्यामागे शरद पवार यांचा मोठा वाटा आहे. वाणिज्य मंत्री मुरासोली मारन यांनी या परिषदेला जाण्यापूर्वी पवारांकडून या विषयावरील त्यांचे विचार समजून घेतले होते, असे शंकरराव कोल्हे यांनी नमूद केले आहे.

❒❒❒

# फळशेतीतील क्रांती

शरद पवारांची आणि डॉ. एम.एस. स्वामिनाथन यांची भेट झाली तेव्हा महाराष्ट्राचे कृषी मंत्री म्हणून त्यांनी नुकतीच सूत्रे हाती घेतली होती. महाराष्ट्रातील शेती व्यवसायाच्या प्रगतीचा वेग वाढविण्याच्या दृष्टीने त्यांनी सुरुवातीलाच पुढाकार घेतला. कृषी विद्यापीठामधील सर्व वैज्ञानिकांची बैठक पुण्यात घेतली होती आणि या बैठकीतील चर्चेच्या आधारे त्यांनी गहू आणि ज्वारीच्या 'किमान उत्पन्नाची हमी' या योजनेचा प्रारंभ केला. आपल्या शेतातील उत्पादनाबद्दल शेतकऱ्यांना अधिक जागरूक

करण्याचा हा पहिलाच धोरणात्मक पुढाकार होता. उत्पादकता आणि शेती उत्पादनाचा दर्जा उत्तम राखण्याची जाणीव शेतकऱ्यांच्या व कृषी व्यवस्थापन करणाऱ्यांच्या मनात निर्माण करण्याच्या दृष्टीने आपल्या काळाच्या ते बरेच पुढे होते. आता आपणा सर्वांना कळून चुकले आहे की जागतिक स्पर्धेत टिकून राहायचे तर कृषी उत्पादनांचा दर्जा उत्तम असणे महत्त्वाचे आहे.

आपल्या देशातील फुलशेतीतील (उद्यान विज्ञानातील) क्रांतीच्या शिल्पकारांमध्ये शरद पवार हे प्रमुख आहेत. फलशेतीचे यश तंत्रज्ञानावर व संरचनेवर फळे तयार झाल्यानंतरच्या काळात विशेष अवलंबून असते, हे त्यांनी ओळखले होते. रोगमुक्त बियाण्यांचा पुरवठा आणि ठिबक सिंचनासारखे तंत्र शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रथम पावले उचलली. या तंत्रज्ञानामुळे उत्पादनात वाढ होते. द्राक्षे, डाळिंब, स्ट्रॉबेरी, अंजीराच्या उत्पादनात आपले राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे. हापूस आंबा तरंगरूपाच्या व चवीच्या दृष्टीने अव्वल आहे आणि महाराष्ट्र त्याचे माहेरघर आहे.

आपल्या कारकिर्दीत पवारांनी तंत्रज्ञानावर विशेष भर दिला होता. त्यामुळेच उत्तम द्राक्षे आणि इतर पिकांसाठी त्यांनी संशोधन व शिक्षण संस्था स्थापन केल्या. परंपरागत शेती व दुग्ध व्यवसायात नवीन तंत्रज्ञान आणण्यात ते अग्रेसर होते. भारतीय कृषीशास्त्राच्या इतिहासात संस्थांचे निर्माते म्हणून पवारांचे नाव चिरकाल घेतले जाईल. माहिती तंत्रज्ञान व जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधन आणि शिक्षण संस्थांच्या स्थापनेसाठी त्यांनी अथक

प्रयत्न केले. त्यांनी ज्या संस्था विकसित केल्या, त्यात वैज्ञानिक विद्वत्ता व सामाजिक परिस्थिती यांची सांगड घालण्यात आलीच पाहिजे, असा त्यांचा आग्रह असायचा. थोडक्यात आपल्या घराची खिडक्या-दारे उघडी ठेवा. त्यात सर्व दिशांनी हवा खेळू द्या. मात्र त्यामुळे उडून जाऊ नये म्हणून जमिनीवर पाय घट्ट रोवून उभे राहा, असा जो संदेश गांधीजींनी दिला होता त्याचे श्री. पवार हे मूर्तिमंत प्रतीक आहेत, असे स्वामिनाथन यांनी म्हटले आहे. श्री. पवार हे दृष्टे आहेत. अनेक स्वप्न त्यांनी उराशी बाळगली आहेत. त्यांचे खास वैशिष्ट्य असे की स्वप्ने साकार करण्याचे त्यांचे प्रयत्न सतत चालू असतात. आपल्यापुढील प्रश्न सोडविण्यासाठी पद्धतशीर व सर्वंकष दृष्टी असल्याने ते यशस्वी झाले आहेत. अभिनव कल्पना प्रत्यक्षात उतरवता आल्या तरच त्या योग्य ठरतील, असे ते मानतात.

❑❑❑

## शेतकऱ्यांबद्दलची आत्मीयता

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना, जुन्नर येथे गळीत हंगामाच्या शुभारंभाच्या निमित्ताने श्री. शरदचंद्रजी पवार हे उपस्थित होते. त्यावेळेस तिसरा हप्ता 50 रुपयांनी काढणार असल्याचे चेअरमनने सांगितल्यावर शेतकऱ्यांनी त्याला विरोध केला व हा निर्णय पवारसाहेबांवर सोपवावा, अशी विनंती केली. पवारसाहेबांनी व्यासपीठावर वल्लभशेठ बेनके, दिलीपराव वळसे पाटील, सहकार

महर्षी शिवाजीराव काळे यांच्याबरोबर सविस्तर चर्चा करून व्यासपीठावरच कॅलक्युलेशन करून तिसरा हप्ता शंभर रुपयांनी वाढवून मंजूर केला, असा पवारांची शेतकऱ्यांबद्दल असलेली आत्मीयता आर्वी, जुन्नरचे दत्ता रोकडे यांनी कथन केली.

❏❏❏

# क्रीडाप्रेमी, क्रीडा संघटक व कुशल क्रीडा प्रशासक

## क्रीडा नगरीचे शिल्पकार

शरद पवार हे क्रीडाप्रेमी, क्रीडा संघटक, कबड्डी, खो-खो अशा खेळांचे चाहते, कुस्तीचे प्रेमी म्हणून अनेकांना ज्ञात आहेत. बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजमध्ये शारीरिक शिक्षणाचे सर्वांचे लाडके प्राध्यापक आर.डी. खानीवाले यांच्या सान्निध्यात हे धडे पवारांनी गिरवले आहेत. लीडर म्हणून पांढरी हाफ पँट आणि बीएमसीसीचा लोगो छातीवर झळकवत बाह्यांचा गंजीफ्रॉक व पांढरे पी.टी. शूज घालून मुलांना पी.टी.चे धडे देणारे शरद पवार त्यांच्या महाविद्यालयीन मित्रांनी पाहिले आहेत. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री म्हणून पुण्याच्या जवळ 270 एकर जमिनीवर मुळेकाठी एकाच संकुलात 30 खेळांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडानगरी स्थापनेचे स्वप्न पवार यांनी पहिले, जोपासले आणि साकारले.

1988 मध्ये पुण्याचे जिल्हाधिकारी म्हणून श्रीनिवास पाटील यांची नेमणूक महाराष्ट्र शासनाने केली होती. एप्रिल 1992 मध्ये त्यांची जिल्हाधिकारी कारकीर्द संपली आणि पिंपरी-चिंचवडचे आयुक्त म्हणून नियुक्ती झाली. पुण्याच्या बालेवाडीतील क्रीडानगरीच्या निर्मितीच्या आणि तिसऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या निमित्ताने त्यांचा शरद पवारांशी जो संबंध आला त्यावर त्यांनी भाष्य केले आहे. पुण्याच्या आसपास साधारणत: तीनशे एकर शासकीय जमीन क्रीडानगरी स्थापन करण्यासाठी शोधावी, असा आग्रह नव्हे तर आदेश शरद पवारांनी त्यांना दिला होता. तहसीलदार हवेली, मुळशी, खेड, शिरूर व संबंधित प्रांतांना बोलवून पुण्याच्या आसपासची जमीन शोधायची होती. हवेलीतील बालेवाडीतील 26 एकर आणि मुळशीतील म्हाळुंग्याची 225 एकर गायरान जमीन आणि लगतची 19 एकर खाजगी जमीन मिळवून 270 एकराचे क्रीडा संकुल उभारावे, असा प्रस्ताव शरद पवारांना श्रीनिवास पाटील यांनी नकाशासह लेखी दिला. त्यांनी तो पाहिला आणि एक दिवस एका खाजगी फोरव्हील ड्राईव्ह जीपमधून शरद पवार व श्रीनिवास पाटील हे दोघेच जमीन पाहण्यासाठी गेले. सरकारी यंत्रणा जमिनीची पाहणी करतात, तिथे आसपास जमिनीचे भाव वाढतात, म्हणून ही काळजी त्यांनी घेतली होती. म्हाळुंग्याच्या शेतकऱ्यांनी हो-ना करता 225 एकर गायरान जमीन या कामाला देण्याची तयारी दर्शवली आणि त्यापाठोपाठ बालेवाडीतीन जमीनसुद्धा मिळाली. त्यानंतर 19 एकर खाजगी जमीन भूसंपादन करून क्रीडानगरीसाठी मिळविण्यात आली.

देशाच्या प्रमुख वर्तमानपत्रात जाहिरात देऊन क्रीडानगरी उभारण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञ निवडण्याचे जिकिरीचे काम शरद पवारांनी केले आणि शशी प्रभू यांच्या प्रतिभेला नवे आव्हान लाभले. ठेकेदारांना बोलविण्यात आले. बाबुराव शिर्के यांनी हे काम करण्याचा विडा उचलला आणि जिद्दीने विक्रमी वेळात बांधकाम पूर्ण केले. शरद पवारांचा पन्नासावा वाढदिवस. एक्कावनाव्या वर्षात पदार्पणाचा 12-12-1990 हा दिवस. क्रीडा नगरीचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते झाले आणि त्यानंतरचा सोहळा पुण्यात नेहरू स्टेडियमवर साजरा झाला. सर्व शक्ती पणाला लावून ॲथलेटिक्ससाठी भव्य अत्याधुनिक स्टेडियम, रात्रीसुद्धा त्यात खेळ व्हावेत म्हणून 59 दिवसांत फिलिप्स कंपनीने उभारलेले चार भव्य टॉवर्स, त्याचे श्रीमती लता मंगेशकर यांच्या हस्ते झालेले उद्‌घाटन या सर्व कल्पना शरद पवारांच्याच. परदेशातून मागवलेला सिंथेटिक ट्रॅक, प्रेक्षकांना बसण्यासाठी भव्य गॅलरी, पत्रकारांसाठी खास व्यवस्था, क्रीडा ज्योतीवर पंडित नेहरूंच्या सहीची उठून दिसणारी आद्‌याक्षरे, बैठकांसाठी प्रशस्त दालने, कॅफेटरिया, एकाच वेळी प्रवेशद्‌वारे उघडून प्रेक्षकांची गर्दी वेगवेगळ्या मार्गाने बाहेर पडून मुख्य रस्त्यावर काही क्षणातच ओसरली जावी याची व्यवस्था, या सर्व सूचना पवारांनी केल्या आणि अमलात आणल्या. इनडोअर गेम्स, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, टेबल टेनिससाठी भव्य इनडोअर स्टेडियम, गादीवरील कुस्त्यांसाठी वेगळा आखाडा, जिम्नॅस्टिकसाठी हॉल, टेनिससाठी विंम्बल्डनच्या धर्तीवर कोर्ट्‌स, पोहण्यासाठी ऑलिम्पिक दर्जाचा

तरण तलाव, कबड्डी, खो-खोसाठी वेगवेगळी मैदाने, प्रेक्षकांसाठी गॅलरीज, सायकलिंगसाठी वेलोड्रम अशा अनेक प्रकारच्या क्रीडाप्रकारांसाठी वेगवेगळे स्टेडियम एकाच संकुलात उभारण्याचे आणि तेही अकरा महिन्यांच्या वेळेत पूर्ण करण्याचे कष्टप्रद व अनोखे कार्य शरदरावांनी केले. जवळजवळ दर आठवड्याला एक बैठक पुण्यात किंवा मुंबईत, उभारणीच्या कामासाठी दर पंधरवड्याला क्रीडानगरीत कार्यस्थळावर सर्वांची बैठक, कामाचा उरक होताना उरलेल्या बांधकामाचा पाठपुरावा करण्याचे त्यांचे कसब, वेळेत काम पूर्ण करण्याची त्यांची हातोटी आणि कार्यावर असलेली निष्ठा हे त्यांचे गुण सर्वांना जवळून पाहायला मिळाले.

ऑक्टोबर 1993 मध्ये तिसरी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा होणार होती; परंतु 30 सप्टेंबर रोजी किल्लारीमध्ये झालेल्या भूकंपामुळे ती स्पर्धा पुढे 10 ते 25 जानेवारी 1994 या काळात झाली. खेळासाठी परदेशातून आणावयाची साधने, यंत्रणा, कॅमेरे इत्यादी तांत्रिक बाबींपासून क्रीडाकाळात येणाऱ्या खेळाडूंच्या राहण्याची, जेवण्याची व्यवस्था होईपर्यंतची सर्व काटेकोर आखणी शरद पवारांच्या अनुभवी मार्गदर्शनातून झालेली होती. हॉकीच्या स्पर्धा पिंपरी-चिंचवडच्या अॅस्ट्रोटर्फ व धनुष्यबाण स्पर्धा अण्णासाहेब मगर स्टेडियमवर घेण्यात आल्या. बाकी सर्व संकुलात पार पडले. भारतीय, परदेशी खेळांच्या स्पर्धा या देशात एकाच छताखाली पुणे सोडून आजपर्यंत कुठेही झालेल्या नव्हत्या.

31 वी राष्ट्रीय खेळांची स्पर्धा पंजाबमध्ये लुधियाना, पतियाळा, आनंदपूरसाहेब, चंदिगढ, जालंदर अशा पाच ठिकाणी

झाली; पण त्याआधी 17 वर्षांपूर्वी या स्पर्धा पुण्यात एकाच ठिकाणी यशस्वीपणे पार पडल्या. नियोजनाचे सर्व श्रेय शरद पवारांना जाते. राहण्याच्या वेगळ्या व्यवस्थेसाठी व्हिलेज खेळग्राम वेगळे केले पाहिजे ही कल्पना शरद पवारांची.

1992 मध्ये पिंपरी-चिंचवडचे आयुक्त म्हणून श्रीनिवास पाटील यांची नियुक्ती झाली आणि त्यांच्यावर शरद पवारांनी खेळाडूंना राहण्यासाठी क्रीडा ग्राम उभारण्याची जबाबदारी दिली. प्रिफेक पद्धतीने तयार केलेली 1250 घरे त्यांनी आठ महिन्यात शिर्के यांच्या मदतीने उभी केली. उत्तरेकडील राज्यांतील खेळाडूंची व्यवस्था क्रीडानगरीजवळ थेरगाव काळेवाडीत सिंधूनगरात, दक्षिणेकडील राज्यांतील खेळाडूंची व्यवस्था निगडीमध्ये कृष्णानगरात केली होती. खेळाडूंसाठी नाश्ता, दुपारचे जेवण, संध्याकाळचा चहा, न्याहारी, रात्रीचे जेवण कोणत्या प्रकारचे असावे, या सगळ्या सूचना त्या वेळेस शरद पवारांनी स्वतः दिलेल्या होत्या. पुणे शहराचा व पिंपरी-चिंचवडचा चेहरामोहरा, विमानतळापासून, रेल्वे स्टेशनपासून क्रीडानगरीकडे जाण्याचे रस्ते सुशोभित करण्याची सूचना, फलक कोणत्या रंगात कसे उभारावेत यासुद्धा सूचना पवार यांनी दिल्या होत्या.

या नगरीचे बारसेही पवारांनी केले. सारसबागेजवळच्या एका तात्पुरत्या कार्यालयातील एक सकाळ होती. शरद पवार तयारीवर शेवटचा हात फिरवणार म्हणून सर्वजण हजर होते. या काळात खेळाडूंना क्रीडाग्रामातून क्रीडा मैदानावर घेऊन जाणाऱ्या बसेसपैकी एक बस एस.टी. अधिकाऱ्यांनी सजवलेली होती.

शरदरावांनी ती पाहून नारळ फोडून आशीर्वाद द्यावा म्हणून एस.टी.तील अधिकारी उत्सुक होते. पवारसाहेबांनी त्यांच्या मनातील नामकरणाला ओठांवर आणले. नाव दिले गेले श्री शिवछत्रपती क्रीडानगरी. त्याचे उद्घाटन त्यावेळेचे राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते आणि समारोप तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांच्या उपस्थितीत झाला होता.

असे हे क्रीडा नगरीचे शिल्पकार, क्रीडाप्रेमी आणि नियोजनाचे चालतेबोलते संगणक म्हणजे शरद पवार होत. त्यांनी या आठवणी सांगणाऱ्या श्रीनिवास पाटील या सनदी अधिकाऱ्याला पुढे सक्रिय राजकारणात आणून खासदारही केले. त्यांनी ठरविलेल्या उमेदवाराला निवडून आणण्याचे कसब त्यांच्यात इतके ठासून भरले आहे की 2019 मध्येही त्यांनी उदयनराजे भोसले यांना पाडून पुन्हा श्रीनिवास पाटील यांना या वयात साताऱ्यातून निवडून आणले.

❒❒❒

# कुशल क्रिकेट प्रशासक

शरद पवार यांचे राजकीय आणि सामाजिक कर्तृत्व सर्वश्रुत आहे. अभ्यासू वृत्ती हा त्यांचा मोठा गुण आहे. कबड्डी, खो-खो या मराठमोळ्या खेळांची प्रगती त्यांच्यामुळेच झाली. मुंबई क्रिकेट संघटनेत त्यांच्याबरोबर काम करताना दिलीप वेंगसरकर यांना त्यांची कुशलता जवळून पाहता आली, असे त्यांनी एका लेखात म्हटले होते. मुंबई क्रिकेट अध्यक्षपदापासून शरद पवार

क्रिकेटच्या प्रशासनाशी निगडित झाले आणि बघता बघता क्रिकेटने प्रगती केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरवारे क्लब हाऊसशी असलेला वाद आणि पांढरा हत्ती ठरलेल्या मेगाव्हिजन या दोन अडचणींशी सामना करताना मुंबई क्रिकेट संघटनेच्या व क्रिकेटपटूंच्या नाकीनऊ आले होते; परंतु शरद पवार मुंबई क्रिकेटचे अध्यक्ष झाले आणि गरवारे क्लबशी असलेला वाद संपुष्टात आला. मेगाव्हिजनचा प्रश्नही निकालात निघाला. मैदानाबाहेरचे वाद मिटल्याने क्रिकेटपटू मैदानावर अधिक लक्ष देऊ शकले. पवारांच्या काळात वानखेडे स्टेडियम नव्याने तयार झाले. ते रूप थक्क करणारे आहे. स्टेडियम पूर्णपणे पाडून नव्याने तयार करायचे, तर बऱ्याच प्रशासकीय अडचणी असतात; परंतु पवारसाहेबांनी अडचण येऊ दिली नाही. 2011 च्या विश्वकरंडक स्पर्धेत वानखेडे स्टेडियम नव्या रूपात सुसज्ज होते.

मुंबई ही भारतीय क्रिकेटची पंढरी समजली जाते; पण भारतीय क्रिकेटच्या पालक संघटनेला स्वतःची वास्तू नव्हती. वानखेडे स्टेडियमच्या परिसरात 'क्रिकेट इंडिया'ची आलिशान आणि सुसज्ज वास्तू उभी झाली आहे. त्यामध्ये पवारांची मेहनत आहे. वसई-विरार, अंबरनाथ, बदलापूर आणि पनवेलपर्यंत मुंबई क्रिकेटची व्याप्ती आहे. दूरदूरपर्यंत पसरलेल्या मुंबईतून प्रवास करून वानखेडे स्टेडियम परिसरात येऊन सराव करणे आणि सामने खेळणे म्हणजे छोट्या छोट्या खेळाडूंसाठी दिव्यच असते. शरद पवार अध्यक्ष झाल्यापासून सुविधांची व्याप्तीही वाढली आहे. वांद्रे-कुर्ला संकुलासारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प त्यांनी राबवला.

कांदिवली, मुलुंडसारख्या भागात छोट्या छोट्या अकादमी तयार केल्या. मुलांचा प्रवासाचा ताण कमी करणे हा त्यामागे हेतू आहे. पवारसाहेबांच्या नेतृत्वाखाली मुंबई क्रिकेट संघटनेत सर्व पदाधिकाऱ्यांनी ग्रासरूटला जाऊन कामे केली. वांद्रे-कुर्ला संकुलासारखी क्रिकेट अकादमी या देशात कुठेही नाही. ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिकेत अशा प्रकारच्या अकादमी आहेत. इनडोअर अकादमीत तुम्हाला हव्या तशा खेळपट्ट्या, हवे तसे वातावरण निर्माण करता येते; परंतु वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण, भीष्मराज बाम यांच्यासारख्या मानसोपचार तज्ञांची मार्गदर्शक व्याख्याने, व्यक्तिमत्त्व विकासाची शिबिरे असे अनेक उपक्रम पवारांच्या काळापासून घेतले जाऊ लागले. आज भारतीय क्रिकेटला जे ऐश्वर्य मिळाले आहे त्याची सुरुवात शरद पवार यांनीच केली होती. प्रथम श्रेणी म्हणजेच रणजी स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या खेळाडूंनाही समाधानकारक पैसा आज मिळू लागला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे की शरद पवार जुन्या खेळाडूंना विसरले नाहीत. निवृत्त खेळाडूंना निवृत्तीवेतनाची योजना त्यांनी सुरू केली आणि त्यात मोठी वाढ केली. आत्ताच्या खेळाडूंना चांगल्या प्रमाणात पैसा मिळत असला तरी पूर्वी तशी परिस्थिती नव्हती. आजही काही माजी खेळाडूंची आर्थिक परिस्थिती चांगली नाही; परंतु निवृत्तीवेतनाने त्यांना मोठा आधार मिळाला आहे. जे खेळाडू दिवंगत झाले आहेत, त्यांच्या विधवांनाही निवृत्ती वेतनाचे मानधन दिले जाते. माजी खेळाडूंबाबतही पवारसाहेबांना किती आस्था आहे, हे त्यातून दिसून येते.

मुंबई क्रिकेट संघटना, भारतीय क्रिकेट संघटना आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेचे (आयसीसी) प्रमुखपद अशी एक एक पावले उचलत पवारसाहेबांनी क्रिकेट क्षेत्रात आपला प्रशासकीय ठसा उमटवला आहे. एक मराठी माणूस संपूर्ण क्रिकेट विश्वाचा एक उत्तम प्रशासकीय नेता झाला, याचा सर्वांना अभिमान आहे.

❑❑❑

# आय.पी.एल.चे जनक

टी-20 स्पर्धा भारतात होऊ शकते, असं बी.सी.सी.आय.चे अध्यक्ष असताना शरद पवारांना वाटलं. त्यासाठी त्यांनी ललित मोदींना प्रोत्साहन दिलं. 'भारतामध्ये आय.पी.एल. स्पर्धा सुरू झाल्या, याचं श्रेय खरं शरद पवार यांनाच द्यावं लागेल', असं रवी शास्त्री यांनी 'दिलीप सरदेसाई स्मृती व्याख्याना'त म्हटलं होतं. 'आय.पी.एल. सुरू करण्यासाठी ललित मोदींनी प्रयत्न केले; पण त्याला शरद पवारांचं पाठबळ मिळालं नसतं, तर हे केवळ अशक्य होतं', असं शास्त्री म्हणाले. शरद पवार हे 2005 ते 2008 या काळात बी.सी.सी.आय.चे अध्यक्ष होते. आय.पी.एल.संदर्भात होणाऱ्या प्रत्येक बैठकीला शरद पवार आपल्या हातात फायलींचा गठ्ठा घेऊन येत असत. त्यातील प्रत्येक पान त्यांनी वाचलेलं असे.

❑❑❑

# जनसामान्यांसाठी झटणारा लोकनेता

## जनसामान्यांशी अतूट बांधिलकी

शरद पवारांचे माजी स्वीय सहायक टी.एन. धुवाळी 1950 साली कोकणातून मुंबईत आले. त्यावेळी ते चौथीत होते. तीन भाऊ, एक बहीण असा त्यांचा परिवार होता. त्यांचे वडील मिलमध्ये कामाला होते आणि त्यांचे पुढचे सगळे शिक्षण मुंबईत झाले. 1960 साली मंत्रालयातील बांधकाम खात्यात धुवाळी यांना नोकरी मिळाली. 1972 मध्ये माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात श्री. शरद पवार यांचा राज्यमंत्री म्हणून समावेश झाला होता. त्यावेळी मंत्रिमंडळातील वसंतदादा पाटील यांच्या कार्यालयात सार्वजनिक बांधकाम खात्यातील विजय सिंग चव्हाण काम करीत होते. माननीय पवारसाहेबांचा राज्य मंत्री म्हणून शपथविधी झाला आणि त्याच दिवशी विजय चव्हाण यांनी आपले मेव्हणे श्री. शिंदे यांना धुवाळी यांच्या घरी पाठवून बोलावून घेतले. मंत्रिमंडळातील वसंतदादा पाटील आणि शरद पवार या दोन नेत्यांच्या कार्यालयात काम करण्याची संधी असल्याचे विजय सिंग यांनी त्यांना सांगितले. पवारसाहेबांकडे काम करायची इच्छा असल्याचे सांगताच त्यांची भेट साहेबांशी घालून देण्यात आली. तेव्हापासून धुवाळी हे शरद पवारांसोबत काम करीत होते. 1978 झाली शरद पवार मुख्यमंत्री झाले आणि धुवाळींना निवासी स्वीय सहायक म्हणून साहेबांनी घेतले. स्वीय सहायक झाल्यावर मात्र पवारांशी त्यांचा अधिक संबंध येत गेला.

पहिल्या दिवशी काम करीत असताना पवारसाहेबांनी त्यांना काही महत्त्वाच्या व्यक्तींना दूरध्वनी करण्यास सांगितले होते. बहुतेक फोन त्यांनी व्यवस्थित लावले होते. त्यानंतर माजी मंत्री भानुशंकर याज्ञिक यांना फोन लावण्यास साहेबांनी सांगितले, तेव्हा त्यांचा फोन नंबर धुवाळींजवळ नव्हता. साहेबांनी दोन-तीन वेळा विचारले, 'काय झाले?' 'फोन एंगेज आहे', असे धुवाळी सांगत होते. साहेबांनी धुवाळींना त्यांच्या चेंबरमध्ये बोलावले आणि विचारले, 'त्यांचा कोणता फोन लावत आहात?' तेव्हा धुवाळींचा चेहरा पडला. तेव्हा साहेब म्हणाले की, 'फोन नंबर माहीत नसेल तर तसे सांगत जा, पण खोटे बोलत जाऊ नका.' त्या वेळेपासून धुवाळींनी कोणतीही गोष्ट लपवली नाही.

यशवंतराव चव्हाणसाहेबांना फोन लावायला सांगितला की ते म्हणत असत, 'अगोदर मला फोन देत जा.' पवारसाहेब एस काँग्रेसमध्ये असल्यापासून त्यांच्याबरोबर धुवाळी संपूर्ण भारतभर फिरले. 'साहेब आपल्या कर्मचाऱ्यांची अत्यंत काळजी घेत. जिथे त्यांची राहायची व्यवस्था असेल तिथेच कर्मचाऱ्यांचीही व्यवस्था करायला सांगत. नेते म्हणून साहेब फार मोठे आहेत आणि तसे माणूस म्हणूनही आहेत', असे आपले मत धुवाळी यांनी मांडले आहे. अनेकांना साहेबांची भेट हवी असायची. खेड्यापाड्यातून आलेला माणूस साहेबांची भेट झाल्याशिवाय जात नसे. अशा वेळी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी बोलल्याशिवाय ते बाहेर पडत नसत.

साहेबांच्या कन्या सुप्रिया महाविद्यालयात प्रवेश घेणार होत्या आणि त्यावेळी साहेब परदेशात जायला निघाले होते.

जाताना सांगून गेले की, 'मी तुझ्या प्रवेशासाठी कुणाकडे शब्द टाकणार नाही. तू तुझ्या गुणवत्तेने प्रवेश मिळव.' सुप्रियानेही इतरांप्रमाणे रांगेत लागून प्रवेश घेतला होता. सकाळी घरातून बाहेर पडताना आणि रात्री घरी आल्यानंतर साहेब सुप्रियाच्या खोलीत जाऊन तिची भेट घेत असत.

त्यांची काम करण्याची क्षमता सर्वांना ठाऊक आहे. प्रथमतः मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिला दौरा पुण्याला झाला. पवारसाहेब सकाळी नऊ ते रात्री दोन वाजेपर्यंत येणाऱ्यांना भेटत होते. दिवसभर फक्त चहावर होते. रात्री दोन नंतर त्यांचे मित्र बॅनर्जी साहेबांना म्हणाले, 'आता काहीतरी खायचं आहे की नाही?'

साहेब राजकारणात नसते तर देशाचे अव्वल उद्योगपती किंवा प्रगतशील शेतकरी झाले असते. समोरच्या माणसाची समस्या त्यांना त्याच्याशी बोलताक्षणी समजते. सर्वसामान्य माणसावर त्यांनी प्रेम केले आहे आणि सत्तेत नसतानाही सर्वसामान्य त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू राहिला आहे. सर्वसामान्य माणसांसाठीच राजकारण, समाजकारण करायचे असते याची जाणीव सदैव त्यांच्या मनात असल्यामुळे काहीही काम नसताना साहेबांच्या दर्शनासाठी बाहेरगावहून माणसे येत असतात. साहेब केंद्रात संरक्षण मंत्री झाले आणि दिल्लीला गेले, तेव्हा धुवाळीसुद्धा त्यांच्यासोबत गेले. मात्र मुख्यमंत्री पदावरून दूर होताच क्षणभरही शासकीय निवासस्थानात न थांबणारे पवारसाहेब बघायला मिळाले, असे अनुभव धुवाळी यांनी सांगितले आहेत.

❐❐❐

# महिला हिताची जाण

1995 साली शरद पवार यांच्या निवासस्थानावर हातावर पोट पण मनात जिद्द असणाऱ्या महिलांकरिता संस्था उभारलेल्या काही महिला जमल्या होत्या. शासनातर्फे सकस आहार योजना राबवली जाते. तेथे काम मिळण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या या महिला होत्या. खोट्या महिला संस्था दाखवून टेंडर्स गिळकृत करणारी काही मंडळी असतात, त्यांच्यापासून या महिला त्रासल्या होत्या. युतीचे सरकार दोन महिन्यापूर्वी आले होते आणि ब्रेडवाल्यांनाच काम मिळणार असासुद्धा सुगावा त्यांना लागला होता. महिला धोरण हे शरद पवार यांनी जाहीर केलेले होते आणि म्हणून यातून मार्ग काढण्यासाठी, मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांच्या बंगल्यावर या महिला गेल्या होत्या. त्यामध्ये श्रीमती मणिंदर बेदी या पवईच्या स्त्रीशक्तीच्या नेत्या सुद्धा होत्या. मुलाखत ठरलेली नव्हती. फोनवर बोलणेसुद्धा झाले नव्हते. पवारसाहेब भेटतील का, हा प्रश्न त्यांच्या मनाला सतावत असतानाच त्या आठ-दहाजणी आश्चर्यचकित झाल्या. कारण त्यांना सन्मानाने आत बोलावले गेले. त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन कोणाला भेटायचे, कुठली पावले उचलायची, सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कसे काम करायचे हे पवारसाहेबांनी त्यांना सांगितले आणि काही अडचण आली तर त्यांचा या महिलांना पाठिंबा राहील, याची ग्वाही दिली.

एक सुखद सत्य म्हणजे त्यानंतर पंधराशे महिला सकस आहार योजने अंतर्गत कार्यरत झाल्या आणि आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करत्या झाल्या. सगळ्या अडचणींवर मात करून

शासकीय पातळीवर आत्मविश्वासाने त्या आजही काम करत आहेत. शिक्षण कमी आणि गरिबी असली तरी मनं खंबीर आणि हात मेहनतीस तयार आहेत, अशा स्त्रिया घर सावरू शकतात. शरद पवारांना त्या 'स्त्री शक्ती'च्या महिला नेहमीच साथ देत आल्या आहेत आणि देतील. महिला हिताची जाण ठेवणाऱ्या शरद पवारांनी व्यस्ततेतही त्या महिलांना योग्य मार्गदर्शन केले, त्यामुळे त्या हा ऋणातला आनंद कधी विसरू शकत नाहीत, असे श्रीमती मणिंदर बेदी यांनी म्हटले आहे.

❒❒❒

# कामगार हिताला प्राधान्य देणारे नेतृत्व

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी वसंतराव नाईक आले आणि उमदं नेतृत्व म्हणून गृहमंत्रीपद शरद पवारांना मिळालं. तेव्हा प्रेमाताई पुरव या ट्रेड युनियनमध्ये काम करीत होत्या. 1972 साली गिरणी कामगार संप झाला, त्यावेळी शरद पवार गृहमंत्री होते. प्रेमाताईंना पूर्वीपासूनच पवारांच्या कामाबद्दल आदर होता. त्यांच्या वागण्याची, सर्वांना आदराने वागवण्याची पद्धत प्रेमाताईंना आवडायची. युनियनच्या कामामुळे त्यांच्याशी भेटी होत. त्यांच्या खात्याशी संबंधित कुठलेही काम असले की त्यांच्याकडे त्या जात असत. मंत्र्यांना भेटायला जायचं म्हणजे बाहेर तासन्तास थांबणं होई, ते प्रेमाताईंना अजिबात आवडत नसे. पवारांकडे मात्र तिष्टत थांबावं लागत नसे. ते चटकन भेटत आणि पटापट काम होऊन जाई. कुठल्याही कामासंबंधी दोन दिवसात त्यांच्याकडून फोन

यायचा. काम होईल की अवघड आहे, ते स्वतः स्पष्टपणे सांगत आणि त्याआधी त्यांनी प्रत्येक प्रश्नाचा अभ्यास केलेला असे. एकदा संप बरेच दिवस चालला आणि त्यावेळी महागाई प्रतिकार समितीही जोरात कार्य करीत होती. या दरम्यान एकदा प्रेमाताई यांचा मोर्चा काळाघोडापर्यंत पोचला. पुढे एखादं शिष्टमंडळ मोर्चाला सामोरे जातं अशी नेहमीची पद्धत असे; पण त्यांना शिष्टमंडळ वगैरे नको, स्वत: मुख्यमंत्र्यांनी भेटावं, असा या मंडळींचा आग्रह होता. तसा निरोप त्यांनी पाठवला आणि पंधरा मिनिटात स्वतः मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि गृहमंत्री शरद पवार त्यांना भेटायला आले. भाषण केलं. प्रश्न मिटला असं नाही; पण कोणत्याही परिस्थितीला कसं सामोरं जायचं याचं तारतम्य, वातावरण जास्त हाताबाहेर जाऊ नये यासाठी लागणारं तंत्र शरदराव काळजीपूर्वक सांभाळत, याचं प्रत्यंतर आलं. त्यामुळे बऱ्याच गोष्टी सामोपचाराने मिटत असत.

याच काळात तब्बल 42 दिवस कामगारांचा संप चालला. शेवटी सामोपचाराने तडजोड झाली. अर्थात संप, लढे, कामगारांचे प्रश्न या विषयाचे भीष्माचार्य कॉम्रेड डांगे यांच्या शब्दात 'कामगार नाक मुठीत धरून नाही, तर झेंडा उंचावून गिरणीत प्रवेश करता झाला.' काही मागण्या मान्य झाल्या. काहींच्या बाबतीत तडजोड करावी लागली. संपकाळात सस्पेंड झालेले काही कामगार पुन्हा कामावर घेतले गेले नाहीत. प्रेमाताई कामगारांच्या वतीने निवेदन तयार करीत होत्या आणि त्यानंतर गिरणी कामगार युनियनच्या वतीने त्या सचिवालयात गेल्या. त्या दिवशी शरदरावांकडे काही

महत्वाची मंडळी येणार होती. त्यांनी बाहेरून फोन केला. 'थोडं काम होतं. येऊ का?' असं विचारलं आणि त्यांना पवारांनी यायला सांगितलं. दारातूनच त्यांनी म्हटलं की, 'माफ करा, वेळ न ठरवता आले. एक निवेदन द्यायचे होते.' कामात असूनही पवार उठून म्हणाले, 'आता कामात आहे. तुम्ही निवेदन द्या. दोन दिवसात कळवतो.' निवेदन दिलं आणि मनात विचार करतच त्या घरी गेल्या. रात्री कामगार घरी येणार होते. त्यांना काय सांगायचं, हा प्रश्न त्यांच्यापुढे होता. घरी पोचल्या तर कामगार आलेले होते. त्यांना सांगितले की, दोन-चार दिवसात निर्णय नक्कीच चांगला लागेल; पण ते दोन दिवस त्यांच्यासाठी अत्यंत कठीण अवस्थेत गेले. तिसरा दिवस उजाडला. तो दिवस 30 जानेवारीचा होता. चंद्रावर गेलेली पहिली महिला व्हेलोंतिना तेरेश्कोवा भारतभेटीला येणार होती. तिचे स्वागत करायला विमानतळावर प्रेमाताईसुद्धा जाणार होत्या. मन अतिशय अस्वस्थ होते. तिथे पुन्हा कामगार भेटणार होते. त्यांना कसे तोंड द्यावे, हे कळत नव्हते; पण जाणे भाग होते. करण्यासारखे काहीच नव्हते. धास्ती वाटत होती; कारण निवेदन घाईघाईत दिलेले होते. शरद पवारांनी ते नीट वाचले असेल का? दोन दिवसात फोन नाही म्हणजे काहीतरी गडबड असावी, या विचारातच प्रेमाताईंनी विमानतळ गाठले आणि पाहुण्यांची वाट बघत त्या थांबल्या होत्या. घोषणाबाजी चालू होती. त्यात प्रेमाताईंनीही सूर मिसळले होते; पण जोर नव्हता. इतक्यात विमान आले. ही सर्व मंडळी आत गेली. दुसऱ्या बाजूने शरदराव, सौ. प्रतिभाताई व इतर मंडळी आली. त्यावेळी शरद पवार पर्यटन

मंत्रीही होते. त्यामुळे पाहुण्यांच्या स्वागतासाठी ते आले होते. आत जाताजाता हात दाखवून त्यांनी प्रेमाताईंना बोलावले आणि म्हणाले, 'तुमचं निवेदन वाचलं. निर्णयही झाला आहे. उद्या सकाळपर्यंत कळेल.' आणि ते निघून गेले. दुसऱ्या दिवशी सर्व कामगारांना परत घ्यावे असे पेपरमध्ये छापून आले होते. असे हे शरद पवार. कामगार प्रश्नांबद्दल त्यांची समज, सामान्य कार्यकर्त्यांशी वागण्याची पद्धत यामुळे प्रेमाताई भारावून गेल्या होत्या. पवारांचे असे अनेक अनुभव अनेक व्यक्तींनी तितक्याच आदरपूर्वक व्यक्त केलेले आहेत.

❑❑❑

# जनसेवेतून मोठा झालेला नेता

1978 सालची गोष्ट. शरदराव यांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली होती. हाच मुहूर्त साधून दिलीप कदम सुशिक्षित बेरोजगार संघटनेतर्फे हुतात्मा चौकात उपोषणाला बसले होते. मागणी होती, शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपात ज्यांनी हंगामी कर्मचारी म्हणून काम करून शासनाला मदत केली, त्यांना विनाअट शासकीय सेवेत सामावून घ्यावे. शरदरावांनी त्यांच्या शिष्टमंडळाला बोलावणे पाठवले. भेटीत त्यांनी 'तुम्ही हंगामी संपकरी कर्मचाऱ्यांचा मुद्दा मांडला, तेव्हा पी.एस.सी. उमेदवार, तेसुद्धा बेकार आहेत, त्यांच्यावर अन्याय होत नाही का? दोन्ही मंडळींवर अन्याय होणार नाही असा तोडगा आपण काढू. तेव्हा तुम्ही उपोषण मागे घ्या.'

त्यांच्या शब्दात जादू होती. त्याप्रमाणे दिलीप कदम आणि त्यांचे सहकारी वागले. उपरोक्त विषयासंदर्भात ते पवारांना वरचेवर भेटत होते. एका भेटीत ते म्हणाले की, 'हा बेकारीचा प्रश्न अत्यंत ज्वलंत आहे. तेव्हा तुम्ही आपले कार्य संपकालीन कर्मचाऱ्यांपुरते मर्यादित ठेवू नका. ते व्यापक करा.' त्यांचे म्हणणे कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पटले आणि त्यानुसार ते कामाला लागले. पवारांच्या अतिव्यस्ततेमुळे भेटणे कठीण होत होते. एक दिवस त्यांनी कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांना निरोप पाठवला की, 'आज सात वाजता मंत्रालयात या. मी तुम्हाला बंगल्यावर येण्यासाठी गाडी पाठवतो.' आणि खरोखर त्यांनी त्यांच्यासाठी गाडी पाठवली. बंगल्यावर भेटणाऱ्यांची खूप गर्दी असल्यामुळे त्यांचा नंबर रात्री सव्वा बारा वाजता लागला. बेरोजगारीच्या समस्येवर चर्चेत खूप ऊहापोह झाला. साहेबांची त्याबद्दलची कळकळ आणि आस्थेची जाणीव झाली. रात्री दीड वाजेपर्यंत ते चर्चा करीत होते. बाहेर अजूनही माणसे उभीच होती. सहज कदम पवारसाहेबांना म्हणाले की, 'आम्हाला एकत्र भेटण्यासाठी ठिकाण नाही, तर.... शासनाने...' कदमांचे वाक्य अर्धवट असतानाच पवारांनी त्यांच्या सचिवांना मुख्य सचिव प्रधानसाहेबांना फोन लावण्यास सांगितले व रात्री दीड वाजता त्यांनी आझाद मैदानाजवळील जागा कार्यालयासाठी उपलब्ध करून देण्याची सूचना केली. सर्वजण त्यांच्या कार्यतत्परतेचा नमुना बघत होते. 'रात्र बरीच झाली, तेव्हा तुम्ही इथेच झोपा.' असे त्यांनी सांगितले. सहा वाजता सकाळी कदमांना जाग आली.

जाताजाता साहेबांना भेटून जावे, हा विचार करत होतेच की सौ. प्रतिभाताई पवार यांनी त्यांना चहा दिला व म्हणाल्या, 'तुमचे साहेब तर सकाळी पाच वाजताच अधिवेशनासाठी नागपूरला रवाना झाले.' पवारसाहेब रात्री तीन वाजेपर्यंत लोकांच्या भेटी घेत होते. झोपले कधी आणि गेले कधी? कदमांनी मनात म्हटले, 'माणूस नशिबाने नाही तर त्याच्या गुणांनी, श्रमांनी, त्यागाने व जिद्दीने मोठा होतो, हेच खरे!'

❑❑❑

# कठीण प्रसंगी परक्या देशात मदत

ऑक्टोबर 1995 मध्ये इस्रायलमधील जेरुसलेममध्ये जागतिक मराठी परिषदेसाठी जाण्याचा योग पनवेलच्या सुनीता जोशी यांना आला होता. 'कशी असते जागतिक मराठी परिषद?' या उत्सुकतेने व इस्रायल, इजिप्त बघण्याच्या निमित्ताने परिषदेसाठी निवेदिका म्हणून जाणारी त्यांची मैत्रीण संध्या जोशी हिच्या सोबतीने जेरूसलेम येथे सुनीता जोशी गेल्या. दोन-तीन महिने आधी नक्की जाण्याचे ठरवूनही आयत्या वेळेस गोंधळ झाला. केंद्र सरकारी कर्मचारी असल्याने डिपार्टमेंटचे 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळण्यास विलंब लागला आणि त्यामुळे पासपोर्ट व इस्रायल व्हिसा अगदी आदल्या दिवशी मिळाला. पर्यायाने फ्लाईट बुकिंग होऊ शकले नाही आणि 'ग्लोबल व्हिजन' या अरेंज केलेल्या ट्रॅव्हल एंजसीमार्फत न जाता स्वतंत्ररीत्या उशिरा म्हणजे परिषदेच्या समारोपाच्या दिवशी त्या जाऊन पोचल्या. हा त्यांचा

परदेशवारीचा पहिलाच अनुभव होता. परिषद आटोपून इस्रायलला जाणाऱ्या सर्व लोकांच्या व्हिसाची व्यवस्था ग्लोबल व्हिजनच करणार होते; परंतु जोशी उशिरा गेल्यामुळे त्यांचा व्हिसा राहून गेला. जेरुसलेमला पोचल्यावर समारोपाचा कार्यक्रम आटोपल्यावर प्रथम ग्लोबल व्हिजनच्या श्री. पिळणकरांकडे जोशींनी धाव घेतली आणि व्हिसा काढून द्यावा, ही विनंती केली. त्यांनी सांगितले की, 'तुम्ही उशिरा आलात. तुमचा व्हिसा तुम्हीच काढून आणा.' हे सांगितल्यावर जोशी यांच्यापुढे अत्यंत बिकट प्रश्न पडला. त्यांच्या पायाखालची जमीन सरकली. आता आपले कसे होणार, हा प्रश्न त्यांना भेडसावू लागला. त्यांची मैत्रीण समारंभ संपताक्षणी निरोप घेऊन तिच्या स्नेहयांकडे निघून गेली होती आणि अशावेळी त्यांना शोधत बीडचे एक शेतकरी श्री. जीवनराव बजगुडे आले. त्यांची अडचण जवळजवळ सारखीच होती. त्यांनाही कोणीच दाद दिली नव्हती. शेवटी त्यांनी दोघांनी मिळून तेलअविवला जाऊन व्हिसा काढून आणण्याचे ठरविले.

भारतात परतायचे चार दिवसानंतरचे बुकिंग होते आणि जवळ डॉलर्सही कमी होते. तेव्हा येनकेन प्रकाराने व्हिसा मिळवायलाच हवा होता. रात्रभर त्यांना झोप लागली नाही. सकाळी सर्व बसेस इस्रायलमधल्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्यास निघाल्या तर सुनीता जोशी आणि जीवनराव बजगुडे व्हिसा मिळवण्यासाठी तेलअविवला निघाले. त्यांचे साईट सिईंग हुकले होतेच. हॉटेल बुकिंग काऊंटरवर तेलअविवला कसे जायचे? बस स्टॅन्ड कुठे आहे? ऑफिसचा पत्ता, सर्वसाधारण टॅक्सीचे भाडे

याची चौकशी त्यांनी केली आणि टुरिस्ट व्हिसा मिळावा, असे पत्र घेऊन ते निघाले. हॉटेलच्या आवारातच टॅक्सी स्टँड होते. ते टॅक्सी स्टँडकडे निघाले तर समोरून श्री. शरद पवार जिना उतरताना दिसले. श्री. बजगुडे म्हणाले की, 'आपण पवारसाहेबांना भेटून आपली अडचण सांगूया.' आधल्या दिवशीचा अनुभव गाठीला होता. त्यामुळे सहाजिकच जोशी म्हणाल्या, 'काही नको. आपण 700 डॉलर्स भरले तरीसुद्धा ज्यांची जबाबदारी होती, त्यांनी ती टाळली. हेही त्या बाकीच्या पुढाऱ्यांसारखेच. वेगळं काय करणार?' तरीही बजगुडे पवारसाहेबांजवळ पोचले. त्यांचे आपापसात काहीतरी बोलणे झाले. त्यांनी जोशींना जवळ बोलवून चौकशी केली. सर्व ऐकून घेतल्यावर ते म्हणाले की, 'सर्व्हिस करता म्हणजे तुम्ही गरजेपुरते इंग्रजी बोलू शकाल. तेव्हा आता माझ्यासाठी गाडी येईल, त्यामधून तुम्ही तेलअविवला जा. ड्रायव्हर स्थानिक आहे. तो इथली भाषा जाणतो. तुमचे सर्व काम व्यवस्थित होईल. काही काळजी करू नका. तुमचे साईट सिईंग हुकले आहे, तेव्हा तुमचे व्हिसाचे काम दुपारी 2 पर्यंत आटोपले की, मी द्राक्ष शेती पाहायला जात आहे, तिथे तुम्ही मला जॉईन व्हा. मी ड्रायव्हरला तशा सूचना देऊन ठेवतो.'

जोशी यांच्या कानावर विश्वास बसेना. त्या भारावून गेल्या. पवारसाहेबांच्या रूपात साक्षात देव भेटल्यासारखे त्यांना वाटले. देशाचं संरक्षण मंत्री पद भूषवलेल्या, विरोधी पक्षनेते असलेल्या, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा वाहिलेल्या एवढ्या मोठ्या व्यक्तीने त्यांच्यासारख्या सामान्य माणसांची अडचण

सोडवण्यासाठी आस्था दाखवली, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायचेसुद्धा त्या विसरून गेल्या.

दुपारी तीन वाजेपर्यंत व्हिसा त्यांच्या हातात पडला आणि त्यांनी नि:श्वास सोडला. व्हिसा ऑफीसची वेळ बदलल्यामुळे त्यांना पवारसाहेबांबरोबर द्राक्ष शेतीवर जॉईन होता आले नाही. हॉटेलवर ड्रायव्हरने त्यांना सोडले आणि तासाभरातच साईट सिईंगला गेलेली मंडळी परतली. थोड्याच वेळात पवारसाहेब स्वतः सुनीता जोशी यांना शोधत आले आणि पुन्हा एकदा 'तुमच्या कामात काही अडचण आली नाही ना?' वगैरे चौकशी करून गेले. पवारसाहेबांनी त्यांच्यासारख्या सामान्य माणसांसाठी जे केले ते पवारांच्या दृष्टीने फार मोठे नसेल; पण जोशी आणि बजगुडे यांच्यासारख्या सामान्य लोकांच्या दृष्टीने खास उल्लेखनीय आणि अविस्मरणीय होते, अशी आठवण सुनीता जोशी यांनी सांगितली आहे.

परतल्यानंतर पवारसाहेबांना चार ओळी लिहून पाठवाव्यात, म्हणून अनेकदा त्यांनी लेखणी सरसावली पण राहून गेले. पवारसाहेबांच्या एकसष्ठीनिमित्त वसंत खेर यांनी संपादित केलेल्या 'लोकमान्य लोकनेता' या पुस्तकात त्यांनी त्या ओळी लिहून त्याची मनात राहिलेली रुखरुख थोडी कमी करण्याची संधी प्राप्त करून घेतली. त्या ओळी अशा -

तप:साधना करून यशाचा षड्ज लाविला असा
शांत, स्निग्ध रस झरत राहिला भरून वाहिला पसा
साथसंगती तशाच होत्या, तसेच रसिकाग्रणी

रंगत गेली मैफिल म्हणून कधी न जाहली सुनी
ख्याल, तराणे, किती हरखती, उंच घेतल्या ताना
कौतुकभरली थाप पाठीवर, लवल्या तेव्हा माना
मैफिल रंगत गेली झाले सुरेल जीवन गाणे
भैरवीचेही असेच होतील स्वर मंजुळवाणे.

❒❒❒

# माणुसकी

शरद पवार यांच्यात माणुसकी ठासून भरली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी विकास बँकेत काम करणारे विलास पाटील हे काँग्रेसचे खंदे पुरस्कर्ते. ऑफीस संपल्यावर आणि वेळ मिळेल तेव्हा ते पक्षाचे कार्य करायचे. त्यामुळे घरी ते उशिरा जात आणि रात्री टेबलावर ठेवलेले ताट जेऊन झोपणे एवढाच वेळ त्यांना मिळे. त्याचा तब्येतीवर परिणाम होऊन ते अवेळी दगावले. त्यांच्या मागे त्यांची पत्नी, दोन मुली, मुलगा एवढे कुटुंब होते. मुली शिक्षित होत्या. त्यांनी नोकरीसाठी अनेक ठिकाणी प्रयत्न केले; परंतु त्यांना नोकरी मिळत नव्हती. ही गोष्ट शरद पवार यांच्या कानावर गेली. त्यांनी या काँग्रेसच्या सच्च्या कार्यकर्त्याची अडचण जाणली. दोन्ही मुलींना सहकारी बँकांमध्ये त्यांनी सामावून घेतले. असा हा माणुसकी जोपासणारा नेता आहे, असे विलास पाटील यांच्यासोबत त्या काळात नोकरी केलेले कोल्हापूरचे आनंदराव इंगवले सांगतात.

❒❒❒

# आजारी मुलीला जीवदान

नांदगावचे महेंद्र रघुनाथ हंबिरे यांची पालघर तालुका समाजवादी काँग्रेस अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली होती. पालघर तालुक्यात एका लहान मुलीच्या हृदयशस्त्रक्रियेच्या मदतीसाठी ते आणि इतर कार्यकर्ते शरद पवारांना भेटले. त्या वेळी मुख्यमंत्री असलेले वसंतदादा पाटील यांच्या मुख्यमंत्री निधीतून आर्थिक मदत मिळवण्याचे ठरले; पण त्याच वेळी शरद पवार परदेशी जाण्याच्या तयारीत होते तर मुख्यमंत्री बाहेरगावी दौऱ्यावर होते. तरीही पवारांनी जे.जे. हॉस्पिटलचे डीन यांना प्रत्यक्ष दूरध्वनी करून मुलीच्या शस्त्रक्रियेची व्यवस्था केली आणि शस्त्रक्रियेला येणाऱ्या खर्चाबाबत परदेश दौऱ्यावरून आल्यावर नंतर बोलू, असे सांगितले. गंभीर आजारी मुलीला घेऊन जे.जे. हॉस्पिटलच्या डीनना ही मंडळी भेटली. डीन त्यांच्यावर रागावून म्हणाले की, त्यांनी 'फक्त पवारसाहेबांचे नाव सांगितले असते, तरी शस्त्रक्रिया झाली असती.' त्यांनी मुलीच्या हृदयाची शस्त्रक्रिया केली आणि ती मुलगी आजतागायत हयात आहे. पवारसाहेबांच्या एका शब्दाने त्या मुलीला जीवदान मिळाले.

मुंबईच्या समाजवादी युवक काँग्रेसने त्यावेळी बोर्डी, तालुका डहाणू येथे पक्षाचे शिबिर आयोजित केले होते आणि या शिबिरास पवार उपस्थित राहणार असल्यामुळे महेंद्र हंबिरे काही कार्यकर्त्यांसह त्यांच्या स्वागताला गेले. आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यांची पवारसाहेब जातीने विचारपूस करीत होते. भोजनाच्या वेळी पवारसाहेब कार्यकर्त्यांच्या सोबत जेवायला बसले.

त्यांच्यासमवेत त्यावेळच्या समाजवादी काँग्रेस पक्षाच्या सरचिटणीस श्रीमती अंबिका सोनी उपस्थित होत्या. त्यांच्यासोबत भोजनाचा योग म्हणजे सर्व सामान्य कार्यकर्त्यांना मिळालेली प्रेरणा होती आणि एका असामान्य नेतृत्वाची ओळख झाली, असे हंबिरे म्हणतात.

❑❑❑

# लोकोद्धाराचा आदर्श

पंढरपूरचे डॉ. उद्धव रसाळे गाडगेबाबांच्या विचाराने प्रेरित झाल्यामुळे 1976 साली गाडगेबाबांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याचे औचित्य साधून त्यांच्यावर एक पुस्तक लिहिले होते. त्या पुस्तकाला प्रा. शिवाजीराव भोसले यांची प्रस्तावना लाभली होती. या पुस्तकाचे प्रकाशन पवारसाहेबांच्या हस्ते व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. पण डॉ. रसाळे हे तेव्हा फार प्रसिद्ध किंवा मोठे व्यक्ती नव्हते. त्यांच्या खिशात पाचशे रुपयेसुद्धा नव्हते. कार्यक्रमाला दहा ते पंधरा हजार रुपये खर्च येणार होता आणि हे त्यांचे मनोगत त्यांनी त्यांचे निकटवर्ती गोफणे तात्या यांना बोलून दाखवले होते. त्यांच्या भावना ओळखून तात्यांनी फोनवर पवारसाहेबांशी संपर्क साधला होता. हो-नाहीची वाट न पाहता प्रकाशनाची तारीख सांगून टाकली होती.

माधवानंद थिएटर, माळेगाव येथे कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाला पवारसाहेब येतील का, याविषयी

लोकांमध्ये चर्चा होती. लोक इकडे साशंक नजरेने पहात होते. त्या दिवशी पवारसाहेबांचे तालुक्यात अनेक कार्यक्रम होते. त्यातून वेळ मिळायला हवा होता.

त्यावेळी दिवाळी होती. पवारसाहेबांचे बंधू अमेरिकेतून सणासाठी आले होते. पवारसाहेब घरी आहेत, असे समजल्यावर पुस्तकाची एक प्रत व निमंत्रण घेऊन त्यांच्या भेटीला गोफणे तात्यांसह डॉ. रसाळे गेले. त्यांना पाहताच कार्यक्रमाची आठवण झाली आणि पवारसाहेबांनी येण्याचे मान्य केले. तालुक्यातील इतर कार्यक्रम रद्द करण्याविषयी तहसिलदार, प्रांतसाहेब, संबंधित मंडळींना कळवून टाकले. त्यांचा निरोप घेऊन ही मंडळी आनंदाने घरी परतली.

24 ऑक्टोबर 1976 रोजी ठरल्याप्रमाणे सकाळी दहा वाजता पवारसाहेब कार्यक्रमाला हजर झाले. जनसमुदायाच्या महासागरात अनेक मान्यवर या कार्यक्रमाला हजर होते. सकाळी दहा वाजल्यापासून चाललेला कार्यक्रम दुपारी दोन वाजेपर्यंत चालू होता. त्यांना कळून चुकले की तळागाळातील लोकोद्धाराची भाषा बोलणारे पवार प्रत्यक्ष कृतीतूनही सातत्याने जनसामान्यांसाठी, लोकोद्धारासाठी झटतात.

❒❒❒

# सहस्रपैलू व्यक्तिमत्त्वाचे धनी

## स्वास्थ्यसंकटातही

## असामान्य आत्मविश्वास

जनतेत सतत राहणाऱ्या आणि जनसामान्यांची सुखदुःखे स्वतः अनुभवलेल्या शरदरावांनी जनमनाची चाहूल अचूकपणे ओळखली होती. देशात बहुसंख्येने असलेल्या शेतकऱ्याला आणि त्याच्या शेतीव्यवसायाला समृद्धी प्राप्त झाल्याशिवाय देशाला स्वावलंबी आणि स्वाभिमानी होता येणार नाही, हेही त्यांनी ओळखले होते आणि म्हणूनच महाविद्यालयीन शिक्षण घेताना त्यांनी जनहिताच्या समाजकारणाचा प्रारंभ केला होता. जनतेच्या उदंड आणि अखंड प्रतिसादाने पक्षातील आणि प्रशासनातील सत्तास्थाने त्यांना प्राप्त झाली. महाराष्ट्रात राज्य मंत्र्यापासून मुख्यमंत्री पदापर्यंत पोचणारे पवारसाहेब देशाचे संरक्षणमंत्री झाल्यामुळे त्यांच्या सामाजिक सेवेचे क्षेत्रही राष्ट्रव्यापी झाले. समाजाच्या विविध क्षेत्रातील आणि घटकातील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी आपल्या अधिकाराचा उपयोग केल्यामुळे जनसामान्यांचा त्यांच्यावर विश्वास वृद्धिंगत होत गेला. ते सत्तेवर असोत किंवा नसोत, त्यांच्या पाठीशी जनता असल्यामुळे सामाजिक परिवर्तनाचे काम करण्याविषयीचा आत्मविश्वास पवारसाहेबांच्या मनात सतत वाढत गेला.

आत्मविश्वास मनात असतो; पण त्यासाठी जे काम करावे लागते, त्याला शरीराची साथ आवश्यक असते. मुंबईतील ब्रीच कॅण्डी इस्पितळात साहेबांना एका अवघड शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागले होते आणि शस्त्रक्रियेनंतर शारीरिक सामर्थ्य साथ देइनासे झाले होते. त्याच वेळी 2004 मधील लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या आणि त्यासाठी प्रचार करणे आवश्यक होते; पण जनता हाच साहेबांचा प्राणवायू असल्याचा चमत्कार लोकसभा निवडणूक प्रचाराच्या वेळी महाराष्ट्रातील आणि देशातील जनतेला पाहायला मिळाला. शस्त्रक्रियेनंतर शारीरिक दुर्बलतेमुळे डॉक्टरांनी प्रवासावर आणि बोलण्यावरही बंधने घातली असतानाही साहेबांनी लोकसभेच्या निवडणुकीत प्रचारासाठी विविध गावांतील 50 सभांमधून भाषणे करण्याचा आगळा विक्रमच केला. लोकसभेच्या निवडणुकीनंतर देशातील नवीन सरकारात साहेबांना कृषीमंत्री पद देण्यात आले आणि ते दिल्लीला गेले असले तरी महाराष्ट्रातील जनतेकडे त्यांचे लक्ष कायम असल्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीचीही जबाबदारी त्यांनी स्वीकारली. प्रकृती अस्वास्थ्याने त्यांच्या मनाची भरारी अडवली होती. जवळ-जवळ एक महिनाभर त्यांना अशा अवघड आणि शारीरिक यातनांना, उपचारांना सामोरे जावे लागले होते, जे केवळ असामान्य आत्मविश्वासामुळेच सहन करणे शक्य झाले होते.

त्यांच्या जीवनकार्यात सावलीप्रमाणे त्यांना साथ देणाऱ्या प्रतिभाताईंनी त्या काळात त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी

मोलाची मदत केली. कोणत्याही क्षेत्रात असामान्य कर्तृत्व गाजवण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती आणि प्रयत्नांबरोबरच शारीरिक स्वास्थ्याचीही आवश्यकता असते; पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे असा आघात होण्याची साहेबांवर ही पहिलीच वेळ होती. बोलण्यावर नियंत्रण, खाण्यावर बंधने अशा अवस्थेत एक महिना गेला आणि आता विधानसभेच्या निवडणूक प्रचारासाठी पवार महाराष्ट्रात येऊ शकणार नाहीत, असे अनेकांना वाटू लागले. तथापि मनाच्या असामान्य आत्मविश्वासाने पुन्हा एकदा प्रतिकुलतेवर विजय मिळवला. शरद पवार महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणूक प्रचारात दाखल झाले. एक-दोन नव्हे तर वेगवेगळ्या मतदारसंघातील 102 प्रचार सभांमध्ये भाषणे करून पवारसाहेबांनी जिंकण्याची किमया केली होती. त्यांच्या प्रत्येक सभेतील प्रचंड जनसमुदायाने त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यास मोलाची मदत केली होती. प्रकृती अस्वास्थ्याबद्दल कोणी विचारलेले त्यांना अजिबात आवडत नाही; कारण समोर येणारी जनता त्यांच्या कार्यासाठी लागणारा आत्मविश्वास इतका वाढवीत असते की, त्यामुळे प्रतिकूल स्वास्थ्यावर मात करण्याची मानसिक शक्ती त्यांना मिळते. म्हणूनच पवारसाहेब म्हणजे लोकांसाठी, लोकांपासून शक्तिसामर्थ्य घेणारा लोकनेता आहे, असे सुरेख वर्णन रमेश गायकवाड यांनी केले आहे.

2004 मध्ये उद्भवलेल्या कर्करोगाविषयी आणि प्रकृतीसंबंधी आलेल्या संकटांविषयी पवारांनी त्यांच्या 'लोक माझे सांगाती' या ग्रंथात सहाव्या प्रकरणात 'कर्करोगाला भिडताना' या

शीर्षकाखाली सविस्तर विवेचन केले आहे. ब्रीच कँडी हॉस्पिटलमधील उपचार, केमोथेरॅपी, त्यांनंतर अमेरिकेतील उपचार वाचताना पवारांची कमाल वाटते.

याच प्रकरणात पवारांनी अकाली सोडून गेलेल्या विलासराव देशमुख आणि आर.आर. पाटील यांच्याही प्रकृतीविषयी लिहिले आहे. शरीरावर घातक परिणाम करणारे पानमसाले आणि तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहण्याचा सल्लाही त्यांनी जनतेला दिला आहे. कर्करोगाविरुद्ध मनाचा निर्धार, नियमित औषधोपचार आणि कामातली एकाग्रता ही त्रिसूत्री त्यांनी दिली आहे.

2006 मध्ये दिल्लीत कृषीमंत्री असताना एक दिवस त्यांना अस्वस्थ वाटत होते. त्यांना राममनोहर लोहिया रुग्णालयात नेल्यावर हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या वाहिन्यांमध्ये अडथळा असल्याचे सांगण्यात आले. ते अपोलो रुग्णालयात गेल्यावर त्यांना स्टेंट बसविण्यास सांगण्यात आले. काही दिवसांनी हे अडथळे आपोआप गेले. मात्र 6 महिन्यांनी पुन्हा त्रास सुरू झाला आणि पवारांनी स्टेंट बसवून घेतला. 2014 मध्ये दिल्लीतील निवासस्थानी खुर्चीतून पडल्याने पवारांच्या मांडीतील खुब्यातला बॉल क्रॅक झाला. शस्त्रक्रिया करून नवीन बसविण्यात आला. त्यांना 6 महिने चालता येणार नाही व काठी घेऊन चालावे लागेल, असे डॉक्टर म्हणाले. आश्चर्य म्हणजे पवार 15 दिवसांतच चालायला लागले व लवकरच काठी वापरणेही बंद केले.

आजारपणातही पवार कार्यालयात जात होते. कामे करीत होते. त्यांनी आहारात तेलकट, तिखट, मसाले कमी केले. न्याहारी

आणि दोन वेळचे जेवण वगळता मध्ये काही खात नाहीत. पाणी खूप पितात. ताणाचं व्यवस्थापन करताना सकाळी लवकर उठतात. पायी चालण्याचा व्यायाम करतात. विशेष म्हणजे त्यांचे झोपेवर नियंत्रण असून कमी झोपेची सवय त्यांनी शरीराला लावून घेतली आहे. त्यांनी एक उदाहरण दिले आहे. ते म्हणतात, 'हेलिकॉप्टरने एखाद्या ठिकाणी पोचायला 35 मिनिटांचा अवधी असेल तर मी अर्धा तास झोप काढायचं ठरवतो, झोप मला लगेच लागते आणि तिसाव्या मिनिटाला मी ताजातवाना होऊन तयार असतो. हे हुकमी झोपेचं वरदान मी कमावलं आहे.' हे सर्व वाचल्यावर स्वत:वर सर्वतोपरी नियंत्रण ठेवणारे, प्रचंड सहनशील असे पवार हे जीवनात हार मानणारे नाहीत, तर सतत लढणारे आहेत, हेच त्यातून सिद्ध होते. संघर्षाचा किंवा लढण्याचा हा गुण त्यांना त्यांच्या आईकडून प्राप्त झाला, असे शरद पवारांनी कृतज्ञतापूर्वक नमूद केले आहे.

❑❑❑

# समस्यांचे निराकरण

राजकारणाच्या चढ-उतारात, बदलत्या राजकीय झंझावातात बारामतीचा किल्ला सदैव अजिंक्य राहिला आहे. विरोधाची राजकीय लाट कितीही मोठी असली तरी या बालेकिल्ल्याची वीट कधी ढासळली नाही. राष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या आणि लोकप्रियतेच्या शिखरावर विराजमान झालेल्या नेत्यांनाही काही वेळेला पराभवाची चव चाखावी लागते, याची

पुसटशी सावलीही ज्यांच्या आसपास फिरकू शकली नाही, असा हा व्यापक जनाधार असलेला नेता म्हणजे शरद पवार. डॉ. एन.पी. हिराणी म्हणतात, महाबळेश्वरच्या अधिवेशनात महाराष्ट्रातील सहकारी सूतगिरणीच्या काही समस्या डॉ. हिराणी आणि इतर पदाधिकाऱ्यांनी शरद पवारांसमोर ठेवल्या होत्या. महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. त्यांच्या समस्यांची पवारांना चांगली जाण होती. कापूस पणन महासंघाचे मुख्य प्रशासक झाल्यानंतर काही समस्यांच्या संदर्भातही हिराणी यांनी पवारांना फॅक्स केले आणि नंतर भेटावयास गेले. त्यावेळी फॅक्स मिळाले, हे त्यांनी आवर्जून सांगितले. राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळासंदर्भातही केंद्राकडून वसुली करावयाची असलेल्या 285 कोटी रुपयांचा प्रश्नही हिराणींनी त्यांच्यासमोर ठेवला होता. प्रत्येक समस्येच्या निराकरणाचा आश्वासक प्रतिसाद शरद पवारांनी दिल्याचे ते म्हणतात व पवारांचा कृषी, उद्योग, विज्ञान-तंत्रज्ञान, फलोद्यान, बँकिंग अशा सर्वच क्षेत्रांचा अभ्यास आहे, हे वेळोवळी जाणवल्याचेही सांगतात.

❑❑❑

# मुंबई-पुणे प्रवासाची एक आठवण

बरीच जुनी गोष्ट आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कोषाध्यक्ष, राष्ट्रीय स्तरावर चिटणीसपदी राहिलेले आमदार हेमंत टकले यांनी पवारांसोबत केलेल्या एका प्रवासाचे वर्णन केले आहे. ते मुंबईतील निवासस्थानी शरद पवारांना भेटण्यासाठी गेले होते.

दिवसभराच्या भरगच्च कार्यक्रमानंतर शिल्लक राहिलेल्या लोकांच्या भेटी संपत असताना बराच वेळ झाला होता. त्यामुळे आपला नंबर लागणार नाही, असे हेमंत टकले यांना वाटले. ते निघण्याच्या मनःस्थितीत असताना शरद पवारांचा त्यांना निरोप आला की आपल्याला प्रवास करता करता चर्चा करावयाची आहे. हेमंत यांना कळले नाही की, आपला प्रवास कुठे होणार आहे? थोड्या वेळाने शरद पवारांनी त्यांना सांगितले की, 'तू माझ्याबरोबर गाडीमध्ये पुण्याला येत आहे आणि वाटेत आपण सविस्तर बोलू.' हेमंत यांना प्रश्न पडला होता की, साहेब आपल्या या दिवसभराच्या असंख्य उलाढालीतून कशी चर्चा करतील? थोड्याच वेळात पवारांच्या गाडीतून ते पुण्याकडे निघाले.

पवारांनी त्यांच्या शिबिरांच्या संकल्पनेविषयी, सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांबद्दल तपशिलाने माहिती घेतली. अचानक त्यांनी विचारले की, 'माझ्यासाठी कोणता विषय निवडला आहेस?' त्यांना कुठला विषय द्यायचा याबाबत काहीच ठरलेले नव्हते. 'सर्वसाधारणपणे तुमचे मार्गदर्शन व्हावे अशी अपेक्षा आहे' असे हेमंत यांनी सांगितले. लगेच त्यांनी अशा पद्धतीने विचार करणे बरोबर नसल्याचे सांगितले आणि मग स्वतः 'गॅट करारामुळे भारतीय शेती उद्योगावर येऊ घातलेले संकट आणि त्याचा मुकाबला करण्यासाठी करावी लागणारी तयारी' या विषयाची निवड त्यांनी केली आणि त्यांच्याजवळ असलेला माहितीचा खजिना त्यांनी उघड केला. नव्या व्यवस्थेबद्दल इतक्या आत्मीयतेने आणि तळमळीने पवारांनी विवेचन केले की, त्यामधून एकविसाव्या

शतकातील त्याचे गांभीर्य ठळकपणे अधोरेखित होऊ लागले. बोलताना सहजपणे ते म्हणाले की, 'येणाऱ्या काळात पक्ष कार्यकर्त्यांनी हे विषय समजावून घेतले नाहीत तर आपल्या देशातील शेती आणि अर्थव्यवस्था भयानक विनाशाच्या गर्तेत अडकून पडेल. हा विषय राजकारणापुरता मर्यादित ठेवून चालणार नाही, तर तो व्यापक अशा समाजकार्याचा अविभाज्य घटक बनला पाहिजे.' त्यांच्या बोलण्यात एक खंत होती. आपण राजकारण कुणासाठी करतो, कुणाच्या भल्यासाठी करतो, हे कार्यकर्ते समजून घेतील, तेव्हाच आपण घेत असलेल्या अभ्यास शिबिरांना काही अर्थ प्राप्त होईल. रूढ अर्थाने पक्ष वाढवणे, संघटना मजबूत करणे, लोकांच्या प्रश्नांसाठी आंदोलन उभे करणे या टप्प्यावरून जात असताना या सर्वांच्या पाठीमागे आवश्यक असणाऱ्या वैचारिक बैठकीचा आणि सामाजिक बांधिलकीचा हा एक नवा धडा पवारसाहेबांकडून हेमंत यांना मिळाला.

खोपोली घाटातून गाडी लोणावळ्याकडे मार्गस्थ झाली. सुपर एक्स्प्रेस हायवेची कामे त्या ठिकाणी सुरू होती. पवारसाहेब सहज रस्त्यांकडे डोकावून बघत होते. हायवेसाठी वापरात येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञान व कामाच्या दर्जाबद्दल घेण्यात येणारी दक्षता याबाबतचे वेगवेगळ्या देशातील दाखलेच त्यांनी द्यायला सुरुवात केली. थोड्या वेळापूर्वी शेतमालावर बोलणारे पवारसाहेब एखाद्या कुशल इंजिनिअरप्रमाणे या विषयावरही वेगळं सांगायला लागले. रस्त्याचा बराच भाग सरळ करण्याचा प्रयत्न दिसून येत होता. एका ठिकाणी अचानक फ्लायओव्हर समोर आला. तिथे

उड्डाणपुलाचे प्रयोजन संयुक्तिक वाटत नाही, असे हेमंत यांनी म्हटले आणि त्याला पवारांनी दुजोरा दिला. या रस्त्यावर कुणातरी महत्त्वाच्या व्यक्तींच्या जमिनी आणि बंगले आहेत. कदाचित ते वाचवण्यासाठी सरळ रस्ता वळणदार केला असेल, असे पवार म्हणाले. 'आपल्या सार्वजनिक कामांमध्ये आपण वैयक्तिक मतलबाला प्राधान्य देतो, हीच खरी शोकांतिका आहे. आपल्या राजकारण्यांनी वैयक्तिक हितसंबंध बाजूला ठेवून राज्याचा आणि देशाचा विचार केला, तर आपण आपले प्रकल्प चांगले घडवू शकतो. याबाबतीतही नेत्यांपासून सर्वांनी एका आदर्श नीतीचा अवलंब केला पाहिजे', असे ते म्हणाले. पुढे गेल्यानंतर त्यांनी पंतप्रधानांचे एक पत्र दाखवले. गुजरातमधील भूकंपानंतर केंद्र शासनाने 'नॅशनल डिझास्टर ग्रुप'ची स्थापना करून त्याच्या उपाध्यक्षपदी पवारसाहेबांनी काम करावे, असे सुचविण्यात आले होते. स्वतः पंतप्रधान या गटाचे अध्यक्ष म्हणून काम बघणार होते. सर्व पक्षप्रमुख हजर असताना हे काम पवारांनी करावे, असे एकमताने ठरले. पवारसाहेबांच्या कार्यकुशलतेवर दाखवलेला संबंध देशाचाच विश्वास त्यामधून स्पष्ट होत होता. लातूरच्या विनाशकारी भूकंपानंतर ज्या कल्पकतेने पवारसाहेबांनी पुनर्वसनाचे काम करून दाखवले होते, त्याला मिळालेली ही एक दादच होती. रूढ अर्थाने पक्षीय राजकारणाच्या बाहेरील आणि देशावर आलेल्या संकटांचा सामना करण्यासाठी नियोजन करणे, अशी फार मोठी व्यापकता त्यामध्ये होती.

बोलता-बोलता पवारसाहेब विविध क्षेत्रातील तंत्रज्ञानाबद्दल बोलत होते. वेगवेगळ्या विषयांमध्ये शिरत होते. हे सर्व एका विलक्षण गतीने घडत होते आणि थोड्या वेळाने हेमंत यांना कंटाळा आला असेल असे समजून त्यांनी प्रश्न केला, 'एवढ्यात एखादे चांगले पुस्तक वाचले आहेस का?' लेखक ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे चरित्रात्मक पुस्तक वाचल्याचे हेमंत यांनी सांगितले आणि ते पुस्तक मराठीत अनुवादित व्हायला हवे होते, असे हेमंत यांनी बोलताच पवारसाहेब म्हणाले की, 'हे पुस्तक मराठीतसुद्धा आलेले आहे.' ते संरक्षणमंत्री असताना अब्दुल कलाम यांच्याशी असलेले स्नेहसंबंध त्यांनी उलगडले. या महान वैज्ञानिकाला पंडित भीमसेन जोशींच्या गाण्याचे व्यसन असल्याचा अत्यंत वेगळा पैलू त्यांनी मांडला. पुस्तकांवरून गाडी सहजपणे नाट्यक्षेत्राकडे वळली. आपल्याला सध्या चांगली नाटके बघायला मिळाली नाहीत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. पण वेळ काढून बघण्यासारखे काही आहे का, याची त्यांनी चौकशी सुरू केली. त्यावर 'यदाकदाचित' नाटक बघा, असे हेमंत यांनी सुचविले. एखाद्या वेगळ्या फॉर्ममध्ये हास्याचे फवारे उडवत अत्यंत गंभीर होणारे हे नाटक अंतर्मुख बनवते, असे म्हणताच त्यांचा त्या नाटकातील अनेकांशी मित्रत्वाचा संबंध आहे, त्यामुळे या माध्यमातून होणाऱ्या मनोरंजनापेक्षा काही सामाजिक, राजकीय प्रश्नांना स्पष्ट करणारे विषय आपल्या रंगभूमीवर अभावानेच येतात, असे पवारांनी अगदी सहजपणे सांगितले. अनेक विषयांवर बोलताना या अजब व्यक्तिमत्त्वाला किती पैलू आहेत हे हेमंत यांच्या लक्षात आले.

राजकारणामध्ये राहूनही परिवर्तनाच्या दिशेने समाजाला प्रवास करायला लावणारे नेतृत्व दुर्मिळ असते. माणूस म्हणून शरद पवार हे दीपस्तंभासारखे आहेत, असे हेमंत म्हणतात.

❒❒❒

# विद्वत्तेची कदर

1981-82 च्या दरम्यान शरद पवार हे विरोधी पक्षनेते होते. पुण्यातील नारायण पेठेतील एक विद्यार्थी ऑक्सफर्ड विद्यापीठातून पदार्थ विज्ञानाची पदवी सुवर्णपदक मिळवून पास झाला होता. त्याची माहिती पवारसाहेबांना प्राप्त झाली. त्या विद्यार्थ्याचे अभिनंदन करण्याचा मनोदय त्यांनी सुरेश तौर यांच्याकडे व्यक्त केला. पवारसाहेब सुरेश तौर, त्यांचे बंधू ॲड. धनंजय तौर, शिवाजीराव आढाव यांना घेऊन नारायण पेठेत या हुशार, गुणवंत विद्यार्थ्याचा तपास करू लागले. त्यावेळी नारायण पेठेतील पत्र्या मारुतीच्या पुढे लोखंडे तालमीच्या अलीकडे त्या हुशार विद्यार्थ्यांचे घर सापडले. सर्वजण पडका जिना चढून त्याच्या घरी पोचले. पवारसाहेबांनी पुष्पगुच्छ देऊन त्याचे अभिनंदन केले. त्यावेळी त्या विद्यार्थ्याच्या आई-वडिलांचा आनंद गगनात मावेनासा झाला आणि त्यांनी साहेबांना शुभेच्छा देऊन 'तुमच्यासारखे विद्ववत्तेची कदर करणारे नेते या देशाला व महाराष्ट्राला लाभो', अशी इच्छा प्रगट केली.

❒❒❒

# राजकारणापलीकडची माणुसकी

शरद पवार यांनी राजकीय जीवनात अनेक कठीण प्रश्न सोडवले आहेत. मराठवाड्यातील भूकंपाने जग हादरले; पण त्यांनी स्थितप्रज्ञाप्रमाणे सतत तिथेच मुक्काम ठेवला. भूकंपग्रस्तांचे अश्रू पुसले. मुंबई बॉम्बस्फोटानंतर त्यांनी त्वरेने कार्यवाही केली आणि आश्चर्य म्हणजे दुसऱ्या दिवशी मुंबई सुरळीत झाली व महाराष्ट्राची घडी कधीच विस्कटू दिली नाही.

त्यांच्या चेहऱ्यावर संकटांचा तणाव कधीच प्रतिबिंबित होताना दिसत नाही. त्यांना मिळालेली ही दैवी देणगी आहे. ते जाणीवपूर्वक प्रयत्न करून हा तणाव बाजूला ठेवतात; कारण त्यामुळे लोकांना भेटताना संकोच होऊ नये हीच भावना असावी. गुणग्राहकता आणि व्यक्तिगत संबंध हे शरदरावांकडूनच शिकावे. ‘सारथी’ या संघटनेचे संस्थापक, अनेक औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी असलेले नागपूरचे अमर वझलवार यांनी एक अनुभव कथन केला आहे. ते दिल्लीला पवारांना व्यस्त कार्यक्रमांमध्ये भेटायला गेले होते. अनेक चाहत्यांना सौम्यपणे वेळ नसल्याचे सांगत पवारसाहेब गाडीत बसले आणि आश्चर्य म्हणजे एका तासात दिल्ली मुक्कामी संध्याकाळच्या भेटीची वेळ वझलवारांना दिल्याचा निरोप आला. नागपूरवरून मुद्दाम वझलवार दिल्लीला आले, याची जाणीव पवारांना झाली होती. वझलवारांचे एक नातेवाईक पवारांसोबत शाळेत होते. मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी सहज पवार यांना पत्र लिहिले, तर वाशी येथे जाताना त्यांची आवर्जून भेट घेतली तसेच त्यांच्या मुलीच्या लग्नातही पवारांनी

उपस्थिती दर्शविली. अशा प्रेमळ वागणुकीने पवार लोकांना जिंकतात. अनेक लोकांना त्यांचे हे बेरजेचे राजकारण वाटते. त्यांना हे समजत नाही की हे माणुसकीचे राजकारण आहे. यात नवीन संबंधांची सतत भर पडते आहे. हे सर्व सांभाळायला पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंतचाही वेळ कमी पडतो.

❏❏❏

# मॅक्सम्युलरच्या तत्त्वज्ञानातही रमणारा नेता

जैवतंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान अशा विश्वव्यापक विषयांत रमणारे शरदराव यांचे व्यक्तिमत्त्व किती संपन्न आहे, याची एक छोटीशी आठवण निशिकांत जोशी यांनी सांगितलेली आहे. एकदा शरदराव चिपळूणला आले होते. भारतीय तत्त्वज्ञानाचे गाढे व्यासंगी जर्मन पंडित मॅक्सम्युलर यांचा एक ग्रंथ जोशी यांनी त्यांना भेट दिला. ‘भारताकडून आम्ही इंग्लंडने काय शिकावे?’ असे मराठी नाव त्या ग्रंथाचे आहे. हे पुस्तक अवश्य वाचा, असे साहेबांना सांगितले. रात्री अकराच्या सुमारास ते विश्रांतीसाठी गेले आणि दुसऱ्या दिवशी सकाळीच बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठात जाताना शरदरावांच्या हातात ते पुस्तक होते. पहाटे तीन वाजेपर्यंत आपण सुमारे दोनशे पाने म्हणजे अर्ध्याहून अधिक पुस्तक वाचले आहे, असे त्यांनी सांगितले आणि अनेक घटनांची चर्चा केली. देशाचे संपूर्ण राजकारण पाहणारा, जगभर

फिरणारा, आधुनिक तंत्रज्ञानाचा पाठपुरावा करणारा असा हा नेता मॅक्सम्युलरच्या तत्त्वज्ञानातही तेवढ्याच आस्थेने रमतो, ही बाब महत्त्वाची म्हणावी लागेल.

❒❒❒

# विचाराधिष्ठित नेतृत्व

प्रजा समाजवादी पक्षातून अशोक मेहता आणि चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखाली शिवाजीराव गिरिधर पाटील, शरद पवार काँग्रेसमध्ये आले. शिवाजीराव पाटील यांनी काही आठवणी सांगितल्या. 1965 चा काळ होता. यशवंतरावजी यांच्या सल्ल्याने वसंतराव नाईक आणि वसंतदादा पाटील यांनी शिवाजीराव पाटील यांची महाराष्ट्राच्या काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्ती केली. शरदराव पवार महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रमुख होते. महाराष्ट्राचे झंझावती दौरे करून युवकांना काँग्रेसमध्ये आणण्याचे प्रयत्न त्यांनी त्यावेळेस केले. शरदरावांची पद्धत अशी होती की, योजना स्वतःला पटली की ती धडाक्यात सुरू करायची, पूर्णत्वास न्यायची आणि मग नेत्यांची मान्यता घ्यायची. याच पद्धतीने त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या साप्ताहिक पत्रिकेची योजना आणली. त्याची पूर्ण सज्जता केली. नंतर यशवंतरावजींना बोलावून त्यांच्या हस्ते सुरुवात केली. त्यावेळी त्यांनी काढलेले उद्‌गार असे होते की, ‘माझे तरुण आज एका नव्या उपक्रमाला सुरुवात करीत आहेत. हा प्रयत्न नवीन आहे. युवकांना संघटित करण्याच्या त्यांच्या कामात मी आनंदाने मदत करीन.’ एका तरुण

कार्यकर्त्याला त्या महान नेत्याच्या आश्वासनाने जे बळ आले, त्याने त्याचा पुढचा भविष्यकाळ उजळून गेला. तो कार्यकर्ता होता शरद पवार.

बारामतीचे पवार घराणे हे राजकीय जागृत घराणे, शेतकरी कामगार पक्षाचे पाईक असे त्यांचे स्थान आहे. शरदराव यांचे ज्येष्ठ बंधू वसंतराव पवार हे शेतकरी कामगार पक्षामध्ये गेले नाहीत. त्यांनी विचाराने काँग्रेस पक्ष पत्करला. महात्मा गांधी, पंडित नेहरू, यशवंतराव यांच्या नेतृत्वाची व काँग्रेसच्या विचारांची बैठक स्वीकारली. 1967 मध्ये शरदराव प्रथम प्रचंड मतांनी निवडून आले आणि काँग्रेसच्या युवकांना संघटित करण्याचे जोखमीचे काम करतानाच आपल्या मतदारसंघातील कोरडवाहू भागात विधायक कामांचा प्रचंड कार्यक्रम त्यांनी यशस्वी केला. राजकारणात विचारांची बैठक व लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या विकासाच्या कामाचा सतत प्रयत्न, त्यातून जी अमाप लोकप्रियता त्यांना मिळाली, त्यामुळेच आमदारकी सोडून ते लोकसभेच्या मतदारसंघात शिरले. तेव्हा त्यांच्या मतदार संघाच्या विकासाच्या प्रयत्नांचा पाठपुरावा करणाऱ्या पुणे जिल्ह्यातील सर्वच मतदारांनी त्यांना अक्षरशः डोक्यावर घेतले. विकासासंबंधी शरदरावांचा प्रयत्न आपला मतदार संघ किंवा आपला जिल्हा एवढ्यापुरता मर्यादित कधीच नव्हता, त्यांच्यासारखा साऱ्या महाराष्ट्राचा, सर्वच क्षेत्रांच्या व संपूर्ण समाजाच्या विकासाचा सर्वांगीण विचार करणारा नेता यशवंतरावजींनंतर दुसरा कोणी झाला नाही. राजकारण करताना शरदरावांनी समाजकारणाकडे दुर्लक्ष केले नाही. मराठवाडा

विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यायला भलेभले घाबरत; परंतु मराठवाड्यातला सर्वसाधारण समाज हा प्रश्न प्रतिष्ठेचा मानून रागवेल हे स्पष्ट दिसत असताना, सामाजिक न्याय देण्याच्या भावनेने त्यांनी हे पाऊल उचलले. रागावलेल्या लोकांचा दुरावा त्यांनी पूर्ण जाणिवेने सहन केला; पण निर्णय तडीस नेला.

महाराष्ट्राच्या बहुसंख्य नद्यांची खोरी तुटीची आहेत. एक वैनगंगा खोरे सोडले तर अधिक पाण्याचे क्षेत्र कोणत्याही खोऱ्यात नाही, म्हणूनच कमी पाण्यात वाढणाऱ्या फळझाडांचे प्रकल्प शरदरावांनी सुरू केले. दुष्काळी भागासह कोकणसारख्या नापीक समजल्या जाणाऱ्या जमिनीच्या क्षेत्रात फळबागांच्या शंभर टक्के अनुदानावर चाललेल्या प्रकल्पांनी सर्व क्षेत्र आज आर्थिकदृष्ट्या समृद्ध होत आहे.

❒❒❒

# विनोदाची दांडगी जाण

शरद पवार यांच्या तालमीत राजकारणाचे धडे गिरवलेले दिवंगत माजी शिक्षणमंत्री प्रा. रामकृष्ण मोरे यांचे पुणे जिल्ह्याच्या स्थानिक राजकारणातून पुढे पवारांशी मतभेद झाले. मात्र एकदा दोघांनी मतभेद मिटवायचे ठरवून आळंदी मुक्कामी कार्यकर्त्यांचा मनोमीलन मेळावा घेतला. त्यात ‘पवार साहेबांबरोबरचे मतभेद मी आज या मेळाव्याच्या साक्षीने इंद्रायणीत बुडवत आहे’, असे रामकृष्ण मोरे म्हणाले. पण त्यांचे

वाक्य पूर्ण होताच पवार उठले आणि म्हणाले, 'मोरे, इंद्रायणी नको. दुसरी एखादी नदी बघा, नाहीतर तुकारामांच्या गाथेसारखे आपले मतभेद पुन्हा वर तरंगायला लागतील.' आळंदी, तेथून वाहणारी इंद्रायणी नदी आणि तुकारामांचे वंशज असलेले प्रा. मोरे हा संदर्भ चपखलपणे जोडून पवारांनी केलेल्या या विनोदाने कार्यकर्त्यांची हसून हसून मुरकुंडी वळली.

❑❑❑

# मराठीविषयी कमालीची आस्था

1999 मध्ये 'कलासक्त', पुणे या नोंदणीकृत संस्थेतर्फे 'केल्याने भाषांतर' या त्रैमासिकाचे काम संस्थापक-संपादक विद्‌यासागर महाजन, डॉ. सुनंदा महाजन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हाती घेतले. आपण जी एक निराळी भाषा आत्मसात केली आणि जिच्यातील साहित्य वाचताना मनमुराद आनंद लुटला, ते साहित्य त्या भाषेतून मराठीत आणून मराठी वाचकांपर्यंत पोचवावे, या आंतरिक इच्छेने आणि तळमळीने 'केल्याने भाषांतर' हे त्रैमासिक प्रकाशित होऊ लागले आणि नियमित सुरू राहिले. मराठी भाषेत जर्मन, रशियन, जपानी अशा विविध परदेशी भाषांमधील उत्तमोत्तम साहित्य मिळवताना मराठी भाषकांची आणि मराठी भाषेची सेवा घडत राहावी, या हेतूने हे त्रैमासिक सुरू झाले होते. मात्र पुढे चालविण्यात काही अडचणी येत होत्या.

2003 च्या साहित्य संमेलनात 'केल्याने भाषांतर'चा अंक पवारसाहेबांच्या हाती पडला आणि तो वाचून त्यावरील दूरध्वनी क्रमांक पाहून त्यांनी स्वतः आपण होऊन संपादकांशी संवाद साधला. 'मी शरद पवार बोलतोय. तुमचा अंक पाहिला. तुमचे काम चांगले आणि महत्त्वाचे आहे. मी काय मदत करू शकतो, ते सांगा' असे त्यांनी म्हटले. त्यांचे शब्द ऐकून ही सर्व मंडळी भांबावून आणि नंतर भारावून गेली. पवारसाहेबांनी त्यांना मुंबईत बोलावून घेतले. प्रतीक्षा कक्षात मातब्बर मंडळी बसलेली असूनही या साहित्यकलोपासकांना आत बोलावून घेतले. सर्व अंक पाहून प्रकाशनाविषयी, छपाईसंबंधी, कागदाविषयी अनेक प्रश्न विचारले. अशोक जैन आणि सरोजिनी वैद्य यांचा या कामात असलेला सहभाग त्यांना मोलाचा वाटला. या त्रैमासिकाच्या कार्यात असलेल्या प्राध्यापक म्हणून आणि भाषांतरकार म्हणून वाटचालीची त्यांनी आस्थेने चौकशी केली. अडचणी समजून घेतल्या. साहित्यिक आणि साहित्य या क्षेत्राविषयी वाढते महत्त्व याविषयी चर्चा केली आणि पवारसाहेब या मंडळींच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले. मराठीविषयी कमालीची आस्था असणारा हा एकमेव नेता आहे असे डॉ. सुनंदा महाजनांचे मत आहे.

❒❒❒

# मैत्रीची जाण ठेवणारा नायक

## द्रष्टा विचारवंत आणि अभ्यासू मित्र

शरद पवार यांनी एवढी मोठी पदे भूषवूनही अनेक सामान्यांशी आपली मैत्री जपलेली आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शेती या सगळ्या क्षेत्रात त्यांचे श्रेष्ठत्व सर्वांनाच मान्य झाले आहे. एक अभ्यासू राजकारणी, कुशल प्रशासक, लोकसंग्राहक नेता त्याचप्रमाणे शिक्षण, तंत्रज्ञान, विज्ञान याबद्दल आस्था बाळगणारा द्रष्टा विचारवंत म्हणून ते ओळखले जातात. माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान याबाबतची त्यांना अद्ययावत माहिती असते. अभ्यासाला ते परिश्रमाची जोड देतात. कामात सतत मग्न असतात. अविश्रांत कष्ट करण्याची त्यांची तयारी असते. कित्येकदा दोन-दोन दिवस न झोपता ते काम करतात. राजकारणातच नव्हे तर सार्वजनिक जीवनातही असे व्यक्तिमत्त्व दुर्मिळ आहे. लोकसंग्रह हा त्यांचा फार मोठा गुण आहे. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांना तो छंद होता. त्याच वेळेस त्यांचे नेतृत्वगुण प्रगट होऊ लागले होते. सतत कोणत्यातरी विषयावर ते विद्यार्थ्यांना एकत्र करीत असत. खेळातही त्यांना रुची आहे. क्रिकेट बरोबरच खो-खो, हुतुतू अशा अस्सल देशी खेळांची त्यांना आवड आहे. एक क्रीडा प्रशासक म्हणूनही ते यशस्वी झाले आहेत. मित्रांना ते कधीच विसरत नाहीत. कितीही घाई असली तरी मित्रांसाठी वेळ काढतात. अनेक विषयांवर राजकारण सोडून ते बोलतात. जगभरात काय चाललेलं आहे, शेती

तंत्रज्ञान या बाबतीत काय प्रगती झाली आहे या विषयावर ते बोलतात.

प्रत्येक जिल्ह्यातीलच नव्हे तर तालुक्यातील राजकारण, त्यामधील व्यक्ती यांची त्यांना माहिती असते. त्यांच्याइतकी माहितगार व्यक्ती राजकारणात सध्यातरी कोणीच नाही. राजकारणाच्या हालचालींबद्दल जेव्हा त्यांना मित्र विचारतात, तेव्हा ते मित्रांची मते ऐकून घेतात. राजकारणाबद्दल आणि राजकीय व्यवस्थेबद्दल त्यांची स्वतःची अशी मते आहेत. मात्र ती सर्वांनी मान्य केली पाहिजे, असा त्यांचा आग्रह नसतो. मित्रांशी ते आजही अत्यंत सहजपणे आणि बरोबरीने वागतात.

पवारांचे एक मित्र ज्ञानेश्वर आगाशे यांनी त्यांचा अनुभव कथन केला आहे. ते मुंबईहून पुण्याला चालले होते. शरदराव यांनाही पुण्याला जायचे होते; परंतु ते विमानाने जाणार होते. मात्र ज्ञानेश्वर आगाशे मोटारीने जात आहेत, हे कळल्यावर आणि गाडीत जागा आहे हे कळल्यावर ते त्यांच्याबरोबर मोटारीने गेले. घरी ज्ञानेश्वर आगाशे यांना कळविता आले नाही कारण त्यावेळेस दळणवळणाची साधने आजच्यासारखी नव्हती. घरी गेल्यावर त्यांच्या घरी जो स्वयंपाक होता, त्यातच त्यांनी भोजन केले. वेगळे काही करू दिले नाही.

आपल्या मित्रांशी मित्रत्वाच्या नात्याने ते वागत असले तरी आपल्या पदाचा दुरुपयोग ते करणार नाहीत, करून घेणार नाहीत याबद्दल ते दक्ष असतात. ‘जे काही व्यवहार्य, शक्य आणि न्याय्य असेल तेच मी करीन’ असे ते प्रांजळपणे सांगतात.

शेतीच्या बाबतीत परदेशात काय सुरू आहे याबद्दल त्यांचा फार मोठा अभ्यास आहे. इंग्लंडमधील शेती तंत्रज्ञान, विद्यापीठ आणि संशोधन यावर त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले आहे. आपल्याकडे ते तंत्रज्ञान कसे आणता येईल याचा विचार ते सतत करीत असतात. फलोत्पादन, फळांची साठवण, शीतगृहे आदींच्या तंत्रज्ञानाबद्दलची माहिती त्यांना इंग्लंडच्या दौऱ्यात झाली होती. कोणत्याही मोसमात फळांचे उत्पादन करण्याची क्षमता भारताकडे आहे, मग त्यांची निर्यात का केली जाऊ नये, असा सवाल त्यांनी केला होता. राज्यात परतल्यावर ते कामाला लागले आणि आपल्या फळांची निर्यात सुरू झाली. द्राक्ष, डाळिंब परदेशात पाठविण्यासाठी पायाभूत सुविधा त्यांनी उभारल्या आहेत.

❑❑❑

# मैत्री योग्य नेता

बापूसाहेब काळदाते यांनी शरद पवारांच्या अनेक आठवणी सांगितल्या आहेत. शरद पवार हे त्यांचे अनेक वर्षांपासूनचे पारिवारिक मित्र. राजकीय क्षेत्रात मात्र त्यांचे अनेक मतभेद असतानाही त्यांची मैत्री अबाधित राहिली. राजकीय पक्षांच्या पलीकडे जाऊन शरद पवार मैत्री जपतात, हे वैशिष्ट्य साऱ्या महाराष्ट्राला माहिती आहे. सर्व क्षेत्रांमधील व्यक्तींचा व्यापक परिचय असणारे शरद पवार यांच्याशिवाय दुसरे नेतृत्व या देशात नाही. शरद पवार यांच्या स्नेहयांचा एक परिवार तयार करण्यामध्ये त्यांच्या पत्नी सौ. प्रतिभा पवार यांचेही मोलाचे

योगदान आहे. शरद पवारांचा आणि बापूसाहेबांचा संबंध 1967 साली ते लातूरहून आणि शरद पवार बारामतीतून प्रथमच निवडून सभागृहात गेले होते, तेव्हा आला. एक तरुण, संघटन कुशल असा युवक नेता अशी त्यांची प्रतिमा होती. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे मानसपुत्र म्हणून महाराष्ट्र पवारांना ओळखतो. महाराष्ट्र घडविणाऱ्यांमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे नाव अग्रणी आहे. त्यांनी उभी केलेली सहकारी चळवळ आणि पंचायत राज यांमुळे ग्रामीण भागात नवे नेतृत्व महाराष्ट्रात निर्माण होऊ लागले. याच मुशीत शरद पवार तयार झाले आहेत.

1972 मध्ये पवार पहिल्यांदा मंत्री झाले आणि त्यांच्या प्रशासनिक गुणवत्तेला संधी मिळाली. जुना अनुभव आणि पार्श्वभूमी यांमुळे ते अधिक परिणामकारक काम करू शकले. त्यांनी आपले सामर्थ्य अनेक वेळा सिद्ध करून दाखवले. 1978 मध्ये शरद पवार जनता पक्षाच्या प्रमुख पाठिंब्यावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. विविध पक्षांमध्ये व्यवस्थित समन्वय घडवून आणण्यात त्यांनी कौशल्य दाखवले. सामाजिक न्यायाच्या संदर्भात मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्ताराचा प्रयत्न त्यांनी त्यावेळी केला. ते पुन्हा मुख्यमंत्री झाले तेव्हा 1992-93 मध्ये त्यांनी मराठवाड्यासाठी तीन महत्त्वाचे निर्णय घेतले. मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव जोडून केला, नांदेड येथे रामानंद तीर्थ यांच्या नावाने नवे विद्यापीठ सुरू केले आणि वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली. या प्रक्रियेत बापूसाहेब त्यांच्या संपर्कात सातत्याने होते. घ्यावयाच्या निर्णयांचा

तपशील ठरवून येणाऱ्या अडचणींचा विचार करून त्यावर मात करण्याची योजनाही आखण्यात ते सोबत होते.

बाबा आढाव यांनी 'एक गाव, एक पाणवठा' ही चळवळ सुरू करून महाराष्ट्रात समतेचे एक नवे वारे निर्माण केले. वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात शरद पवार गृहराज्यमंत्री होते. त्यांनी 'एक गाव, एक पाणवठा'साठी एक समिती गठीत केली. या समितीचे बापूसाहेब एक सदस्य होते. ही चळवळ महाराष्ट्रात सर्वदूर नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शरद पवारांचा बहुतांश वेळ प्रशासनाच्या कामात गेल्यामुळे त्यांना या चळवळीकडे एकमेव कार्य म्हणून पाहता आले नाही; परंतु त्यांनी मोलाचे सहकार्य केले. 1975 मध्ये ते राज्यात कृषीमंत्री होते. बापूसाहेब सत्याग्रह करणार आहेत, हे त्यांना माहीत झाले होते. बापूसाहेब पुण्याला गेले, तेव्हा पवारांचा फोन आला आणि त्यांना घेऊन पवारसाहेब मुंबईला गेले. सोबत घरी नेले. त्यांनी सौ. प्रतिभा पवार यांना सांगितले, 'हे उद्या सत्याग्रह करून जेलमध्ये जाणार आहेत. केव्हा सुटतील हे सांगता येत नाही. त्यांच्यासारखे धाडस मी करू शकत नाही.' आणीबाणीबद्दल व्यथा आणि असहायता त्यांनी व्यक्त केली. त्या दिवशी त्यांनी जेवणात बापूसाहेबांच्या आवडीचे पदार्थ खाऊ घातले आणि त्यानंतर निरोप दिला.

औरंगाबादमध्ये मंत्रिमंडळाची बैठक होती. त्यावेळेस बापूसाहेबांनी सत्याग्रह करायचे ठरवले होते. सत्याग्रह करून अटक होताच पवार त्यांच्या घरी गेले आणि त्यांच्या पत्नी सौ. सुधाला

त्यांनी धीर दिला व तुरुंगात वाचायला बरीच पुस्तके पाठवून देण्याची व्यवस्था केली.

1978 साली पुलोद सरकारचे मुख्यमंत्री झाल्यापासून शरद पवार यांचा महाराष्ट्रातील डाव्या चळवळीशी संपर्क वाढत गेला आणि या चळवळीतील समतेच्या आग्रहाचे काही परिणाम त्यांच्यावर होत गेले. त्यांनी उचललेली पावले बापूसाहेबांना अनेक वेळा पसंत नसली तरी त्यांनी आपला संपर्क मात्र शेवटपर्यंत कमी केला नाही आणि मैत्री जोपासली.

❑❑❑

# दिलदार वर्गमित्र

बारामती मुक्कामी बिगरी ते मॅट्रिकपर्यंतचे जे विद्यार्थी एकमेकांसोबत होते, त्यात शरद पवार आणि ज्यांनी हा अनुभव कथन केला, त्यात पुण्याच्या रजनी शहा आणि निळकंठ निबंधे हेही होते. बारामती म.ए.सो. हायस्कूलची 1958 ची अकरावीची म्हणजेच मॅट्रिकची ही बॅच होती. 1957-58 च्या बॅचचा एखादा मेळावा घ्यावा, एखादे स्नेहसंमेलन घ्यावे, असा विचार काही वर्गमित्रांच्या मनात ठरला. सर्वांचे पत्ते जमवून पत्रव्यवहार करून कार्यक्रम आखला गेला. 23 जुलै 2000 दिवस ठरला होता. त्यांचा एक मित्र म्हणजे शरद पवार हे जागतिक कीर्तीचे नेते आहेत, याची झिंग काही निराळीच होती. सर्व ठिकाणाहून त्यांचे मित्र तिथे आले आणि शरद पवारांनीसुद्धा 'येतो' असे उत्तर दिल्यामुळे सर्व वर्गमित्रांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. जवळपास 42 वर्षांनी

साठीच्या जवळपास गेलेले 55 विद्यार्थी-विद्यार्थिनी आपापल्या जोडीदारासह जमणार होते.

निलायम थिएटरजवळ हॉटेल अशोका येथे सनईचे सूर निनादू लागले होते. अडीच वाजता शरद पवार यांचे आगमन झाले. अडीच ते पाच हा वेळ शरद पवारांनी या वर्गमित्रांसाठी दिला होता. त्या वेळात एक राजकारणी नेता, पुढारी सर्व बिरुदे बाजूला सारून केवळ ते वर्गमित्र म्हणूनच त्यांच्यासोबत राहिले. सर्व मोठेपणा विसरून मित्रांसोबत शाळेत असल्याप्रमाणे त्यांनी सर्वांची अगत्यपूर्वक चौकशी केली. 'वर्गात मी सर्वात शेवटच्या बाकावर कोपऱ्यात शेजारी बसत होतो', अशी आपली आठवण सांगत सर्वांना नावानिशी ओळखले. आपल्याला शरदरावांनी ओळखले याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर होता. सर्व शिक्षक मंडळींनाही त्यांचे खूप कौतुक वाटले. त्यांच्याविषयी योग्य तो आदर दाखवून श्री. शरद पवारांनी मित्रांना आपल्या अनुभवसंपन्न जीवनातील काही किस्से सांगितले. जुन्या मित्रांना मिळालेले ते एक प्रकारचे मार्गदर्शन होते. लहानपणची एखादी मिस्किल आठवण सांगून ते हशा पिकवीत होते. आजूबाजूला कडेकोट बंदोबस्त नाही, कार्यकर्ते नाहीत, केवळ मित्र म्हणून ते आले होते. सर्वांचा यावर विश्वास बसत नव्हता. पुढील भेटीचे बारामती येथील त्यांच्या फार्महाऊसवर येण्याचे सर्वांना त्यांनी आवर्जून निमंत्रणही दिले. असा हा नेता सर्वांची नावानिशी अगत्याने चौकशी करतो याचाच सर्वाधिक आनंद सर्व मित्रांना झाला होता.

❒❒❒

# मैत्रीची जपणूक

स्क्वॉश आणि बॅडमिंटन या खेळात संपूर्ण महाराष्ट्र गाजविणाऱ्या दत्ता शिंदे आणि शरद पवार यांची खास मैत्री होती. महाराष्ट्राचा चॅम्पियन आपला खास मित्र असल्याचा शरदरावांना खूप अभिमान होता. त्यामुळे दत्ताजींच्या सर्व मॅचेस बघायला शरदराव आपल्या मित्रमंडळींना घेऊन जात. दत्ताजींचे टॉन्सिलचे ऑपरेशन झाले होते, तेव्हासुद्धा न चुकता दररोज हॉस्पिटलमध्ये ते भेटायला जायचे. 1961 साली दत्ताजींचे मित्र व बॅडमिंटनचे पार्टनर डॉ. विजय जोशी यांनी दत्ताजींना क्रीडा साहित्याचे दुकान सुरू करण्याबाबत सुचविले. ही कल्पना शरदरावांपुढे मांडल्यावर “आपण फड गाजवलेले पाटील लोक, धंदा जमणार आहे का?” असा आपुलकीने प्रश्न विचारला. पण दत्ताजीही जिद्दी. त्यांनी 12 एप्रिल 1961 ला टिळक रोडवर श्री. सुधीर फडके म्हणजेच बाबूजी यांच्या जागेत दुकान सुरू केले. सुरुवातीला पवारांनी विरोध दर्शवला होता, तरीही त्यांनी दुकानासाठी धावपळ केली, मदत केली; पण नियतीला पाहावले नाही. 12 जुलै रोजी पानशेत धरण फुटून संपूर्ण दुकान पाण्याखाली गेले. दत्ताजींनी आपल्या मोटरसायकलवरून शरदरावांसह लकडी पूल पार केला होता आणि क्षणातच पूल पाण्याखाली गेला होता. दुकानाचे नुकसान भरून काढण्यासाठी व दुकान वाढवण्यासाठी पवारांनी नंतरही मदत केली. दुकान पुन्हा सुरू झाले आणि भरभराटही झाली, असा अनुभव दत्ताजींच्या पत्नी आशा दत्तात्रय शिंदे यांनी सांगितला.

❒❒❒

# एक मित्र

बापूसाहेब थिटे यांनी पवारांच्या संदर्भात त्यांच्या विद्यार्थीदशेतील काही आठवणी सांगितल्या आहेत. 1959-60 मध्ये थिटे स.प. महाविद्यालयात होते. आंतर महाविद्यालयीन क्रीडास्पर्धांच्या निमित्ताने शरद पवारांची ओळख झाली. पुढे थिटेंनी एम.ई.एस. महाविद्यालयात (आताचे गरवारे महाविद्यालय) प्रवेश घेतला. भारतीय खेळांचे जनरल सेक्रेटरी म्हणून थिटे निवडून आले. ते मंगळवार पेठ युवक काँग्रेसच्या ब्लॉक शाखेचे अध्यक्षही झाले. त्यावेळी शरद पवार बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाचे (बी.एम.सी.सी.) क्रीडा प्रतिनिधी होते. त्यांनाही सामाजिक कार्याची आवड होती. त्यातून त्यांची ओळख वाढली. युवक काँग्रेस राज्य अधिवेशन होण्यापूर्वी शरद पवारांची सोमवार पेठ लोक समितीच्या युवक शाखेच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. त्यांच्या राजकीय जीवनाचा तो श्रीगणेशा होता. आज आपण शरद पवारांना बारामतीतून निवडून येणारा नेता, असे म्हटले तरी त्या काळात त्यांची खरी राजकीय जीवनाची सुरुवात पुण्यातून झालेली होती. त्यावेळेस बॅरिस्टर अंतुले हे राज्य पातळीवरील युवक काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांना मुख्य कार्यकारिणी सरचिटणीस म्हणून संधी मिळाल्यामुळे अध्यक्षपद रिकामे झाले होते. त्या जागेवर निवडीसाठी फलटणचे बॅरिस्टर राजा भोसले हे इच्छूक होते; पण शरद शरद पवारांनी सर्व प्रतिनिधीशी बोलून बांधणी केली आणि पवारांची अध्यक्षपदी नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून बघितले नाही.

आपल्या युवक काँग्रेस अध्यक्षपदाच्या कालावधीत पवारांनी राज्यभर कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण केले. त्यांच्या भावी जीवनात ही जुळणी खूप महत्त्वाची ठरली. निवड झाल्यानंतर फक्त कार्यकर्त्यांची बांधणी करायची एवढेच मनाशी न बाळगता आपले कार्यकर्ते अधिक डोळस बनले पाहिजेत, राज्यात आणि देशात विविध क्षेत्रात कोणते प्रयोग चालले आहेत, याची त्यांना माहिती असली पाहिजे, यासाठी शरद पवार यांची धडपड असायची. त्यासाठी त्यांनी त्या काळात 'नवयुवक' नावाचे मासिकही काढले होते. त्याचे संपादक तेच होते. या मासिकात शेतीपासून नव्या उद्योगांपर्यंत, कुक्कुटपालनापासून दुधाच्या धंद्यापर्यंत सगळ्यांची माहिती असायची. इतकेच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर उद्योग क्षेत्रात काय चालले आहे, याचीही माहिती त्यात असायची. यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री झाल्यानंतर शरद पवारांनी त्यांच्या वीस-पंचवीस मित्रांना पंजाबच्या दौऱ्यावर नेले होते. त्यावेळेस देशात येणाऱ्या कच्च्या मालापैकी दोन तृतीयांश कच्चा माल हा पंजाबमधील उद्योगांना लागायचा. तेथे प्रक्रिया होऊन हा माल देशभर विकला जायचा. पंजाबने शेती आणि उद्योग या दोन्ही क्षेत्रात चांगली कामगिरी केली होती. आपल्या महाराष्ट्राचे शेतीबरोबरच उद्योग सुरू झाले पाहिजेत व त्यामध्ये युवकांनी आघाडी घेतली पाहिजे, असे शरद पवार यांचे मत होते आणि त्यातूनच हा दौरा आकाराला आला होता.

❐❐❐

# मुलाखतींतून जाणवणारे व पत्रकारांना भावलेले शरद पवार सुधीर गाडगीळांना भावलेले पवारांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

शरद पवारांची आणि सुधीर गाडगीळ यांची फार जुनी मैत्री. गाडगीळ पत्रकारिता करीत असताना पवारांचा त्यांच्याशी अनेकदा संपर्क आला आणि निवेदक म्हणून सुधीर गाडगीळ यांनी पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात पवारांची एक दिलखुलास प्रगट मुलाखत घेतली होती. बारामतीला अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने सुधीर गाडगीळ गेले होते. त्यांनी पवारांचे काम स्वत: बघितले होते.

शरद पवारांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे विरोधकांच्या टीकेवर कणमात्र भाष्य न करता ते त्यांना दुर्लक्षून संपवतात, क्वचित खट्याळ टिप्पणी करून टीकाकारांना चेष्टेचा विषय करतात. साहित्यिकांपेक्षाही नेमक्या आणि मोजक्या शब्दात घटना आणि व्यक्तींवर प्रतिक्रिया नोंदवणे हे त्यांचे वैशिष्ट्य दिसून आले आहे. एकाच वेळी कलेपासून शेतीपर्यंत सर्वच क्षेत्रातील व्यक्तींशी त्यांचा दांडगा संपर्क असतो. त्या संपर्कातून ते स्वतःला सतर्क म्हणजेच अपडेट ठेवतात. त्याचबरोबर असंख्य व्यक्तींच्या संपर्कात असूनही नको असलेल्या

व्यक्तींना टाळणे त्यांना सहज जमते. माणसांना ओळखण्याच्या बाबतीत त्यांच्याइतकी परिपक्वता आणखी कोणाकडे नाही.

वेळेचे उत्तम नियोजन करून अखंड काम करण्याची त्यांची क्षमता ही चकित करून टाकणारी आहे. कदाचित हेच त्यांच्या यशाचे रहस्य असावे. महाराष्ट्रातील गावोगावच्या छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांना ते त्यांच्या नावानिशी ओळखतात. त्यांची स्मरणशक्ती दांडगी आहे. राजकारणात आवश्यक असे वैविध्यपूर्ण कौशल्य असलेला असा नेता अन्य कोणाच्याही पाहण्यात आला नसावा. एकदा सुधीर गाडगीळ यांनी याविषयी त्यांच्या कौशल्याचे रहस्य विचारले होते. त्यावर ते म्हणाले की, “हे आमचे ट्रेड सिक्रेट आहे.” असे खुमासदार उत्तर दिल्यानंतर बोलण्याच्या ओघात त्यांनी सांगून टाकले की बारामतीच्या आठवडी बाजारात लहानपणी ते जात असत. तेथे काम करताना परिसरातील सर्व प्रकारच्या लोकांशी त्यांचा संपर्क यायचा. लोकांना लक्षात ठेवले, नावानिशी ओळखले की आवडते, हे त्यांच्या लक्षात आले होते. तेच कौशल्य पुढे त्यांना सार्वजनिक जीवनात उपयोगी पडले.

नाना प्रकारच्या व्यक्तींना त्यांना तोंड द्यावे लागते आणि सर्वांनाच वेळ देणे शक्य नसल्यामुळे काहीजणांना त्यांना खुबीने टाळावे लागते. नको असलेल्या व्यक्तींना टाळणे त्यांना सफाईने जमते. बोलण्याच्या ओघात किंवा जाहीर प्रश्नांची उत्तरे टाळताना ते समोरच्याला अपमानित करीत नाहीत. टाळावयाचा विषय सभ्यपणे दुसऱ्या विषयावर नेऊन ते टाळतात. अशा वेळी ते कोणालाही नाउमेद करत नाहीत.

बालगंधर्व रंगमंदिरात त्यांची आणि त्यांच्या पत्नी सौ. प्रतिभा पवार यांची प्रकट मुलाखत सुधीर गाडगीळ यांनी घेतली होती. पवारांनी त्यांच्या संभाषणचतुरतेची झलक वारंवार दाखवली. अनेक प्रश्न त्यांनी खुबीने टाळले होते, तर बऱ्याच प्रश्नांची उत्तरे दिली होती. त्यांचा हजरजबाबीपणा हा गुण श्रोत्यांना चांगलाच आवडतो. पवारांना सौ. प्रतिभाताई यांच्याबद्दल विचारले असता कपड्यांच्या खरेदीपासून घरातील महत्त्वाचे निर्णच प्रतिभा पवारच घेत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. त्यांना अडचणीत टाकणारा प्रश्न होता की, "रामकृष्ण मोरे यांनी तुमच्या कमकुवत बाजू व त्रुटींबद्दल लेख लिहिला आहे. या लेखाबद्दल तुमचे मत काय आहे?" या प्रश्नाचे उत्तर न देता त्यांनी "त्या लेखाचा अभ्यास करीत आहे" असे उत्तर देऊन रामकृष्ण मोरे यांचा अवमानही केला नाही आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल रामकृष्ण मोरे यांच्या मतांवर टिप्पणीही केली नाही. असे हे शरद पवारांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे.

❑❑❑

# निगर्वी, कणखर सहधर्मचारिणी प्रतिभाताई पवार

विजया पाटील यांनी शरद पवारांच्या सहधर्मचारिणी प्रतिभाताई पवार यांची मुलाखत एकदा घेतली होती. ब्रिगेडियर राणे या आर्मीमध्ये वरिष्ठ पदावर असणाऱ्या आजोबांच्या

सहवासात वाढलेली प्रसिद्ध क्रिकेटपटू सदू शिंदे यांची प्रतिभा ही सर्वात मोठी कन्या. पुण्यात प्रभात रोडवर या मुलीचे बालपण गेले. आई श्रीमती निर्मला शिंदे यांनी त्या काळामध्ये एल.आय.सी.मध्ये काम करून आपल्या मुलींना मोठे केले. अशा घरगुती व शिस्तबद्ध वातावरणात वाढलेली ही तरुण मुलगी वयाच्या अठराव्या वर्षी शरद पवारांशी विवाहबद्ध झाली आणि तिचे सगळे आयुष्यच बदलले. विवाहानंतर बारामतीसारख्या गावातील वेगळ्या वातावरणात पवारांच्या घरात प्रतिभाताईंनी प्रवेश केला. सासू-सासरे, दीर-जावा, नणंदा, या सर्वांची मुले, इतर नातेवाईक या सर्वांचा गोतावळा. दररोज शेकडोंच्या संख्येने असणाऱ्या घरातील माणसांचा राबता, सासरच्या रीतिभाती या सर्व गोष्टी समजावून घेत, आपल्यामध्ये सामावून घेत स्वतःमध्ये त्याप्रमाणे बदल घडवत आपल्या जीवनाची वाटचाल त्यांनी सुरू केली आणि शरद पवार या भारदस्त व्यक्तिमत्त्वाबरोबर वैवाहिक जीवनाची इतकी वर्षे कशी गेली ते त्यांना कळलेही नाही. प्रतिभाताईंना जवळून ओळखणारे सर्वजण सांगतात की 1967 पासून सुरू झालेली वाटचाल यशस्वी रीतीने त्यांनी पूर्ण केली.

प्रतिभाताई पवार तशा मुलाखतीपासून थोड्या लांब असतात; पण त्या आपल्या आयुष्याबद्दल जेव्हा बोलतात, तेव्हा त्यातला सच्चेपणा, स्पष्टपणा ऐकत राहावासा वाटतो. विजया पाटील यांनी घेतलेल्या मुलाखतीतून प्रतिभाताईंचे निगर्वी पण तितकेच कणखर व्यक्तिमत्त्व आपल्या लक्षात येते.

राजकारणापासून अत्यंत अलिप्त असणाऱ्या एका घराण्यातील त्या होत्या आणि त्यांनी राजकारणात सक्रिय असणाऱ्या तरुणाशी विवाह करण्याचे कसे काय ठरवले, असा प्रश्न त्यांना विचारला तेव्हा त्याविषयी त्या म्हणाल्या की, त्यांच्या घरच्यांनी सांगितले की मुलगा चांगला आहे. घराणे चांगले आहे. राजकारण म्हणजे नक्की काय किंवा या घरात आल्यानंतर पुढे कसा प्रवास करावा लागेल, एवढा विचार त्यावेळी त्यांनी केला नाही आणि कदाचित त्यामुळेच अशा प्रकारचा दूरगामी विचार केला गेला नसावा.

सतत माणसांच्या गराड्यात राहणाऱ्या, दिवसाचे अठरा ते वीस तास काम करणाऱ्या शरद पवार नावाच्या व्यक्तीबरोबर संसार करणे ही सोपी गोष्ट नसतानाही आव्हान त्यांनी कसे पेलले, याविषयी प्रतिभाताई पवार म्हणाल्या की, 'लग्नापूर्वी ते पाच वाजता येणार म्हणजे पाचलाच यायचे. त्यावेळी वेळेच्या बाबतीत अत्यंत काटेकोर असायचे. लग्नानंतर वाढत्या जबाबदारीमुळे वेळ पाळणे शक्य झाले नाही. तरी आज येतो म्हणून सांगितले म्हणजे ते येणारच, मग रात्री कितीही वाजोत. कार्यक्रमात बदल झाला तर कोणत्याही माध्यमातून त्यांच्यापर्यंत निरोप पोचणारच, ही गोष्ट लग्न झाल्यापासून आजपर्यंत त्यांनी कटाक्षाने पाळली आहे आणि त्याचे समाधान आहे'.

पवारसाहेबांच्या डोक्यात सतत पर्यावरण, पाणी, झाडे, उद्योगधंदा, शेती, सहकार, माहिती तंत्रज्ञान हे विचार असतात, तेव्हा सौ. प्रतिभा त्यांच्यासोबत असतात तेव्हा त्यांचा कसा

अनुभव आहे, हे विचारल्यावर त्या म्हणाल्या की, 'आम्ही सोबत प्रवास करतो तेव्हा त्यांच्या बोलण्यात आजूबाजूचे डोंगर कसे हिरवे होतील, पाऊस त्या भागात किती झाला, पिके कोणती घेतली पाहिजेत, कोणते उद्योग उभे झाले पाहिजेत, पाण्याचा वापर कसा करायला पाहिजे हे आणि यासारखे अनेक विषय असतात. ज्यामध्ये त्यांना मुळातच रुची आहे, अशा शिक्षण, शेती, पाणी यांसारख्या गोष्टींसाठी त्यांना अधिक वेळ देता आला तर त्यासारखी दुसरी चांगली गोष्ट नाही.'

शरद पवारांबरोबर प्रतिभाताईंचाही देश-विदेशातील राजकारण, समाजकारण, शिक्षण, कला क्षेत्रातील अनेकांशी संपर्क येतो. तेव्हा त्यांना त्यांनी उंची पेहराव करावा, दागिने घालावे असे वाटत नाही का? हा प्रश्न विचारल्यावर प्रतिभाताई म्हणाल्या की, 'मला मुळातच दागिने घालण्याची आवड नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात दागिने घालत नाही. मला आवडतात त्या प्रकारच्या साड्या नेसते. कोणत्या साडीला किमती म्हणावे, हे त्या व्यक्तीवर अवलंबून आहे. त्यामुळे मला असे वाटत नाही की मी साधी राहते किंवा हे साधेपणाचे लक्षण आहे. मला जसे राहायला आवडते, तसे मी करते.'

असे विचारण्यात आले की पवारसाहेबांच्या सगळ्या प्रवासामध्ये त्यांच्या आयुष्यातील एक टप्पा असा होता की ज्या वेळी ते सहजीवन अधिक वेळ एकत्रितपणे घालवू शकत होते, तो काळ म्हणजे पवारसाहेबांचे देशाचे संरक्षणमंत्री होते तेव्हाचा. देश तसा वेश करण्याचा प्रतिभा पवारांचा स्वभाव आणि दिल्लीत

असताना तेथील मित्र मंडळ, शिस्तबद्ध आयुष्य यांचा आनंद त्यांनी घेतला, त्याबाबत त्यांना विचारताच त्या म्हणाल्या की त्यांचे 'आजोबा आर्मीत असल्याने शिस्तीच्या जीवनाचा परिचय होता. सर्व गोष्टी वेळेवर व्हायच्या आणि नंतर मात्र कोणत्याच गोष्टीची वेळ नाही, हेही अंगवळणी पडले होते. तेही सहजपणे स्वीकारले. मात्र पवारसाहेब संरक्षणमंत्री झाले तेव्हा सुप्रियाचे लग्न झाले होते आणि त्याअर्थी रिकामपण मिळत होते. त्यामुळे त्यांना ती मिनिस्ट्री आवडली. जरी पवारसाहेब खूप काम करायचे तरी थोडा शांतपणा मिळाला होता.'

लग्न झाल्यानंतर पहिल्या एक-दोन वर्षात एकदा बारामतीला संक्रांत, हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाच्या वेळी जमलेल्या महिलांनी प्रतिभाताई पवार यांना नाव घ्यायचा आग्रह केला होता. त्यावेळी त्यांनी उखाणा घेतला होता की 'नाशिकची द्राक्षे आणि नागपूरची संत्री, शरदराव होतील खात्रीने मंत्री' हा उखाणा घेताना प्रतिभाताईंना त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव झाली होती, म्हणून तसं नाव घेतलं होतं का? असा प्रश्न त्यांना विचारला तेव्हा त्यांनी उत्तर दिलं होतं, ज्येष्ठ कवयित्री संजीवनी मराठे प्रभात रोडला त्यांच्या घरासमोरच राहायच्या. त्यांचे लग्न ठरले आणि मुलगा आमदार आहे, हे कळल्यावर संजीवनीताई म्हणाल्या होत्या की, 'मुलगा आमदार आहे ना मग मी तुला सांगते तो उखाणा घे.' तेव्हा त्यांनी गमतीने सांगितलेला उखाणा प्रतिभाताईंनी घेतला होता. पवार मंत्री होतील किंवा ते व्हायला पाहिजेत वगैरे विचारांनी त्यांनी ते नाव घेतले नव्हते.

प्रतिभाताई घरी काम करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांची काळजी घेतात. अनेक कामे स्वत: करतात. पवारसाहेबांबरोबर रात्री उशिरा आलेल्या अनेक पाहुण्यांनाही स्वयंपाक करून जेऊ घालतात. स्वच्छता करणारा न आल्यास स्वत: घराची साफसफाई करणाऱ्या प्रतिभाताई शरदरावांच्या प्रत्येक निर्णयात, सर्वच बाबतीत त्यांना साथ देतात. साधी राहणी, निगर्वी व्यक्तिमत्त्वाच्या पण कणखर अशा या प्रतिभाताई आहेत.

❒❒❒

# लोकसत्ता आयडिया एक्स्चेंज 2011 आणि पवार

2011 च्या 'लोकसत्ता आयडिया एक्स्चेंज'मध्ये शरद पवार यांनी हजेरी लावली आणि लोकसत्तातील पत्रकारांबरोबर त्यांच्या गप्पा अडीच तास रंगल्या होत्या. त्यातील काही ठळक मुद्द्यांचे स्मरण करणे आवश्यक आहे.

पवारांना गिरीश कुबेर यांनी प्रश्न विचारला होता की 'यूपीए 1 आणि यूपीए 2 या सरकारांमध्ये फारच फरक जाणवतो. राजकीय अस्थिरता सध्या बघायला मिळत आहे. अशा वेळी घटक पक्षांचे नेते किंवा सक्षम मंत्री म्हणून आपल्याला काय वाटते?' त्यावर पवारसाहेब म्हणाले होते की, '2004 ते 2009 या यूपीए सरकारच्या पहिल्या डावात देशात विश्वासाचे वातावरण होते. पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्याबद्दल जनसामान्यांत चांगली

भावना होती. ते राजकीय नेते नसले तरी त्यांना प्रश्नांची चांगली जाण होती. विचारांची स्पष्टता होती. त्यांच्या राजकीय मतांबद्दल उजवे-डावे होऊ शकते; पण डॉ. सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए 1 सरकारने विविध क्षेत्रात चांगली प्रगती केली होती. त्याचा फायदा 2009 मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत यूपीएला झाला. डॉ. सिंग यांच्याबद्दल असलेल्या आदराच्या भावनेने लोकांनी पुन्हा या सरकारवर विश्वास दर्शवला. शहरी तसेच ग्रामीण भागातील लोकांनी सरकारच्या धोरणांवर सुरुवातीपासूनच शिक्कामोर्तब केले. सरकारचा दुसरा कालखंड सुरुवातीपासूनच वादग्रस्त ठरला. भारताचे नियंत्रक आणि महालेखापालांनी (कॅग) 3 जी मध्ये मिळालेल्या उत्पन्नाच्या आधारे 2 जी मध्ये 1 लाख 72 कोटींचा घोटाळा झाल्याचा निष्कर्ष काढला. नक्की किती नुकसान झाले याबद्दल दुमत आहे. आकडेवारीबद्दल वाद आहे. एवढी रक्कम सरकारी खजिन्यात जमा होण्याची शक्यता होती, असे कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आले. या ‘शक्यता’ शब्दाने सारा गोंधळ झाला. लोकांना वाटले एवढ्या रकमेचा भ्रष्टाचार झाला. तेव्हापासून सरकारच्या विश्वासार्हतेला तडा गेलेला आहे. तत्कालीन दूरसंचार मंत्री ए. राजा यांना अटक झाली. एवढा अपहार होऊन पंतप्रधानांनी पावले का उचलली नाहीत, अशी लोकांमध्ये चर्चा सुरू झाली. पंतप्रधान आपल्या अधिकारांचा वापर करीत नाहीत, असे चित्र निर्माण केले गेले. वास्तविक डॉ. मनमोहन सिंग हे अत्यंत साधे आणि सरळ आहेत. मी संरक्षणमंत्री असताना ते अर्थमंत्री होते. मी मुख्यमंत्री असताना

ते रिझर्व बँकेचे गव्हर्नर होते आणि तेव्हापासून आमचे चांगले संबंध आहेत. उगाच चुकीच्या गोष्टींचा पुरस्कार करायचा, हा त्यांचा स्वभाव नाही. संशयाचे वातावरण तयार केले गेले. केंद्रीय सत्ता कणखर नसल्यास न्यायालयासह अन्य सत्ताकेंद्रे अधिक प्रभावी होतात आणि तसेच झाले. एखाद्याबद्दल वाईट मत झाले की त्याने चांगले काम केले तरी लोक विसरतात, हे माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांच्याबाबत मी स्वतः अनुभवले आहे. जैन डायरीत त्यांच्या नावाचा उल्लेख होता. कोणीतरी सुटकेस दिल्याचे त्यात नमूद करण्यात आले होते. देशाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यात नरसिंहराव यांचेही योगदान होते; पण शेवटची दोन वर्षे ते भलतेच बदनाम झाले. तेव्हाही सरकार दुबळे असल्याची टीका होऊ लागली आणि अन्य घटक जास्त प्रभावी झाले होते. तशीच काहीशी स्थिती सध्या झाली आहे. सरकारच्या पहिल्या कालखंडाप्रमाणेच आताही महत्त्वाचे आणि चांगले निर्णय होतात; पण त्यांचा गाजावाजा होत नाही. नाहीतरी अलीकडे वेडेवाकडे काही झाले तर त्यालाच अधिक प्रसिद्धी मिळते.'

गिरीश कुबेर यांनी विचारले की, 'आभास हे वास्तव असू शकत नाही. वैयक्तिक चरित्रापेक्षा देशाच्या फायद्याचे निर्णय घेणे महत्त्वाचे असते; पण तसे काही होताना दिसत नाही किंवा सरकारच्या पातळीवर एकदम उदासीनता दिसते.' त्यावर पवारसाहेब म्हणाले होते की, 'कोणताही निर्णय घेताना त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार नाही, ही अधिक खबरदारी घ्यावी लागते. प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याची पंतप्रधानांची

भूमिका नाही. न्यायालये अधिक आक्रमक झाल्याची चर्चा सुरू असते. पण त्यातही सरकारने हस्तक्षेप केला नाही वा मते मांडली नाहीत. सरकारच्या काम करण्याच्या पद्धतीत बदल का झाला हा प्रश्न सर्वांनाच पडतो. कोणत्याही कायद्याचा गैरवापर होऊ नये. माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग होऊ लागला आहे. कायद्याने दिलेल्या अधिकारांचे जतन झाले पाहिजे, यात दुमत होण्याचे कारण नाही. येत्या फेब्रुवारी महिन्यात माझ्या राजकीय कारकिर्दीस 45 वर्षे पूर्ण होतील; पण अलीकडे मलाही प्रशासनात काम करताना वेगळे अनुभव येऊ लागले आहेत. नोकरशाहीला पूर्ण विश्वास दिल्यास त्यांच्याकडून आपल्याला विश्वास प्राप्त होतो. अनेक कठीण प्रसंगांत नोकरशाहीने केलेल्या कामाचा अनुभव मी घेतला आहे. 1972 साली राज्यात भीषण दुष्काळ पडला असताना 45 लाख लोकांना रोजगार हमी योजनेवर काम देण्यात आले होते. प्रत्येक सोमवारी कामगारांना वेतन मिळालेच पाहिजे, असा दंडक तेव्हाच्या मुख्यमंत्र्यांनी घातला होता. दर सोमवारी पहाटे चारपर्यंत बसून अधिकारी वेतनाची तयारी करीत. त्यामुळे सोमवारी सकाळी कामगारांच्या हातात पैसे मिळायचे. 1993 मध्ये शुक्रवारी दुपारी मुंबईत बॉम्बस्फोट झाले. सोमवारी सकाळी मुंबई पूर्ववत झाली. त्याला कारण नोकरशाही होती. माहितीच्या अधिकाराच्या कायद्यामुळे नोकरशाही निर्णय घ्यायला तयार होत नाही. पूर्वी नोकरशहा फाईलवर आपले स्वच्छ मत मांडीत. आता तीन पर्याय मांडतात. माहितीच्या अधिकारात कोणी फाईल मागितली व त्यावरून काही गोंधळ झाल्यास निवृत्तीनंतर

आपल्याला निवृत्तिवेतन मिळणार नाही, कारण आपल्या उत्पनाचे अन्य साधन नाही असे अधिकारी सांगतात. मुख्यमंत्री असताना एखाद्या वर्गाला लाभ होणारा निर्णय अधिकाऱ्यांच्या बैठकीत मी सांगत असे व तशी फाईल तयार होई. अनेकदा अधिकारी आपले स्वच्छ मत मांडीत. निर्णय व्यवहार्य ठरणार नाही, असे ठामपणे फाईलवर नोटिंग करत. मग मी काही वेळा आग्रह सोडून द्यायचो किंवा अधिकाऱ्यांना राजी करायचो. आता केंद्रीय मंत्री म्हणून माझ्याकडे फाईल आल्यावर सचिवांची सूचना योग्य, त्यावर विचार व्हावा, असा शेरा मांडतो. माझ्यासारख्या राजकारण्याची ही गत झाली आहे, त्याला कारण माहितीचा अधिकार आहे.'

'तुमचा भर नेहमी माणसे जोडण्यावर राहिला आहे. नोकरशाहीशी तुमचे सलोख्याचे संबंध राहिले. आता मात्र तुमच्या पक्षात माणसे तोडली जात आहेत, दादागिरी चालते याबद्दल तुम्ही काय सांगाल?' असा प्रश्न दिनेश गुणे यांनी त्यांना विचारला. त्यावर शरद पवार हसून म्हणाले की, 'मलाही वृत्तपत्रांमधून वाचायला मिळते; परंतु नोकरशाही अजितबद्दल (म्हणजे अजित पवार यांच्याबद्दल) समाधानी आहे. अधिकारी मला भेटतात, तेव्हा अजितबद्दल चांगले ऐकायला मिळते. हा एकच मंत्री आहे जो आमच्या पाठीशी ठामपणे उभा राहतो, असे ते म्हणतात. एखादी बाब चुकीची आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले की ती करू नये हे सांगण्याचे धाडस ते करतात. राजकारणात एखाद्याबद्दल एखादे मत तयार झाले किंवा वृत्तपत्रातून चर्चा सुरू झाली ते बदलणे अवघड जाते. या मताला सुसंगत शब्द आमच्याकडून बाहेर

पडल्यास त्याचीच चर्चा होत राहते. आता 'मी टग्या आहे', हे अजितने सांगण्याची काही गरज नव्हती. झाले, पुढे पाच-दहा वर्षे हे नाव सुटणार नाही. माझे संबंध दाऊदशी जोडले गेले होते. त्यातून मला बाहेर पडण्यासाठी दहा वर्षे लागली'

प्रशांत दीक्षित यांनी प्रश्न विचारला की, 'पूर्वीच्या काळी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांमध्ये जिव्हाळा होता. आता तसे चित्र दिसत नाही. केंद्र काय किंवा राज्यांमध्येही प्रचंड दुरावा निर्माण झाला आहे किंवा सहिष्णुतेचे वातावरण राहिलेले दिसत नाही. याचे कारण काय?' त्यावर शरद पवार म्हणाले की, 'संसदेत पण मला हल्ली कटुता दिसू लागली आहे. पूर्वी तसे नव्हते. बॅरिस्टर नाथ पै यांनी एकदा एका विषयावर मत मांडले असता संसदेत एका मंत्र्याने वेडेवाकडे उत्तर दिले. तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी उभे राहून दिलगिरी व्यक्त केली. साऱ्या मंत्र्यांमध्ये योग्य संदेश गेला. महाराष्ट्रात एस.एम. जोशी यांच्या वयाबद्दल एका मंत्र्याने काही मल्लिनाथी केली. यशवंतराव चव्हाण यांनी लगेच उभे राहून एस.एम. यांची माफी मागितली. अशा घटनांचा आमच्यावर खोल परिणाम झाला. पूर्वी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सुसंवाद होता. उत्तमराव पाटील, कृष्णराव धुळप, बापू काळदाते यांच्यासारख्या विरोधी पक्षाच्या नेत्यांबरोबर आमचे उत्तम संबंध होते. कौटुंबिक मित्र होते. घरी येणे-जाणे असायचे. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना त्यांनी एक चांगली प्रथा पडली होती. दर पंधरवड्याला मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर एका मंत्र्याच्या घरी सपत्नीक सर्व मंत्र्यांनी भोजनाला

जमायचे. त्यातून सर्व मंत्रिमंडळ म्हणजे कुटुंब झाले होते. नागपूर हिवाळी अधिवेशन म्हणजे तर हुरडा पार्टी. आज याच्याकडे, उद्या त्याच्याकडे जाण्यातून वैयक्तिक स्नेह निर्माण झाला होता. हल्ली विधानसभेत गोंधळ वाचायला मिळतो. तरी अगदी सर्व संपले असे अजून तरी वाटत नाही.'

मधु कांबळे यांनी एक प्रश्न विचारला की, '1998 मध्ये सोनिया गांधी सरकार स्थापनेचा दावा करण्यासाठी गेल्या तेव्हा तुम्ही त्यांच्याबरोबर नव्हतात. पण 2004 मध्ये सोनिया गांधी या मनमोहन सिंग यांना बरोबर घेऊन गेल्या आणि ते पंतप्रधान झाले. 1998 मध्ये तुम्ही गेला असता तर पंतप्रधानपदी निवड झाली असती, अशी राजकीय वर्तुळात नेहमीच चर्चा सुरू असते, त्याबद्दल काय?' त्यावर पवारांनी असे उत्तर दिले की, 'लोकसभेत वाजपेयी सरकार एका मताने पडल्यानंतर सोनिया गांधी या सरकार स्थापण्याचा दावा करण्यासाठी गेल्या होत्या तेव्हा आपण त्यांच्याबरोबर नव्हतो. वाजपेयी सरकार पाडण्यात आपली महत्त्वाची भूमिका होती. निर्णायक क्षणी सभागृहातच मायावती यांच्याकडे गेलो आणि त्यांची चार मते सरकारच्या विरोधात पडली. 1999 च्या निवडणुकीत सोनिया गांधी यांच्या विदेशीपणाचा मुद्दा विरोधी पक्ष उपस्थित करतील, अशी काँग्रेसमध्ये चर्चा होती. तामिळनाडूमध्ये आघाडीत काँग्रेसला जास्त जागा मिळाव्यात म्हणून आपल्याला जयललिता यांच्याबरोबर भेटीसाठी पाठविण्यात आले होते. मी गेल्यावर जास्त जागा मिळाल्या. सायंकाळी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक

होती. सोनिया गांधी यांनी लिहून आणलेले भाषण वाचून दाखवले. बैठकांमध्ये नेतृत्वाला खूश करण्यासाठी नेत्यांमध्ये स्पर्धा लागलेली असते. असा (विदेशीपणाचा) मुद्दा उपस्थित होण्याची शंका सोनियांनी व्यक्त केली; पण या नेत्यांनी नकारात्मक भूमिका घेतली. डावीकडून प्रत्येक नेत्याला त्याचे मत विचारण्यात आले. कोपऱ्यात पी.ए. संगमा बसले होते. त्यांनी निवडणुकीचा हा मुद्दा होऊ शकतो, असे मत मांडले. तारिक अन्वर यांनीही याला दुजोरा दिला. आपली वेळ आल्यावर सोनियांच्या विदेशीपणाचा मुद्दा नाही, असे नाही, असे मत मी मांडले. शंभर कोटींच्या देशाला देशी पंतप्रधान मिळू शकत नाही का, अशी तेव्हा चर्चा सर्वसामान्यांमध्ये होती. एका महाविद्यालयीन युवतीने मला असा प्रश्न विचारला होता. हा प्रश्न विचारला जाऊ शकतो. त्याला उत्तरही देता येईल असे मी म्हणालो. पण काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीनंतर मला काँग्रेस पक्षातून काढून टाकण्यात आले.'

दिनेश गुणे यांनी एक प्रश्न विचारला की, 'हेलिकॉप्टरमधून तुम्ही लवासा प्रकल्पाची जागा निश्चित केली; पण या प्रकल्पाबद्दल आता वाद निर्माण झाला आहे.' त्यावर पवार म्हणाले की, 'देशात ब्रिटिशांच्या काळात थंड हवेची ठिकाणे विकसित झाली होती. त्यानंतर देशात एकही थंड हवेचे ठिकाण विकसित झालेले नाही. हेलिकॉप्टरमधून प्रवास करताना परिसराची पाहणी करायची मला सवयच आहे. त्यातून आपल्याला लवासा प्रकल्पासाठी जागा उत्तम वाटली. थंड हवेचा प्रकल्प उभारण्यासाठी जागा चांगली होती. इंग्लंडमध्ये 'लेक डिस्ट्रीक्ट'

भागात मोठा प्रकल्प उभारण्यात आला आहे. निवृत्त सनदी अधिकारी देवव्रत मेहता, माजी आमदार मदन बाफना, अण्णा जोशी आणि अनंतराव थोपटे यांना खास इंग्लंड वारी करून येण्यास सांगितले. महाराष्ट्र सरकारने पर्यटकांना आकर्षित करण्याच्या उद्देशाने धोरण तयार केले आहे. लवासा प्रकल्प हा पूर्ण इको फ्रेंडली प्रकल्प आहे. अशा प्रकल्पांसाठी दूरदृष्टी असलेले अजित गुलाबचंद यांना तो विकसित करण्यास सांगितले. जेवढी झाडे तोडण्यात आली त्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने नव्याने झाडे लावण्यात आली आहेत. या परिसरात अजिबात आदिवासी नाहीत. चार हजार कोटी रुपये गुंतवणूक करून हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. ऑक्सफर्ड विद्‍यापीठाचे उपकेंद्र या ठिकाणी सुरू झाले आहे. पर्यावरण मंत्रालयाने पाच अटींची पूर्तता करण्याचा आदेश दिला होता. त्यापैकी चार अटींची पूर्तता करण्यात आली. पाचवी अट महाराष्ट्र सरकारने प्रकल्पाच्या प्रवर्तकांच्या विरोधात खटला दाखल करावा ही होती. मंत्रिमंडळाने हा प्रकल्प मंजूर केलेला असल्याने राज्य सरकारने खटला भरण्यास नकार दिला. त्यामुळे पर्यावरण मंत्रालयाने नोटीस बजावली आहे. याशिवाय दिल्लीतील आमचे काही मित्र लवासाच्या विरोधात आहेतच.'

सचिन रोहेकर यांनी प्रश्न विचारला होता की, 'जास्त विदेशी गुंतवणूक आणणारा विकासपुरुष समजला जातो. स्थानिकांचा विरोध डावलून प्रकल्प उभारण्याचा अट्टाहास का केला जातो? तसेच कोकणात 40 हजार मेगावॅट क्षमतेचे वीज प्रकल्प

उभारण्याचे धोरण चुकीचे नाही का?' त्यावर पवारसाहेबांनी उत्तर दिले की, 'महाराष्ट्रात आता नवीन प्रकल्प उभा राहत नाही. कोणताही प्रकल्प उभारायचा म्हटला की विरोध होतो. म्हणजेच आताच्या रत्नागिरी वीज प्रकल्पाला असाच विरोध झाला होता, पण या प्रकल्पातून आता 2100 मेगावॅट वीज मिळते आहे. दाभोळ प्रकल्प मागे बंद पडल्यानंतर दाभोळ आणि गुहागरच्या बाजारपेठा ओस पडल्या होत्या. एकेकाळी गुंतवणुकीत आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास फारसे कोणी उत्सुक नसते. महाराष्ट्राबद्दल बाहेर फारसे चांगले बोलले जात नाही. महाराष्ट्रातील 82 टक्के शेतकऱ्यांकडे दोन हेक्टरपेक्षा कमी शेती आहे. 60 टक्क्यांपेक्षा जास्त शेती पावसावर अवलंबून आहे. अशा वेळी औद्योगिकीकरण होणे ही काळाची गरज आहे. फक्त वागळे इस्टेट किंवा चिंचवडमध्ये नवे कारखाने सुरू करू नका. अन्य भागातही कारखाने सुरू करावे. मी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्राकडे अतिरिक्त वीज होती. त्यामुळे राज्यात गुंतवणूक झाली. तसेच योग्य असा कर्मचारी वर्ग राज्यात उपलब्ध होता. कोकणात वीज प्रकल्प उभारण्याचे कारण वेगळे आहे. वीज प्रकल्पांना पाणी लागते. धरणे बांधून त्यातील पाण्याचा वापर वीज प्रकल्पांसाठी करायचा की समुद्राच्या पाण्याचा वापर करायचा? शेवटी कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेल्या धरणांपेक्षा समुद्राचे पाणी वापरणे व्यवहार्य ठरते. महाराष्ट्रात गेल्याच आठवड्यात विजेचा प्रश्न निर्माण झाला होता. एकीकडे वीज नाही, तर दुसरीकडे वीजनिर्मिती प्रकल्पांना विरोध करायचा, हे

दुटप्पी धोरण स्वीकारता येणार नाही. शेवटी राज्याच्या विकासाकरिता वीज आवश्यक आहे. अन्यथा पुढील पिढीला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील. मी मुख्यमंत्री असताना डहाणूमध्ये वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यास असाच विरोध झाला होता. विरोध डावलून आम्ही तो प्रकल्प उभारला. त्यामुळे मुंबईला वीज मिळू लागली. या प्रकल्पामुळे चिकूच्या बागांवर परिणाम होईल अशी भीती व्यक्त केली गेली; पण काहीही परिणाम झालेला नाही.'

गिरीश कुबेर यांनी प्रश्न विचारला की, 'हल्ली बाबा-साधूंचे महत्त्व वाढले आहे. देशाला वैचारिक पुरोगामित्व देणाऱ्या महाराष्ट्रात हा बदल होण्याचे कारण काय वाटते?' त्यावर पवारांनी उत्तर दिले, 'हल्ली साधुसंत, बाबांपुढे नतमस्तक होण्याचे प्रमाण वाढले आहे, हे खरेच आहे. एकीकडे आपला समाज सामाजिक स्तर उंचावतो आहे, तसेच सुबत्ता वाढत असताना दुसरीकडे स्वच्छ शास्त्रीय आधारे पावले टाकण्याचा विचार बाजूला सारण्याची प्रवृत्ती बळावली आहे. आतापर्यंत विविध पदांसाठी 50 वेळा शपथ घेतली पण कधीही परमेश्वराला स्मरून शपथ घेतली नाही. घटनेला स्मरून शपथ घेतो. मी कधी मंदिरात जात नाही, हा माझ्याबद्दलचा आक्षेप असतो. पंढरपूरच्या मंदिरात बडव्यांसमोर मी कधी नतमस्तक होत नाही. वाकून नतमस्तक होऊन माझ्या पदरी काही तरी पडू दे, यापेक्षा मी खाऊन पिऊन एखाद दिवस उपोषण करण्यात धन्यता मानीन. शेगाव संस्थानच्या शिवशंकर पाटील यांनी परिसराचा विकास केला आहे. तेव्हा तो बघण्यासारखा आहे. सेवाभावी वृत्तीने त्यांचे काम आहे.

कमी शिकलेल्या शिवशंकर पाटील यांचा आदर्श घेण्यासारखा आहे. संस्थानच्या वतीने अभियांत्रिकी महाविद्यालय चालविले जाते. मी विचारले त्यांना नवीन काय सुरू केले? त्यावर न्यूक्लिअर टेक्नॉलॉजी असे त्यांनी उत्तर दिले. मला त्यांच्या दूरदृष्टीचे कौतुक वाटते. अशा माणसांसमोर मला नतमस्तक व्हायला आवडेल. नाहीतरी अलीकडे याचा गंडा बांधून त्याच्यापुढे लोटांगण घाल हे सुरू झाले आहे. अधिक आस्था दाखविण्यासाठी स्पर्धा लागली आहे. याबद्दल एकदा वेगळी भूमिका घ्यावी लागेल.'

निशांत सरवणकर यांनी पवारांना प्रश्न केला की, 'पंतप्रधान होण्याची आपली महत्त्वाकांक्षा अद्यापही कायम आहे का?' त्यावर शरद पवारांनी उत्तर दिले की, 'माझ्या पक्षाची ताकद मला माहीत आहे. मी या भानगडीतही पडणार नाही. पुढील निवडणूक लढवायची नाही ही माझी इच्छा आहे. खरेतर गेल्या वेळेस निवडणूक लढविणार नव्हतो; पण सर्वांच्या आग्रहामुळे निवडणूक लढवली. वाटले तर राज्यसभेत जाईन पण निवडणूक लढविण्याची इच्छा नाही.'

रोहन टिल्लू यांनी प्रश्न केला की, 'प्रत्येक राजकीय पक्षात नेत्याचे उत्तराधिकारी ठरलेले आहेत. तुमचा उत्तराधिकारी कोण?' त्यावर शरद पवार यांनी उत्तर दिले की, 'आमच्याकडे उत्तराधिकारी कोणी नाही. जो पक्ष चालवू शकेल, त्याच्याकडे सूत्रे जातील.'

अशी ही पवारांची मुलाखत होती. त्यात - मी कॉँग्रेस सोडली नाही, मला कॉँग्रेसने पक्षातून काढले, माहितीच्या

अधिकारामुळे व त्याच्या गैरवापराने नोकरशाही निर्णय घ्यायला तयार होत नाही, पूर्वी विरोधक व सत्ताधाऱ्यांमध्ये सुसंवाद होता, आता कटुता दिसते, आणि जो पक्ष चालवू शकेल, त्याच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेसची सूत्रे जातील अशी काही महत्त्वपूर्ण विधाने त्यांनी केली होती.

❑❑❑

# शरद पवार नावाचे कुतूहल

पत्रकारांना पवारांचे फारच कौतुक आहे. त्याची कारणेही तशीच आहेत. अनंत बागाईतकर यांनी यासंदर्भात काही आठवणी आणि अनुभव सांगितले आहेत. राजधानी दिल्लीत पवार पूर्वी येऊन जाऊन असत. 1996 नंतर मात्र त्यांनी दिल्लीतला मुक्काम अजिबात हलवलेला नाही. पवार महाराष्ट्राच्या राजकारणात होते तरीही दिल्लीतील पत्रकारांमध्ये त्यांच्याबद्दल सतत कुतूहल असे. पवार यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांच्या राजकीय हालचाली याबद्दल हे कुतूहल आहे आणि आजही ते कायम आहे. पवार कोणत्या वेळी कोणते राजकीय पाऊल उचलतील, याचा अंदाज भल्याभल्यांना येऊ शकत नाही आणि त्यामुळेच त्यांच्याबद्दलचे औत्सुक्य टिकून आहे. पवारांचे क्रिकेट, त्यांचे राजकारण, मंत्री म्हणून त्यांचे काम असे त्यांचे विविध पैलू आहेत. अगदी अलीकडची महाराष्ट्रातील सरकार स्थापनेची गोष्टसुद्धा कमी आश्चर्यकारक नाही.

सहज उपलब्ध होणे हे पवारांचे वैशिष्ट्य असले तरी ताकास तूर लागू न देणे ही त्यांची खासियत आहे. त्यांच्या काही

मजेदार सवयी आहेत. एखाद्या दिवशी त्यांना मुद्द्याचे बोलायचे नसेल तर पत्रकारांबरोबर इतर जगभरातल्या विषयांवर चर्चा करतात, नव्हे तर पत्रकारांनाही चर्चेत गुंतवतात. पत्रकारांना यातून नवनवीन माहिती मिळते; परंतु त्या दिवशीची बातमी मिळत नाही आणि पवारांनी कसे गुंडाळले याची चर्चा बाहेर सुरू होते. 'सामना'चे अग्रलेख व त्यांच्याविरुद्ध आलेले लेख किंवा बातम्या वाचून दाखवणे ही पवारांची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण सवय आहे. त्यामुळे पत्रकार ज्या गोष्टीसाठी आलेले असतात, त्याला यशस्वीपणे बगल देता येते. पवारांचा मूड असला तर पत्रकारांची मजा असते. वर म्हटल्याप्रमाणे सदाशिवपेठेपासून जगभरातल्या सर्व विषयांचा समावेश त्यांच्या चर्चेत असतो. पवार पत्रकारांना टाळत नाहीत, हा त्यांचा गुण पत्रकारांना सर्वाधिक आवडतो. त्यांना भेटीसाठी वेळ नसेल आणि पत्रकारांनी चिठ्ठी पाठवली तर कधी कधी ते स्वतः बाहेर येतात आणि 'आता वेळ नाही, उद्या भेटू' असे सांगतात. तेव्हा पत्रकारही अवघडून जातात; परंतु त्यांच्यासारखे सौजन्य इतरत्र पाहण्यास मिळत नसल्याने पत्रकारांना पवारांकडे जायला आवडते. अलीकडे मात्र पवार पत्रकारांवर काहीसे चिडायला लागले आहेत. त्यातही इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधील पत्रकारांच्या आक्रमक स्वभावामुळे ते त्रासताना दिसतात. अन्यथा ते सहसा कुणावर चिडत नाहीत.

सत्तारूढ आघाडीतील प्रमुख नेत्यांमध्ये पवार यांचा समावेश होतो. एखादा पेचप्रसंग निर्माण झाल्यास इतर नेत्यांप्रमाणे पवारही त्याच्या सोडवणुकीसाठी प्रक्रियेत सहभागी

असतात. महाराष्ट्रातील सत्तास्थापनेचा घोळ 2004 मध्ये तेरा दिवस चालला. 2009 मध्ये देखील तेवढेच दिवस त्यासाठी लागले आणि आता 2019 मध्ये तर राष्ट्रपती शासन लागेपर्यंत परिस्थिती गेली. अशा परिस्थितीत पत्रकारांना इतर नेत्यांच्या दरवाज्याबाहेर उभे राहावे लागते. पवारांचे घरही त्याला अपवाद नसते. पवारांच्या घराबाहेर बातमीसाठी ताटकळत उभे असलेल्या पत्रकारांना मात्र पाणी, चहा, कधीकधी नाश्ता, बिस्किट पाठविले जातात.

राजकारणाबरोबरच सांस्कृतिक गोष्टींमध्ये पवार रस घेतात. भीमसेन जोशी, मालिनी राजूरकर, पंडित जसराज यांच्यासारख्या दिग्गज कलाकारांप्रमाणेच देवकी पंडित, संजीव अभ्यंकर यांसारख्या ताज्या दमाच्या कलाकारांनीही पवारांच्या घरी मैफिली जमविल्या आहेत. मराठी कवींच्या कविता वाचनाचा कार्यक्रमही होऊन जातो; परंतु श्रोत्यांची उपस्थिती या कार्यक्रमांना कमी असते. हे कार्यक्रम त्यांच्या शिस्तीत होतात. त्यात भपकेपणा नसतो. पं. जसराज यांच्या कार्यक्रमाला सोनिया गांधींनी हजेरी लावली व सोनियाजींना पं. जसराज यांचे गायन खूप आवडते, हे या कार्यक्रमाच्या निमित्ताने पत्रकारांना कळले. या निमित्ताने ठळकपणे लक्षात येते की आपल्या पाहुण्यांची ते जातीने चौकशी करतात. त्यांचे स्वागत आणि त्यांना निरोप देण्यासाठी दरवाजापर्यंत जाण्याची त्यांची सवय दुसऱ्याला संकोच यायला लावते; परंतु ते आपल्या शिरस्त्यात कधी फरक करीत नाहीत.

संसदेतील पवारही वेगळे नाहीत. प्रश्नोत्तराचा तास असो की त्यांच्या मंत्रालयाशी निगडित मुद्द्यांवरील वेगवेगळ्या चर्चा, पवार पूर्ण तयारीनिशी सभागृहात येतात. आणखी एक बाब लक्षात येते की मंत्री म्हणून पवार माहिती दडवून ठेवत नाहीत, तर जास्तीत जास्त माहिती देण्याकडे त्यांचा कल असतो. एखादी चूक मान्य करायलाही ते मागेपुढे पाहत नाहीत. त्यामुळेच संसदेतील विरोधी पक्षदेखील त्यांना कधी अडचणीत आणत नाहीत. त्यांची उत्तरे अभ्यासपूर्ण आणि माहितीपर असल्याने व त्यांच्या माहिती देण्याच्या भूमिकेमुळे अनेक प्रश्न सुटलेले आहेत.

एकदा 'शरद यादव, लालूप्रसाद यादव आणि मुलायमसिंग यादव असे तीन यादव हे सभागृह चालवतात' असे पवारांनी म्हणताच सभागृहात हशा पिकला होता. पवारांचे संसदेतील एक भाषण संस्मरणीय असे आहे. बाबरी मशीद पडल्यानंतर दुसऱ्या दिवशी लोकसभेचे कामकाज सुन्न वातावरणात सुरू झाले होते. सय्यद शहाबुद्दीन यांनी भाषण करताना 'एका बाजूला कत्तल करणारे आणि दुसऱ्या बाजूला म्हणजे काँग्रेस कत्तल होताना स्वस्थ बसणारे आहेत', असे सांगत 'मै कहाँ जाऊ?' म्हणून अक्षरशः हंबरडा फोडला आणि सभागृह थरारून गेले होते. काँग्रेसचे अर्जुनसिंग यांचे पहिले भाषण झाले; पण त्यात केवळ शब्दच्छल होता. डावे पक्ष व धर्मनिरपेक्ष राजकीय पक्षांनी भारतीय जनता पक्ष व काँग्रेसची सालटी काढली होती. अखेर सायंकाळी पवार बोलायला उभे राहिले. त्या दिवशी प्रथमच त्यांचे एवढे आक्रमक आवेशातील दर्शन घडले. भाजपच

याला कारणीभूत कसा आहे हे त्यांनी सांगितले. त्यांचे भाषण क्रमाक्रमाने वरच्या पट्टीत जात होते. त्यांनी 'ये भाजप क्या है? इनके मुख में राम है और दिल में नथुराम है' असे म्हटले आणि प्रथमच काँग्रेसच्या मंडळींनी त्या दिवशी प्रचंड बाके वाजवून त्यांना प्रतिसाद दिला.

संसदेतील सेंट्रल हॉल हे पवारांचे एक आवडते ठिकाण आहे. सेंट्रल हॉलमध्ये आल्यानंतर त्यांच्याभोवती गर्दी जमली नाही तरच नवल! तेथेही खासदार त्यांना कामे सांगत असतात आणि पवारही शक्य होईल तशी ती करीतही असतात. सेंट्रल हॉलमध्ये बसल्यानंतर जवळपास सर्वच पक्षांची मंडळी त्यांना भेटत असतात. त्यात पूर्वी विजय मल्ल्याही असायचे, राहूल बजाजही असायचे. राहूल बजाज व पवारसाहेब दोघेही एकमेकांच्या सारख्या फिरक्या घ्यायचे. उपस्थितांना तो सामना पाहताना मजा वाटायची आणि ते बसल्यानंतर पत्रकारांचे त्यांच्यावर हमखास लक्ष असायचे आणि त्या माहितीचा वापर बातमीकरिता उघडपणे करायचा नाही असा संकेत आहे. एकदा तर फार मोठ्या राष्ट्रीय वृत्तपत्राच्या पत्रकारांनी हा नियम मोडला आणि दुसऱ्या दिवशी पवार त्यांच्यावर फार भडकलेले सर्वांनी पाहिले.

प्रामाणिकपणे बातमीसाठी आलेल्या पत्रकारांना पवार नाराज करीत नाहीत. विशेष म्हणजे वरिष्ठ, कनिष्ठ असा भेद पाळत नाहीत. एखादा नवीन, तरुण पत्रकार असेल तर कुठून आलात वगैरे चौकशी करत असतात. ज्या पद्धतीने ते एखाद्या वरिष्ठ पत्रकाराशी, अनुभवी पत्रकाराशी बोलतात त्याच पद्धतीने

नवीन पत्रकारांशी संवाद साधतात. पत्रकारांनाही प्रतिप्रश्न करून तो किती खोल आहे याची चाचपणी कुशलतेने करीत असतात. पवार हे राजकारणात चोवीस तास व्यग्र असले तरी क्रिकेट, संगीत, साहित्य हे सर्व त्यांना विलक्षण प्रिय आहे. ते चौफेर पण सावधचित्त असतात. असे असले तरी त्यांच्यात एक खोडकरपणा दडलेला आहे. गंमत करणे, टोप्या उडवणे त्यांनाही आवडते. त्यात खिलाडूपणा असतो. पत्रकारांच्या मनात आपल्याबद्दल कुतूहल टिकवून ठेवणारा; पण दिलखुलास असा हा नेता आहे, म्हणूनच पत्रकार आणि पवार यांच्यातील संवाद तेवढाच टिकलेला आहे, असे अनंत बागाईतकर म्हणतात.

❑❑❑

# दखलपात्र प्रसंग आणि पवारांचे गुणविशेष उलगडणारे उल्लेख

## लोकमतवरील हल्ला

वृत्तपत्रांच्या कार्यालयावर राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचे हल्ले हे या देशाला नवीन नाहीत. विरोधात बातमी आली, की कार्यकर्ते अशी चुकीची पावले टाकतात. राजेंद्र दर्डा यांनी एक लेख लिहिला होता. त्यात एक प्रसंग नमूद केला आहे. ते म्हणतात, '9 जून 1995 रोजी दुपारी तीनच्या सुमारास लोकमतच्या औरंगाबाद

कार्यालयावर सिल्लोडच्या शिवसैनिकांनी हल्ला चढवला. सुरक्षा रक्षकांना, संपादकीय विभागातल्या पत्रकारांना शिवीगाळ करत कर्मचाऱ्यांना मारहाण केली. कार्यालयातल्या दूरध्वनी, फॅक्स, संगणक, खुर्च्या, टेबल, पंखे अशा दिसेल त्या वस्तूंची नासधूस केली. 'कुठे आहेत तुमचे संपादक राजेंद्र दर्डा?' असे विचारत हल्लेखोरांनी अक्षरश: धुडगूस घातला. मी व माझी दोन्ही लहान मुले ऋषी व करण त्यावेळी कार्यालयातच होतो. सिंगापूरचे उद्योगपती डॅडी बलसाराही त्यावेळी माझ्यासोबतच होते. हल्ल्यातून सुदैवानेच आम्ही बचावलो. दुसऱ्याच दिवशी सकाळी 11 वाजता काँग्रेसच्या काही नेत्यांसह, तत्कालीन विरोधी पक्षनेते शरद पवार यांनी तडक औरंगाबाद गाठले. लोकमतमध्ये येऊन त्यांनी केवळ आमची विचारपूसच केली नाही तर सर्वांना धीर दिला. राज्यात तेव्हा शिवसेना-भाजपचे युती सरकार होते. लोकमतच्या हल्ल्यावरून पवारांनी विधान परिषदेत 18 जुलै 1995 रोजी पावसाळी अधिवेशनात सरकारला धारेवर धरले. विधान परिषदेत नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेत लोकमतवरील हल्ल्याचा उल्लेख करीत 'राज्यात वृत्तपत्र स्वातंत्र्याला धोका निर्माण झाला आहे. गुंडगिरी व दहशतवादी प्रवृत्तीवर कठोर कारवाई झाली पाहिजे', अशी मागणी त्यांनी केली. माध्यमांच्या स्वातंत्र्यासाठी शरद पवार नेहमीच खंबीरपणे उभे राहिले आहेत.

❑❑❑

# 1980 च्या जळगाव-नागपूर दिंडीने पवारांच्या राष्ट्रीय राजकारणाला कलाटणी

राजकीय यात्रांचे प्रेरणास्थान राहिलेली महाराष्ट्रातील पहिली शेतकरी दिंडी 7 डिसेंबर 1980 रोजी जळगाव ते नागपूरच्या दरम्यान निघाली आणि यातून शरद पवारांचा राष्ट्रीय राजकीय क्षितिजावर उदय झाला. या दिंडीत पवारांच्या संघटन कौशल्याची चुणूक दिसल्याने दिल्लीत त्यांच्या नेतृत्वात पहिली किसान रॅली निघाली. अंतुले सरकारविरोधातील या दिंडीतून पवारांची ताकद ओळखून राजीव गांधींनी त्यांना पुन्हा काँग्रेसमध्ये घेतले.

राज्यात तेव्हा दररोज शेती विक्री आणि मरणप्राय खेडी अशीच चर्चा होत होती. मोठ्या प्रमाणावर अंगावर आलेली शेती, शेतीपूरक मालाचे, सीड्स, फर्टिलायझरचे गगनाला भिडलेले भाव, शासनाची शेतकऱ्यांप्रती उदासीनता याविरोधात पायी शेतकरी दिंडी त्यावेळचे विरोधी पक्ष नेते असलेल्या शरद पवार यांच्या नेतृत्वात निघाली. शेतकरी प्रश्नांवर 1980 रोजी ही दिंडी निघाली. विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते ग.प्र. प्रधान, बाबा आढाव, शिवाजीराव देशमुख, एन.डी. पाटील, गणपतराव देशमुख, एस.एम. जोशी, राजारामबापू पाटील, प्रभा राव, नानासाहेब गोरे, बापूसाहेब काळदाते आदी मंडळी दिंडीत सहभागी होती. एक-दोन पक्ष वगळता सर्व पक्षांनी या दिंडीला पाठिंबा दिला. नागपूर अधिवेशनापर्यंत पोचण्यापूर्वीच यात्रा बरखास्त करण्याची सरकारची

रणनीती होती; मात्र पवारांनी शेतकऱ्यांना गनिमीकाव्याने रात्रीतून नागपुरात पाठवून मुख्यमंत्र्यांसह दिल्लीकरांचीही झोप उडवली.

20 डिसेंबर 1980 रोजी ही यात्रा पोहरा बंदी, जिल्हा अमरावती येथे पोचली. खासदार यशवंतराव चव्हाण तिथे सहभागी झाले. शासनाने या जंगलात पोलीस बळाचा वापर करून यात्रा उधळण्याचे नियोजन केले. विश्रामगृहातील शिपाई, चहावाला व काही लोकांना पवार यांच्याभोवती हेर म्हणून ठेवण्यात आले होते. हे लक्षात आल्यानंतर पवारांनी कधी शेकोटीच्या तर कधी शौचाला जाण्याच्या निमित्ताने प्लॅन बी तयार केला. यशवंतराव, पवारांसह काही जणांना पोलिसांनी अटक केली. त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात वेळ घालवला. पोलीस यंत्रणा त्या ठिकाणी अडकून होती. दुसरीकडे पवारांनी दत्ता मेघे यांच्यासह अन्य नेत्यांवर आधीच जबाबदारी सोपवून 25 डिसेंबर रोजीच काही आंदोलकांसह यात्रा नागपुरात घुसण्याचे नियोजन केले होते. अभिनेते दिलीपकुमार दिंडीत सहभागी होण्यासाठी आले. शरद पवारांनी मात्र त्यांना नागपुरात येण्यास मनाई केली. 'गर्दीसाठी तुम्हाला बोलवले असा अर्थ निघू नये म्हणून तुम्ही लांबच राहा' असा पवारांचा निरोप ना.धों. महानोर यांनी दिलीपकुमार यांना दिला होता. अशी काही मंडळी याच कारणामुळे गेली नाही. पण ज्या मंडळींना नागपुरात पोचवायचे, त्यांना पवारांच्या गनिमी काव्याने पोचविले होते आणि सरकारी यंत्रणेला असा चकवा दिला होता. यामुळे पवारांच्या राष्ट्रीय राजकारणात पाय रोवण्यासाठी प्रशस्त मार्ग तयार झाला.

❒❒❒

# 'तर मी पंतप्रधान असतो.... सोनियांना स्वतंत्र विचारांचा पंतप्रधान नको होता....'

12 डिसेंबर 2015 रोजी शरद पवार 75 वर्षांचे झाले. शरद पवार यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त दिल्लीतील विज्ञान भवनात गुरुवार दिनांक 10 डिसेंबर 2015 रोजी एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या समारंभात 'लाईफ ऑन माय टर्म्स - फ्रॉम ग्रासरूट अँड कॉरिडॉर ऑफ पॉवर' या पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन झाले होते. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, उपराष्ट्रपती हमीद अन्सारी, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांसारख्या दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. या पुस्तकात पवार म्हणतात, 'राजीव गांधी यांच्या हत्येनंतर 1991 मध्ये केंद्रात काँग्रेसच्या नेतृत्वात आघाडीचे सरकार सत्तेवर आले, त्यावेळी पंतप्रधान होण्याची संधी मला प्राप्त झाली होती; पण सोनिया गांधी यांचे निवासस्थान असलेल्या 10, जनपथनिष्ठांनी माझ्या मार्गात अडथळे आणले होते. पंतप्रधान पदाच्या शर्यतीत माझे नाव आघाडीवर होते; पण स्वतंत्र आणि धडक विचारसरणीच्या तरुणाला या सर्वोच्च पदावर बसविणे योग्य होणार नाही, शरद पवार 'लंबी रेस का घोडा' असल्याने त्यांच्यामुळे गांधी घराण्याचे महत्त्व कमी होईल, त्यापेक्षा वृद्ध असलेले आणि कुठलाही प्रभाव नसलेले पी.व्ही.

नरसिंहराव यांना या पदावर बसविण्यात यावे, असे सोनियांच्या निष्ठावान नेत्यांनी त्यावेळी त्यांना पटवून दिले होते. पंतप्रधानपदासाठी माझ्या उमेदवारीला केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर अन्य राज्यांतही पाठिंबा होता; पण 10, जनपथच्या निर्णयावरच सर्व काही अवलंबून आहे, याची मला जाणीव असल्याने मी स्वतः सोनियांच्या सभोवताल सुरू असलेल्या घडामोडींवर लक्ष ठेवून होतो. 1991 च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी नरसिंहराव यांनी प्रकृतीचे कारण समोर करून राष्ट्रीय राजकारणातील माघार घेतली होती; पण केवळ मी पंतप्रधान होऊ नये यासाठी त्यांना पंतप्रधानपदी विराजमान करण्यात आले. माझ्याविरोधात सोनिया गांधी यांच्या मनात कटूता निर्माण करणाऱ्यांमध्ये अर्जुनसिंह, माखनलाल फोतेदार, आर.के. धवन आणि व्ही. जॉर्ज यांच्यासारख्या नेत्यांचा समावेश होता. आकस्मिकरीत्या नरसिंहराव यांनी पवारांवर पस्तीस मतांनी मात केली. इंदिरा गांधी यांचे माजी प्रधान सचिव पी.सी. अलेक्झांडर गांधी कुटुंबाचे खास विश्वासू मानले जात आणि त्यांनी पवारांकडे सर्वोच्च तीन खात्यांच्या प्रस्ताव ठेवला होता. पवार हे पंतप्रधान पदाचे सशक्त दावेदार असले तरी गांधी कुटुंबाला स्वतंत्र निर्णय घेणारी व्यक्ती नको होती, हे अलेक्झांडर आणि पवार या दोघांनाही माहिती होते. नरसिंहराव हे वयस्कर असून त्यांची प्रकृती साथ देत नसल्यामुळे त्यांच्याकडे पंतप्रधानपद सोपविणे सुरक्षित राहील, अशाप्रकारे अलेक्झांडर यांनी समजूत घातली आणि पंतप्रधान पदाच्या शर्यतीत असलेल्या अर्जुनसिंग यांना

लवकरच आपल्याकडे हे पद दिले जाईल अशी आशा होती. त्यांना परत आणण्याची कल्पना ठरल्यानंतर ती लाट पवार यांच्या विरोधात गेली, असेही पवार यांनी या पुस्तकात नमूद केले आहे.

या पुस्तकात पवारांनी आणखी काही बाबी नमूद केल्या आहेत. 1990 च्या दशकात संसदेत निवडून न येताही केवळ सोनिया गांधी यांना संसदीय पक्षाचा नेता बनविण्यासाठी पक्षाच्या घटनेत केलेला बदल धक्कादायक होता. सोनियांना पक्षाध्यक्ष पदासाठी निमंत्रित करण्यात मीही होतो; मात्र आमच्यात जवळीक नव्हती. मात्र एकूणच संबंध सौहार्दपूर्ण म्हणता येतील. पक्ष चालवण्यासाठी सोनिया गांधी केवळ दोन-तीन लोकांवर निर्भर होत्या. काँग्रेसने महाराष्ट्रातील सर्वाधिक जास्त जागा जिंकल्यामुळे पक्षात थोडीफार अस्वस्थता होती. 1978 मध्ये मी इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध बंड पुकारणारे सरकार स्थापन केल्याकडे निष्ठावंत आणि सोनियांचे लक्ष वेधले होते. मी 1990 मध्ये मुख्यमंत्री असताना माझ्या विरोधात काही मंत्र्यांनी केलेले बंड फसले. राजीव गांधी हेही माझ्याविरुद्ध होते, अशा बाबी सोनिया गांधी यांच्या कानावर घालत निष्ठावंतांनी अपेक्षित प्रभाव साधला होता. सोनिया गांधी जास्त काही बोलत नव्हत्या, मात्र त्यांच्या कृतीतून अविश्वास व्यक्त होत होता. 'मी पी.सी. चाको यांची निवड केली असता त्यांना माझे निकटस्थ समजून त्यांनी दुसऱ्याकडे जबाबदारी सोपवली' असा उल्लेखही पवारांनी या पुस्तकात केला आहे.

❒❒❒

# वाजपेयी सरकार केवळ एका मताने कसे पडले?

1997 मध्ये अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार केवळ एका मताने कसे पडले, याचा किस्सा पवारांनी 'लाईफ ऑन माय टर्म्स - फ्रॉम ग्रासरूट अँड कॉरिडॉर ऑफ पॉवर' या पुस्तकातील एका प्रकरणात सांगितला आहे. त्यावेळी पवार लोकसभेत काँग्रेसचे नेते होते. आपल्या मागण्या मान्य न केल्यामुळे तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जयललिता यांनी अण्णाद्रमुकच्या 18 खासदारांचे समर्थन काढून घेतले होते. काँग्रेसने वाजपेयींविरुद्ध अविश्वास प्रस्ताव मांडला होता. प्रस्ताव पारित झाल्यानंतर विरोधकांनी मतदानाची मागणी केल्यामुळे तत्कालीन अध्यक्षांनी मतदान घेतले. संसदेतल्या कर्मचाऱ्यांनी दारे बंद करीत वोटिंग मशीनवर मतदानाची प्रक्रिया सुरू केली. त्या अवघ्या काही मिनिटात शरद पवार बसपाच्या प्रमुख मायावती यांना बाजूला नेत काही शब्द बोलले. बसपाकडे पाच खासदार होते. हा पक्ष कोणती भूमिका घेणार याचे गुपित कायम होते. वोटिंग मशीनने आकडा दाखविला, त्यावेळी वाजपेयी सरकार एका मताने पराभूत झाले होते. सरकारविरुद्ध कोणी मतदान केले याबाबत तर्क-वितर्क लावले जात होते. काहींनी पवारांना मायावतींशी बोलताना बघितले होते. त्यांनी त्यांना त्याविषयी वारंवार विचारणा चालवली होती; मात्र पवार यांनी मौन बाळगले. एवढ्या वर्षानंतरही पवार यांना मायावतींशी काय बोलणे झाले याबाबत विचारले जाते. 'मी एवढेच म्हणालो

होतो की तुम्ही भाजप सरकारविरुद्ध मतदान केल्यास उत्तर प्रदेशात तुमच्या पक्षाला चांगले यश मिळेल. मायावतींना ते पटले होते.' बसपाने सरकारविरुद्ध मतदानाचा निर्णय घेतला आणि सरकार गडगडले, असा खुलासाही पवारांनी विस्ताराने केला आहे.

❒❒❒

## नेहरूंशी जवळीक आणि मुख्यमंत्री पद

'ए.आर. अंतुले यांच्यासारख्या नेहरू, गांधी घराण्याशी 100% निष्ठा असणाऱ्या नेत्याने मुख्यमंत्रीपद मिळताच 'प्रतिभा प्रतिष्ठान' वगैरे स्थापून देणग्या गोळा केल्याने या घराण्याची काहीशी बदनामी केली. त्यामुळे अंतुले यांचे मुख्यमंत्रीपद गेले आणि नव्या मुख्यमंत्र्याचा शोध सुरू झाला. आता केवळ नेहरू, गांधी घराण्याशी निष्ठा असून चालणार नाही तर नाव, आडनाव किंवा पत्त्यात आमचा उल्लेख असला पाहिजे, असे फर्मान इंदिरा गांधी यांनी काढले आणि राज्यातील काँग्रेस आमदारांचा सारा तपशील धुंडाळण्याचे काम काँग्रेस कार्यकारिणीने सुरू केले. त्यात फक्त बाबासाहेब भोसले यांच्या पत्त्यात 'नेहरूनगर, कुर्ला' असा उल्लेख आढळला. तेवढ्या एका निकषावर 'करून टाका बाबासाहेबांना मुख्यमंत्री' असा आदेश आला आणि बाबासाहेबांना मुख्यमंत्रीपद मिळाले' अशी माझी माहिती आहे', असे पवार यांनी एका पत्रकार परिषदेत सांगताच प्रचंड हशा पिकला होता.

❒❒❒

# वीजप्रवाह खंडित झाल्यावरही जनतेला मंत्रमुग्ध करणारा नेता

अफाट स्मरणशक्ती, समयसूचकता आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची जिद्द असलेला नेता असाच पवारसाहेबांचा उल्लेख करावा लागेल. 1980 सालचा मे महिन्यातली घटना. पवारसाहेब विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी रात्री साडेसात वाजता कागल येथे आले होते आणि काही विघ्नसंतोषी लोकांनी वीजप्रवाह बंद केला होता. व्यासपीठावर दिवाबत्तीची किंवा बॅटरीची कसलीच सोय नव्हती. तरीसुद्धा पवारसाहेबांनी मोठ्या हिमतीने, कौशल्याने आणि आपल्या वक्तृत्वशैलीने दहा हजारांच्या जनसमुदायाला मंत्रमुग्ध केले होते व ही प्रचारसभा व्यवस्थित पार पडली होती, असा अनुभव खंडेराव भोसले यांनी सांगितला.

❒❒❒

# आचार्योपासनेचा आदर्श

नागपूरचे वासुदेव गोविंद चोरघडे यांनी 1990 सालची पवारांची एक आठवण सांगितली आहे. नागपूरच्या 81 वर्षे वयाच्या वयोवृद्ध संस्कृत व्याकरणाचार्य, न्याय व वेदान्त शास्त्राचे पंडित असलेल्या श्री. अंबादासशास्त्री पांडे गुरुजी यांना त्यांच्या विपन्नावस्थेत आर्थिक सहाय्य मिळावे, यासाठी वासुदेव गोविंद चोरघडे आणि त्यांचे चुलत बंधू वामन चोरघडे प्रयत्नात होते. केंद्र

व राज्य सरकारशी पत्रव्यवहार केला होता; परंतु त्यात यश आले नव्हते. पवार मुख्यमंत्री असताना डिसेंबर 1990 मध्ये त्यांचा एक कार्यक्रम नागपूरला गांधी स्मारक निधीच्या कस्तुरबा भवनात, बजाजनगर येथे आयोजित केला होता. त्या प्रसंगी पवार हे व्यासपीठाकडे जात असताना केवळ एक-दोन मिनिटांत त्यांच्याशी या संदर्भात चोरघडेंचे बोलणे झाले. याबाबत सविस्तर पत्र घेऊन मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत पाठविण्यास पवारांनी सांगितले. त्याप्रमाणे 11 डिसेंबर 1990 ला सूचनेप्रमाणे चोरघडेंनी पत्र पोचते केले. त्यानंतर सात-आठ दिवसांनी त्या पत्रावर काय कारवाई झाली, हे जाणून घेण्यासाठी नागपुरात मुख्यमंत्री कार्यालयात चोरघडे गेले. तेथील अधिकाऱ्याने कुणाच्या मदतीसाठी पत्र होते, हे विचारले. त्यांना चोरघडे यांनी नाव सांगितले. तेव्हा ते म्हणाले की, त्यांच्या नावाने मुख्यमंत्र्यांनी एक लक्ष रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले असून त्यांच्या नावाने त्याच दिवशी चेक पाठविण्यात आला आहे. वासुदेव चोरघडे कार्यालयातून बाहेर पडले. ताबडतोब वामनरावांना फोन केला आणि नंतर श्री. पांडे गुरुजींच्या भेटीला गेले. त्यांच्या हाती नुकतेच रजिस्टर पत्र पोचले होते. त्यांनी त्यातील चेक देवासमोर ठेवला. नमस्कार केला. पांडे गुरुजींच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. या वयोवृद्ध विद्यावर्तीच्या आयुष्यात आनंदाचा क्षण आला. याचे श्रेय शरद पवार यांच्या गुणग्राही आणि सेवातत्पर वृत्तीला जाते. आपल्या कृतीने त्यांनी आचार्योपासनेचा आदर्श निर्माण केला होता.

❒❒❒

# शालेय जीवनातील शेतीकामाचा प्रसंग

प्रवरानगर येथील महात्मा गांधी विद्यालयात 1954 साली पवारांचे वर्गमित्र बाबासाहेब विठ्ठल खर्डे आठवीत, तर पवार नववीत होते. प्रवरा कारखान्याने त्यांच्या विद्यालयाच्या विकासासाठी पाच एकर ऊस शेतीचे उत्पन्न दिले होते. या जमिनीत ऊस लावल्यानंतर त्याला पाणी देण्याचे काम शाळेतील विद्यार्थ्यांना आळीपाळीने करावे लागत असे. अशीच पाणी देण्याची पाळी एक दिवस शरद पवार, सय्यद, सी.एस. झेंडे आणि खर्डे यांच्यावर आली. ते उसाच्या शेतात गेले. कामात दुपारचे अडीच-तीन वाजले. त्यांच्या पोटात कावळे ओरडू लागले. त्यांचे डबे शाळेतील दप्तरात आणि शाळा तीन किलोमीटर दूर होती. शेजारच्या एका शेतकऱ्याचा ऊस गळीताच्या अवस्थेत होता. भूक भागवण्यासाठी सय्यद आणि पवारांनी शेतात जाऊन पाच-सहा ऊस आणले. ऊस खात असतानाच शेताचा मालक आला आणि त्याच्या शेतातील ऊस तोडल्याबद्दल या मुलांचे शर्ट काढून घेऊन गेला. सायंकाळी या सर्वांना उशीर झाला म्हणून शिक्षक शेतात आले. झालेला प्रकार कळल्यावर त्या शेतकऱ्याकडे गेले. 'विद्यार्थी उपाशी होते, शेतात काम करीत होते आणि त्यांचे डबे शाळेत होते' हे सांगितल्यानंतर त्या शेतकऱ्याने त्यांचे शर्ट परत केले. हा लहानपणीचा अनुभव कोल्हार, (राहता), अहमदनगरचे बाबासाहेब खर्डे यांनी सांगितला.

❑❑❑

# समाजकारणात राजकारण नाही

18 ऑक्टोबर 2001 या दिवशी रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील नवीन वास्तूचं उद्‌घाटन होतं. वेळेचं बंधन पाळून आरोग्यमंत्री श्री. खानविलकर यांच्यासह श्री. शरद पवार आले आणि संपूर्ण वातावरणात नवचैतन्य निर्माण झालं होतं. वास्तूच्या उद्‌घाटनानंतर श्री. शरदराव यांनी आपल्या भाषणात सांगितलं की, 'आजच्या तंत्रज्ञानाच्या या युगात आपणास जैविक तंत्रज्ञानाची कास धरावी लागेल.' तीस मिनिटांच्या भाषणात त्यांनी राजकारणाबद्दल एक शब्दही उच्चारला नाही, मात्र एक मार्मिक कोटी करून गेले की, 'मराठी माणूस जगाच्या पाठीवर कुठेही असो, भांडत असतो. त्यातूनच आपल्या पायावर धोंडा मारून घेतो.' आपल्या परदेश दौऱ्यातील त्यांचे हे निरीक्षण मराठी माणसाच्या प्रेमापोटीच नोंदवले असले, तरी त्यांच्या भाषणाने सर्व उपस्थितांची मने जिंकली होती. हा किस्सा डॉ. दिलीप पारखे यांनी सांगितला.

❏❏❏

# कांद्‌यांचा हार

शरद पवार 1976 मध्ये पुलोदचे मुख्यमंत्री असताना पुसेगाव, तालुका खटाव, जिल्हा सातारा येथे एका कार्यक्रमास गेले होते. त्यावेळी गावकऱ्यांनी सुकलेल्या कांद्‌यांचा हार साहेबांच्या गळ्यात घातला. साहेबांनी त्यातील एक कांदा तोंडात टाकला आणि समोर बसलेल्या समुदायाला सांगितले की, "मला अत्यंत

वाईट वाटते या कांद्याला पाणी कमी पडले, जर भरपूर पाणी असते तर कांदे सुकले नसते; परंतु मी पुढच्या वेळेस येथे येईन त्यावेळी आपण मला मोठ्या कांद्याचा हार घाला." त्याबरोबर समोर बसलेल्या समुदायाने टाळ्यांचा कडकडाट केला आणि त्यानंतर लवकरच पुसेगावच्या शेतीसाठी पाण्याची सोय झाली होती, हा अनुभव पुण्याच्या भानुदास शिंदे यांनी सांगितला.

❒❒❒

# शंभर फुटी बाकही तोकडा

महाराष्ट्राचे नाट्याचार्य आणि 'नवाकाळ'कार काकासाहेब खाडिलकर यांच्या स्नुषा आणि मुंबई काँग्रेसच्या नेत्या श्रीमती यमुनाबाई खाडिलकर यांचा मुंबई मराठी साहित्य संघात षष्ट्यब्दीपूर्ती समारंभ त्यांच्या चाहत्यांनी आयोजित केला होता. प्रमुख अतिथी होते मुख्यमंत्री शरद पवार. शरद पवार यांचा परिचय करून देताना खाडिलकर सत्कार समितीचे चिटणीस आणि पत्रकार चंद्रकांत पुरंदरे म्हणाले की, 'शरद पवार आणि मी पुण्याला एकाच कॉलेजात शिकलो. तेव्हापासून शरदराव आणि मी पुण्याला एकमेकांचे दोस्त बनलो आहोत. पुणे जिल्हा रहिवासी मंडळाचे शरदराव अध्यक्ष आणि मी चिटणीस म्हणून काम केले आहे.' त्यावेळी पवारांच्या चेहऱ्यावर आश्चर्यभाव उमटल्याचे बघितले. शरद पवार आपल्या भाषणात सुरुवातीलाच म्हणाले की, 'मी राज्यमंत्री झालो तेव्हा अनेकांना आम्ही त्यांच्याच जिल्ह्यातला असल्याची ओळख पटली. मंत्रीपदावर माझी नियुक्ती

झाली तेव्हा कित्येकांना मी त्यांच्या तालुक्यातला वाटू लागलो. आता मुख्यमंत्री झाल्यावर तर कित्येकांना त्यांच्याच गावातला, त्यांच्याच शाळा-कॉलेजातला वाटू लागलो आहे (हशा). काहींची मजल तर मी आणि ते वर्गात एकाच बाकावर शेजारी शेजारी बसत असे, असं सांगायची. शाळा-कॉलेजातील बाकावर दोन किंवा तीन विद्यार्थी आमच्या वेळेला बसत. आता माझ्याच बाकावर बसणाऱ्या माझ्या मित्रांसाठी बाक बनवायचं ठरवलं तर शंभर फूट लांबीचा बाकही तोकडा पडेल!' पवारांच्या या वाक्याने सभागृह हास्यकल्लोळात बुडाले, अशी आठवण कुर्ला, मुंबईचे प्रफुल्लकुमार मोकाशी यांनी सांगितली.

❏❏❏

# गणपतीपुळे पर्यटन केंद्राची प्रेरणा

गणपतीपुळे येथील पर्यटन केंद्र हे आज महाराष्ट्रातील प्रथम क्रमांकाचे पर्यटन स्थळ झाले आहे. त्याचे श्रेय शरद पवारांना जाते, हे फार थोड्या लोकांना माहीत असेल. 1962 च्या नोव्हेंबर महिन्यात पवारसाहेब फियाट गाडी घेऊन पुण्याला साळवी यांच्या घरी आले आणि सुधाकरला म्हणाले की, 'चल कोकणात चाललो आहे. तुझ्या गावी जाऊन येऊया.' आणि त्यांच्याबरोबर मधुसूदन बळवंत साळवी आणि सात-आठ जण गणपतीपुळ्याला गेले. त्यावेळी पुण्यातील निसर्गरम्य समुद्र किनारा, पांढरीशुभ्र वाळू आणि निळा समुद्र पाहून पवारसाहेब म्हणाले, 'असे सुंदर ठिकाण महाराष्ट्रच काय, अख्ख्या भारतात

नाही. अशा ठिकाणी पर्यटन स्थळ व्हायला पाहिजे.' त्यानंतर मंत्री झाल्याबरोबर सुमारे 20 कोटी रुपये खर्च करून गणपतीपुळे पर्यटन केंद्राची त्यांनी बांधणी केली आणि आज हजारो पर्यटक या स्थळाला भेट देत आहेत.

❑❑❑

# लोग साथ आते गए और कारवाँ बनता गया

1980 नंतर महाराष्ट्रातील शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पुलोद सरकार बडतर्फ झाल्यानंतर शरदरावजी विरोधी पक्षनेते झाले आणि त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक तरुण मंडळी एकत्र आली. काँग्रेसच्या नव्या सरकारच्या कारकिर्दीत सर्व जीवनावश्यक वस्तूंचे भाव अचानकपणे वाढू लागले होते. सिमेंट प्रकरणामुळे लोक हैराण झाले होते. या सर्वांच्या विरोधात शरदराव यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूरच्या कलेक्टर ऑफीसवर मोर्चा काढण्याचे ठरविण्यात आले होते. सर्वजण स्टेशन रोडच्या काँग्रेस कमिटीत जमलेले होते. सत्ता नसल्याने बरीच मंडळी गायब झाली होती. साधारणत: 30-35 जण पवारांच्या आगमनाच्या वेळी झिंदाबादच्या घोषणा देत होते. त्यावेळी पवारांच्या चेहऱ्यावर थोडंसं हसू आणि अस्वस्थता दिसून येत होती. त्यांनी हातांनी कार्यकर्त्यांना खुणावले आणि म्हणाले, 'आपण सर्वांनी बेंबीच्या

देठापासून घोषणा दिल्या तरी आपला आवाज रस्त्यापर्यंत जाणार नाही. तेव्हा आपण थोडे शांत बसून विचार करूया.'

शरद पवारांच्या ठिकाणी दुसरा कोणताही नेता असता तर कार्यक्रम रद्द करून काढता पाय घेतला असता. पण कोणत्याही परिस्थितीत शंभरजण जर झाले तरी मोर्चा काढायचा, असा त्यांनी निर्णय घेतला आणि सुरुवात बारा वाजता स्टेशन रोडवरून झाली. मार्ग लक्ष्मीपुरी, दसरा चौक, कलेक्टर ऑफीस असा होता. माजी मुख्यमंत्री व आपला स्वाभिमानी तरुण विरोधी पक्षनेता रस्त्यावरून पायी चालत निघालेला पाहून कोल्हापूरची जनता मागे राहणार नव्हती. मोर्चा जसा जसा पुढे सरकत गेला, तसतसे लोक स्वयंस्फूर्तीने मोर्चात सामील होऊ लागले आणि नंतर इतका प्रतिसाद मिळाला की सुरुवातीच्या शंभर-दीडशे लोकांच्या मोर्चाचे रूपांतर कलेक्टर ऑफीसजवळ ते जेव्हा आले, तेव्हा ते दहा ते बारा हजार लोकांच्या समूहात झाले होते, अशी आठवण कोल्हापूरचे गजानन मारुतीराव भोसले यांनी सांगितली.

❒❒❒

# सक्षम नेतृत्वाची झलक

कोल्हापूरचे शांताराम बोकील यांनी त्यांचे काही अनुभव सांगितले आहेत. ते म्हणतात की, मी तेव्हा नागपूरच्या 'नागपूर पत्रिका' दैनिकाचा संपादक होतो. महाराष्ट्र विधिमंडळाच्या 1980 च्या नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या वेळी जळगाव ते नागपूर अशा शेतकरी दिंडीचे नेतृत्व श्री. शरद पवार यांनी केले होते.

लोकप्रतिनिधी सभागृहाकडे शेतकऱ्यांच्या मागण्यांची पूर्तता करा, असे साकडे घेऊनच ही प्रदीर्घ वाटचाल करून शेतकऱ्यांची ही दिंडी नागपूरला पोचली होती. दिंडीवर लाठीमार, अश्रुधूर, गोळीबार करण्याची पाळी यायला नको म्हणून वरिष्ठ पोलीस अधिकारी पवारांकडे आले व त्यांना बाजूला नेऊन सांगितले की, 'आम्ही दिंडी अडवीत आहोत. तिथून पोलिसांचे कडे तोडून पुढे जाण्याचा प्रसंग आला, तर मात्र आम्हाला गोळीबार करून लोकांना रोखण्याचे आदेश आहेत. असे काही होऊ नये अशी आमची आणि तुमचीही मनोमन इच्छा आहे. तेव्हा तुम्ही स्वतः सर्वात पुढे येऊन ठिय्या देऊन तुमच्या दिंडीतील मंडळींना रोखून ठेवा.' शरद पवार यांनी लगेच पुढे जाऊन सर्वांना रस्त्यावर बसून राहण्याचा व कसली गडबड वा अनुचित प्रकार न करण्याचा आदेश दिला आणि विशेष असे की सर्वजण तिथे बराच वेळ रस्त्यावर शांतपणे बसून राहिले. स्वतः पवार तेवढे उभे होते. आजकाल अनेक नेते मोर्चे, धरणे, आंदोलन आदी करतात तेव्हा जमावाकडून दंगा, दगडफेक, लुटालुटीच्या घटना सर्रास दिसून येतात; पण पवार यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या हजारोंचा सहभाग असलेल्या शेतकरी दिंडीकडून व तिच्यात सहभागी झालेल्या मंडळींकडून कसलाही शांतताभंगाचा किंवा अनुचित प्रकार जळगाव ते नागपूर प्रवासी मार्गात व नागपुरात घडला नव्हता. असे हे सक्षम नेतृत्व, असा हा नेतृत्वाचा वचक आणि दरारा असेलेले हे शरद पवार, अशा शब्दांत बोकील यांनी पवारांचा गुणगौरव केला आहे.

❒❒❒

# पदयात्रांनी सुजलेले पाय

शरद पवारांनी आयुष्यात अनेक माणसे, अनेक कार्यकर्ते जोडले. त्यातीलच मूळ बारामतीच्या सटवाजीनगरचे रहिवासी आणि नोकरीनिमित्त मुंबईत आलेले आताचे ठाण्याचे रहिवासी रामचंद्र साबळे हे एक. त्यांनी पवारांची एक आठवण सांगितली.

1986 च्या अगोदर एका विधानसभेच्या निवडणुकीमध्ये शरद पवारांना बारामती मतदारसंघातून हरविण्यासाठी काही विरोधी पक्षांनी चंग बांधला होता. त्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला होता; परंतु त्यांचा हा कुटील डाव पवारांसह अनेक कार्यकर्त्यांनी सतर्क राहून डाव उधळून लावलाच; पण पवारांना विक्रमी मतांनी निवडूनही आणले होते. त्या निवडणुकीच्या कालावधीमध्ये शरद पवारांचे सर्व कार्यकर्ते आणि त्यांच्या अग्रभागी श्रीमती लक्ष्मीबाई कृष्णा करडे या महिला कार्यकर्त्या असायच्या. थंडी मी म्हणत होती. त्यावेळी विरोधकांचा डाव उधळून लावण्यासाठी हे कार्यकर्ते रात्रभर गस्त घालत होते. पहाटे तीन-साडेतीनच्या दरम्यान अचानक रस्त्याच्या बाजूला पांढरी ॲम्बॅसॅडर येऊन उभी राहिली आणि त्यातून शरद पवार उतरले. थेट शेकोटीजळ जात कार्यकर्त्यांना त्यांनी विचारले, ‘तुमच्या विभागात सर्व ठीकठाक आहे ना? काही गडबड तर नाही ना?’ त्यावेळी कार्यकर्त्यांनी सांगितले की, ‘तुम्ही निश्चिंत राहा.’ परंतु कार्यकर्त्यांची नजर पवारसाहेबांच्या पायांवर गेली. त्यांच्या पायाला चालून चालून सूज आली होती. त्यांचा जोर निवडणुकीच्या काळात पदयात्रांवर होता. निवडणुकीच्या काळात प्रत्येक वाड्या,

वस्त्यांना भेटी देत कार्यकर्त्यांची जवळून विचारपूस करून पवारसाहेब त्यांची सुखदु:खं ऐकून घेत व निवारण्यासाठी प्रयत्न करीत. चालून-चालून आपल्या नेत्याच्या पायाला आलेली सूज पाहून कार्यकर्त्यांचेही मन गहिवरले.

❒❒❒

# गिळायला शिकले पाहिजे, ओकायला नाही

शरद पवार हे महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनेचे अध्यक्ष झाले होते. अध्यक्षपदावर निवड झाल्यानंतर राज्य शिक्षकेतर मंडळाच्या कार्यकारी मंडळाची सभा झाली. पवारसाहेब आता काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. "तुमच्या मागण्या तुमचा अध्यक्ष या नात्यानेच शासनापुढे मी मांडीन व तुम्हाला न्याय मिळवून देईन; पण तुम्ही मंडळींनी एक पथ्य पाळणे गरजेचे आहे, की संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संघटनेत काम करताना, गिळायला शिकले पाहिजे, ओकायला नाही." पवार साहेबांनी दिलेला कानमंत्र अत्यंत मोलाचा होता, अशी आठवण नवनीत शहा यांनी सांगितली.

❒❒❒

# 'लोक माझे सांगाती'

2015 मध्ये शरद पवार यांचे 'लोक माझे सांगाती' हे पुस्तक त्यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाला प्रकाशित झाले. शरद पवार गेली साडेपाच दशकं देशाच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण

सहभाग असणाऱ्या नेत्यानं आपल्या राजकीय वाटचालीचा घेतलेला विश्लेषक वेध या पुस्तकात आहे.

पवार म्हणतात, “सर्वसमावेशकता हे या देशाचं वैशिष्ट्य आहे. देशातील सामान्य माणसावर माझा विश्वास आहे. हा सर्वसामान्य भारतीय माणूस भारतातील सर्व राजकारण्यांपेक्षा खूपच शाहणा आणि समजूतदार आहे. योग्य वेळी योग्य निर्णय तो घेतो. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत जनतेचं एक सामुदायिक शहाणपण प्रत्ययाला येतं. हेच शहाणपण भारतीय लोकशाहीचा कणा आहे. त्याच्या भरवशावर या देशाचं भवितव्य सुरक्षित आहे. साऱ्या भारतभर त्याच्या या प्रगल्भ जाणतेपणाचा मी आपल्या साडेपाच दशकांच्या सार्वजनिक जीवनात काम करताना वारंवार अनुभव घेतला आहे. या जनतेचा विश्वास मला पंचावन्न वर्ष लाभला, यापेक्षा अधिक काय असू शकतं?”

शरद पवार यांचे ‘लोक माझे सांगाती’ हे 356 पृष्ठसंख्या असलेले पुस्तक या पुस्तकाची मांडणी अखेरच्या टप्प्यात आली असताना हाती पडले. ही एक राजकीय आत्मकथा असल्याचे त्याच्या मुखपृष्ठावर नमूद आहे. ‘कसोटीच्या क्षणी सामुदायिक शहाणपणाचं दर्शन घडवणाऱ्या, काश्मीरपासून कन्याकुमारी-पर्यंतच्या प्रत्येक भारतीयास विनम्र सादर’ अशी अर्पणपत्रिका जोडलेली आहे. ‘माझे बाबा, माझे हिरो’ या शीर्षकाखाली सुप्रिया सुळेंची प्रस्तावना या पुस्तकाला आहे. 9 प्रकरणांमधून शरद पवार यांनी या पुस्तकात त्यांच्या बालपणापासून तर ‘येत्या काळात डोकावताना’ या शेवटच्या प्रकरणात नमूद केलेल्या वर्तमानापर्यंत

विविधांगी विश्लेषण केले आहे, सर्वच बाबींचा सांगोपांग आढावा घेतला आहे. या पुस्तकावर चर्चा करायची म्हणजे आणखी एक वेगळा ग्रंथ आकाराला येईल. मात्र 'लोक माझे सांगाती' हे पुस्तक म्हणजे शरद पवारांना जाणून घेण्याचा एक मार्ग निश्चितच आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

❑❑❑

# राष्ट्रपती आणि पंतप्रधान पवारांबद्दल काय म्हणाले?

दिल्लीतील पवारांच्या सत्कारसोहळ्याच्या कार्यक्रमात राष्ट्रपती प्रणब मुखर्जी म्हणाले होते, 'भारताला जागतिक स्तरावर अन्न-धान्यात निर्यातदार देश बनविण्यात शरद पवारांचे मोलाचे योगदान आहे. शरद पवार यांचे देशासाठीही अनन्यसाधारण योगदान आहे. केंद्रीय कृषीमंत्री म्हणून सलग 10 वर्ष काम करताना त्यांनी देशाच्या शेती विकासासाठी रचनात्मक कार्य केले. एके काळी भारताला तांदूळ आयात करावा लागत असे, देशाची या गंभीर समस्येतून मुक्तता करण्यासाठी पवारांनी वैज्ञानिक व तज्ज्ञांची मदत घेतली. याकरिता शेतकऱ्यांचे प्रबोधन केले. याचा परिपाक म्हणून जगात प्रथम क्रमांकाचा तांदूळ निर्यातदार देश म्हणून भारताची नवी ओळख निर्माण करून दिली. जागतिक स्तरावर गहू निर्यातीतही देशाला अव्वल स्थानावर पोचविले.'

याच कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते, 'शरद पवार यांचा मूळ पिंड हा रचनात्मक आहे. त्यामुळेच ते राजकारणातही रचनात्मक काम करू शकले. देशाच्या राजकारणात सतत 5 दशके वावर असणारे पवारांचे आयुष्य देशसेवेसाठी पूर्णपणे समर्पित राहिले आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत सहकार आणि राजकारणात संतुलन राखले आहे.' पंतप्रधानांनी आपल्या भाषणात पवारांबरोबरील इस्त्राईल देशाच्या दौऱ्यातील काही प्रसंग आणि गुजरातचे मुख्यमंत्री असताना पवारांनी राज्यातील शेतीच्या विकासाची पाहणी करून कपाशीसोबतच गहू उत्पादनाचा दिलेला सल्ला आदी आठवणींना उजाळा दिला.

❐❐❐

# पवार जेव्हा पूजा करतात...

'मी विज्ञानवादी आहे', असं म्हणणाऱ्या शरद पवारांना जाहीरपणे पूजा-आरत्या करताना कुणी फारसं पाहिलं नाही; पण मुख्यमंत्री असताना त्यांनी सपत्निक विठ्ठल-रखुमाईची पूजा केली होती. अनेकदा जाहीरपणे देव-धर्माबद्दल चिकित्सकपणे पवार बोलतात; पण तेच पवार आग्रहास्तव पूजाअर्चाही करतात. भीमाशंकरच्या गेस्ट हाऊसमध्ये रात्री झोपलेले असताना पवारांच्या अंगावरून साप गेला; पण त्यांना काहीही इजा झाली नाही. त्यानंतर पत्नी प्रतिभाताई या भीमाशंकरच्या मंदिरात नवस बोलल्या आणि त्यांच्या आग्रहास्तव शरद पवारांनी भीमाशंकरला अभिषेक घातला होता. पवारांच्या गावी म्हणजे काटेवाडीत

हनुमानाचं मंदिर आहे, तिथेही गावकऱ्यांच्या आग्रहास्तव ते अभिषेक करत होते, असं पत्रकार संजय मिस्कीन सांगतात.

❑❑❑

# 'पुतना मावशी'चा उल्लेख आणि माफी

शरद पवार 1987 साली पुन्हा काँग्रेसमध्ये आले आणि 1988 साली ते महाराष्ट्राचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. त्यावेळी मुंबई महानगरपालिकेच्या 285 भूखंडांच्या भ्रष्टाचाराचं प्रकरण खूप गाजलं. हे भूखंड खाल्ल्याचा आरोप थेट शरद पवारांवर होता. जनता दलाच्या नेत्या मृणाल गोरे आणि शिवसेनेचे त्यावेळचे आमदार छगन भुजबळ यांनी पवारांवर हा आरोप केला होता. भूखंडाची आरक्षणं कशी वाटली गेली आणि बदलली गेली, याविषयी पवारांनी जाहीरपणे खुलासा केला नव्हता. मृणाल गोरे यांनी भूखंड घोटाळ्याविषयी विधानसभेत आरोप केला, तेव्हा शरद पवार यांनी संतापून त्यांना 'पुतना मावशी' असं म्हटलं; पण नंतर पवारांनी मृणाल गोरेंची माफीही मागितली. या घोटाळ्यावरचे आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत.

❑❑❑

# ... आणि घाशीराम जर्मनीत पोचला

ज्येष्ठ नाट्यकर्मी विजय तेंडुलकर यांनी लिहिलेलं आणि डॉ. जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेलं 'घाशीराम कोतवाल' हे नाटक जोरदार गाजलं. 80 च्या दशकात या नाटकाचा प्रयोग

जर्मनीत होणार होता; पण या नाटकाला काहींचा विरोध होता. नाटकात काम करणारी अनेक मंडळी पुण्यात राहत होती. जर्मनीला विमानाने जाण्यासाठी त्यांना मुंबईचा प्रवास करणं आवश्यक होतं. विरोध करणाऱ्यांनी शिवसेनेच्या मदतीने पुणे-मुंबई रस्त्यावर खोपोलीजवळ गाड्या अडवण्याची योजना आखली; पण ही माहिती अगोदर नाटकातील मंडळीना कळल्यामुळे डॉ. जब्बार पटेल आणि डॉ मोहन आगाशे यांनी पुण्यात शरद पवारांची भेट घेतली. किर्लोस्कर समूहाचे चंद्रकांत किर्लोस्कर यांच्याशी पवारांचे मैत्रीचे संबंध होते. पवारांनी किर्लोस्करांना अडचण सांगितली आणि ताबडतोब 'घाशीराम कोतवाल'च्या टीमसाठी पुणे-मुंबई चार्टर विमानाची सोय केली गेली. नाटक जर्मनीत पोचलं.

❑❑❑

# शंकरराव चव्हाणांचा सल्ला ऐकला असता तर बाबरी मशीद पडली नसती

अयोध्येतील बाबरी मशीद पाडल्यानंतर देशभरात दंगली उसळल्या. ज्यामध्ये हजारो नागरिकांना प्राण गमावले. मात्र "तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांचा सल्ला जर ऐकला असता तर बाबरी मशीद पडून दंगली उसळल्या नसत्या. मनुष्यहानी झाली नसती," असं वक्तव्य शरद पवार यांनी केलं होतं. 6 डिसेंबर 1992 रोजी अयोध्येतील बाबरी मशिदीचं पतन झालं तेव्हा शरद पवार हे केंद्रात संरक्षणमंत्री होते. तर शंकरराव चव्हाण हे गृहमंत्री होते.

'अयोध्येतील बाबरी मशिदीचं पतन ही भारतातील वादग्रस्त घटना म्हणून ओळखली जाते. राम मंदिर आंदोलन पेटलं असताना, 'कल्याण सिंह सरकार बरखास्त करा', असा सल्ला तत्कालीन गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांना दिला होता. जर नरसिंहराव यांनी हा सल्ला ऐकला असता तर बाबरी मशीद पडली नसती आणि मनुष्यहानी तसंच रक्तपात झाला नसता' असं शरद पवार म्हणाले होते. 'राम जन्मभूमी आंदोलनामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. कारसेवक लाखोंच्या संख्येने अयोध्येच्या दिशेने येत होते. परिस्थिती गंभीर असल्याने पंतप्रधान नरसिंहराव यांच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीमध्ये माझ्यासह शंकरराव चव्हाण, अर्जुन सिंह, माधवसिंह सोळंकी यांचा समावेश होता. 'वाद टोकाला गेला आहे. आंदोलनामुळे काहीतरी विपरित घडेल', असा अहवाल तत्कालीन गृहसचिव माधव गोडबोले यांनी अयोध्येतील परिस्थितीबाबत सादर केला होता. या अहवालावर समितीमध्ये चर्चा झाली. विषय अतिशय संवेदनशील होता. 'कारवाई केली तर दंगली होतील. बाबरी मशीद वाचवायची असेल तर उत्तर प्रदेशातील कल्याण सिंह सरकार बरखास्त करा', असं मत शंकरराव चव्हाण यांनी मांडलं होतं. 'सरकार बरखास्त करणं योग्य नाही' असं असं सांगत नरसिंहराव यांच्यासह इतर मंत्र्यांनी शंकरराव चव्हाण यांच्या मताविरोधात भूमिका घेतली. मग पुढे बाबरी मशिदीचं पतन झालं. मुंबईत कायदा सुव्यवस्थेची

परिस्थिती निर्माण झाली. शंकरराव चव्हाणांचं मत स्वीकारलं असतं तर ते अप्रिय ठरलं असतं, पण मनुष्यहानी झाली नसती. रक्तपात झाला नसता.' असे पवारांनी आपल्या आत्मचरित्रात नमूद केले आहे.

❒❒❒

# एकुलती माझी लेक लाडकी!

शरद पवार आणि प्रतिभा पवार यांनी लग्नानंतर एकच मूल होऊ देण्याचा निर्णय घेतला होता. 30 जून 1969 रोजी त्यांना मुलगी झाली. तिचं नाव सुप्रिया. खरंतर त्या काळात 'मुलगा हवाच' अशी समाजाची कर्मठ मानसिकता होती. पण जवळपास पाच दशकांपूर्वी पवारांचा हा निर्णय काळाच्या पुढचा होता. आजही कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रिया बहुतांश महिलाच करतात; पण पवारांनी स्वत: नसबंदी करत आदर्श घालून दिला.

❒❒❒

# विधानसभा निवडणूक 2019 सत्तासंग्रामाचे सेनापती शरद पवार

विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळालं तरी खरे सामनावीर ठरले ते राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार. निकालानंतर सर्वाधिक चर्चा झाली ती पवारांच्या परिश्रमांची. राजकारणाच्या आखाड्यात सामना एकतर्फी होऊ न देता पवारांनी

भाजपसमोर राष्ट्रवादीचा आलेख उंचावून दाखवला. सगळं प्रतिकूल वातावरण, एक्झिट पोल्सने दिलेल्या कमी जागा, यामुळे राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या गोटात अतिशय निराशेचे वातावरण होते. मात्र जसे निकाल यायला लागले तसे भाजपच्या तोंडचे पाणी पळाले. काँग्रेसपेक्षा राष्ट्रवादीने सरस कामगिरी करत परिस्थिती बदलविण्याची ताकद कायम असल्याचं शरद पवारांनी दाखवून दिलं. यामुळेच काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी पवारांना खास फोन करून त्यांचे आभारही मानले आणि आपल्या भावनाही व्यक्त केल्या.

वयाच्या 79 व्या वर्षी शरद पवार यांनी निवडणुकीत बाजी पलटवून लावली. साताऱ्यातली पावसातली सभा तर देशभर सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनली. पवारांच्या या मेहनतीचा फायदा काँग्रेसलाही झाला. त्यामुळे काँग्रेसची इभ्रत वाचली. निवडणुकीच्या काळात राष्ट्रवादीने काँग्रेसमध्ये विलीन व्हावे, असे मत सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केले होते. त्यावरून वेगळी चर्चाही झाली होती. मात्र निवडणुकीत राष्ट्रवादीनेच काँग्रेसला बळ दिल्याचे सिद्ध झाले.

राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाला आता भवितव्य नाही, असा समज अनेकांनी लोकसभेच्या निवडणुकांच्या निकालानंतर करून घेतला होता. अनेक नेते हे दोनही पक्ष सोडून भाजप-शिवसेनेत जात होते. अनेक वर्षे सोबत असलेले सहकारी पवारांनाही सोडून गेले. अहमदनगरमधील अकोले येथील प्रचारसभेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप अध्यक्ष अमित शहा यांच्यावर तोफ डागणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मधुकर पिचड यांच्यावर नाव न घेता टीकास्त्र सोडले. 'आदिवासींचा विकास करण्यासाठी पक्ष सोडून गेलो, असे सांगतात, मग काय चाळीस वर्षे गवत उपटत होतात काय?' असा घणाघात त्यांनी केला. पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावरही हातवारे करत टीका केली. 'मी कुस्ती संघटनेचा अध्यक्ष आहे, त्यामुळे कुस्ती कोणाशी आणि कशी खेळतात हे मला चांगले ठाऊक आहे. यांच्याशी काय कुस्ती खेळायची?' असं म्हणत त्यांनी पुन्हा हातवारे केले. 'समोर पैलवान नाही म्हणता, तर मग पंतप्रधान आणि गृहमंत्री इकडे काय भंडारदरा धरण पहायला येतात का?' असा सवालही त्यांनी केला.

18 ऑक्टोबर, 2019 रोजी सकाळी 10 वाजता पंढरपूर आणि त्यानंतर अंबाजोगाईची सभा केल्यानंतर शरद पवार यांची साताऱ्यामध्ये संध्याकाळी सभा होती. साताऱ्याच्या या सभेत शरद पवार काय बोलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. शरद पवार यांनी साताऱ्यात तुफानी पावसातही सभा घेतली. पवार बोलायला उभे राहिले आणि जोरदार पाऊस सुरु झाला; परंतु पवारांनी सभा सुरुच ठेवली. यावेळी बोलताना पवारांनी साताऱ्याचे माजी खासदार आणि भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. विशेष म्हणजे शरद पवार यांच्या पायाला जखम झालेली होती. चालताना त्रास होत होता. अशा स्थितीतदेखील त्यांनी पावसात भाषण केले.

शरद पवार म्हणाले की, 'वरुणराजानेदेखील आपल्याला आशीर्वाद दिले आहेत. त्याच्या आशीर्वादाने सातारा जिल्ह्यात चमत्कार होणार आहे आणि याची सुरुवात 21 तारखेपासून होणार आहे. एखाद्या माणसाकडून चूक झाली की, त्याने ती चूक कबूल करायची असते. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मी उदयनराजे भोसलेंना साताऱ्यातून उमेदवारी दिली, ही माझ्याकडून चूक झाली होती,' अशी जाहीर कबुली पवारांनी यावेळी दिली. 'साताऱ्याचा प्रत्येक माणूस ती चूक सुधारण्यासाठी 21 तारखेची वाट बघत आहे'.

निवडणुकीच्या निकालानंतर पवार म्हणाले की, 'छत्रपतींच्या साताऱ्याच्या गादीबद्दल सर्वांना आदर आहे; परंतु त्या गादीशी इमान न ठेवल्यास काय होते, हे साताऱ्याच्या लोकांनी दाखवून दिले. पक्षांतर केलेल्यांना जनतेने साफ नाकारले आहे. या निवडणुकीचे हे व्यवच्छेदक लक्षण आहे. एक-दोन अपवाद वगळता पक्षांतर केलेले उमेदवार पराभूत झाले आहेत. आघाडीच्या काळात या लोकांनी पंधरा-पंधरा वर्षे सत्तेची फळे चाखली. सत्ता जाताच पाच वर्षेसुद्धा त्यांना विरोधी बाकावर बसवले जात नाही. कायम सत्तेची ऊब हवी असते. अशी हाव असणे काही बरे नाही. सातारा लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे उमेदवार श्रीनिवास पाटील दोनदा खासदार होते. ते राज्यपालही होते. त्यामुळे साताऱ्याला अभ्यासू खासदार लाभला. या निवडणुकीत दिसलं की भाजप-सेनेच्या लोकांचा सत्तेचा उन्माद जनतेला पसंद पडला नाही. मुळात जमिनीवर पाय ठेवून चालले की, त्यांचे स्वागत

होते; परंतु त्यांनी सीमा ओलांडली होती', अशी जोरदार टीका पवारांनी केली.

2019 च्या विधानसभा निवडणुकीत भाजप-शिवसेनेला स्वबळावर सरकार स्थापन करता येणार नाही ही बाब स्पष्ट होताच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अडीच अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद वाटून घेण्याचा मुद्दा पुढे केला. ही संधी साधून शरद पवार यांनी आपला राजकीय अनुभव आणि कौशल्य पणाला लावले. शिवसेनेच्या पाठीशी ते उभे राहिले. स्वतःच्या पक्षाच्या नेत्यांना या आघाडीसाठी पवारांनी तयार केले. शिवसेनेच्या संजय राऊतांनी त्यांच्या पक्षातील नेत्यांना तयार केले. शिवसेना-राष्ट्रवादी विकास आघाडी झाली असली तरी काँग्रेसच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांचा पाठिंबा मिळवणे अशक्य वाटत होते. मात्र शरद पवारांनी मल्लिकार्जुन खरगे, अहमद पटेल, वेणुगोपाल या काँग्रेस नेत्यांचे मत परिवर्तन केले आणि त्यांच्या माध्यमातून शिवसेनेसारख्या कट्टर हिंदुत्ववादी पक्षासोबत आघाडी करण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाला राजी करण्याचे दिव्य कार्य पार पाडले.

शरद पवार हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे नेते आहेतच; पण 2019 च्या विधानसभा निवडणुकीनंतर ते लोकोत्तर नेते ठरले आहेत. आजवर एकही निवडणूक शरद पवार हरलेले नाहीत. त्यांना हव्या त्या पद्धतीने त्यांनी आजवर निवडणुका फिरवलेल्या आहेत. निकालानंतर सरकारे बनवलेली आहेत. क्रिकेटचे मैदान असो की कुस्तीचा आखाडा, भल्याभल्यांची बोलती त्यांनी बंद केली आहे. महाराष्ट्राला आणि देशाला याचे फार कौतुक आहे.

पवारसाहेबांनी एकदा मनात घेतलं की गेम झाला समजायचं. त्यांच्या चाहत्यांना हे अतिशय भारी वाटतं. पवार म्हणजे विलक्षण प्रतिभेचे चाणक्य आहेत आणि चंद्रगुप्तही. त्यांनी आजवर केलेले राजकारण निव्वळ अफाट आणि अतर्क्य आहे. पवारसाहेब पराभूत होऊ शकत नाही, याची त्यांच्या चाहत्यांना एवढी खात्री आहे की पवार अडचणीत आले असले तरी तो त्यांचा 'गेम' आहे असेच लोक म्हणतात.

पवारांचे वाचन आणि आकलन विलक्षण आहे. त्याचा फायदा 2019 च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना झाला. यावेळी शरद पवार केवळ धुरंधर राजकारणीच नव्हते तर असे काहीतरी होते की जे शरद पवार महाराष्ट्राने कधीच पाहिले नव्हते. यावेळचे शरद पवार अत्यंत झपाटलेले होते, जणू एखाद्या स्वातंत्र्यसंग्राम सेनानीसारखे धावत होते. संपूर्ण निवडणुकीत त्यांच्या धावण्यात काहीतरी हेतू होता. ऐतिहासिक काम आपल्याला करायचे आहे हे ते जाणून होते. ते काम किती अवघड आहे याचा परिचय लोकसभा निवडणुकीनंतर झाला होता. जवळचे दुरावले होते. पक्ष गलितगात्र झाला होता. या पक्षाला उभारी देणे अशक्य असल्याचे वाटत होते. मुद्दा त्यांच्या राजकीय अस्तित्वाचा तर होताच; पण त्यापेक्षा अधिक राज्यावर आणि देशावर मोठे संकट आले आहे, ते दूर करणे आपली जबाबदारी आहे, असे त्यांना वाटत होते. फायद्यातोट्यांच्या परिभाषेत राजकारणाचे मोजमाप करणारे पवार सामान्य नाहीत. यशवंतराव चव्हाणांनंतर महाराष्ट्राची काळजी आपल्याला घ्यावी लागणार, याची जाणीव त्यांना होती आणि

तशीच भूमिका घेत वाटचाल करणारा हा नेता, मुत्सद्दी राजकारणी अशी त्यांची प्रतिमा उत्तरोत्तर तयार होत गेली. काळाच्या ओघात त्यांच्या राजकारणाचा आत्मा कधी हरवला, त्यांनाही समजले नाही. शरद पवारांना या निवडणुकीच्या निमित्ताने तो आत्मा गवसला. या निवडणुकीत शरद पवारांना भाजपला सत्तेपासून दूर ठेवायचे होते. शिवसेनेच्या आक्रमतेने तशी आशा कायम राहिली. पवारांनी शिवसेनेला सत्तेचा मार्ग दाखवला. हे सरकार येणार अशी औपचारिकताच उरली असताना महाराष्ट्रात राजकीय भूकंप झाला. राष्ट्रपती राजवटीत झोपलेला महाराष्ट्र जागा झाला तेव्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आणि अजित पवार उपमुख्यमंत्री झाले होते. भल्या सकाळी शपथ घेण्याची ही युक्ती देवेंद्र फडणवीसांना महागात पडली आणि ते तोंडावर आपटले, तर अजित पवार यांच्या राजकीय करिअरवर प्रश्नचिन्ह लागले. नरेंद्र मोदी आणि अमित शहा सोबत असतील तर आपण काही करू शकतो, या आत्मविश्वासातून केलेली भाजपची ती खेळी चुकली आणि शरद पवार हेच खरे हिरो ठरले. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना पदांचा राजीनामा द्यावा लागला.

अजित पवार अधूनमधून रुसतात आणि मग त्यांची मनधरणी केली जाते, याची सवय महाराष्ट्राला झाली आहे. पण महाविकास आघाडीचे सरकार स्थापन करण्याच्या हालचालींना वेग येताच अजित पवारांनी दार बंद केले आणि रात्रीच भाजपशी हातमिळवणी करत पहाटे उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. शरद पवारांसाठी हा मोठा धक्का होता. ज्याप्रमाणे 1978 साली

वसंतदादा पाटील यांच्या सरकारात घडले होते, त्याची पुनरावृत्ती होणार होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते अजित पवार यांना भाजपने फोडले. अजित पवार यांच्याकडे मोजके अपवाद वगळता आमदारच नव्हते. मात्र त्यांच्या विधिमंडळ पक्षनेते पदाचा फायदा घेऊन तांत्रिक मुद्द्यावर आपण ही बाजी जिंकू, अशी खात्री भाजपला वाटत होती. आपण काही करू शकतो ही खात्री होती. सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. शरद पवारांनी विलक्षण धावपळ करीत त्यांच्यासोबत असलेल्या 162 आमदारांची परेड करीत शक्तीप्रदर्शन केले आणि वातावरण बदलले. सर्वोच्च न्यायालयाने उद्याच्या उद्या मतदान घ्या, असा आदेश दिल्याने भाजपच्या पायाखालची वाळू सरकली. बहुमत पाठीशी नसल्याची खात्री होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांनी राजीनामे दिले.

अजित पवारांना राजकारण कळत नाही, असा आरोप केला जातो; पण त्यांना अशा प्रसंगांतूनही शरद पवार समजलेले नाहीत. शत्रूला मोडून काढणे शरद पवारांसाठी सामान्य गोष्ट होती. या निवडणुकीत 79 वर्षाच्या नेत्याच्या वलयावर काँग्रेसने स्वतःची लाज राखली आणि राष्ट्रवादीने मुसंडी मारली होती. त्यामुळे या नेत्याला सोडणे ही घोडचूक ठरेल, हे कोणत्याही सामान्य माणसाला समजेल. लोकसभा निवडणूक झाल्यावर भाजप अजिंक्य आहे, यावर शिक्कामोर्तब झाले खरे; पण विधानसभा निकालानंतर त्यांना तसेच वाटावे, याचेच आश्चर्य वाटते.

त्या दिवशी हा सर्वांनाच मोठा धक्का होता. अजित पवार यांनी बंड केले आणि शरद पवार यांच्या सांगण्यावरूनच केल्याची चर्चा सुरू झाली. सर्वजण शरद पवारांकडे पाहात होते. विविध पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते या सर्वांशी जोडलेल्या शरद पवारांनी 'तुमची जबाबदारी माझ्यावर आहे', असे 162 आमदारांना प्रेमाने समजावल्यावर तर सर्वांसाठीच ते कुटुंबप्रमुख झाले. अजित पवारांना लगेच परत येण्याचे आवाहन केले. छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील हे राष्ट्रवादीचे मोठे नेते त्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करीत होते. अजित पवार यांना कुटुंबीयांनी समजावले. बहीण सुप्रिया सुळे यांनीही भावनिक आवाहन केले. हॉटेलवर आपल्या पतीसह त्यांची भेट घेतली. आत्यांनी संपर्क साधला. त्यानंतर शरद पवारांच्या पत्नी प्रतिभा पवार यांनी फोनवरून अजितदादांना कुटुंब न दुभंगू देण्याची साद घातली, तेव्हा त्यांचा कठोरपणा कमी झाला. अजित पवार परतले आणि पवारांचे संयुक्त कुटुंब एकत्र राहिले.

यातून काही गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेस आघाडी झाली होती, मात्र निकालानंतर जे विलंबाचे नाट्य घडले ते आघाडीसाठी चांगले यासाठी की त्यातून पहिल्या फटक्यात सत्ता स्थापनेचा दावा करताच ते मिळाले असते तर कदाचित तीनही पक्षांतील नेत्यांना, कार्यकर्त्यांना त्याचे महत्त्व समजले नसते. शरद पवारांनाही लक्षात आले की आपल्याविषयी शंका निर्माण होणार नाही असे राजकारण घडवायचे आव्हान आता आपल्यासमोर आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी

आणि शिवसेनेच्या या महाआघाडीने सत्ता मिळवली. उद्धव ठाकरे हे शिवसेनेतील बंड उफाळून येऊ नये म्हणून आणि पवारांच्या खेळीनुसार मुख्यमंत्री झाले. पक्ष आणि कुटुंब तुटू नये म्हणून अजित पवारांना पुन्हा उपमुख्यमंत्री केले गेले. हे सरकार शिवसेनेचे किंवा महाआघाडीचे असले तरी सर्व सत्तासंग्रामाचे सेनापती शरद पवार हेच होते.

❒❒❒

# थोडक्यात शरद पवार

### प्रारंभिक व वैयक्तिक जीवन

शरद पवारांचा जन्म १२ डिसेंबर, १९४० रोजी पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील काटेवाडी येथे झाला. शरद पवार यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव पवार आणि आईचे नाव शारदाबाई पवार आहे. गोविंदराव हे निरा कॅनॉल सहकारी सोसायटीचे बराच काळ सेक्रेटरी होते. पुढे ते बारामती येथे निघालेल्या सहकारी बँकेचे पहिले व्यवस्थापक झाले. शारदाबाई बारामतीपासून दहा कि.मी. अंतरावरील काटेवाडी येथील कुटुंबातील शेतीची काळजी घेत असत. शारदाबाई या १९३८ मध्ये पुणे जिल्हा लोकल बोर्डाच्या शिक्षण समितीच्या प्रमुख होत्या.

शरद पवार यांचे लग्न प्रतिभा शिंदे यांच्याशी 1967 मध्ये झाले. ब्रिगेडियर राणे या आर्मीमध्ये एका वरिष्ठ पदावर असणाऱ्या आजोबांच्या सहवासात वाढलेली प्रसिद्ध क्रिकेटपटू सदू शिंदे यांची प्रतिभा ही सर्वात मोठी कन्या. पुण्यात प्रभात रोडवर

या मुलीचे बालपण गेले. आई श्रीमती निर्मला शिंदे यांनी त्या काळामध्ये एल.आय.सी. मध्ये काम करून मुलींना मोठे केले.

सुप्रिया (सुळे) (1969) ह्या शरद पवार यांच्या कन्या. त्या बारामती लोकसभा मतदारसंघातील खासदार तर पुतणे अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पद भूषविले आहे. शरद पवार यांचे लहान बंधू प्रताप पवार हे 'सकाळ'या मराठी दैनिकाचे संस्थापक आहे. पवारांचे नातूही आता राजकारणात आले आहेत.

**राजकारण प्रवेश**

छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शरद पवारांचे तीन आदर्श आहेत. शाळेत असताना १९५६ साली पवारांनी गोवा मुक्ती सत्याग्रहाला पाठिंबा दर्शविण्यासाठी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला. तिथून त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात झाली. त्यानंतर कॉलेजमध्ये असताना विद्यार्थी संघटनेचे नेते म्हणूनही त्यांनी काम पाहिले. विद्यार्थी संघटनेच्या एका समारंभासाठी त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना आमंत्रित केले. पवारांनी त्याप्रसंगी केलेल्या भाषणामुळे यशवंतराव अतिशय प्रभावीत झाले. त्यानंतर चव्हाणांच्या सांगण्यावरून पवारांनी युवक काँग्रेसमध्ये प्रवेश केला. चव्हाणांनी पवारांमधील सुप्त नेता हेरला आणि त्यानंतर पवार त्यांचे शिष्य बनले. वयाच्या २४ व्या वर्षी ते महाराष्ट्र राज्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यानंतर त्यांच्याकडे यशवंतरावांचा राजकीय वारसदार म्हणून पाहिले जाऊ लागले.

१९६६ साली शरद पवारांना युनेस्को शिष्यवृत्ती मिळाली. त्याअंतर्गत त्यांना पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इटली, इंग्लंड इत्यादी देशांना भेट देऊन तेथील राजकीय पक्षांचा आणि त्यांच्या पक्षबांधणी करायच्या पद्धतीचा जवळून अभ्यास करता आला.

## विधानसभा

सर्वप्रथम १९६७ च्या राज्य विधानसभा निवडणुकीत ते बारामती मतदारसंघातून विजयी झाले. वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा राज्यमंत्री म्हणून समावेश वयाच्या २९ व्या वर्षी झाला. १९७२ आणि १९७८ सालच्या निवडणुकीतही ते विजयी झाले. १९७८ सालच्या निवडणुकीनंतर वसंतदादा पाटील मुखमंत्री झाले. यशवंतराव चव्हाणांबरोबरच वसंतदादा पाटील हेसुद्धा पवारांचे मार्गदर्शक होते. पण काँग्रेस पक्षाचे १२ आमदार फोडून पवारांनी विरोधी पक्षाबरोबर हातमिळवणी केली आणि वसंतदादांचे सरकार पाडले. त्यानंतर 'पवारांनी माझ्या पाठीत खंजीर खुपसला' अशी जळजळीत प्रतिक्रिया वसंतदादांनी दिली होती.

## मुख्यमंत्री

१८ जुलै, १९७८ रोजी पवारांचा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाला. पवारांबरोबर काँग्रेस (इंदिरा) पक्षातून बाहेर पडलेले १२ आमदार, काँग्रेस (एस) पक्ष आणि जनता पक्ष यांची आघाडी पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) या नावाने बनली आणि त्याचे नेते शरद पवार झाले. ते राज्याचे सर्वांत तरुण मुख्यमंत्री होते. १९८० साली श्रीमती इंदिरा गांधींचे सत्तेत पुनरागमन झाल्यानंतर त्यांनी विरोधी पक्षांची राज्य सरकारे

बरखास्त केली. त्यात पवारांचे सरकारही बरखास्त झाले. जून १९८० मध्ये विधानसभा निवडणुका झाल्या. काँग्रेस (इंदिरा) पक्षाने २८८ पैकी १८६ जागा जिंकल्या आणि बॅरिस्टर अब्दुल रहेमान अंतुले राज्याचे नवे मुख्यमंत्री झाले. शरद पवार विधानसभेतील प्रमुख विरोधी नेते झाले.

## लोकसभा, परत विधानसभा, परत मुख्यमंत्री

इ.स. १९८४ सालची लोकसभा निवडणूक पवारांनी लढवली आणि ते लोकसभेवर निवडून गेले. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या लाटेत विरोधी पक्ष राज्यातील ४८ पैकी केवळ ५ जागा जिंकू शकले. त्यात पवारांच्या बारामती या जागेचा समावेश होता. मात्र त्यांनी राष्ट्रीय राजकारणात न पडता काही काळ राज्याच्या राजकारणातच राहायचे ठरवले. मार्च इ.स. १९८५ ची राज्य विधानसभा निवडणूक त्यांनी बारामतीतून जिंकली आणि लोकसभा सदस्यत्वाचा त्यांनी राजीनामा दिला. त्या विधानसभा निवडणुकीत पवारांच्या काँग्रेस (एस) पक्षाने २८८ पैकी ५४ जागा जिंकल्या आणि पवार राज्यविधानसभेतील विरोधी पक्षनेते झाले.

१९८७ साली ९ वर्षांच्या खंडानंतर शरद पवारांनी राजीव गांधींच्या उपस्थितीत औरंगाबाद येथे काँग्रेस (इंदिरा) पक्षात परत प्रवेश केला. जून १९८८ मध्ये पंतप्रधान आणि काँग्रेस अध्यक्ष राजीव गांधींनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचा केन्द्रीय मंत्रिमंडळात अर्थमंत्री म्हणून समावेश केला. त्यांच्या जागी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून राजीव गांधींनी शरद पवारांची

निवड केली. २६ जून, १९८८ रोजी त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून दुसऱ्यांदा शपथ घेतली. त्यापूर्वीच्या काळात राज्यात काँग्रेस पक्षाला फारसे आव्हान नव्हते. पण बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसेना हा पक्ष भारतीय जनता पक्षाशी युती करून काँग्रेस पक्षाच्या अनेक वर्षे अबाधित असलेल्या वर्चस्वाला आव्हान देऊ लागला होता. त्या आव्हानाला तोंड देऊन राज्यात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व कायम राखण्याची जबाबदारी पवारांवर आली.

नोव्हेंबर १९८९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने राज्यातील ४८ पैकी २८ जागा जिंकल्या. पण १९८४ च्या तुलनेत पक्षाने १५ जागा कमी जिंकल्या. शिवसेनेने ४ जागा जिंकून प्रथमच लोकसभेत प्रवेश केला. भारतीय जनता पक्षाने १० जागा जिंकून जोरदार मुसंडी मारली. लोकसभा निवडणुकीतील चांगल्या कामगिरीमुळे शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष या दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला. राज्य विधानसभेसाठी फेब्रुवारी १९९० मध्ये निवडणुका होणार होत्या. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी राज्याच्या कानाकोपर्यात प्रचारसभा घेऊन काँग्रेस पक्षापुढे मोठे आव्हान उभे केले. राज्य विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने २८८ पैकी १४१ तर शिवसेना-भाजप युतीने ९४ जागा जिंकल्या. राज्याची स्थापना झाल्यानंतर प्रथमच काँग्रेस पक्षाने विधानसभेतील बहुमत गमावले. तरीही १२ अपक्ष आमदारांच्या पाठिंब्यावर शरद पवार यांनी ४ मार्च १९९० रोजी मुख्यमंत्री म्हणून तिसऱ्यांदा शपथ घेतली.

जानेवारी १९९१ मध्ये विलासराव देशमुख, सुरूपसिंग नाईक आणि इतर काही मंत्र्यांनी शरद पवारांना मुख्यमंत्री पदावरून हटवण्याची मागणी पक्षाध्यक्ष राजीव गांधी यांच्याकडे केली; पण त्याला राजीव गांधींनी नकार दिला.

१९९१ च्या लोकसभा निवडणुकीत पवारांनी काँग्रेस पक्षाचा राज्यात एकहाती प्रचार केला. पक्षाने राज्यात ४८ पैकी ३८ जागा जिंकल्या. निवडणूक प्रचारादरम्यान राजीव गांधींची हत्या झाली. पवारांचे नाव पंतप्रधानपदाच्या शर्यतीत होते. मात्र काँग्रेस संसदीय पक्षाने पी.व्ही. नरसिंहराव यांना नेतेपदी निवडले. नरसिंहराव यांचा २१ जून, १९९१ रोजी भारताचे पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला.

## पुन्हा दिल्ली

पी.व्ही. नरसिंहरावांनी पवारांना केन्द्रीय मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री म्हणून नेमले. २६ जून, १९९१ रोजी त्यांचा केंद्रीय मंत्री म्हणून प्रथमच शपथविधी झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या जागी सुधाकरराव नाईक यांची निवड करण्यात आली. राज्य काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदांमुळे सुधाकरराव नाईक यांना राजीनामा द्यावा लागला. त्यावेळी त्यांनी पवारांवरही तोफ डागली होती. बाबरी मशीद विध्वंसानंतरच्या दंगलींमुळे नरसिंहरावांनी शरद पवारांना पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री म्हणून नेमले. त्यांनी ६ मार्च, १९९३ रोजी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून चौथ्यांदा सूत्रे हाती घेतली.

## मुख्यमंत्रीपदाची चौथी कारकीर्द

पवारांची मुख्यमंत्रीपदाची चौथी कारकीर्द अत्यंत संकटाची व वादग्रस्त ठरली. ते परत मुख्यमंत्री बनून एक आठवडा व्हायच्या आत, १२ मार्च, १९९३ रोजी मुंबईत भीषण बाँबस्फोट झाले. त्यांत अडीचशेपेक्षा अधिक माणसं ठार तर ६०० हून अधिक लोक जखमी झाले. ३० सप्टेंबर, १९९३ रोजी लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये भूकंप होऊन दहा हजारांपेक्षा जास्त लोक ठार झाले. या संकटांबरोबरच राज्यात कमालीच्या वाढलेल्या भ्रष्टाचाराबद्दल मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त गो.रा. खैरनार यांनी पवारांना दोषी धरून त्यांच्यावर अनेक आरोप केले. प्रख्यात समाजसेवक अण्णा हजारे यांनी वनखात्यातील वाढत्या भ्रष्टाचाराविरोधात उपोषण केले. तेव्हा पवारांचे सरकार भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहे असा आरोप झाला. जळगाव येथील सेक्स स्कँडलमध्ये अनेक तरुणींवर लैंगिक अत्याचार झाले, त्यात काँग्रेस पक्षाचे स्थानिक नगरसेवक सामील आहेत असा आरोप झाला. २३ नोव्हेंबर, १९९४ रोजी नागपूर येथे गोवारी समाजातील लोकांचा शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची मागणी करण्यासाठी मोर्चा निघाला, तेव्हा मुख्यमंत्री या नात्याने मोर्चेकऱ्यांची भेट न घेता त्यांच्यावर लाठीमार करण्यात आला. त्यात चेंगराचेंगरी होऊन ११४ लोक मृत्युमुखी पडले. त्यामुळे आदिवासी कल्याण मंत्री मधुकरराव पिचड यांना तेव्हा या घटनेची जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा लागला.

राज्य विधानसभेसाठी फेब्रुवारी-मार्च १९९५ मध्ये निवडणुका होणार होत्या. त्या निवडणुकींच्या तिकिटवाटपात काँग्रेस पक्षात मोठया प्रमाणावर बंडखोरी झाली. अनेक ठिकाणी काँग्रेस नेत्यांनी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध अपक्ष म्हणून निवडणुका लढवल्या.

जनतेत सरकारविरुद्ध वाढलेली नाराजी आणि मोठ्या प्रमाणावर झालेली बंडखोरी यांचे प्रतिबिंब मतपेटीत उमटले. काँग्रेस पक्षाचा राज्यात प्रथमच पराभव झाला. शिवसेना-भाजप युतीस २८८ पैकी १३८ जागा मिळाल्या तर काँग्रेस पक्षास ८० जागांवर समाधान मानावे लागले. राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून मनोहर जोशी यांचा १४ मार्च, १९९५ रोजी शपथविधी झाला.

## दिल्लीची तिसरी फेरी

१९९६ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत पवार राज्य विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते होते. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी बारामतीतून विजय मिळवला आणि त्यानंतर ते पुन्हा राष्ट्रीय राजकारणात उतरले. जून १९९७ मध्ये त्यांनी काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सीताराम केसरी यांच्याविरुद्ध निवडणूक लढवली पण त्यांचा पराभव झाला.

१९९८ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राज्यात रिपब्लिकन पक्ष आणि समाजवादी पक्षांबरोबर निवडणूकपूर्व आघाडी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शिवसेना-भाजप विरोधी मतांचे विभाजन टळले आणि काँग्रेस-रिपब्लिकन पक्ष आणि समाजवादी पक्ष यांच्या युतीने ४८ पैकी ३७ जागा जिंकून जोरदार

यश प्राप्त केले. शिवसेना-भाजप युतीला १० जागांवर समाधान मानावे लागले. त्यानंतर शरद पवार १२ व्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते झाले.

१२ वी लोकसभा बरखास्त झाल्यानंतर मे १९९९ मध्ये पी.ए. संगमा आणि तारिक अन्वर यांच्या साथीने शरद पवारांनी अशी मागणी केली की, '१३ व्या लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने इटलीत जन्मलेल्या सोनिया गांधींऐवजी भारतात जन्मलेल्या कोणाही नेत्याला पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून घोषित करावे.' काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधींना लिहिलेल्या पत्रात त्या तिघांनी म्हटले, 'उच्च शिक्षण, कर्तबगारी आणि पात्रता असलेल्या अनेक व्यक्ती असलेल्या या ९८ कोटी लोकांच्या भारत देशात भारताबाहेर जन्म झालेल्या कोणत्याही व्यक्तीने सरकारचे नेतृत्व करणे योग्य होणार नाही, कारण हा प्रश्न देशाची सुरक्षा, आर्थिक हितसंबंध आणि जागतिक राजकारणातील भारताच्या प्रतिमेबरोबरच प्रत्येक भारतीयाच्या अस्मितेशी निगडित आहे.' या कारणावरून काँग्रेस पक्षाने शरद पवार, पी.ए. संगमा आणि तारिक अन्वर यांना ६ वर्षांसाठी पक्षातून काढून टाकले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

त्यानंतर १० जून, १९९९ रोजी शरद पवारांनी 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची' स्थापना केली. १९९९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर कोणत्याही पक्षास अथवा आघाडीस बहुमत मिळाले नाही. त्यानंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची आघाडी होऊन विलासराव देशमुख राज्याचे नवे मुख्यमंत्री झाले.

२००४ मधील लोकसभा निवडणुकीनंतर पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष केंद्रात मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारमध्ये सामील झाला. २२ मे, २००४ मध्ये शरद पवारांनी देशाचे कृषीमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. २९ मे, २००९ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांना कृषी, ग्राहकांशी संबंधित बाबी, अन्न आणि सार्वजनिक वितरण ह्या खात्यांची धुरा देण्यात आली. जुलै २०१० मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर पक्षकार्याला अधिक वेळ देण्याची इच्छा असल्याचे सांगून पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याकडे त्यांनी आपल्यावरील कार्यभार कमी करण्याची विनंती केली. मधल्या काळात पवार आणि त्यांचा पक्ष राज्याच्या किंवा केंद्राच्या सत्तेबाहेर होता. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाला चौपन्न जागा मिळाल्या. शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस या तीन पक्षांचे मिळून महाआघाडीचे सरकार महाराष्ट्रामध्ये स्थापन करण्यात शरद पवार यांचा मोलाचा सहभाग होता.

### क्रीडा प्रशासन

राजकारणाबरोबरच क्रिकेट हेदेखील पवारांच्या आवडीचे क्षेत्र आहे. २९ नोव्हेंबर २००५ रोजी ते भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी निवडून आले. १ जुलै, २०१० रोजी त्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. जगमोहन दालमिया यांच्यानंतर हे पद भूषविणारे ते दुसरे भारतीय होते. शरद पवार यांना कबड्डी, खो-खो, कुस्ती,

फुटबॉल आणि क्रिकेट यासारख्या खेळांमध्ये रस आहे. ते खालील सर्व संस्थांचे प्रमुख किंवा तत्सम पदावर राहिले आहेत.

- मुंबई क्रिकेट असोसिएशन
- महाराष्ट्र कुस्ती संघ
- महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन
- महाराष्ट्र खो-खो असोसिएशन
- महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना
- भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्ड
- आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे उपाध्यक्ष
- आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष

**शिक्षणसंस्थांमधील सहभाग**

पवारांचा शिक्षणक्षेत्राशीही घनिष्ठ संबंध आहे. ज्या संस्थांचे त्यांनी अध्यक्षपद किंवा प्रमुखपद भूषविले, त्यातील महत्त्वाच्या शिक्षणसंस्था खालीलप्रमाणे -

- विद्या प्रतिष्ठान, बारामती
- कृषी विकास प्रतिष्ठान, बारामती
- रयत शिक्षण संस्था, सातारा
- वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी, पुणे
- शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव, बारामती

**पवार अध्यक्षपदी किंवा प्रमुखपदी राहिले अशा काही अन्य संस्था**

- नेहरू सेंटर, मुंबई

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
- आंतरराष्ट्रीय शेती व्यापार व शेतीवर आधारित उद्योग केंद्र (सीटा)
- रायगड सैनिकी शाळा, महाड, जिल्हा रायगड
- को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया

**प्रमुख सन्मान**

- सर्वोत्कृष्ट संसदपटू (2003)
- पद्मविभूषण (2017)

❑❑❑

# शरद पवार यांचा जीवनपट

12 डिसेंबर 1940 - जन्म - काटेवाडी, बारामती, जि. पुणे

1946-1957 - शालेय शिक्षण - बारामती नगरपालिका शाळा, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची एम.ई.एस., राजर्षी शाहू विद्यालय, बारामती, रयत शिक्षण संस्थेची शाळा, महात्मा गांधी विद्यालय, प्रवरानगर

1958-1962 - महाविद्यालयीन शिक्षण 11 वी, 12 वी, बी.कॉम. - बृहनमहाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे

1962 - युवक काँग्रेसमध्ये प्रवेश

1963 - पश्चिम महाराष्ट्र युवक काँग्रेसचे चिटणीस, चिनी आक्रमणाच्या वेळी नागरी समितीची धुरा, युनेस्कोचे निमंत्रण, आंतरराष्ट्रीय युवक परिषदेत सहभाग, जपान, अमेरिका, कॅनडा, इंग्लंड व जर्मनी या देशातील युवक चळवळीचा अभ्यास केला.

1964 - महाराष्ट्र युवक काँग्रेसचे चिटणीस

1967 - बारामतीतून विधानसभेवर प्रथम निवडून आले.

1970-1972 - 'काँग्रेस फॉर सोशॅलिस्ट ॲक्शन' या संघटनेच्या महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष

1972 - राज्यमंत्री - गृह, क्रीडा, राजशिष्टाचार, प्रसिद्धी, अन्न व नागरी पुरवठा

1974-1978 - मंत्री - शिक्षण व युवक कल्याण, कृषी, पाणलोट क्षेत्र विकास व खार जमिनी, गृह व युवक सेवा, निवडणुकीनंतर उद्योग व कामगार मंत्री

जुलै 1978-फेब्रुवारी 1980 - महाराष्ट्राचे मुख्यमंत्री

1981-1984 महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते

1982-1986- अखिल भारतीय काँग्रेस कमिटी समाजवादीचे अध्यक्ष

1984 - बारामती मतदारसंघातून खासदारपदी निवड

1985 - विधानसभा विरोधी पक्षनेते

26 जून 1988- 4 मार्च 1990 - महाराष्ट्राचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री

5 मार्च 1990- 25 जून 1991 - महाराष्ट्राचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री

नोव्हेंबर 1991 - बारामती लोकसभा मतदारसंघातून खासदार

26 जून 1991 - 5 मार्च 1993 - भारताचे संरक्षण मंत्री

6 मार्च 1993- 14 मार्च 1995 - महाराष्ट्राचे चौथ्यांदा मुख्यमंत्री

मे 1996 - डिसेंबर 1997 - पुन्हा खासदारपदी निवड

फेब्रुवारी-मार्च 1998 - निवडणुकीत पुन्हा खासदारपदी निवड

19 मार्च 1998 ते मे 1999 - लोकसभा विरोधी पक्षनेते

10 जून 1999 - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना व राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड

सप्टेंबर-ऑक्टोबर 1999 - निवडणुकीत पुन्हा खासदारपदी निवड

मार्च 2001 - केंद्रिय आपत्कालीन व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष

नोव्हेंबर 2001 - मराठवाडा कृषी विद्यापीठाचा 'कृषीरत्न' किताब

2001-2010 - मुंबई क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष

13 मे 2004 - सार्वत्रिक निवडणुकीत पुन्हा खासदारपदी निवड

22 मे 2004 - 2009 - भारताचे कृषीमंत्री

2005-2008 - बीसीसीआय अध्यक्ष

16 मे 2009 - 16 मे 2014 - पुन्हा खासदार

23 मे 2009 - 18 जाने. 2011 - केंद्रीय मंत्रिमंडळात कृषी, ग्राहकांशी संबंधित बाबी, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री

18 जाने. 2011 - 26 मे 2014 केंद्रीय मंत्रिमंडळात कृषी आणि अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री

जुलै 2010 - 2012 - आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष

2012 - 2016 - मुंबई क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष

3 एप्रिल 2014-2 एप्रिल 2020 व पुन्हा 2020 पासून - राज्यसभेवर

❒❒❒

# पवारांनी केलेली उल्लेखनीय कामे

● युनेस्कोच्या फूड फॉर हंगर ऐवजी कामाच्या मोबदल्यात रेशन देण्याचा निर्णय. त्यातून रोजगार हमी योजना उभी राहिली.

● ज्येष्ठ बंधू अप्पासाहेब पवार यांच्या नेतृत्त्वाखाली 1971 साली बारामती कृषी प्रतिष्ठानची स्थापना केली. पथदर्शी प्रयोग राबवले.

● 'घर तेथे संकरित गाय', 'गाव तेथे सहकारी दूध सोसायटी' या सूत्राने बारामती तालुक्यात व नंतर हे मॉडेल राज्यभर नेऊन दुग्ध व्यवसाय वृद्धिंगत केला.

● यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून शेती, सहकार, शिक्षण, पर्यावरण अशा अनेक क्षेत्रात उपयुक्त कार्य.

● दिल्लीतील सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेड इन ॲग्रिकल्चर ॲन्ड ॲग्रो बेस्ड इंडस्ट्रीज (सीटा) संस्थेच्या उभारणीत पुढाकार.

● पवार अध्यक्ष झाल्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या शाळा, महाविद्यालये, आश्रमशाळांमध्ये मोठी भर.

● विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी रुजावी, संशोधक तयार व्हावेत, यासाठी रयत विज्ञान परिषदेची स्थापना.

● 1993 पासून नेहरू सेंटरचे अध्यक्ष आहेत.

● नेहरू तारांगण आधुनिक केले. आशियातल्या पहिल्या विशेष प्रोजेक्टरचा वापर केला.

● केंद्र आणि राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यातील तफावत दूर करण्याचा केली.

● आणीबाणीत 50 ते 55 वयाच्या सक्तीने निवृत्त केलेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेतले.

● प्राथमिक आरोग्य केंद्रातील मदतनिसांना वेतनवाढ.

● मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव.

● स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नावे विद्यापीठ स्थापन.

● सीमाप्रश्न सोडवण्यासाठी बेळगावात मतदान घेण्याचा प्रस्ताव मांडला, मात्र सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ.

● मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्सला वलय मिळवून देण्यात महत्त्वाचं योगदान, सध्या हे संकुल मुंबईचा कणा आहे.

● 80 च्या दशकात मुंबईच्या समुद्रात नैसर्गिक तेलाचे साठे आढळले, त्यावर आधारित उद्योग महाराष्ट्रात ठेवण्यात यश.

● राज्यातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत विदर्भातील बुटीबोरीला उभारण्यात मोठा सहभाग.

● पुणे परिसरात ऑटोमोबाईल कंपन्यांच्या उभारणीला प्राधान्य.

● माथाडी मंडळांच्या स्थापनेत शरद पवारांचा सिंहाचा वाटा, दिवंगत अण्णासाहेब पाटील यांना मोलाची मदत.

● माथाडी कामगारांच्या घरांसाठी वडाळा-चेंबूरमध्ये जमीन दिली.

● नवी मुंबईच्या कोपर खैरणेत सिडकोकडून 5 हजार घरं बांधून ती माथाडी कामगारांना दिली.

● केंद्रीय कृषीमंत्री असताना शरद पवार यांनी माथाडी मंडळावरचा 248 कोटींचा आयकर माफ करून घेतला.

● चातुर्वर्ण्य हेच देशातील पहिले आरक्षण असल्याची मांडणी केली.

● इंदिराजींच्या हत्येनंतर निर्माण झालेली परिस्थिती निवळण्यात महत्त्वाचं योगदान.

● पंजाब शांत करणारा ‘राजीव-लोंगोवाल करार’ प्रत्यक्षात आणण्यामागे महत्त्वाचे प्रयत्न.

- 1989 साली मुख्यमंत्री असताना नाशिकला यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची स्थापना.
- कुशल क्रीडा संघटक अशी त्यांची ओळख आहे.
- राज्य कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष असताना लाल मातीसोबतच गादीवरील कुस्तीला सुरुवात केली.
- देशातील सर्वश्रेष्ठ अशा महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेला प्रतिष्ठा मिळवून दिली.
- खो-खो खेळासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे शरद पवार यांचा वाढदिवस 'खो-खो दिवस' म्हणून साजरा केला जातो.
- 1990 साली बिजिंगमधील एशियाड स्पर्धेत कबड्डीचा समावेश करण्यात योगदान.
- 1993 साली पुण्यात राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं आयोजन, त्यावेळी 11 महिन्यात शिवछत्रपती क्रीडा नगरीची उभारणी केली.
- संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे शाहीर अमर शेख यांच्या नावाने पुरस्कार सुरु केला.
- साहित्य अकादमी पुरस्कार मिळवणाऱ्या मराठी कलाकारांना राज्याकडून 1 लाख रुपये देण्याचा निर्णय.
- कवी ना.धों. महानोर, लक्ष्मण माने यांसारख्या साहित्यिकांचा विधान परिषद प्रवेश शरद पवार यांच्यामुळेच झाला.
- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेला अनेक अडचणींतून सोडवलं, यशवंत नाट्यगृह उभारण्यात मोलाची मदत.
- 'घाशीराम कोतवाल' नाटकाच्या बंदीविरोधात उभे राहिले.

- 1988 मध्ये मुख्यमंत्री असलेल्या पवारांनी भटक्या-विमुक्तांना घरे बांधण्यासाठी पुण्यात जमीन मंजूर केली.
- 1990 मध्ये फलोत्पादन कार्यक्रम राबवला. हा यशस्वी कार्यक्रम केंद्र सरकारनेही स्वीकारला.
- मुख्यमंत्री असताना कोकण रेल्वेसाठी केरळने निधी देण्यात असमर्थता दर्शवल्यानंतर महाराष्ट्राने ती जबाबदारी घेतली.
- शरद पवार यांनी पैठणला संतपीठाची घोषणा केली, 17 एकर जमीनही दिली.
- शाहू-फुले-आंबेडकरांचं लिखाण प्रकाशित करण्यासाठी समित्या स्थापन केल्या, संकलित साहित्य प्रकाशित केलं.
- महाराष्ट्रासाठी 3 वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय
- महिलांना सैन्यदलात प्रवेश देण्याचा ऐतिहासिक निर्णय सरंक्षणमंत्री पवार यांनी घेतला. लष्करात महिलांना आरक्षण दिलं.
- लातूरच्या किल्लारी भूकंपावेळी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी दीर्घ काळ तळ ठोकून केलेल्या कामाला तोड नाही.
- स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण आणि राज्य महिला आयोग स्थापन करण्यात योगदान.
- अर्थसंकल्पात आदिवासींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद करण्याचा निर्णय, पवारांचा हा निर्णय केंद्रानेही राबवला.
- दुसऱ्या हरित क्रांतीचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात.
- कृषीमंत्री कार्यकाळात गहू आणि तांदळाच्या उत्पादनात भारताने यशस्वी झेप घेतली.

● कृषीमंत्री झाल्याबरोबर शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं. 3 कोटी 69 लाख शेतकऱ्यांना याचा फायदा झाला.

● शेती कर्जावरचा 12 टक्क्यांचा व्याजदर टप्प्याटप्प्याने 4 टक्क्यांवर आणला.

❑❑❑

# असा द्रष्टा नेता परत होणे नाही!

यशवंतराव चव्हाण यांची वैचारिक ताकद आणि वसंतदादा पाटील यांचे संघटन कौशल्य यांचा समर्थ वारसा जोपासणारे शरद पवार हे एक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ राजकारणी तर आहेतच; पण केवळ राजकारण एके राजकारण न करता त्यांच्यात असंख्य असे गुण आहेत की प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती, सामान्य माणसे त्यांच्याशी जोडल्या गेली आहेत. साहित्य, कला, संस्कृतीशी जिव्हाळ्याचे नाते ठेवून सुसंस्कृत आणि संपन्न महाराष्ट्र घडविण्यात शरद पवार यांचा सिंहाचा वाटा आहे. चांद्यापासून बांद्यापर्यंत पसरलेल्या महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यातील राजकारण, समाजकारण, पाण्याची परिस्थिती याचा सखोल अभ्यास, शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या समस्यांची जाण, सहकारी साखर कारखानदारीसमोरील आव्हाने आणि विदर्भातील कापूस किंवा संत्रा उत्पादकांच्या अडचणी एवढेच नव्हे तर महाराष्ट्रासह देशातील शेतीविषयक समस्या या सर्वांवर मात करण्याची मानसिक आणि बौद्धिक ताकद पवारांकडे आहे. 1993 साली मराठवाड्यात भूकंपाची आपत्ती कोसळल्यावर सर्वप्रथम तेथे

पोचणारे आणि नंतर कितीतरी दिवस तेथेच मुक्काम ठोकून मिळेल ती चटणी-भाकरी खात, भूकंपग्रस्तांचे अश्रू पुसणारे शरद पवार या देशाने बघितले. क्रिकेटमधील जगमोहन दालमिया यांची मिरासदारी मोडून काढण्यासाठी आक्रमक झालेले शरद पवार किंवा प्रमोद महाजनांसारख्या विरोधी पक्षातील नेत्याच्या अकाली निधनाने हळवे झालेले शरद पवार अशी अनेक रूपे त्यांच्या ठायी आहेत.

सुरेंद्र हसमनीस यांनी 2006 मध्ये पवारांबद्दल सुंदर लेखन केले होते. 'भल्या पहाटे एखाद्या बड्या उद्योगपतीबरोबर गोल्फचा चेंडू चालवणारे, त्या दिवशी दुपारी देहू-आळंदी किंवा पंढरपूरसारख्या ठिकाणी वारकरी मंडळींत राहणारे आणि सायंकाळी एखाद्या शेताच्या बांधावर शेतकरी बांधवांना चार युक्तीच्या गोष्टी सांगणारे आणि रात्री बालगंधर्वमध्ये एखाद्या सुगम संगीताच्या मैफिलीचा आस्वाद घेणारे शरद पवार राजकारणाचे डावपेच खेळतात तरी कधी, असा प्रश्न अनेकदा अनेकांना पडतो. म्हणजे पवारसाहेबांना जवळून ओळखतात त्यांना त्याचे अजिबात आश्चर्य वाटत नाही. शरदराव फडावरचे पैलवान नाहीत, असे उत्तर देऊन ते मोकळे होतात. खेड्यापाड्यांत जत्रांचा हंगाम सुरू झाला की वर्षभर कसलीही मेहनत न घेणारे पैलवान फुरफुरू लागतात. त्यांना फडावरचे पैलवान म्हणतात. चार-आठ दिवस मेहनत करून ते कुस्तीच्या फडात उतरतात. पण वर्षभर मेहनत करून मैदानात उतरणाऱ्या पैलवानांकडून अस्मान बघण्याचेच भोग त्यांच्या नशिबी येतात. शरद पवार हे वर्षभर

मेहनत करणाऱ्या पैलवानांच्या पठडीतील राजकारणी आहेत आणि त्यामुळे निवडणुका आल्या तरी त्यांना चिंता नसते. कुणाला कधी अंगावर घ्यायचे, कुणाला कधी पाठ दाखवायची हे त्यांच्या डोक्यात तयार असते. दोन पावले पुढे टाकताना कधी चार पावले मागे घेण्याची तयारी ठेवावी लागते. शरद पवार यांनी आपले राजकारण असे फुलविले आहे. कोणी कितीही नाके मुरडली तरी सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार हा शब्द आहे आणि तो का आहे याचे उत्तर त्यांच्याविषयी सखोल अभ्यास करणाऱ्यांनाच मिळते.'

एखाद्या प्रसंगी घेतलेली मुत्सद्दी माघार म्हणजे स्वाभिमान गहाण ठेवणे नव्हे, हे शरद पवार यांच्याकडून शिकायला हवे. 1999 मध्ये केवळ पवार यांच्या प्रयत्नांमुळे बहुजन समाज पार्टीच्या नेत्या मायावती यांनी आपली मते फिरवली आणि केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार एका मताने कोसळले. नव्या सरकारसाठी काँग्रेसने प्रयत्न सुरू केले, तेव्हा लोकसभेत विरोधी पक्षनेते असलेले शरद पवार पंतप्रधान होणार अशी सर्वांचीच खात्री आणि अपेक्षा होती; पण आपल्याला डावलून सोनिया गांधी पंतप्रधान म्हणून नरसिंहराव यांचे घोडे पुढे दामटत असल्याचे लक्षात येताच स्वाभिमानी शरद पवार यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. त्याच वर्षी महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेसने लढविल्या आणि यशही मिळवले. नंतर अत्यंत सन्मानाने काँग्रेसबरोबर आघाडी करून राज्याच्या सत्तेत

भागिदारी मिळवली. काँग्रेसला त्यांची गरज होती आणि त्यामुळे राज्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे सरकार स्थापन झाले.

2004 च्या लोकसभा निवडणुकीनंतर देशात काँग्रेसच्या नेतृत्वाखालील पण अनेक पक्षांचा सहभाग असलेले सरकार स्थापन झाले. या सरकारमध्ये शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सहभागी होता. या सरकारमध्ये राष्ट्रवादीचे दोन कॅबिनेट मंत्री आणि एक राज्यमंत्री होता. त्याच सुमारास राज्यात असलेले काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार आणि केंद्रात राष्ट्रवादीला द्यावी लागलेली मंत्रीपदे म्हणजे पवारांच्या स्वाभिमानाचा विजय आहे.

राजकारणात नेहमीच नाही पण प्रसंग येताच आपली ताकद दाखवावी लागते. राजकारणात जसे शह दिले जातात, तसे समोरून काटशह मिळतात. 1979 साली वसंतदादा पाटील आणि नासिकराव तिरपुडे यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात उद्योग मंत्री असलेल्या शरद पवार यांनी सुंदरराव सोळंके, सुशीलकुमार शिंदे व दत्ता मेघे या आपल्या सहकाऱ्यांसह मंत्रीपदाचा राजीनामा देऊन वसंतदादा-तिरपुडे यांचे सरकार ढासळून टाकले व स्वतःच्या नेतृत्वाखाली आघाडीचे पुलोद सरकार स्थापन केले. त्यावेळी ‘शरद पवार यांनी वसंतदादांच्या पाठीत खंजीर खुपसला’, असा प्रचार करण्यात आला. पवारांनी दादांचे सरकार पाडण्याचा निर्णय का आणि कोणत्या परिस्थितीत घेतला हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला नाही. तेव्हा वसंतदादा आणि तिरपुडे यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकार होते; पण आघाडी सरकारची म्हणून जी काही पथ्ये असतात ती खुंटीवर टांगून तिरपुडे यांनी

रोज यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यावर टीका करण्याचा सपाटा लावला होता. तिरपुडे यांना आवरा, अशी विनंती शरद पवार यांनी केली पण वसंतदादांनी ते फारसे मनावर घेतले नाही. अखेर तिरपुडे यांच्या जाचातून आपली आणि आपल्या पक्षाची आणि कार्यकर्त्यांची सुटका करून घेण्यासाठी पवार यांनी ते सरकार पाडून आपल्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार स्थापन केले. अंगाला राख फासून आणि साधू बनून कुणी राजकारणात उतरत नाही. प्रत्येकालाच महत्त्वाकांक्षा असतात आणि संधी मिळाली की तिचा फायदा उठवणे अपरिहार्य असते. तिरपुडे यांच्या अट्टाहासातून आणि वसंतदादांच्या नमते घेण्याच्या भूमिकेतून शरद पवार यांच्याकडे अशी संधी चालून आली. तिचा सुयोग्य वापर पवार यांनी केला.

बाळासाहेब ठाकरेंसारखं समोरच्यांना आपल्या कवेत घेईल असं अमोघ वक्तृत्व नाही, राज ठाकरेंसारख्या लाखा-लाखांच्या सभा त्यांच्या भरत नाहीत, शिवसैनिकांसारखे जीव ओवाळून टाकतो, असे म्हणणारे कार्यकर्ते पक्षाजवळ नाहीत, ते कधीही कोणताही आदेश देत नाहीत पण तरीही शरद पवार या नावाचं गारूड साऱ्या महाराष्ट्रभर का असावं? महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातल्या माणसाला शरद पवार हे नाव माहीत असतं. लाखाच्या सभा भरल्या नसल्या तरी ते काय बोलतात याकडे सगळ्यांचं लक्ष असतं. त्यांच्या पुढच्या कृतीचा अंदाज लावता लावता लोकांच्या डोक्याचा भुगा होतो आणि जीव ओवाळून टाकायचं म्हणाल, तर निष्ठावंत कार्यकर्ते अवघ्या महाराष्ट्रभर

त्यांनी निर्माण केले आहेत. खेडेगावातल्या एखाद्या कार्यकर्त्यापासून संशोधन क्षेत्रातील मान्यवरांपर्यंत आणि स्वपक्षापासून विरोधी पक्षांपर्यंत पवारांच्या मैत्रीचं वर्तुळ विस्तारलेलं आहे. प्रत्येक क्षेत्रातील बड्या लोकांशी त्यांचे संबंध चांगले आहेत. रतन टाटा असो वा राहूल बजाज किंवा अनिल, मुकेश अंबानी असो वा अन्य कुणी उद्योगपती त्या सर्वांना शरद पवार जवळचे वाटतात. साहित्य क्षेत्रातील मान्यवरांशी त्यांची मैत्री प्रसिद्ध आहेच; पण नाट्यक्षेत्रातील जब्बार पटेल, मोहन आगाशे, मोहन जोशी यांच्याशीही त्यांचे चांगले संबंध आहेत. कठीण परिस्थितीतूनही ते मार्ग काढतात. त्यामुळे कुणीच त्यांचा दीर्घकाळ शत्रू रहात नाही. बाळासाहेब ठाकरे हे तर मोठं उदाहरण. राजकारणापलीकडे त्यांची मैत्री होती.

दांडगी स्मरणशक्ती हा पवारांचा अफलातून गुण आहे. आयुष्यात त्यांना एकदा भेटलेली माणसे पुढे दहा वर्षांनी भेटली तरी त्यांच्या लक्षात रहातात. खेड्यापाड्यात सभेला गेल्यानंतर ते तेथील नेत्यांना, जुन्या जाणत्यांना अगदी नावानिशी हाक मारून त्यांच्याशी आदराने बोलतात. त्यांना मान देतात. समोरची व्यक्ती आपल्याला शरद पवार ओळखतात, एवढ्या आनंदातच त्यांची कधी होते, ते कळतही नाही. अगदी तालुका स्तरावरच्या नेत्यांची नावेही पवारांच्या डोक्यात असतात. माणसं जोडण्याची कला त्यांना अवगत आहे.

पवारांना वाचनाची आवड आहे. त्यांच्या वैयक्तिक संग्रहात नवीन आलेली पुस्तकंही आढळतात. मुंबईत पु.ल. देशपांडे

भवन उभारण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. यशंतराव चव्हाण यांच्या स्मृत्यर्थ उभारलेल्या चव्हाण सेंटरतर्फे अनेक सांस्कृतिक व साहित्यिक कार्यक्रम होतात, कारण त्याची प्रेरणा शरद पवार आहेत. पवारांमुळेच साहित्य क्षेत्रातील अनेक चांगली मंडळी राजकारणात आली. ना.धों. महानोर, लक्ष्मण माने व रामदास फुटाणे यांची उदाहरणं समोर आहेत.

शरद पवार हा नेता कोणाच्या पोटी जन्मल्याने नव्हे तर माणसांनी उभा केलेला नेता आहे. माणसांच्या गोतावळ्यातून, मित्रांच्या मैफिलीतून, मातीतील हितसंबंधातून सेंद्रिय पद्धतीने आकार घेतलेला हा नेता आहे, असे जे पत्रकार संजय आवटे म्हणतात, ते योग्यच आहे. अवघ्या महाराष्ट्राला शरद पवार या नावाचे अप्रूप आहे. राजकारण नावाची गोष्ट महाराष्ट्राला शिकवली ती या नावाने. कोणत्याही मैफिलीत जेव्हा अन्य विषय नसतात, कोणत्याही विषयाने मैफिल खुलत नाही तेव्हा कोणीतरी हे नाव उच्चारते आणि मैफिलीत रंग भरू लागतात. या नावाबद्दल टोकाची मते असू शकतात पण दोन्ही टोकांना त्याविषयी चर्चेत तेवढाच रस असतो. मराठी माणूस तसा ‘स्थितप्रज्ञ’ आणि ‘ठेविले अनंते’ जातकुळीतला; पण त्याचा राजकारणातला रस वाढला तो शरद पवार या नावाने. 38 व्या वर्षी एखादा नेता मुख्यमंत्री होणे हा लोकांसाठी तेव्हा एखादा चमत्कारच होता. खेळाच्या कोणत्याही चौकटीत स्वतःचे नियम स्वत: तयार करणारा हा नेता. त्याचे गुणही कसे तर हमीद दलवाईंसारख्या सुधारकांची पाठराखण केल्याने व्होट बँक जाईल, हे ठाऊक असूनही त्यांची सोबत

करणारा, ओमर अब्दुल्लांना मानसपुत्राचं प्रेम देणारा, मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव देण्यासाठी किंमत चुकवणारा, पंचायत राज व्यवस्थेत महिलांच्या आरक्षणात सारी सरंजामशाही पुरुषसत्ताक व्यवस्था दुखावणार हे माहीत असूनही तो निर्णय घेणारा, व्यक्तिगत आयुष्यात एका मुलीवर नसबंदी करून घेणारा, हातात गंडादोरा नसणारा, कर्मकांड वगैरे काहीही न मानणारा, गोविंद तळवळकरांपासून महानोरांपर्यंत, अंबानींपासून नारळीकर आणि अगदी पु.ल. नि सुनीताबाईंपर्यंत सर्वांशी मैत्री असणारा हा नेता.

तुम्ही कोणत्याही अडचणी सांगा, कोणतेही पीक सांगा, शरद पवार तुम्हाला औषध सांगतील. ते असे एक गाव सांगा, ज्या गावातला किमान एक माणूस ते सांगू शकणार नाहीत! दिल्लीत राजकारण करताना एका रात्री सोमेश्वर साखर कारखाना ताब्यात घेणाऱ्या पवारांचा आवाका किती विलक्षण आहे, हे वेगळे सांगायची गरज नाही. एखादा चमत्कार वाटावा अशी स्मरणशक्ती! एकाच वेळी सगळ्या आघाड्यांवर काम करण्याची शक्ती आणि युक्ती. हे सगळं असाधारण आहे. शरद पवारांनी राजकारणाला करियरचं वलय निर्माण करून दिलं. राजकारण करणारा असाधारण नेता अशी त्यांची प्रतिमा उभी राहिली.

1989 ते 1996 हा काळ पवारांची कठोर परीक्षा पाहणारा होता. मुंबई बॉंब स्फोट, किल्लारीचा भूकंप, गोवारी मोर्चातील चेंगराचेंगरी या बाबी क्लेशकारक होत्या. याच काळात त्यांना भूखंड घोटाळा, दाऊदशी संबंध, गुन्हेगारांना दिल्या गेलेली

उमेदवारी, लवासा जमीन प्रकरण अशा आरोपांमध्ये गोवण्यात आले. मात्र त्यांच्यावर कोणतेही आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत.

2014 च्या लोकसभेने सगळी सूत्रं फिरली. नरेंद्र मोदींनी राजकारणाची सगळी स्पेस घेऊन टाकली. शरद पवारांच्या पक्षाची फार कठीण अवस्था झाली; पण शांतपणे कायम लढत राहण्याच्या त्यांच्या स्वभावाने त्यांनी यावर मात केली. असाध्य आजारावर मात करणाऱ्या विजिगिषु वृत्तीने स्वतःला सावरत पवार नव्या व्यवस्थेत महत्त्वाचे घटक ठरले. त्यांच्या अमृत महोत्सवाला मोदींपासून सर्वच मोठमोठ्या नेत्यांनी हजेरी लावावी, यातच सारे आले. 2014 च्या विधानसभा निवडणुकीत दारूण पराभव होऊनही भाजपला पाठिंबा देण्याच्या राजकीय खेळीचा वापर करत त्यांनी स्वतःचे महत्त्व कायम ठेवले. 2019 मध्ये स्वत:च्या पक्षाचे 54 आमदार निवडून आणून काँग्रेसचेही 44 आमदार निवडून आणून स्वत:च्या खेळीने 106 जिंकणाऱ्या भाजपला सत्तेपासून दूर ठेवत वैचारिकदृष्ट्या कुठलेही साम्य नसणाऱ्या 56 जागा जिंकणाऱ्या हिंदुत्ववादी शिवसेनेसोबत सरकार स्थापन केले. हा चमत्कार पवारच करू शकतात.

पवारांचे कुटुंब स्वातंत्र्य चळवळीतून पुढे आलेले आहे. घरात समाजवादाचा विचार होता. राजकारण, समाजकारण करीत यशाच्या अनेक पायऱ्या पवार चढले आणि त्यांनी मागे वळून पाहिले नाही. पॅशन आणि निष्ठा यापेक्षाही पवार राजकारणाच्या विचित्र खेळात अडकत गेले. रोजच्या नव्या चालींनी स्वतःवरच खुश होत गेले. कार्यकर्ते टाळ्या पिटत गेले. खेळाचे प्रयोजनही ते

स्वतः विसरून गेले की काय असा प्रश्न काही वेळा पडतो. त्यांचे माणसं जोडण्याचे आकडे मोठे होत गेले. हळूहळू निवडणुका जिंकून देणारा कप्तान म्हणून नेते, कार्यकर्ते त्यांच्याभोवती जमा झाले. 2014 ची निवडणूक हातातून निसटली तेव्हा त्यांनी सावध व्हायला हवे होते. हा कप्तान आता जिंकून देऊ शकत नाही ही खात्री पटताच अनेक सोबती अजिंक्य संघात गेले आणि पवार एकटेच राहिलेत का, असा प्रश्न विचारला जाऊ लागला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांनी स्थापन केला तेव्हा टीकाकार म्हणत होते की, चला आता एक तरी पक्ष स्थापन झाला जो पवार फोडू शकणार नाहीत; पण हाही पक्ष फुटला. मात्र 2019 च्या विधानसभा निवडणुकांदरम्यान भर पावसातल्या आणि पायाच्या दुखण्यातही भिंगरीप्रमाणे सतत फिरून घेतलेल्या सभांनी 79 वर्षांचा शरद पवार नावाचा म्हातारा तरुणांनाही लाजवून गेला.

प्रश्न हाच शिल्लक राहतो की शरद पवारांनी राज्याच्या आणि राष्ट्राच्या राजकारणात किंवा समाजकारणात जी किमया साधली ती पुढे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील कोणी नेता साधू शकणार आहे का? अजितदादांचे बंड होते की शरद पवारांची खेळी, हा कायम अनुत्तरित राहणारा प्रश्न जरी बाजूला ठेवला तरी भविष्यात काय घडणार आहे? सुप्रिया सुळे राष्ट्रवादीचे नेतृत्व करतील का? सध्या जुन्या पिढीचे नेते राष्ट्रवादीत अधिक आहेत. अजितदादांचे निकटवर्तीय असलेले धनंजय मुंडेंसारखे पुढच्या पिढीचे नेते हा पक्ष एकसंघ ठेवू शकतील का? असे प्रश्न तर आहेतच; पण शरद पवार हे राजकारणातले वादळ स्वत:हून आले

आणि स्वत:हूनच त्यांनी निर्माण केलेले राजकारण ते संपवून तर जाणार नाहीत, जसे त्यांनी निर्माण केलेले पक्ष कालानुरूप विलीन केले अगदी तसेच, अशी शंका वाटते. त्यांनी राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात मांडलेला सारीपाट त्यांच्याच नियमांनी, त्यांच्याच फास्यांनी आणि त्यांच्याच चालींनी खेळला गेला. आता आपण खेळात परत जिंकू शकत नाही, अशी परिस्थिती आल्यावर त्यांचा हा सारीपाट तेच मोडूनतोडून तर टाकणार नाहीत?

असे असले तरी त्यांनी इतिहास घडवला. 'दि पॉवर ऑफ पवार' कधीच कोणी नाकारू शकणार नाही आणि त्यांच्यासारखा द्रष्टा नेताही परत होणे नाही. त्यांचं राजकारण मग ते 'कात्रजचा घाट' दाखवणारं असलं तरी सतत चर्चिल्या जाणारच आहे. ते बाजूला ठेवलं तरी त्यांचं भव्यदिव्य असं समाजकारण तर नक्कीच अजरामर ठरणार आहे. ते कधीच नष्ट होऊ शकत नाही आणि त्याचप्रमाणे जनसामान्यांशी त्यांनी जोडलेली नाती - ती मात्र माणसांच्या हृदयात तशीच घर करून राहणार आहेत, अखेरपर्यंत!

❒❒❒

समाप्त

# डॉ. पवन मांडवकर

एम.ए. (मराठी, इंग्रजी), बी.एड., पीएच.डी., नेट
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ 445 401
अध्यक्ष, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
कार्यकारिणी सदस्य, अमरावती विद्यापीठ प्राचार्य फोरम
मराठी अभ्यास मंडळ सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
विविध संस्थांचे, ग्रंथालयांचे पदाधिकारी व नॅक असेसर

## प्रकाशित पुस्तके

बालकथा — गाढव गोष्टी, झंपू, गंमतगोष्टी, संस्कारशील श्याम, गौरीची दिवाळी

कादंबऱ्या — डेड लॉक, विरह, अपूर्ण संघर्ष, मी अनामिका बोलतेय, दीपशिखा

कथासंग्रह — दामूअण्णा (विनोदी), ब्यांड मास्तर (उत्कृष्ट कथासंग्रह म्हणून राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त), परीचे पंख

लेखसंग्रह — आनंदाचे डोही, दु:खाचा तरंग

काव्य — प्रेम कविता, किलबिलाट (बालकाव्य) (साहित्य संस्कृती मंडळ अनुदानित)

अभ्यासात्मक/संशोधनात्मक/संदर्भग्रंथ — झटपट शुद्धलेखन, झटपट पत्रलेखन, झटपट मराठी शुद्धलेखन, ठळक शुद्धलेखन, झटपट निबंध, दया पवार, अर्वाचीन मराठी कविता : १८८५ ते १९३५ : एक दृष्टिक्षेप, बहिणाईची गाणी : सौंदर्य आणि समीक्षा, दया पवार : वाङ्मयदर्शन आणि चिकित्सा (यूजीसी अनुदानित प्रबंध), दलित कथा आणि विटाळ, महाविद्यालयीन कार्यप्रणाली

संकीर्ण — धमाल वार्ता, छान छान नावे बाळांची, एका रखेलीची (आत्म)हत्या!, वास्तुशास्त्रातील ठळक संकेत, हसणावळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या

अनुभव/आठवणी/माहितीपर – अण्णा हजारेंचे राळेगणसिद्धी, सद्दाम हुसैन, शरद पवार, शरद जोशी
संशोधनपर धार्मिक – शनिशिंगणापूर, श्री क्षेत्र चिंतामणी कळंब, वैदर्भीय अष्टविनायक, श्री क्षेत्र माहूरगड, कथा पुंडलिकाची
ग्रंथ संपादन – घरगुती व्यवसाय (शालेय जीवनात केलेले पहिले संपादन), ओंजळ (प्राति. काव्यसंग्रह), गंधाली (प्राति. चारोळीसंग्रह), सिंधू (गौरवग्रंथ), मराठी प्राध्यापक सूची, दलित, ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य, संत साहित्य
नियतकालिके संपादन – आदर्श (त्रैमासिक हस्तलिखित)(शालेय जीवनात दोन वर्ष चालवलेले नियतकालिक), ज्ञानदीप (अमरावती विद्यापीठ शिक्षण महाविद्यालय वार्षिकांक १९९४–९५), मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका, रिसर्च जर्नल ऑफ इंडिया, विविध महाविद्यालयांच्या जर्नल्सच्या संपादन/सल्लागार मंडळावर.

## पुरस्कार

विदर्भ संत साहित्य संमेलन अंजनगावसूर्जी – २००१ सन्मान पत्र, आध्यात्मिक सहजसमाधी विश्वविद्यापाठाचा आचार्य काव्यरत्न पुरस्कार – २००४, म. ज्योतिबा फुले शिक्षाविद पुरस्कार – चतुर्थ अखिल भारतीय प्रतिभा सम्मान पुरस्कार समारोह, इन्दौर –२००७, साहित्य गौरवपत्र – साहित्यप्रेमी सार्वजनिक वाचनालय, इस्लामपूर, २००७, सर्वोत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार – ब्यांड मास्तर – साहित्यप्रेमी सार्वजनिक वाचनालय, इस्लामपूर, २००७

❑❑❑